



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार २० सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४





# दुष्काळाच्या बैठकीत नेत्यांचा काजू, बदामावर ताव



**नांदेड / प्रतिनिधी-** मराठवाड्यातील शेतकरी दुष्काळाच्या संकटाने होरपळत असताना, नांदेडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दुष्काळी आढावा बैठकीत नेत्यांमध्येच जोरदार शाब्दिक खडाजंगी झाल्याचे समोर आले आहे. शेतक-यांच्या ज्वलंत प्रश्नांवर चर्चा करून त्यावर उपाययोजना करण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीत नेत्यांनी काजू बदामावर ताव मारला. याबाबतचा व्हीडीओ व्हायरल झाल्याने शेतक-यांसह सामान्य नागरिकांमधून नेत्यांविषयी तीव्र संताप व्यक्त होत आहे.

नांदेड येथील वातानुकूलित नियोजन भवनाच्या थंडगार कक्षात आठ जिल्ह्यांसाठी ही आढावा बैठक पार पडली. मराठवाड्यातील अनेक भागांत शेतकरी दुष्काळाच्या झळा सोसत आहेत. पिकांचे नुकसान, पाण्याची टंचाई, पीकविमा, कर्जाचा प्रश्न आणि नुकसानभरपाई अशा अनेक समस्यांनी शेतकरी त्रस्त असताना, या प्रश्नांवर ठोस चर्चा होणे अपेक्षित होते. बैठकीच्या सुरुवातीला राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुष्पगुच्छ आणि सत्कार स्वीकारण्यास नकार देत साधेपणाचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतर बैठकीतील वातावरण काही वेळातच बदलले.

दुष्काळी परिस्थितीवर चर्चा सुरू असताना नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या. शेतक-यांच्या अडचणींवर चर्चा करून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याऐवजी बैठकीत वैयक्तिक आणि राजकीय मुद्द्यांवरून वाद झाल्याचे चित्र समोर आले. या बैठकीत काही नेते आणि लोकप्रतिनिधींमध्ये काजू-बदाम तसेच इतर खाद्यपदार्थांच्या मुद्द्यावरूनही टोलेबाजी झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे दुष्काळी आढावा बैठक नेमकी शेतक-यांच्या प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी होती की नेत्यांच्या आरोप-प्रत्यारोपांसाठी, असा सवाल उपस्थित केला जात आहे. यावेळी उर्जा, पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, खासदार रामराव वडकुते, खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, खासदार संजय चव्हाण, खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार सर्वश्री. हेमंत पाटील, अमरनाथ राजूरकर, सईद खान, कैलास पाटील, बाबूराव



कदम कोहळीकर, भिमराव केराम, राजेश पाटील, राजू नवघरे, प्रताप पाटील चिखलीकर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मणी, कृषी आयुक्त सुरज मांढरे, उपायुक्तरिता मैत्रेवार, वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होत्या. तर खासदार अशोकराव चव्हाण, खासदार अजित गोपछडे, खासदार ओमराजे निंबाळकर, खासदार बजरंग सोनवणे, खासदार डॉ. कल्याण काळे यांच्यासह विविध विधानसभा मतदार संघातील आमदार दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

**पीक नुकसानग्रस्त शेतक-यांच्या मदतीसाठी शासन कटिबद्ध :** भरणे

नांदेड : मराठवाड्यासह राज्यात अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले असून, पावसात खंड पडल्याने शेती पिकांवर परिणाम झाला आहे. संकटग्रस्त शेतक-यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई व मदत मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील. पीक विम्याचा लाभ अधिकाधिक शेतक-यांना मिळण्यासाठी मुदतपूर्व पीक कापणी प्रयोग काळजीपूर्वक व अचूकपणे तातडीने पूर्ण करावेत. असे निर्देश राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज आयोजित बैठकीत दिले.

नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील आठही जिल्ह्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीचा आढावा कृषी मंत्री भरणे यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते.



बैठकीत खाण्यापेक्षा बांधावर खा!:हिंगोलीत संतप्त शेतक-यांनी कृषिमंत्र्यांनाच दिली काजू-बदामाची प्लेट

## ◆ 'काजू-बदाम खायेंगे, दुष्काळ पाहणी करेंगे!' ◆

***वसमत (जि. हिंगोली)*** *: तालुक्यातील टाकळगाव शिवारात पिकांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आलेले राज्याचे कृषी मंत्री दत्ता भरणे यांना शेतकरी आणि आंदोलकांच्या तीव्र आक्रोशाला सामोरे जावे लागले. पाहणी दौरा आटोपून ताफा पुढे निघताच 'शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समिती'च्या संतप्त कार्यकर्त्यांनी मुख्य रस्त्यावर उतरून कृषी मंत्र्यांचा ताफा अडवला. 'शक्तीपीठ महामार्ग रद्द करा' आणि 'काजू-बदाम खायेंगे, दुष्काळ पाहणी करेंगे' अशा उपरोधिक घोषणाबाजीमुळे घटनास्थळी काही काळ मोठा तणाव निर्माण झाला होता. अखेर पोलिसांनी वेगाने हस्तक्षेप करत ताफ्याला वाट मोकळी करून दिली.१९ सप्टेंबर रोजी दुपारी ३:४० वाजेच्या सुमारास कृषी मंत्री दत्ता भरणे, खासदार रामराव वडकुते आणि आमदार राजू नवघरे यांच्यासह वरिष्ठ अधिका-यांचा ताफा टाकळगाव शिवारात सोयाबीन पिकाची पाहणी करण्यासाठी दाखल झाला होता. पाहणीदरम्यान उद्धवसेनेचे जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सतीश महागावकर, तुषार जाधव, तानाजी भोसले यांच्यासह संघर्ष समितीच्या पदाधिका-यांनी कृषी मंत्र्यांना घेराव घालून निवेदन दिले. शेतक-यांच्या जमिनी उद्ध्वस्त करणारा प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग तातडीने रद्द करावा आणि तालुक्यात दुष्काळ जाहीर करून शेतक-यांना तत्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान, कृषिमंत्र्यांच्या नांदेड येथील आढावा बैठकीत आमदार, खासदार सुकामेवा खात असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने आंदोलकांनी कृषी मंत्र्यांना उपरोधिकपणे पत्रावळीत काजू-बदाम देण्याचा प्रयत्न केला.*



### शेतक-यांच्या जखमेवर मीठ चोळले : दानवे



विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या प्रकारावरून सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. राज्यात शेतकरी पाण्याअभावी, विजेअभावी आणि पिके जळाल्यामुळे हवालदिल झाला आहे. कर्जाच्या विळख्यात शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाउल उचलत असताना, दुष्काळाच्या बैठकीत बसून काजू-बदाम चघळणे म्हणजे शेतक-यांच्या दुःखाची क्रूर थट्टा आहे. शेजारच्या कर्नाटक सरकारने तत्काळ निर्णय घेत दुष्काळ जाहीर केला; परंतु महाराष्ट्रातील निष्क्रिय सरकार केवळ बैठकांचे सोपस्कार करत मुहूर्त शोधत बसले आहे. सरकारने तोंडदेखलेपणा बंद करून तातडीने दुष्काळ जाहीर करावा असे अंबादास दानवे म्हणाले.

### शेतक-यांची दुःखी, खिन्न अवस्था : सुषमा अंधारे

मराठवड्यातला शेतकरी कोणत्या परिस्थितीतून जातोय. दुष्काळ जाहीर करण्यासाठी कसल्या बैठक घेता? रेस्ट हाउसवर बसून कसल्या बैठका करता, धरणं कोरडी पडली आहेत.रात्रीचा काही जिल्ह्यात तुरळक पाउस पडला आहे. मुख्यमंत्र्यांनी तात्काळ दुष्काळ जाहीर करण्याची भूमिका का घेउ नये? चमकोगिरी हे मंत्री करतायत. शेतकरी दुःखी, खिन्न अवस्थेत असताना त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचं काम हे शिंदेंचे मंत्री करत आहेत अशा शब्दात शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी टीका केली.

### काजू-बदामावर मुख्यमंत्र्यांची नाराजी



***मुख्यमंर्त्यांनी प्रशासनाच्या ढिसाळपणावर नाराजी व्यक्तकेली. ते म्हणाले, शासकीय बैठकांमध्ये ड्रायफ्रूट्स ठेवण्याची प्रशासनाची एक पारंपरिक पद्धत असते, पण अशा गंभीर विषयांच्या बैठकीत या गोष्टी नक्कीच टाळल्या पाहिजेत. कोणी मुद्दाम दुष्काळात असे केले असे म्हणणे चुकीचे ठरेल, तरीही अधिका-यांनी आणि प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून संवेदनशीलता बाळगलीच पाहिजे.***

### सत्ताधारी आणि विरोधकांकडून प्रशासनावर हल्लाबोल



***नांदेडच्या प्रशासनाला अजिबात अक्कल किंवा भान उरलेले नाही का? आपण कोणत्या विषयावर चर्चा करत आहोत आणि तिथे कसे वागले पाहिजे, याचे साधे ज्ञान अधिका-यांना असायला हवे. अधिकारी अशा चुका करतात आणि त्याचा नाहक मनस्ताप आम्हाला सहन करावा लागतो.***

*◆ संजय शिरसाट (सामाजिक न्याय मंत्री):*



***राज्यभरात बळीराजा दुष्काळाने होरपळतोय आणि सरकार मात्र बैठकांमध्ये काजू-बदाम खाण्यात मस्त आहे. या सरकारला शेतक-यांच्या प्रश्नांशी काहीही देणेघेणे राहिलेले नाही. सरकारने तात्काळ विशेष अधिवेशन बोलावून दुष्काळावर सविस्तर चर्चा करावी आणि शेतक-यांना थेट मदत जाहीर करावी. पावसाळ्याच्या दिवसांत सरकारने दुष्काळ सर्वेक्षणाची कोणतीही प्रक्रिया पूर्ण केली नाही, हे अत्यंत दुर्दैवी आहे.***

*◆ रोहित पवार आमदार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष)*



# केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकार शेतक-यांना तातडीने मदत देणार

**नागपूर/प्रतिनिधी :** पुढच्या आठवड्याभरात नुकसानीचा प्राथमिक आढावा घेउन पंचनाम्यानंतर तातडीची मदत शेतक-यांना करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (ता.१९) दिली आहे. नागपूर येथील पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी त्यांनी राज्यातील दुष्काळाच्या परिस्थितीबाबत माहिती दिली.मुख्यमंत्री बोलताना म्हणाले की, 'राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाचा खंड पडल्याने पिकांचं नुकसान होत आहे. तर अनेक ठिकाणी उतारा कमी येईल, अशी परिस्थिती आहे. याचा आढावा घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. मंत्रिमंडळ बैठकीत सर्वच मंत्र्यांनी चर्चा करून आपापल्या जिल्ह्यांत आढावा घेण्यासाठी निर्देश दिले आहेत. पुढच्या आठवड्याभरात प्राथमिक आढावा घेउ. त्यानंतर पंचनामे करून तातडीची मदत जाहीर करू.' असंही त्यांनी स्पष्ट केलं.



### दुष्काळावर मुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही

अतिरिक्तवीज पुरवठा-यावेळी जनावरांचा चारा आणि पाणी टंचाईसह शेतक-यांच्या वीजपुरवठ्याची माहिती मुख्यमंर्त्यांनी दिली. ज्या शेतक-यांच्या विहिरीत पाणी आहे, त्या शेतक-यांना पिकं वाचवता येतील, यासाठी अतिरिक्त वीजपुरवठा करण्यात येत आहे. संध्याकाळच्या वेळी शेतक-यांना अतिरिक्त वीज मिळावी यासाठी तजवीज केली असून सर्वच भागांत जास्तीची वीज देण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं.तसेच काही ठिकाणी सिंगल फेजमुळे वीज दिली जात नव्हती, त्या ठिकाणी वीज पुरवठा करण्याचे निर्देश दिले आहेत. तर दुष्काळी उपाययोजना शेतक-यांना किमान काही ना काही दिलासा देउ, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

**विरोधकांनी राजकारण करू नये-** राज्यातील पावसाचा खंड लक्षात घेउन राज्य सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी⇨(पान २ वर)

# युपीआय शुल्काचा पेट्रोल पंपांवर परिणाम; रोख व्यवहारावर भर

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** केंद्र सरकारने १५ ऑक्टोबरपासून २,००० पेक्षा जास्त रकमेच्या वढक व्यवहारांवर ०.४% मर्चंट डिस्काउंट रेट (युपीआय एमआरडी ) लागू करण्याची घोषणा केली आहे. तथापि, युपीआय एमआरडी शुल्क लागू होण्यापूर्वीच, त्याचा लक्षणीय परिणाम जाणवू लागला आहे. या शुल्कामुळे पेट्रोल पंपांवर आता एक वेगळेच चित्र दिसत आहे. अनेक पेट्रोल पंपांवर रोख पेमेंटचे पोस्टर्स लावण्यात आले आहेत आणि पेट्रोल व डिझेल भरण्यासाठी येणा-या ग्राहकांना २,००० हजारा पेक्षा जास्त पेमेंट न करण्यास स्पष्टपणे सांगितले जात आहे. इतकेच नाही तर, ग्राहक इंधनासाठी ऑनलाइन पेमेंट घेणेही टाळत आहेत. ऑनलाइन ⇨(पान २ वर)






# टीईटीची फुटलेली प्रश्नपत्रिका 1 लाख रूपयांना , धक्कादायक माहिती समोर

**मुंबई/ प्रतिनिधी-** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेच्या (टीईटी) पेपरफुटी प्रकरणात १६ आरोपींविरोधात भिवंडी न्यायालयात तब्बल ३५०० पानांचे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. ठाणे शहर पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रात पेपरफुटीची धक्कादायक माहिती देण्यात आली आहे. फुटलेली प्रश्नपत्रिका १ लाख रुपयांपर्यंत विकत घेण्यास तयार झालेल्या उमेदवारांकडून त्यांच्या गुणपत्रिका आणि इतर शैक्षणिक कागदपत्रे सुरक्षा म्हणून घेण्यात आले होते. प्रश्नपत्रिकेचे पैसे भरल्यानंतरच कागदपत्रे परत केली जाणार होती, अशी माहिती समोर आली आहे.परीक्षा दिल्यानंतर फुटलेली प्रश्नपत्रिका खरी होती का, हे तपासूनच उमेदवार पैसे देणार होते. त्यामुळेच मूळ कागदपत्रे ताब्यात ठेवण्याची शक्कल लढवली गेली. फुटलेली प्रश्नपत्रिका ८० हजारांपासून ते १ लाख रुपयांपर्यंत वेगवेगळ्या दरांनी विकल्या गेल्याची माहिती या वृत्तात देण्यात आली आहे.या प्रकरणातील एकूण १८ आरोपींपैकी १६ जणांना अटक करण्यात आली आहे. आरोपपत्रातील माहितीनुसार, अटकेत असलेला आरोपी प्रकाश पवारने दिल्लीतील फरार आरोपी अशोककुमार साओची भेट घेतली आणि २६ उमेदवारांचे मूळ शैक्षणिक कागदपत्रे त्याच्या हवाली केले. ही कागदपत्रे नंतर आणखी एका आरोपीच्या घरातून पंचनाम्या दरम्यान जप्त करण्यात आली.फुटलेली प्रश्नपत्रिका परीक्षेला येउनही उमेदवार किंवा एजंट नंतर पैसे देण्यासाठी टाळाटाळ करत असत. यातून मार्ग काढण्यासाठी आरोपी⇨(पान २ वर)




# तिरूपतीत लाडू बनवण्यासाठी; तुपाऐवजी पाम तेलाचा वापर

**हैदराबाद / वृत्तसंस्था-** देश-विदेशातील लाखो भक्तांची श्रद्धा असलेल्या तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसिद्ध लाडू प्रसाद तयार करण्यासाठी शुद्ध तुपाऐवजी पाम तेलाचा वापर होत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने मोठी कारवाई करत सुकृती फूड्सचे प्रमोटर कैलास चंद मंगला यांना अटक केली आहे.

ईडीच्या हैदराबाद विभागाने मनी लाण्डरिंग प्रकरणी ही कारवाई केली असून न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे. तिरुपती देवस्थानमला अगमार्क स्पेशल ग्रेड गायीचे तूप म्हणून पुरवठा केला जात होता. मात्र, प्रत्यक्ष तपासात हे तूप रिफाइंड पाम तेल, पाम कर्नल तेल, पालमोलीन आणि विविध रसायनांच्या मिश्रणातून तयार केले जात असल्याचे उघडकीस आले आहे. यामध्ये एम-९०, मोनोग्लिसराइड्स, मायव्हासेट साफ्ट ४०० आणि ॲसिटिक ॲसिड एस्टर या घातक घटकांचा समावेश होता. तपास यंत्रणेनुसार २०१९ ते २०२४ या काळात तिरुपती देवस्थानला सुमारे २३० कोटी रुपयांच्या बनावट तुपाचा पुरवठा झाला आहे. यातील एकट्या कैलास मंगला याने आपल्या कारखान्यात ९६ कोटी रुपयांचे भेसळयुक्त तूप बनवल्याचा आरोप आहे. मंगला याने भेसळीचे साहित्य मिळवून देउन स्वतःच्या कारखान्यात हे बनावट तूप तयार केले. कैलास मंगला याने हे भेसळयुक्त तूप थेट न पाठवता विविध शेल कंपन्यांच्या आडून देवस्थानला पोहोचवले. यामध्ये श्री वैष्णवी डेअरी स्पेशालिटीज, मलगंगा मिल्क अँड ॲग्रो प्राडक्ट्स आणि ए.आर. डेअरी फूड्स या कंपन्यांचा समावेश होता. एवढेच नाही तर रिफाइंड पाम तेल आणि तुपाच्या खरेदी-विक्रीची खरी माहिती लपवण्यासाठी मंगला याने खोट्या नोंदी आणि बनावट कागदपत्रे तयार केली होती.



# ‘The Nurtured Womb’ पुस्तकाचे अकोल्यात प्रकाशन

## २२ वर्षांच्या Prenatal Nurturing प्रवासाला पुस्तकाचे रूप



**अकोला/प्रतिनिधी:-** Saras Prega World च्या संस्थापक डॉ. ऐश्वर्या एस. अंबाडेकर यांच्या ‘The Nurtured Womb’ या पुस्तकाचे प्रकाशन Akola OBGY Associationच्या वतीने आयोजित कार्यक्रमात डॉ. संध्या जोशी मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.

गर्भावस्थेतील आईचे भावविश्व, आई-बाळातील भावनिक नाते आणि Prenatal Nurturing या संकल्पनेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हे पुस्तक साकारण्यात आले आहे. डॉ. अंबाडेकर यांनी गेल्या २२ वर्षांपासून Prenatal Nurturing, Fetal Programming, GaRhasanskar आणि maternal well-being या विषयांवर अभ्यास व कार्य केले आहे.

‘हे पुस्तक अशा हातांनी प्रकाशित व्हावे, जे या जगात नव्या आणि सुंदर जीवांचे स्वागत करतात, हे माझे पुस्तक सुरू केल्यापासूनचे स्वप्न होते. डॉ. संध्या जोशी मॅडम यांच्या हस्ते आज ते पूर्ण झाले, हा माझ्यासाठी अत्यंत भावनिक क्षण आहे,’ अशी भावना डॉ. अंबाडेकर यांनी व्यक्त केली.

यावेळी त्यांनी Akola OBGY Associationचे अध्यक्ष, संपूर्ण association आणि coordinator team यांचे विशेष आभार मानले. तसेच आपल्या २२ वर्षांच्या प्रवासात मोलाचे मार्गदर्शन आणि पाठबळ दिल्याबद्दल डॉ. रेखा पाटील मॅडम यांचे विशेष आभार व्यक्त केले.

‘The Nurtured Womb’च्या माध्यमातून सुरू झालेला हा विचार पुढे ‘Womb Peace Movement’च्या रूपाने व्यापक करण्याचा डॉ. अंबाडेकर यांचा संकल्प आहे. यासाठी स्त्रीरोगतज्ज्ञ, आरोग्यतज्ज्ञ, रुग्णालये आणि समाजाने एकत्र येऊन मातांसाठी काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. ‘प्रवास एका व्यक्तीपासून सुरू होतो; पण परिवर्तनासाठी आपण सर्वांनी एकत्र चालणे आवश्यक आहे,’ असे डॉ. अंबाडेकर यांनी सांगितले.

# महावितरणचे अमरावती परिमंडळात जनजागृती व प्रबोधन

## एकाच दिवशी २७ हजार विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षा आणि ऊर्जा बचतीवर मार्गदर्शन

**अमरावती/प्रतिनिधी:-** गणेशोत्सव हा ’राज्य महोत्सव’ म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहात साजरा होत असतानाच, महावितरणच्या अमरावती परिमंडळाने अनोख्या जनजागृती उपक्रमाचे आयोजन केले. १५ सप्टेंबर रोजी ’राष्ट्रीय अभियंता दिना’चे औचित्य साधून परिमंडळातील महावितरणच्या अभियंत्यांनी एकाच दिवशी परिमंडळातील १७९ शाळा / महाविद्यालयात जावून २७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षा आणि ऊर्जा बचतीतीबाबत मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. महावितरणतर्फे ’हरित ऊर्जा आणि विद्युत सुरक्षेच्या माध्यमातून ऊर्जा स्वातंत्र्याकडे वाटचाल’ या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम राबवण्यात येत आहे. मुख्य कार्यालयाचे निर्देश आणि मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती जिल्ह्यातील ८७ आणि यवतमाळ जिल्ह्यातील ८९ अशा एकूण १७६ शाळा व महाविद्यालयांमध्ये हा थेट संवाद कार्यक्रम पार पडला. यात एकूण २७ हजार ६३६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



या उपक्रमादरम्यान महावितरणच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना वीज अपघातांची कारणे, दरवर्षी होणाऱ्या दुर्घटना आणि त्यामुळे संबंधित कुटुंबांवर ओढवणारे आर्थिक व सामाजिक संकट याविषयी सविस्तर माहिती दिली. ओल्या हाताने विजेच्या उपकरणांना स्पर्श करणे, चालू कुलरमध्ये पाणी भरणे, तुटलेल्या वीज वाहिन्यांना हात लावणे, आकडे टाकून अनधिकृत वीज वापरणे तसेच कपडे वाळत घालण्यासाठी वीज खांबांना तारा बांधणे, अशा अनावधानाने घडणाऱ्या चुकांमुळे होणाऱ्या अपघातांची विविध उदाहरणे देत विद्यार्थ्यांना सतर्कतेचे उपाय समजावून सांगण्यात आले. सोबतच ही माहिती पालकांपर्यंत आणि समाजात पोहोचवण्याचे आवाहनही करण्यात आले.

याशिवाय, वीज बचतीला प्रोत्साहन देण्यासाठी पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजना, महावितरणच्या विविध स्मार्ट योजना आणि हरित ऊर्जा धोरणाची माहिती देण्यात आली. यामध्ये ई-व्ही धोरण, ’गो ग्रीन’ योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना व सौर कृषी पंप योजनेच्या माध्यमातून ऊर्जा स्वातंत्र्याकडे सुरू असलेल्या वाटचालीचा आढावा घेण्यात आला.या उपक्रमादरम्यान महावितरणच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना वीज अपघातांची कारणे, दरवर्षी होणाऱ्या दुर्घटना आणि त्यामुळे संबंधित कुटुंबांवर ओढवणारे आर्थिक व सामाजिक संकट याविषयी सविस्तर माहिती दिली.

या संपूर्ण मोहिमेत शाखा अभियंत्यांपासून ते कार्यकारी अभियंत्यांपर्यंत एकूण १७३ अभियंत्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी स्वत: कार्यकारी अभियंता बिपीन श्रीराव सोबत अमरावती येथील मार्डी रोडवरील नॅशनल असोसिएशन वेल्फेअर फॉर फिजीकल हॅंडिकॅप या संस्थेत उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि या जनजागृती मोहिमेत योगदान दिले.

# १ व १० वरिल उर्वरित

## केंद्राच्या मदतीची वाट न

केली जात आहे. यावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना राजकारणाची वाईट सवय लागल्याची टीका केली. तसेच दुष्काळाच्या मुद्द्यावर राजकारण करू नये, असे आवाहनही केले.दुष्काळाच्या संदर्भातील शासन निर्णय विरोधकांच्या काळातही तेच होते. त्या शासन निर्णयाप्रमाणे कधी काय करायचं याचे नियम आहेत. त्याचं पालन केलं तरच एनडीआरएफचे पैसे मिळतात, असेही मुख्यमंत्री म्हणाले.एकीकडे एनडीआरएफच्या नियमांचं पालन करत आहोत. परंतु दुसरीकडे न थांबता राज्य सरकारच्या वतीने मदत करतो. त्यानंतर एनडीआरएफच्या नियमानुसार दावा करतो. हे जूनचे आदेश असून नवीन नाहीत. विरोधकांना प्रत्येक गोष्टीचं राजकारण करण्याची वाईट सवय लागली आहे. त्यामुळे केवळ राजकारण करणं यावर योग्य नसल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. दुष्काळाच्या मदतीसाठी राज्य सरकार केंद्राला प्रस्ताव पाठवणार असून त्याचे प्रस्ताव ५ ऑक्टोबरनंतरच्या पंचनाम्यानुसार द्यावे लागतील, असा पुनरु च्चारही मुख्यमंत्र्यांनी केला. परंतु केंद्र सरकारच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारच्या संसाधनातून मदत करते. त्यानंतर केंद्राची मदत घेउन राज्य सरकारने केलेल्या संसाधनाचे पैसे परत करते, असंही त्यांनी स्पष्ट केलं. मुख्यमंत्र्यांनी काजू-बदाम खाण्याच्या मुद्द्यावरही भाष्य केलं. राज्यात प्रशासनकडून या बैठकात काजू-बदाम आणून ठेवण्याची पद्धत आहे. त्यामुळे दुष्काळ आहे, म्हणून जाणीवपूर्वक या गोष्टी केल्या जातात, असं म्हणणं योग्य नाही. पण प्रशासनाने थोडी संवेदनशीलता ठेवली पाहिजे, असेही म्हणत प्रशासनाचे कानही मुख्यमंत्री टोचले. दरम्यान, दुष्काळ आढावा बैठकीत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि खासदार संजय जाधव यांच्यासमोर खाण्यासाठी काजू बदाम ठेवण्यात आल्याच्या प्रकरणावरून शिवसेना (उबाठा) आमदार अंबादास दानवे यांनी सरकारवर टीका केली. या प्रकरणावरून राज्य सरकारला दुष्काळाचं गांभीर्य नाही, या चर्चेला उधाण आले आहे.

## युपीआय शुल्काचा पेट्रोल

पेमेंटऐवजी रोख पेमेंटला प्रोत्साहन देणारे पोस्टर्स लावले जात आहेत. केंद्र सरकार युपीआय वापरू न होणा-या २,००० हजार पेक्षा जास्त रकमेच्या व्यवहारांवर एमआरडी कर लावण्याच्या तयारीत आहे आणि हा नवीन नियम ऑक्टोबरपासून लागू होणार आहे. या पार्श्वभूमीवर, आता पेट्रोल पंप आणि सीएनजी स्टेशन्सवर रोख पेमेंटचे पोस्टर्स लावण्यात आले आहेत. पेट्रोल पंप चालकांनी सांगितले आहे की, हा कर ऑक्टोबरमध्ये लागू होईल. त्यामुळे, ते सध्या यूपीआयद्वारे पेमेंट स्वीकारत आहेत. मात्र, लोकांना याची जाणीव झाल्यामुळे, ते या रकमेपेक्षा जास्त रकमेचे यूपीआय पेमेंट टाळत आहेत. त्यांच्या मते, यूपीआय पेमेंटबाबत लोकांमध्ये संभ्रम आहे.ऑक्टोबरपासून लागू होणा-या यूपीआय एमडीआरबाबत त्यांना अद्याप स्पष्ट सूचना मिळालेल्या नाहीत. तथापि, काहींनी आधीच रोख पेमेंट स्वीकारण्यास सुरु वात केली आहे आणि रोख पेमेंटबद्दल माहिती देत आहेत.

**फटका सर्वसामान्यांना-** व्यापा-यांवर कोणताही परिणाम झाला, तर त्याचा फटका सर्वसामान्यांच्या खिशाला बसेल, कारण व्यापारी स्वत:च्या खिशातून कोणताही कर भरत नाहीत. ते म्हणाले की, भविष्यात खाद्यपदार्थांच्या किमती वाढतील. जनतेचे म्हणणे आहे की, सरकारने अचानक असा कर लादू नये. सरकारने याचा पुनर्विचार करण्याची गरज आहे.

## टीईटीची फुटलेली प्रश्नपत्रिका

एजंट्सनी उमेदवारांच्या मूळ गुणपत्रिका आणि इतर शैक्षणिक कागदपत्रे ताब्यात घेउन ते प्रश्नपत्रिका विकणा-यांकडे देण्याचा पर्याय काढला. परीक्षा झाल्यानंतर प्रश्नपत्रिकेचे पैसे दिल्यानंतरच कागदपत्रे परत केली जात , अशी माहिती तपास अधिका-याने दिली.आरोपींची बाजू मांडणारे वकील शैलेश गायकवाड यांनी सांगितले की, त्यांच्या पक्षकारांविरु द्ध कोणताही ठोस पुरावा नाही, जो खटल्याच्या सुनावणीदरम्यान सिद्ध होईल. २८ जून रोजी प्राथमिक शिक्षकांची पात्रता परीक्षा (टीईटी) होणार होती. मात्र, परीक्षेच्या दोन दिवस आधी म्हणजेच २६ जून रोजी टीईटीचा पेपर फुटल्याची बाब भिवंडी पोलिसांच्या कारवाईतून समोर आली होती. तपासकर्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आग्रा येथील माहीम पत्रान प्रायव्हेट लिमिटेड या छापखान्यात प्रश्नपत्रिका छापण्यात आल्या होत्या. कारखान्यातील दोन विद्यमान कर्मचारी आणि एका माजी कर्मचा-याने आपल्या बुटांच्या तळव्यात लपवून गोपनीय प्रश्नपत्रिकेच्या प्रती बाहेर नेल्या. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य आरोपी बिजेंद्र गुप्ता याने केवळ ८,००० रु पयांमध्ये या तीन आरोपींना प्रश्नपत्रिका फोडण्यासाठी तयार केले होते. बिजेंद्र गुप्ता हा कोचिंग क्लास चालवणारा माजी शिक्षक आहे. यापूर्वीही तो अनेक पेपरफुटीच्या प्रकरणात गुंतला होता.

## बंद घरात आढळला महिलेचा

दिवसांपूर्वीच झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

घटनेपासून महिलेसोबत राहणारा ललित मेहरे हा गायब झाला असून, त्यामुळे महिलेच्या मृत्यूबाबतचा संशय अधिक गडद झाला आहे. पोलिस त्याचा शोध घेत आहेत. माहितीनुसार, वैशाली आणि ललित हे दोघेही दारू पिण्याचे व्यसनी होते. त्यामुळे नशेच्या अवस्थेत दोघांमध्ये वाद होऊन त्यात महिलेचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, पोलिसांनी अद्याप हत्येच्या कारणाची पुष्टी केलेली नाही.

घटनेची माहिती मिळताच एसीपी आलूरकर यांच्यासह पोलीस पथक आणि फॉरेन्सिक टीम घटनास्थळी दाखल झाली. घटनास्थळाचा पंचनामा करून फॉरेन्सिक टीमने आवश्यक पुरावे गोळा केले आहेत. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. ललित मेहरेचा शोध लागल्यानंतर आणि त्याची चौकशी केल्यानंतर महिलेच्या मृत्यूचे नेमके कारण समोर येण्याची शक्यता आहे. सध्या बडनेरा पोलीसांनी या प्रकरणात खुनासह विविध कलमाअन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. मृत्यूची वेळ आणि कारण हे पोस्टमॉर्टम रिपोर्टनंतरच स्पष्ट होईल.

## सोयाबीनचे तातडीने पंचनामे करून

पाहणी करताना दिले.यावेळी आमदार राजेश वानखडे,आमदार प्रविण पोटे, आमदार प्रताप अडसड यासह भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होतें.

अमरावती जिल्ह्यात पावसाने तब्बल ३९ दिवसांचा प्रदीर्घ खंड दिल्याने सोयाबीन, कापूस, तूर यासह खरीप पिके संकटात सापडली आहेत. या पार्श्वभूमीवर राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पीक परिस्थितीची पाहणी केली.पालकमंत्र्यांनी शेतात उतरून पिकांची पाहणी केली तसेच पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची सद्यस्थिती आणि नुकसानीची माहिती जाणून घेतली.

तसेच प्रशासनाकडून पीक नुकसानीचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून, सर्वेक्षणाचा अहवाल लवकर प्राप्त झाल्यानंतर अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत कशी देता येईल, याबाबत शासनाकडून निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.या पाहणी दौऱ्यादरम्यान जिल्हाअधिकारी आशिष येरेकर,अमरावती जिल्हा परिषदचे सीइओ संत्यम गांधी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, उपविभागीय अधिकारी दादासाहेब दराडे, तिवसा तहसीलदार डॉ. मयूर कळसे, तालुका कृषी अधिकारी हेमलता इंगळे, गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे, ठाणेदार गोपाल उपाध्याय, नायब तहसीलदार आशिष नागरे, अमोल देशमुख यांच्यासह महसूल, कृषी, पंचायत समिती आणि तिवसा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## अभिजीत दीपकेंच्या सभेतून पत्रकारांची

घटनेचा व्हिडिओ चर्चेत असून, त्यामुळे या बैठकीची चर्चा आता वेगळ्याच कारणाने सुरू झाली आहे.

अभिजीत दिपके सध्या महाराष्ट्रातील विविध भागांत विद्यार्थ्यांशी संवाद साधत असून, शिक्षण, बेरोजगारी, स्पर्धा परीक्षा आणि विद्यार्थ्यांशी संबंधित प्रश्नांवर कार्यक्रम घेत आहेत. कॉकरोच जनता पार्टीने विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर आंदोलने आणि जनजागृतीचे उपक्रम सुरू ठेवले आहेत.या अंतर्गत आज शनिवार १९ सप्टेंबर रोजी शहरातील गाडगे महाराज मंदिरासमोरील खुल्या मैदानात अभिजीत दिपके यांची विद्यार्थ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती.याच बैठकी दरम्यान प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या प्रतिनिधीं विरोधात घोषणाबाजी झाल्याचा दावा करण्यात आला आहे.सभास्थळी काही जणांकडून ‘गो बॅक गोदी मीडिया’ अशा घोषणा देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या घोषणांदरम्यान काही पत्रकारांना कार्यक्रम स्थळाबाहेर जाण्यास सांगण्यात आल्याचा दावाही केला जात आहे. या घटनेचा कथित व्हिडिओ स्थानिक पातळीवर चर्चेत आला आहे. मात्र, व्हिडिओमधील घोषणांचा नेमका संदर्भ, त्या कोणाकडून देण्यात आल्या आणि पत्रकारांना बाहेर जाण्यास सांगण्यामागील परिस्थिती या बाबत स्वतंत्रपणे अधिकृत पुष्टी झालेली नाही.

## दावे आणि व्हिडिओची अधिकृत

उपलब्ध नाही. त्यामुळे सध्या समोर आलेले दावे आणि व्हिडिओ यांची अधिकृत पडताळणी होणे बाकी आहे. मात्र यामुळे शहरात चर्चा जोरावर आहे.

## फोटो दाखवा, बक्षीस मिळवा’

५०० ते १००० रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. या उपरोधिक आंदोलनाची जोरदार चर्चा होताच पालकमंत्री बावणकुळे यांनी घाईघाईने तिवसा तालुक्यातील नॅशनल हायवेला लागून असलेल्या शेतांची पाहणी करण्यासाठी धाव घेतली.

पालकमंत्र्यांचा दौरा केवळ सोपस्कार आणि धावता असल्याचे दिसताच, सार्सी व शिरजगाव मोझरी परिसरातील शेतकरी आणि तालुका कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत पालकमंत्र्यांना जाब विचारला. धोत्रा, माळेगाव, सालोरा, शेंदोळा बुद्रुक आणि मार्डी या कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाल्याचे सांगत प्रशांत कांबळे आणि स्थानिक शेतकऱ्यांनी पालकमंत्र्यांसमोर तुटून पडलेल्या पिकांचे वास्तव्य मांडले. तर मागील वर्षी अतिवृष्टी आणि यंदा दुष्काळ, अशा दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांनी अत्यंत आक्रमकपणे आपल्या मागण्या मांडल्या. आता केवळ धावते दौरे न करता सरकारने तात्काळ हेक्टरी १ लाखांची मदत आणि दुष्काळ जाहीर केला नाही, तर हे आंदोलन संपूर्ण जिल्ह्यात पेटेल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी तालुका कॉंग्रेस पदाधिकारी विश्वजीत बाखडे, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे, कॉंग्रेस शहर कार्याध्यक्ष सुनील बाखडे, शशांक राऊत, संजय चौधरी, मनोज डीगांबरे, संदीप हगवणे, गौरव चौधरी, सर्जा वाघमारे, आकाश माहोरे, पुरुषोत्तम मेश्राम, आकाश मकेश्वर, निलेश गुडधे, प्रवीण देशमुख, रवींद्र बनकर, अभिजित साबळे, श्रीधर कोहळे, संदीप वानखडे, रमेश कोहळे, अमोल काळे यांच्यासह शेतकरी व कॉंग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अमरावती रेल्वे स्थानकाच्या

उभी होती.प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, ही कार भरधाव वेगात आणि अनियंत्रित पद्धतीने ट्रेनच्या अगदी जवळ आली. अचानक फलाटावर चारचाकी गाडी पाहून प्रवाशांमध्ये आणि रेल्वे कर्मचाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही.प्रवाशांच्या सुरक्षेच्या नियमांनुसार कोणत्याही खाजगी वाहनाला फलाट क्षेत्रात प्रवेश करण्यास पूर्णपणे बंदी आहे. तरीही स्कॉर्पिओ अडथळ्यांशिवाय ट्रेन पर्यंत पोहोचणे, हे स्थानकाच्या प्रवेश नियंत्रण आणि सुरक्षा यंत्रणेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करते.या घटनेचा फोटो समोर आल्या नंतर स्थानकावर तैनात असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मुख्य गेटवर वाहनाला का अडवले गेले नाही? तपासणी शिवाय ती आत कशी दाखल झाली? असे काही प्रश्न इथे उत्पन्न झाले आहे. घटनेची माहिती मिळताच रेल्वे सुरक्षा बलचे अधिकारी आणि जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. आरपीएफने वाहन ताब्यात घेत चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अत्यंत संवेदनशील आणि गर्दीच्या रेल्वे परिसरात अशा प्रकारची चूक झाल्याने प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. सुरक्षा व्यवस्थेमध्ये नेमकी कुठे त्रुटी राहिली, याची सविस्तर चौकशी रेल्वे अधिकारी करत असून, निष्काळजी कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून पुढे अशा घटना रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## दर्यापूरात जयंती २ चित्रपटाचे

केवळ मनोरंजनाचा नसून सामाजिक जाणीव करुन देणारा आहे.

अशा या चित्रपटाचे बॅनर अचानक गायब झाल्याने दर्यापूरात अज्ञात समाजकंटकाच्या कृत्याचा संताप व्यक्त होत असून संबंधितांनी सिसिटीव्ही फुटेजच्या आधारे तपासणी करुन त्यांचा शोध घेऊन कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना

साकडे घालत, राज्य सरकारने अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि पालकमंत्र्यांनी वेळेत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी करणे अपेक्षित आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या अडचणी गंभीर असताना पालकमंत्री आणि आमदार उशिरा शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचणे अत्यंत निंदनीय आहे.

शेतकरी संकटात असताना केवळ पाहणी करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष नुकसानाचा आढावा घेऊन तातडीने मदत, पंचनामे आणि आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने ठोस निर्णय घ्यावा आणि अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी युवक कॉंग्रेसच्या वतीने करण्यात आली.

## चांदुर रेल्वे शहरातील मुख्य

आहे. शहरातील विकासकामांच्या बाबतीत चांदुर रेल्वे मागे का पडत आहे, याचे उत्तर लोकप्रतिनिधी आणि संबंधित प्रशासनाने जनतेला द्यावे, अशी मागणीही होत आहे.

धामणगाव विकासाच्या वाटेवर; चांदुर रेल्वे मात्र जैसे थे?

शेजारील धामणगाव रेल्वे शहर विकासाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र असताना चांदुर रेल्वेतील अनेक मूलभूत प्रश्न अद्याप कायम असल्याची नागरिकांची भावना आहे. मुख्य रस्ता, खड्डे आणि पायाभूत सुविधांबाबत ठोस कामे कधी सुरू होणार, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, ‘अशीच परिस्थिती राहिली तर चांदुर रेल्वे शहर पुन्हा ग्रामपंचायतीच्या दिशेने जाईल की काय?’ अशी उपरोधिक प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटू लागली आहे. आता तरी प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधी गणेश विसर्जनापूर्वी मुख्य रस्त्यावरील धोकादायक खड्ड्यांकडे लक्ष देतील का? की नागरिकांनी आणखी किती वर्षे खड्ड्यांमधूनच विकासाचा मार्ग शोधायचा? याकडे चांदुर रेल्वेकरांचे लक्ष लागले आहे.

## आयआयटी बॉम्बेतील साहिल वाकोडे

जातीय अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा छळ किंवा अनुचित वागणूक झाली होती का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने सीआयडी मार्फत चौकशीचे आदेश द्यावेत, अशी प्रमुख मागणी आहे. तसेच परीक्षा केंद्र, संबंधित विभाग, वसतिगृह आणि इतर ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज, प्रवेश नोंदी व डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवावेत. परीक्षा घेणारे शिक्षक, प्राध्यापक, विभागप्रमुख, प्रशासनिक अधिकारी, सहाध्यायी आणि घटनेशी संबंधित व्यक्तींचे जबाब नोंदवावे, अशी मागणीही करण्यात आली.

पवई पोलिसांकडून सुरू असलेल्या तपासावर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली निष्पक्ष कार्यवाही व्हावी, तसेच तपासाची प्रगती कुटुंबीयांना वेळोवेळी कळवावी, असे निवेदनात म्हटले आहे. साहिलच्या कुटुंबीयांना शासनाकडून आवश्यक प्रशासकीय व आर्थिक मदत मिळावी, यासाठी जिल्हा प्रशासनाने राज्य शासन व मुंबई प्रशासनाकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी करण्यात आली.

निवेदन सादर करताना साहिल वाकोडे यांचे नातेवाईक आणि विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोषींना संरक्षण नव्हे, तर सत्याचा शोध आणि न्याय मिळावा, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली.

## सराईत गुन्हेगार बंटी पवार दोन

नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे त्याच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचा आढावा घेत पोलिसांनी हद्दपारीचा प्रस्ताव तयार केला. सहायक पोलिस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या माध्यमातून हा प्रस्ताव पोलिस उपायुक्त यशवंत सोळंके यांच्याकडे सादर करण्यात आला. त्यानंतर पुढील कार्यवाही होऊन १५ सप्टेंबर २०२६ रोजी बंटी पवारला दोन वर्षांसाठी हद्दपार करण्याचा आदेश पारित करण्यात आला.

हद्दपारीचा आदेश १८ सप्टेंबर रोजी बंटी पवारला बजावण्यात आला. त्यानंतर त्याला अमरावती शहर तसेच जिल्ह्याच्या हद्दीतून बाहेर काढून अकोट, जिल्हा अकोला येथे सोडण्यात आले. हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन करून तो अमरावती शहर किंवा जिल्ह्यात परत येतो का, यावरही पोलिसांची नजर राहणार आहे.

**सराईतांवर पोलिसांचा ‘कवच’-** शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अभिलेखावरील सराईत गुन्हेगारांची माहिती तपासून त्यांच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यापुढेही गंभीर गुन्ह्यांची पार्श्वभूमी असलेल्या गुन्हेगारांविरुद्ध त्यांच्या अभिलेखानुसार अशाच प्रकारची कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, पोलिस उपायुक्त यशवंत सोळंके आणि सहायक पोलिस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गाडगेनगरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव, पोलिस हवालदार विनोद इंगळे, सचिन मोहोड तसेच डीबी पथकाचे प्रमुख सहायक पोलिस निरीक्षक संदीप हिवाळे, पोलिस हवालदार भारत वानखडे, नापोकॉ राजेश गुरेले, पोलिस शिपाई प्रताप लोखंडे, महेश शर्मा, सुशांत प्रधान आणि धनराज कुंभरे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## अपहरणाच्या आरोपातून कैलास

रेकॉर्डिंगशी संबंधित ८ जीबी चा मायक्रो मेमरी कार्ड देखील न्यायालयात रेकॉर्डवर सादर करण्यात आला होता. उपलब्ध तोंडी आणि कागदोपत्री पुरावे तसेच संपूर्ण रेकॉर्डचा विचार केल्यानंतर न्यायालयाने आरोपीवर लावण्यात आलेले सर्व आरोप सिद्ध होत नसल्याचे निरीक्षण नोंदवत त्याची निर्दोष मुक्तता केली.

आरोपीच्या वतीने एड. जिया खान यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांच्या युक्तिवादामुळे न्यायालयाने आरोपीला बरी करण्याचा निर्णय दिला. एड. जिया खान यांना एड. सत्यजीत सिंग रघुवंशी, एड.परवेज अहमद खान,एड शाहरुख खान,एड, मिलिंद थोरात, एड.अभिता वायनिक, एड नबील मिर्झा एड,समीर नवरंगावादी यांनी सहकार्य केले.न्यायालयाच्या या निकालामुळे आरोपीला मोठा दिलासा मिळाला आहे.

## पैशाच्या वादात तरुणावर हल्ला

आणि दोन अल्पवयीन अटक अशी आरोपींची नावे आहे. माहितीनुसार जखमी शेख सोहेल आणि हल्ला करणारे सर्व युवक हे सराईत पाकिटमार आहेत. हे सर्वजण बडनेरा ते शेगाव दरम्यान पाकिटमारीच्या घटना करत होते. दिवसभरात मिळालेल्या पैशाची वाटणी केली जात होती. पैशाच्या वाटणी वरून शेख सोहेल सोबत आरोपींचा वाद झाला होता. शुक्रवारी सकाळी सोहेल अमरावतीत असल्याचे कळाल्यावर मुख्य सूत्रधार महाजनपुरा निवासी बादल बागवाले याने त्याला कॉंग्रेस भवनाजवळ पाहिले आणि आपल्या इतर साथीदारांना फोन करून घटनास्थळी बोलावले. त्यानंतर सर्वांनी मिळून त्याच्यावर जीवघेणा हल्ला केला आणि पळून गेले. फ्रेजरपुरा पोलिसांनी जखमीला जिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथून त्याला नागपूर रेफर करण्यात आले. पोलिसांनी परिसरात लागलेले सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. सुरुवातीला एका कॅमेऱ्यात ३ युवक हल्ला करताना दिसले. मात्र, परिसरातील इतर कॅमेरे तपासले असता एका फुटेज मध्ये ८ युवक हल्ला करताना स्पष्ट दिसले. पीएसआय खुशाल तायवाडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून तीन आरोपींविरुद्ध आधी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता, नंतर फुटेजच्या आधारे आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून सर्वांना अटक करण्यात आली. सर्व आठही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले जिथे त्यांना पीसीआर देण्यात आला आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ रविवार, २० सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# रिसोड तालुक्यात कोरड्या दुष्काळाची भीषण परिस्थिती

## शासनाने कागदावरील अहवाल नव्हे

■ प्रतिनिधी | रिसोड ■

वाशिम जिल्ह्यासह रिसोड तालुक्यात मागील अनेक दिवसांपासून पावसाचा मोठा खंड पडल्याने पावसावर अवलंबून असलेली खरीप पिके गंभीर संकटात सापडली आहेत. सोयाबीन, मूग, उडीद, भाजीपाला तसेच इतर पिकांना आवश्यक पाऊस न मिळाल्याने पिके वाळत असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

शेतकरी संकटात असताना शासनाने कागदी अहवाल आणि प्रत्यक्ष परिस्थिती यातील फरक तातडीने दूर करावा. रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत होण्यापूर्वी शासनाने ठोस निर्णय घ्यावा; अन्यथा शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटना तीव्र आंदोलन उभारेल, असा इशारा जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील मोरे यांनी दिला आहे.

रिसोड तालुक्यातील अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतात प्रत्यक्ष पाहणी केली असता पिकांची अवस्था अत्यंत चिंताजनक असल्याचे दिसून येत आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता दुहेरी संकट उभे राहिले आहे. एका बाजूला पिकांचे नुकसान होत असताना दुसऱ्या बाजूला बँका, सोसायट्या आणि खासगी कर्जाचा डोंगर शेतकऱ्यांच्या डोक्यावर आहे.

अशा परिस्थितीत शासनाच्या प्रशासकीय अहवालानुसार रिसोड, मालेगाव व वाशिम तालुक्यांना दुष्काळी परिस्थितीतून वगळण्यात आले असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, हा निर्णय नेमक्या कोणत्या निकषांवर आणि कोणत्या प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे घेण्यात आला, असा सवाल क्रांतिकारी शेतकरी संघटनेने उपस्थित केला आहे. मुख्यमंत्री साहेब, एकदा रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर या आणि प्रत्यक्ष परिस्थिती पाहा. कागदावरील अहवाल पाहण्याऐवजी शेतात उभे असलेले वाळत चाललेले सोयाबीन, मूग, उडीद आणि इतर पिके पाहिल्यानंतरच परिस्थितीची तीव्रता लक्षात येईल. शेतकऱ्यांच्या डोळ्यासमोर उभे असलेले संकट प्रशासनाच्या अहवालात का दिसत नाही, असा सवाल शेतकरी बांधवांकडून केला जात आहे.

## शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन वास्तव पाहावे - बालाजी मोरे पाटील



शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर क्रांतिकारी शेतकरी संघटनेची तात्काळ दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

### क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या प्रमुख मागण्या

- रिसोड तालुक्यात तात्काळ प्रत्यक्ष शेतपिकांची पाहणी करून कोरडा दुष्काळ जाहीर करावा.
- नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी किमान १ लाख रुपयांची तातडीची मदत द्यावी.
- पिकांचे तातडीने पंचनामे करून पीकविमा नुकसानभरपाई मिळवून द्यावी.
- शेतकऱ्यांवरील कर्जाचा ताण लक्षात घेऊन कर्जमाफी/कर्जसवलतीबाबत तातडीने निर्णय घ्यावा.
- जनावरांसाठी चारा छावण्या व पाण्याची व्यवस्था करावी.
- ग्रामीण भागातील नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची तातडीने व्यवस्था करावी.
- प्रशासनाने केवळ कागदावरील अहवालावर अवलंबून न राहता शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी.

मागील वर्षी अतिवृष्टी व ओल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या, पिकांचे नुकसान झाले; मात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अपेक्षित मदत व पीकविम्याचा लाभ मिळालेला नसल्याची तक्रार आहे. त्या संकटातून शेतकरी अद्याप पूर्णपणे सावरलेला नसताना यंदा पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांवर पुन्हा संकट आले आहे.

विशेष म्हणजे महाराष्ट्राचे कृषिमंत्री आणि वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडून या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहण्याची अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान डोळ्यासमोर होत असताना केवळ शासन निर्णय आणि प्रशासकीय अहवालांचा आधार न घेता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पावसाचा खंड आणखी वाढल्यास पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता असून त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर होणार आहे. त्याचबरोबर जनावरांसाठी चारा, पिण्याचे पाणी आणि ग्रामीण भागातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने तातडीने रिसोड तालुक्यासह वाशिम जिल्ह्यातील प्रत्यक्ष परिस्थितीची वस्तुनिष्ठ पाहणी करून कोरड्या दुष्काळाची घोषणा करावी, अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील मोरे यांनी केली आहे.

# अंतर्गत रस्ते एकीकडे सुसाट तर दुसरीकडे चिखलातून काढावी लागते वाट!

## कारखेडा ग्रा.पं.च्या कारभारावर ग्रामस्थांचा संताप!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कारखेडा ग्रामपंचायतची लोकसंख्या ३००० पेक्षा अधिक आहे. या गावात स्वयंभू आणि तथाकथित तत्कालीन आदर्श ग्रा.पं. पदाधिकाऱ्यांनी ज्या विकास कामांमध्ये मलिदा मिळतो अशाच कामांना प्राधान्यक्रम दिला व वर्षानुवर्षे किमान मुरूम तरी टाकून द्या अशी मागणी केलेल्या रस्त्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप बाधित नागरिकांनी केला असुन हे उघड्या डोळ्यांनी दिसून सुद्धा येत आहे.

गावातील काही भागातील अंतर्गत रस्ते सिमेंट पेव्हर ब्लॉक (गट्टू) ने अच्छादित करण्यात आले आहेत. हे रस्ते सुसाट झाले असले तरी यामधून मोठा मलिदा काम करणाऱ्यांना मिळाल्याचे बोलले जात आहे.



मात्र दुसरीकडे त्याच गावात काही कुटुंबांना आपल्या घराजवळ जाण्या-येण्यासाठी आजही चिखलातून वाट काढावी लागत आहे. पावसाळ्यात तर या रस्त्यांवरून चालणेही मुश्किल होते. लहान मुले, वृद्ध आणि महिलांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

किमान येथे मुरूम तरी टाकून द्या अशी मागणी गेल्या पाच वर्षांपासून ग्रामस्थ करत आहेत, परंतु तत्कालीन ग्रापं पदाधिकाऱ्यांनी याकडे साफ दुर्लक्ष केल्याच्या वेदना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत. सर्वांना समान न्याय व विकासाच्या संधी मिळायला हव्यात, परंतु केवळ मलिदा दायक कामांनाच प्राधान्य दिल्याने सर्वसामान्य ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. या प्रकरणाची चौकशी करून प्रलंबित रस्त्यांवर तात्काळ मुरूम टाकण्याची मागणी होत आहे.

# गणेशमूर्तीच्या पाटाला क्यूआर कोड ; अश्लील व्हिडिओ प्रसारित

## स्थानिक गुन्हे शाखा व वाशिम शहर पोलिसांची संयुक्त कारवाई

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील जय भवानी गणेश मंडळाच्या गणेशमूर्तीच्या पाटाला क्यूआर कोड स्कॅनर लावून त्याद्वारे अश्लील व्हिडिओ प्रसारित केल्याच्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखा व वाशिम शहर पोलिसांनी छडा लावला. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. तन्मय शंकर मुठाळ (वय १९, रा. चिवरा, ता. मालेगाव), युगंधर मोहन अफुने (वय १८, रा. अंबिका नगर, लाखाळा, वाशिम) आणि सुमित कैलास भोने (वय १८, रा. सावरगाव जिरे, वाशिम) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

याप्रकरणी राम अर्जुन काळबांडे, रा. काळे फाईल, वाशिम यांनी १८ सप्टेंबर रोजी वाशिम शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार, १७ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी धार्मिक भावना दुखावण्याच्या उद्देशाने जय भवानी गणेश मंडळाच्या गणेशमूर्तीच्या पाटाला क्यूआर कोड लावला. हा कोड स्कॅन केल्यानंतर अश्लील व्हिडिओ प्रसारित होत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले. या प्रकरणी वाशिम शहर पोलिस ठाण्यात



भारतीय न्याय संहितेतील कलम २९९, ३५६(२) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ६७, ६७(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचा तपास करून आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखा व वाशिम शहर पोलिसांना दिल्या. त्यानुसार चार पथकांनी घटनास्थळ परिसरासह इतर भागातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यामध्ये संशयित व्यक्ती आढळून आल्यानंतर गुप्त माहितीच्या आधारे त्यांची ओळख पटविण्यात आली.

त्यानंतर पोलिसांनी तन्मय मुठाळ, युगंधर अफुने व सुमित भोने यांना वेगवेगळ्या ठिकाणांहून ताब्यात घेतले. पोलिसांनी केलेल्या चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर तिन्ही आरोपींना कायदेशीररित्या अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय चौधरी करीत आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, अपर पोलिस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलिस अधिकारी रामकृष्ण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुधाकर आडे तसेच वाशिम शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय चौधरी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाईत सपोनि जितेंद्र आडोळे, सपोनि सीता वाघमारे, पोउपनि निलेश जाधव, पोउपनि सचिन गोखले, पोउपनि शेखर मास्कर, पोउपनि रवि सैबेवार यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखा व वाशिम शहर पोलिस ठाण्यातील अंमलदार सहभागी झाले.

# डॉक्टर्स, इंजिनियर्स, आदर्श कास्तकार युवक मंडळींचा काँग्रेसमध्ये पक्ष प्रवेश



■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड तालुक्यातील लिंगा कोतवाल येथील युवक मित्रमंडळींनी मा.अमित सुभाषराव झनक आमदार रिसोड मालेगाव यांच्या नेतृत्वावर व विकासाच्या विचारांवर विश्वास ठेवत काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी युवकांनी काँग्रेसच्या विचारधारेसोबत काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. मा.अमित सुभाषराव झनक यांनी नव्याने पक्षात प्रवेश करणाऱ्या युवकांचे स्वागत करून त्यांच्या पाठीशी सदैव खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासन दिले.

या प्रवेशामुळे लिंगा कोतवाल परिसरात काँग्रेसची संघटनात्मक ताकद अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

यावेळी गावातील युवक मित्रमंडळी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. काँग्रेस पक्षाच्या विचारांना बळ देत युवकांचा उत्स्फूर्त सहभाग!

# श्रावणधारा, पुस्तक प्रकाशन आणि गौरव सोहळा उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय आणि विदर्भ साहित्य संघाच्या वाशीम शाखेचा दरवर्षीचा उपक्रम अर्थात श्रावणधारा कविसंमेलन एस.एम.सी. शिक्षण संकुल परिसरात शनिवारी (पाच सप्टेंबर) उत्साहात पार पडले. यानिमित्ताने एका कवितासंग्रहाचे प्रकाशन अभ्यासक्रमात समावेश झालेल्या तीन साहित्यिकांचा गौरवही करण्यात आला.

उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी एस.एम.सी. शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा. हरिभाऊ क्षीरसागर होते. सार्सी बोथ येथील शेतकरी कवी गजानन फुसे श्रावणधारा कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ साहित्यिक बाबाराव मुसळे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. प्राचार्य डॉ. विजय पांडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. या कविसंमेलनात फ ारूख जमन, डॉ. विजय काळे, गोपाल खाडे, वैभव भिवरकर, गजानन शिले, गजानन कदम, गजानन चौधरी, पल्लवी आकेवार, माधुरी बहादुरे, ज्योती देशमुख, अनिकेत देशमुख, अविनाश पसारकर यांनी एकापेक्षा एक सरस कविता सादर करून रसिकांची मने जिंकली. सुविख्यात निवेदक चाफे श्वर गांगवे आणि त्यांच्या जोडीला नवोदित निवेदक उमेश बोरचाटे या दोघांनी निवेदनाची बाजू समर्थपणे सांभाळली.

# जिद्द, मेहनत व देशसेवेच्या भावनेने क्रीष्णवने गाठले नौदलात यशाचे शिखर!



■ प्रतिनिधी | मानोरा ■

बालपणापासून पाहिलेले देशसेवेचे स्वप्न, त्यासाठी घेतलेली प्रचंड मेहनत आणि मनातील इच्छाशक्तीच्या जोरावर तालुक्यातील आमदरी येथील एका तरुणाने यशाचे शिखर गाठले आहे. या तरुणाची भारतीय नौदलामध्ये एसएसआर (सीनियर सेकंडरी रिक्रुट) पदी निवड झाली असून, लवकरच तो प्रशिक्षण घेऊन देशसेवेत रुजू होणार आहे.

क्रिशनव चव्हाण चे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संत शिवराम विद्यालय भंडारा या मराठी माध्यमाच्या शाळेत झाले. बालपणापासूनच त्याच्या मनात देशप्रेम व देशाची सेवा करण्याचे स्वप्न होते. त्यासाठी काय करावे लागते याचे मार्गदर्शन त्याने शाळेच्या शिक्षकांकडून घेतले. आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्याने पुणे येथील नामांकित 'गरुड झेप' या अकॅडमीमध्ये प्रवेश घेतला. तेथे शिस्त, मेहनत, कसरत व मनातील इच्छाशक्तीच्या जोरावर त्याने तयारी सुरू ठेवली. बालपणामध्ये बघितलेले आर्मीचे स्वप्न अखेर सत्यात उतरले. त्याची पहिल्यांदा भारतीय आर्मीमध्ये निवड झाली होती. मात्र, वैद्यकीय चाचणीमध्ये (मेडिकल) तो अपात्र ठरल्याने त्याला अपयश आले. परंतु, खचून न जाता पुन्हा तयारी करून त्याने भारतीय नौदलाची परीक्षा दिली. या परीक्षेत त्याला घवघवीत यश मिळाले व आता तो भारतीय नौदलामध्ये एसएसआर पदी निवडला गेला आहे. पुढील काही दिवसात तो नौदलामध्ये दाखल होऊन प्रशिक्षण घेऊन देशसेवेत रुजू होणार आहे.

क्रिशनवचे वडील विवेक चव्हाण हे जिल्हा परिषद येथे आरोग्य विभागात कार्यरत असून, आई गृहिणी आहे. आपल्या मुलाची भारतीय नौदलात निवड झाल्याने संपूर्ण कुटुंब आनंदाने भारावून गेले असून, परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ऑफलाईन करा, भारतीय जनता पार्टीच्या वतीने वैघकिय अधिकाऱ्यांना निवेदन

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयामधील विवाह नोंदणी प्रमाणपत्राला ऑफलाइन एवजी ऑनलाइन करून प्रमाणपत्र वितरित करण्यात यावेङ भारतीय जनता पार्टीच्या वतीने मा .वैद्यकीय अधिकारी व विवाह नोंदणी निबंधक ग्रामीण रुग्णालय रिसोड ' यांना विवाह नोंदणी प्रमाणपत्राला ऑनलाइन करून प्रमाणपत्र वितरित करण्यात यावे करिता निवेदन देण्यात आले आहे ' विवाह नोंदणी व प्रमाणपत्र देण्याचे अधिकार शासनाच्या अधिसूचनेनुसार मागील शासन



निर्णयानुसार विवाह नोंदणी निबंधक म्हणून वैद्यकीय अधिकारी यांना आदेशित केले आहे .परंतु विवाह नोंदणी निबंधकाकडून नागरिकांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र ऑफलाइन वितरित करण्यात येत आहे 'विवाह नोंदणी प्रमाणपत्र ऑफलाइन असल्यामुळे नागरिकांना आडकाठी निर्माण होत आहे ' जसे की विवाह झाल्यानंतर आधार कार्ड मध्ये पतीचे नाव समाविष्ट करावयाचे असल्यास ' आधारसेवा पोर्टल मध्ये विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत ऑनलाईन नमुन्यात पाहिजे तसेच बारकोड निर्माण झालेले ही प्रमाणपत्र पाहिजे 'परंतु रिसोड येथील विवाह नोंदणी निबंधकाकडून नागरिकांना ऑनलाइन प्रमाणपत्र एवजी ऑफलाईन प्रमाणपत्र वितरित करण्यात येत आहे ' ही बाब नागरिकांसाठी खूपच अडकाठी निर्माण करणारी दिसून येत आहे .

## आज महानगरात रिपाइं (आठवले )ची बैठक

**अकोला :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले )अकोला जिल्ह्याची बैठक आज २० सप्टेंबर रोजी, दुपारी १२.००वाजता शासकीय विश्राम गृह (नवीन )नवीन बस स्टॅन्ड जवळ येथे जिल्हाध्यक्ष सुनील अवचार यांच्या अध्यक्षतेत आयोजित करण्यात आली आहे. या बैठक मध्ये १)यावर्षी महात्मा ज्योतीराव फुले यांच्या जयंतीला २शतक पूर्ण झाली असून महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहला १००वर्षे पूर्ण होतं असून, या दोनही प्रसंगाचे औचित्य साधून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सातारा शहरातून शाळेत पहिला प्रवेश केला, याच सातारा ऐतिहासिक शहरातून 'समता क्रांती मार्च 'रिपाइं च्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात १४ऑक्टोबर २०२६ रोजी काढण्यात येत असून, हा समता क्रांती मार्च अकोला शहरात २७ऑक्टोबर २०२६ येत आहे.

# सख्या भावाच्या रक्ताने हात रंगविले ; न्यायालयाने जन्मठेप ठोठावली

## अकोट सत्र न्यायालयाचा निकाल ; आरोपी हरिदास मापेला ५१ हजारांचा दंड

■ प्रतिनिधी | अकोट ■

आठ दिवसांपूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून सख्या भावावर चाकूने सपासप वार करीत त्याचा खून करणाऱ्या हरिदास गणेश मापे (३५, रा. तळेगाव बु., ता. तेल्हारा) याला अखेर न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तीन लहान मुलांच्या डोळ्यांसमोर त्यांच्या वडिलांची हत्या करणाऱ्या आरोपीला अकोट येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेप आणि ५१ हजार रुपयांचा दंड ठोठावला. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी शनिवारी (१९ सप्टेंबर) हा निकाल दिला.

१५ जुलै २०२१ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास शिवाजी मापे हे पत्नी व मुलांसह घरात जेवण करीत होते. त्याचवेळी हरिदास मापे हा दोन्ही हातात चाकू घेऊन घरासमोर आला. आठ दिवसांपूर्वी झालेल्या वादाचा राग उफाळून आल्याने त्याने शिवाजी यांना शिवीगाळ करीत घराबाहेर बोलावले आणि जीवे मारण्याची धमकी दिली.

भावाला समजावण्यासाठी शिवाजी व त्यांची पत्नी घराबाहेर आले. त्यावेळी हरिदासची पत्नी गंगा हिने शिवाजी यांना लाथ मारून खाली पाडले. पत्नीने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता हरिदासने तिला दूर केले, तर गंगाने तिला पकडून ठेवले. त्यानंतर हरिदासने शिवाजी यांच्या गळ्यावर, छातीवर, बगलेत आणि पाठीवर चाकूने वार केले. या जीवघेण्या हल्ल्यात शिवाजी यांचा मृत्यू झाला. हल्ल्यादरम्यान हरिदासच्या हातातील चाकू लागल्याने त्यालाही तसेच त्याच्या पत्नीला दुखापत झाली होती. घटनेनंतर हिवरखेड पोलिसांनी



खुनासह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला.या खटल्यात सरकारी पक्षातर्फे एकूण १६ साक्षीदार तपासण्यात आले. फिर्यादी, तीन अल्पवयीन साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी तसेच तपास अधिकाऱ्यांची साक्ष महत्त्वाची ठरली. सरकारी वकील अजित देशमुख यांनी सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे आरोपीविरुद्धचा गुन्हा न्यायालयासमोर मांडला. प्रकरणाचा प्राथमिक तपास तत्कालीन सहायक पोलिस निरीक्षक धीरज चव्हाण यांनी केला. तत्कालीन पोलिस उपनिरीक्षक विठ्ठल वाणी यांनी पुढील तपास पूर्ण करून आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

### 'तीन मुलांच्या डोळ्यांसमोर हत्या'

शिक्षेच्या टप्प्यावर सरकारी वकील अजित देशमुख यांनी आरोपीने सख्या भावाचा खून केला असून, हा प्रकार तीन अल्पवयीन मुलांच्या डोळ्यांसमोर घडल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी त्यांनी केली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपी हरिदास मापे याला जन्मठेप व ५१ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

### पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात पैरवी

पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अकोट उपविभागीय पोलिस अधिकारी निखील पाटील आणि हिवरखेड पोलिस ठाण्याचे ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पैरवी अधिकारी ज्योती तेलगोटे यांनी न्यायालयीन कामकाजात सहकार्य केले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २९४ ■ रविवार, २० सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन केली पिकांची पाहणी

## एलनिनोच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना करण्याचे निर्देश

### सोयाबीन पिकाची पाहणी व शेतकऱ्याशी संवाद

**वर्धा जनमाध्यम :** एलनिनोच्या प्रभावामुळे यावर्षी पर्जन्यमान तुलनेने बरेच कमी झाले आहे. सिंचन प्रकल्पांमध्ये देखील पुरेसा पाणीसाठा झालेला नाही. परिस्थिती अशीच राहिल्यास दुष्काळसदृश्य स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी आज स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिक परिस्थितीची पाहणी केली व आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

आर्वी तालुक्यातील खरांगणा येथे प्रत्यक्ष बांधावर जात पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सोयाबीन पिकांची पाहणी केली. यावेळी आमदार सुमित वानखेडे, उपविभागीय अधिकारी विश्वास सिरसाठ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरीकर, सुनिल गफाट, अशोक कलोडे, माजी सरपंच निलिमा अवकलवार, माजी उपसरपंच राजेश अवथळे, मंडळ अधिकारी अनिल जगताप तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी पालकमंत्र्यांनी प्रत्यक्ष सोयाबीन पिकात जाऊन पाहणी केली. गेल्या महिन्यात तब्बल २० दिवस पावसाचा खंड पडला. या महिन्यात देखील पावसाचा खंड असल्याने सोयाबीनच्या शेंगा भरलेल्या नाही. हातचे पिक जाण्याची शक्यता आहे. सोयाबीन झालेच तर सरासरी उत्पन्न फार कमी असेल, अशी खंत शेतकऱ्यांनी यावेळी व्यक्त केली. शेतकऱ्यांचे म्हणणे, त्यांच्या भावना पालकमंत्र्यांनी आत्मियतेने जाणून घेतल्या. काही शेतकऱ्यांनी जंगली जनावरांचा मोठ्या प्रमाणावर त्रास असल्याने त्यावर वनविभागाच्या माध्यमातून उपाययोजना करण्याची मागणी केली.

गेल्या महिन्यात आणि या महिन्यात देखील पावसाचा खंड झाल्याने तसेच अपेक्षित पाऊस नसल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. कापूस, सोयाबीनच्या सरासरी उत्पन्नात घट होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच सर्व संबंधित विभागांना आवश्यक सुचना केल्या आहे. आपण देखील सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आवश्यक सुचना केल्या. कृषी आणि महसूल विभागास पंचनामे करुन अहवाल शासनास सादर करण्याच्या सुचना केल्या असल्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यावेळी बोलतांना म्हणाले.

राज्य शासन कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. शेतकऱ्यांचा कर्जाचा भार कमी करण्यासाठी अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना शासनाने आणली. जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळत आहे. एलनिनोमुळे कमी पर्जन्यमान होऊन नुकसान सोसावे लागल्यास निश्चितच शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम शासन करेल, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यावेळी म्हणाले. यावेळी आमदार सुमित वानखेडे यांनी देखील शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

# चार वाहनांची भीषण धडक; तिघांचा जागीच मृत्यू

## ओव्हरटेकचा प्रयत्न ठरला जीवघेणा; आयशर पलटी होऊन दोन ट्रॅक्टरवर आदळला, तिघे गंभीर

**खरांगणा / सेलू जनमाध्यम :** पहाटेची शांत वेळ.. रस्त्यावरून धावणारी वाहने आणि क्षणार्धात झालेली भीषण धडक. ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात आयशरची डंपरला जोरदार धडक झाली आणि त्यानंतर आयशर पलटी होऊन दोन ट्रॅक्टरवर आदळला. या विचित्र अपघातात चारही वाहनांचा अक्षरशः चुराडा झाला. या भीषण दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झाला असून तिघे गंभीर जखमी झाले आहेत. खरांगणा पोलिस ठाण्याच्या हद्दीत तळेगाव रघुजीपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर शनिवारी १९ सप्टेंबर रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास हा थरारक अपघात झाला.



मोर्शी येथील प्रज्वल माथनकर यांच्या मालकीचा डंपर एमएच २७ डीटी ९७४८ असून त्यावर गजानन विठ्ठलराव नांदने वय ३५ रा. खंबीत बेलोरा ता. आष्टी आणि राजकुमार भीमराव चचाने वय २६ रा. हिवरखेड ता. मोर्शी हे चालक म्हणून काम करीत होते. दोघेही शुक्रवारी रात्री डंपर घेऊन परतवाडा येथून तीवसा मार्गे आर्वीला आले. त्यानंतर डंपर भंडारा जिल्ह्यातील पवनीकडे जात होता. दरम्यान, खरांगणाकडून आर्वीकडे दोन नवीन विनानंबरचे ट्रॅक्टर जात होते. त्याचवेळी मागून आलेल्या आयशर एमपी ०४ वायके ४७९३ च्या चालकाने ट्रॅक्टरला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. याचवेळी आयशरची डंपरला समोरून जोरदार धडक झाली. धडकेचा आवाजाने परिसर हादरला. आयशर पलटी होऊन दोन ट्रॅक्टरवर आदळल्याने चारही वाहनांचे मोठे नुकसान झाले.

या अपघातात डंपरचालक राजकुमार भीमराव चचाने आणि ट्रॅक्टरचालक शशिकांत जनार्धन सावरकर वय ४० रा. वडगाव कला ता. सेलू यांचा मृत्यू झाला. आयशरमधील चालक मकसूद हसन मोहमूद हसन रा. ओबीदुल्लागंज रायसेन मध्य प्रदेश याचाही मृत्यू झाला. तर अजमीन हसन मकसूद हसन रा. ओबीदुल्लागंज, गजानन विठ्ठल नान्हे आणि गजानन आंबटकर हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघाताची माहिती मिळताच खरांगणा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह आणि जखमींना वाहनांमधून बाहेर काढण्यात आले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

याप्रकरणी डंपरचालक गजानन नांदने यांच्या तक्रारीवरून खरांगणा पोलिसांनी आयशर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार अंबादास टोपले यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय यशवंत गोहोत्रे आणि जमादार दिनेश धवने पुढील तपास करीत आहेत.

# तीन सराईत गुन्हेगार दोन वर्षांसाठी जिल्ह्याबाहेर

## सावंगी मेघे पोलिसांची कारवाई; गंभीर गुन्ह्यांमध्ये होते सक्रिय

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील सराईत व असामाजिक प्रवृत्तीच्या गुन्हेगारांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. सावंगी मेघे पोलिसांनी सादर केलेल्या प्रस्तावावरून तीन सराईत गुन्हेगारांना दोन वर्षांसाठी वर्धा जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे.

राजकुमार बेतनसिंग वावरी वय ३५, मुक्कदरसिंग बेतनसिंग बावरी वय ४६ आणि जैलसिंग उर्फ जयंतसिंग वेतनसिंग वावरी वय ४० तिघेही रा. शिखबेडा सावंगी मेघे ता. जि. वर्धा अशी हद्दपार करण्यात आलेल्या गुन्हेगारांची नावे आहेत.




या गुन्हेगारांविरुद्ध शरीराविरुद्धचे गुन्हे, गैरकायदेशीर मंडळी जमविणे, लोकसेवकाच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, खुनाचा प्रयत्न, शस्त्राने गंभीर दुखापत करणे तसेच महाराष्ट्र जुगार कायदा आणि भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

जिल्ह्यातील गुन्हेगारी प्रवृत्तीचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी सराईत गुन्हेगारांविरुद्ध हद्दपारीचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सावंगी मेघे पोलिसांनी प्रस्ताव सादर केला. त्यावर आदेशानुसार तिघांनाही दोन वर्षांसाठी वर्धा जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले.

हद्दपारीच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सावंगी मेघे पोलिसांनी विशेष मोहीम राबवून तिघांचा शोध घेतला. त्यानंतर आदेशाची अंमलबजावणी करून त्यांना जिल्ह्याबाहेर हद्दपार करण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव बाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडीक, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, सावंगी मेघेचे ठाणेदार पोलीस निरीक्षक विनोद गिरी यांच्यासह पोलिस अधिकारी आणि अंमलदारांनी केली.

# रस्ता पूर्ण होण्याआधीच भेगांचा विळखा

## ३५३ आयच्या कामाच्या दर्जाची तातडीने चौकशी करा

**सिंदी रेल्वे / मोहन सुरकार :** सिंदी रेल्वे येथील डॉयपोर्ट प्रकल्पासाठी महत्त्वाचा मानला जाणारा राज्य महामार्ग क्रमांक ३५३ आय सात वर्षापासून रखडलेला असतानाच बांधकाम पूर्ण होण्याआधीच रस्त्याच्या पृष्ठभागावर ठिकठिकाणी भेगा पडू लागल्या आहेत. काही ठिकाणी रस्ता उखडण्यास सुरुवात झाल्याने या कामाच्या दर्जावर आणि गुणवत्तेवर नागरिकांकडून गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. लाखो रुपयांचा खर्च करून उभारला जाणारा रस्ता पूर्ण होण्यापूर्वीच भेगाळत असेल तर कामाच्या गुणवत्तेची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

### गुणवत्तेची तांत्रिक तपासणी करा

रस्त्याच्या बांधकामात वापरण्यात आलेले साहित्य, बांधकामाची पद्धत आणि तांत्रिक निकषांचे पालन झाले आहे की नाही, याची स्वतंत्र तांत्रिक तपासणी करण्याची मागणी होत आहे. रस्ता पूर्ण होण्याआधीच भेगा पडत असतील तर संबंधित यंत्रणेच्या देखरेखीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

भेगा पडण्याचे नेमके कारण तज्ज्ञांकडून तपासावे. कामात त्रुटी अथवा निकृष्ट दर्जा आढळल्यास संबंधित कंत्राटदारावर कारवाई करून दोषपूर्ण कामाची दुरुस्ती करावी आणि त्यानंतरच रस्ता पूर्णत्वास न्यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. राज्य महामार्ग ३५३ आयच्या या प्रकाराची संबंधित विभाग किती गांभीर्याने दखल घेतो, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सिंदी रेल्वे येथील डॉयपोर्ट हा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतील महत्त्वाचा प्रकल्प मानला जात आहे. भविष्यात या परिसरातून मोठ्या प्रमाणावर अवजड वाहनांची वाहतूक होणार असल्याने त्यादृष्टीने राज्य महामार्ग ३५३ आयची निर्मिती करण्यात आली. मात्र, सात वर्षांचा कालावधी उलटूनही महामार्गाचे काम पूर्णत्वास गेलेले नाही. त्यातच तयार झालेल्या रस्त्यावर भेगा पडल्याने संपूर्ण कामाच्या टिकाऊपणावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



# रात्री रस्त्यावरच वाघ! विरूळ रसुलाबाद परिसर हादरला

**विरूळ आकाजी जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यात वाघाच्या वावरामुळे निर्माण झालेली दहशत कायम असतानाच विरूळ रसुलाबाद आणि बोरी परिसरात पुन्हा वाघाचे दर्शन झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या अंधारात ऐन रस्त्यावर वाघ दिसल्याने नागरिकांनी आपली वाहने माघारी फिरवून रसुलाबाद गाठले.

शुक्रवारी रात्री महालक्ष्मी पूजनानिमित्त रसुलाबाद येथे दर्शन आणि महाप्रसाद आटोपून काही नागरिक रात्री साडेआठ ते नऊच्या सुमारास आपल्या गावाकडे परतत होते. विरूळ रसुलाबाद मार्गावर पारसडे यांच्या शेताजवळ पोहोचताच अचानक रस्त्यावर वाघ दिसला. काही क्षणांसाठी नागरिकांची धावपळ उडाली. वाघ रस्त्यावर असल्याचे लक्षात येताच नागरिकांनी पुढे जाण्याचा धोका न पत्करता वाहने वळवून पुन्हा रसुलाबादकडे परतण्याचा निर्णय घेतला. या घटनेची माहिती परिसरातील नागरिकांना मिळताच बोरी शिवारातही वाघ दिसल्याचे काही नागरिकांनी सांगितले. त्यामुळे एकाच वाघाचा या परिसरात सातत्याने वावर असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे महिनाभरापूर्वी बोरी शिवारात वाघाने एका कालवडीचा फडशा पाडला होता. त्यानंतर पुन्हा वाघाचे दर्शन झाल्याने शेतकरी आणि नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे.

# संत्रा बागा वाळल्या, शासकीय मदत कुठे

## पाण्याअभावी वर्षानुवर्षांची मेहनत मातीमोल

## आष्टीतील बागायतदार शेतकऱ्यांचा आर्त टाहो

**आष्टी शहीद जनमाध्यम :** वर्षानुवर्षे लेकरांसारख्या जपलेल्या संत्र्याच्या बागा डोळ्यादेखत वाळल्या. लाखो रुपये खर्च करून उभ्या केलेल्या बागांना उन्हाळ्यात पाणी मिळाले नाही आणि हिरवीगार शेती काही महिन्यांत करपून गेली. झाडे वाळली. फळधारणा थांबली. उत्पन्नाचा आधारच हिरावला. मात्र या संकटानंतरही नुकसानग्रस्त संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या हातात अद्याप शासकीय मदतीची प्रतीक्षा आहे. त्यामुळे आष्टी तालुक्यातील बागायतदार शेतकऱ्यांमध्ये संताप आणि हताशा वाढत आहे.

संत्र्याची बाग उभी करणे म्हणजे केवळ रोपे लावणे नव्हे. रोपे, खते, औषधफवारणी, मजुरी, सिंचन व्यवस्था आणि अनेक वर्षांची निगा यासाठी शेतकऱ्याला मोठी आर्थिक गुंतवणूक करावी लागते. बाग उत्पन्न देण्याच्या अवस्थेत पोहोचेपर्यंत शेतकरी वर्षानुवर्षे तिची काळजी घेतो. मात्र यंदाच्या उन्हाळ्यात पाण्याचे स्रोत आटल्याने अनेक बागांना आवश्यक पाणी मिळाले नाही. परिणामी उभी झाडेच करपून गेली.



**कर्ज काढून बाग उभी केली, आता कर्ज फेडायचे कसे-** बाग वाचविण्यासाठी शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब वापरण्याचा प्रयत्न केला. सिंचनासाठी कर्ज काढले. मात्र पाणीच अपुरे पडल्याने अनेक ठिकाणी बाग वाचविणे शक्य झाले नाही. आता बाग गेली आणि उत्पन्नही गेले. डोक्यावर कर्जाचा भार कायम आहे. अशा परिस्थितीत कर्जाची परतफेड करायची तरी कशी, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे.

**पंचनामे झाले तर मदत कधी मिळणार-** नुकसानग्रस्त बागांची प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत. शासनाच्या निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी. केवळ पंचनाम्यांच्या कागदांमध्ये नुकसान बंदिस्त ठेवून शेतकऱ्यांना मदतीच्या प्रतीक्षेत ठेवू नये, अशी मागणी बागायतदारांकडून होत आहे.

**बाग गेली, आता पुनर्लागवडीचा खर्च कोण करणार**

उद्ध्वस्त झालेल्या बागा पुन्हा उभ्या करण्यासाठी मोठा खर्च लागणार आहे. त्यामुळे नुकसानभरपाईसोबत पुनर्लागवडीसाठी आर्थिक सहाय्य आणि सिंचनासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी शेतकरी करीत आहेत. वर्षानुवर्षांची मेहनत काही महिन्यांत उद्ध्वस्त झाली असताना प्रशासनाने केवळ पाहणीवर न थांबता प्रत्यक्ष मदतीचा हात पुढे करणे गरजेचे आहे.

# निवडणुका रद्द करा, आयोग भाजपच्या कार्यालयात बसवा

## अभिजीत दीपके यांचा निवडणूक आयोगावर घणाघात

**वर्धा जनमाध्यम :** निवडणुका केवळ देखावा उरल्या असतील तर त्या रद्दच करा. निवडणूक आयोगाने भाजपच्या मुख्यालयात बसून आदेश घ्यावेत आणि देशातील निवडणुकांचा खर्च तरी वाचवावा, अशा बोचऱ्या शब्दांत कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दीपके यांनी निवडणूक आयोगावर जोरदार हल्ला चढविला. वर्धा दौऱ्यावर आलेल्या दीपके यांनी निवडणुका, मतदार याद्या, पेपरफुटी, एमपीएससी आणि खासगी शाळांच्या शुल्कावरून सरकारला थेट लक्ष्य केले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर टीका करताना दीपके म्हणाले की, निवडणूक चिन्हाचा वाद, विरोधकांच्या उमेदवारांवर कारवाई आणि मतदार यादीतून नावे वगळण्यासारखे प्रकार होत असतील तर निवडणुकीचा देखावा कशासाठी. निवडणूक आयुक्तांनी भाजपच्या मुख्यालयात जाऊन बसावे. पेट्रोल आणि फोन बिलाचा खर्च तरी वाचेल. तेथूनच आदेश घ्यावेत, अशी उपरोधिक टीका त्यांनी केली. भाजपला सत्तेत आणण्यासाठी निवडणूक आयोग मेहनत घेत असल्याचा आरोप करत दीपके यांनी ज्ञानेश कुमार यांना भाजपमध्ये प्रवेश करण्याचा उपरोधिक सल्लाही दिला. एवढी मेहनत घेतल्यानंतर मंत्रिपद किंवा राज्यसभेची उमेदवारी मिळायला हवी, असेही ते म्हणाले.



### सेवाग्रामपासून वर्धा दौऱ्याची सुरुवात

अभिजीत दीपके यांनी सेवाग्राम येथील बापू कुटीला भेट देत वर्धा दौऱ्याला सुरुवात केली. आश्रमाची पाहणी करून त्यांनी तेथील माहिती जाणून घेतली. त्यानंतर एमपीएससी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी ते वर्ध्यात आले. एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असून पेपरफुटी प्रकरणात आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. विद्यार्थ्यांची हीच मागणी आमचीही असल्याचे दीपके यांनी सांगितले. भीमनवार यांच्यावर गंभीर आरोप होत असताना त्यांची नियुक्ती कशी झाली, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी असलेल्या कथित जवळिकीमुळे त्यांची नियुक्ती झाली का, असा प्रश्नही त्यांनी केला.


## जाहीर नोटीस

याद्वारे सर्व संबंधित जनतेस जाहीर करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. भूषण अर्जुनराव वैद्य हे मौजा सावंगी मेघे, ता. व जि. वर्धा, ग्रामपंचायत सावंगी मेघे हद्दीतील, मौजा क्र. १३८, टी.एस. क्र. १९, शेत सर्व्हे क्र. २५७/१ व २५७/२ पैकी प्लॉट क्र. २१७, क्षेत्रफळ १८२.५० चौ.मी. (म्हणजेच १९६३.७० चौ.फुट), वॉर्ड क्र. ४, घर क्र. २७८८, या मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत.सदर मिळकतीच्या हद्दी खालीलप्रमाणे आहेत :- पूर्वेस : प्लॉट क्र. २१६, पश्चिमेस : मोकळी जागा,उत्तरेस : रस्ता, दक्षिणेस : मोकळी जागा,

सदर प्लॉट क्र. २१७, क्षेत्रफळ १८२.५० चौ.मी. (म्हणजेच १९६३.७० चौ.फुट) बाबत सौ. शिवानी गोविंद चितलांगे यांनी माझे पक्षकार श्री. भूषण अर्जुनराव वैद्य यांच्या नावे दिनांक २४/१२/२०२५ रोजी विक्रीखत निष्पादित केले असून, सदर विक्रीखत दस्त क्र. ४३५३/२०२५ अन्वये संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीकृत झालेले आहे. त्यानुसार सदर मिळकतीवर माझे पक्षकार यांचे नाव संबंधित अभिलेखात विधिपूर्वक फेरफार नोंद करून दाखल करण्यात आलेले आहे.माझे पक्षकार यांचे सदर मिळकतीशी संबंधित मूळ लिंक विक्रीखत दिनांक ०९/०९/२०२२, दस्त क्र. २४६९/२०२२ हे हरविले/गहाळ झाले असून, सदर मूळ दस्तऐवजाचा सर्वत्र शोध घेतल्यानंतरही तो अद्याप मिळून आलेला नाही.तसेच, माझे पक्षकार श्री. भूषण अर्जुनराव वैद्य यांनी वरील वर्णन केलेल्या प्लॉट क्र. २१७, क्षेत्रफळ १८२.५० चौ.मी. (म्हणजेच १९६३ चौ.फुट) बाबत श्री. गौरव माधव कुंभारे यांच्या नावे विक्री करण्याचा करारनामा (अ?ग्रीमेंट टू सेल ) केलेला असून, सदर श्री. गौरव माधव कुंभारे यांनी सदर मिळकतीच्या आधारे जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांचेकडे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

म्हणून याद्वारे सर्व संबंधित जनतेस कळविण्यात येते की, वरील नमूद मिळकत व/किंवा सदर व्यवहाराबाबत कोणत्याही व्यक्तीचा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, हरकत, बोजा, धारणाधिकार, गहाण, तारण, अडथळा , भाडेहक्क, कब्जा किंवा अन्य कोणताही कायदेशीर अथवा न्याय्य हक्क किंवा हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही व्यक्तीस वरील नमूद मूळ लिंक विक्रीखत दिनांक ०९/०९/२०२२ दस्त क्र. २४६९/२०२२ मिळाले असल्यास, त्यांनी त्याबाबतचा दावा/हरकत संबंधित कागदपत्रांसह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात सादर करावी.

निर्धारित मुदतीत कोणत्याही व्यक्तीकडून कोणताही दावा किंवा हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत व/किंवा वरील नमूद व्यवहाराबाबत कोणत्याही व्यक्तीचा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, हरकत, बोजा, धारणाधिकार, गहाण, तारण, अडथळा किंवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क अथवा हितसंबंध नाही, असे गृहीत धरले जाईल आणि त्यानंतर कोणतीही पुढील सूचना न देता सदर व्यवहारासंबंधी आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक : - १८/०९/२०२६

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा. मो : - ९९२२४२६१६८**



## MAHAVITARAN — E-tender Notice

The Executive Engineer, MSEDCL, **Hinganghat Division** invites e-Tender in two bid system from experienced reputed agency having experience of similar work in MSEDCL & completing the formalities for Monthly Meter Reading of LT consumers in area of any PC/Village/Clusters having below 70% smart meters up to 20kW (Excluding AG consumers other than Ag metered Urban LT consumers coming under Municipal Corporation, Municipal Council, Nagar Parishad and Nagar Panchayat.) to be done using Mahavitaran Mobile App, IR/RF HHUs ,Bill Printing and Bill distribution up to consumer /consumer premises under **Hinganghat Urban, Hinganghat Rural & Samudrapur sub division of Hinganghat Division** for One year having

**Tender No: BILLING/EE/HGT/T/URBAN/T-18/09-2026, BILLING/EE/HGT/T/RURAL/T-19/09-2026 & BILLING/EE/HGT/T/SPUR/T-20/09-2026.**

The Tender details are available on website etender. mahadiscom.in/eatApp//.The Tender documents can be downloaded from aforesaid website from 19.09.2026. Submit the tender duly filled in on or before 28.09.2026 before 15:00 Hrs.

**PRO NZ, NZ/PR No. 144/2026 Dt: 18.09.2026**

**Executive Engineer, O & M Division, MSEDCL, Hinganghat.**



PAWAN BAHUDESHIY SHIKSHAN AND SAMAJIK VIKAS SANSTHA

**CHETANA PHYSIOTHERAPY COLLEGE WARDHA**

(B.P.Th)

Vaibhavlaxmi Nagari Plot no.34, Shantinagar Chowk, Walfad Road, Umari Meghe Wardha (Affiliated MUHS Nashik)

Contact-9960444175, E-Mail-cpcwardha@gmail.com

**WANTED**

| Sub. Dept. | Principal cum Professor 12 exp as Teacher after Post Graduation in physiotherapy | Professor 09 yrs exp as Teacher after Post Graduation in physiotherapy | Associate Professor 05 yrs exp as Lecturer after Post Graduation | Assistant Professor/ Lecturer Nil |
|---|---|---|---|---|
| Any Subject | 01 (Open) | --- | --- | --- |
| Electrotherapy & Electro diagnosis | --- | --- | 01 (Open) | 01 (Open) 01(SC) |
| Kinesiotherapy & Physical Diagnosis | --- | --- | 01 (Open) | 01 (Open) 01(SC) |
| Any one of the following clinical Subjects | --- | --- | --- | --- |
| Physiotherapy in Musculoskeletal Sciences/Musculoskeletal Physiotherapy | --- | 01 (Open) | 01 (Open) | 01 (Open) |
| Physiotherapy in Neurosciences/ Neuro Physiotherapy | --- | 01 (Open) | 01 (Open) | 01 (Open) |
| Physiotherapy in Community/ Community Physiotherapy | --- | 01 (Open) | 01 (Open) | 01 (Open) |
| Physiotherapy Cardiovascular respiratory Science/Cardiovascular Respiratory Physiotherapy | --- | 01 (Open) | 01 (Open) | 01 (Open) |
| Differently abled persons | --- | | | |

Resume with documents should send through Mail or by Post to the above Mentioned address. Application should reach to college on or Before 30/09/2026 Qualifications & pay scaleas per Maharashtra University Health Science, Nashik Norms.

SECRETERY

Pawan Bahuudeshiy Shikshan and Samajik Sanstha

paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# दिल्ली विद्यापीठाच्या निवडणुकीत अध्यक्ष-सचिवपद ABVP ने जिंकले

## उपाध्यक्षपद NSUI कडून हिसकावले, अपक्षाचा विजय; 17 वर्षांनंतर बदल










**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या (DUSU) निवडणुकीत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेला (ABVP) तीन पदांवर विजय मिळाला. तर एका पदावर अपक्ष उमेदवार विजयी झाला. काँग्रेसच्या विद्यार्थी संघटना NSUI ला एकही पद मिळाले नाही.गेल्या १७ वर्षांत प्रथमच DUSU च्या केंद्रीय पॅनेलमध्ये एखादा अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. ABVP चे यश डबास अध्यक्ष झाले आहेत. तर रिया छावडी यांनी सचिवपदावर आणि लक्ष्य राज सिंह यांनी संयुक्तसचिवपदावर विजय मिळवला.उपाध्यक्षपद अपक्ष उमेदवार दीपांशु शोकीन यांनी जिंकले. DUSU निवडणुकीसाठी शुक्रवारी ५२ महाविद्यालयांमध्ये मतदान झाले. यामध्ये ४०.४६% मतदान झाले असून, १,५१,५१९ विद्यार्थ्यांपैकी ६१,३१२ विद्यार्थ्यांनी मतदान केले.दिल्ली विद्यापीठाचे दोन कॅम्पस, ९१ महाविद्यालये, त्यापैकी ५२ निवडणुकीसाठी पात्र- दिल्ली विद्यापीठाचे दोन कॅम्पस आहेत: दक्षिण आणि उत्तर कॅम्पस, जे अंदाजे १५ किमी अंतरावर आहेत. दिल्ली विद्यापीठात एकूण ९१ महाविद्यालये आहेत, परंतु दिल्ली विद्यापीठातील सर्व महाविद्यालये DUSU निवडणुकीत मतदान करू शकत नाहीत.केवळ ५२ महाविद्यालये आणि विद्याशाखा ख्रच्छ निवडणुकीत थेट सहभागी होतात. सेंट स्टीफन्स, लेडी श्री राम आणि जीझस अँड मेरी यांसारखी काही प्रमुख महाविद्यालये DUSU चा भाग नाहीत.अध्यक्षीय निवडणूक जिंकल्यानंतर यश म्हणाले, 'देशभरात पसरवल्या जात असलेल्या खोट्या कथानकाविरुद्ध हा विजय आहे. आज दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी ते कथानक नाकारले आणि दाखवून दिले की DUSU, ABVP आणि देशासोबत आहे.'या प्रश्नाचे उत्तर निकालांनीच दिले आहे. हा केवळ NSUI चा पराभव नाही, तर इंदिरा भवनचा पराभव आहे. हा राहुल गांधी आणि विनोद जाखर यांचा पराभव आहे. विद्यार्थ्यांनी परिस्थिती ओळखली, त्यांना नाकारले आणि ABVP ला प्रचंड विजय मिळवून दिला.

**रिया छाबडी म्हणाल्या- आमचे लक्ष राजकीय अजेंड्यावर नाही.**

सचिव पद जिंकल्यानंतर एबीव्हीपीच्या रिया छाबडी म्हणाल्या, 'या विजयाने मला खूप आनंद झाला आहे. एकमेव महिला उमेदवार म्हणून, मी माझ्या कार्यकाळात विद्यार्थ्यांसाठी शक्य ते सर्व काही करण्यास तयार आहे. आम्ही एक विद्यार्थी संघटना आहोत. आमचे लक्ष राजकीय अजेंड्यावर नसून विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यावर आहे.' दिल्ली विद्यापीठाचे दोन कॅम्पस आहेत: दक्षिण आणि उत्तर कॅम्पस, जे अंदाजे १५ किमी अंतरावर आहेत. दिल्ली विद्यापीठात एकूण ९१ महाविद्यालये आहेत, परंतु दिल्ली विद्यापीठातील सर्व महाविद्यालये DUSU निवडणुकीत मतदान करू शकत नाहीत. केवळ ५२ महाविद्यालये आणि विद्याशाखा DUSU निवडणुकीत थेट सहभागी होतात. सेंट स्टीफन्स, लेडी श्री राम आणि जीझस अँड मेरी यांसारखी काही प्रमुख महाविद्यालये DUSU चा भाग नाहीत. गेल्या वर्षी एबीव्हीपीने अध्यक्षपदासह तीन पदे जिंकली होती.गेल्या वर्षी झालेल्या DUSU निवडणुकीत एबीव्हीपीने अध्यक्ष, सचिव आणि सहसचिव पदे जिंकली होती, तर एनएसयूआयने उपाध्यक्षपद जिंकले होते.यावेळी एबीव्हीपी, काँग्रेस-समर्थित एनएसयूआय आणि आयसा व एसएफआय यांच्या डाव्या आघाडीचे उमेदवार निवडणूक लढवत आहेत.अरुण जेटली यांच्यासह अनेक प्रमुख नेत्यांनी ख्रच्छ अध्यक्ष म्हणून काम केले आहे. अरुण जेटली: १९७४ मध्ये DUSU अध्यक्ष होते आणि नंतर केंद्र सरकारमध्ये (भाजप) देशाचे अर्थ आणि संरक्षण मंत्री झाले. विजय गोयल: १९७७ मध्ये DUSU अध्यक्ष होते आणि नंतर केंद्र सरकारमध्ये (भाजप) केंद्रीय राज्यमंत्री झाले. अजय माकन: १९८५ मध्ये DUSU अध्यक्ष होते आणि नंतर केंद्र सरकारमध्ये (काँग्रेस) गृहनिर्माण आणि शहरी गरिबी निर्मूलन मंत्री झाले. अल्का लांबा: १९९५ मध्ये DUSU अध्यक्ष होत्या आणि नंतर दिल्ली विधानसभेत आमदार आणि महिला काँग्रेसच्या (काँग्रेस) राष्ट्रीय अध्यक्ष झाल्या.

# पहाटेचा काळ बनून आला चार वाहनांची भीषण धडक; तिघांचा जागीच मृत्यू

## ओव्हरटेकचा प्रयत्न ठरला जीवघेणा; आयशर पलटी होऊन दोन ट्रॅक्टरवर आदळला, तिघे गंभीर

**खरांगणा / सेलू जनमाध्यम :** पहाटेची शांत वेळ.. रस्त्यावरून धावणारी वाहने आणि क्षणार्धात झालेली भीषण धडक. ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात आयशरची डंपरला जोरदार धडक झाली आणि त्यानंतर आयशर पलटी होऊन दोन ट्रॅक्टरवर आदळला. या विचित्र अपघातात चारही वाहनांचा अक्षरशः चुराडा झाला. या भीषण दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झाला असून तिघे गंभीर जखमी झाले आहेत. खरांगणा पोलिस ठाण्याच्या हद्दीत तळेगाव रघुजीपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर शनिवारी १९ सप्टेंबर रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास हा थरारक अपघात झाला.



मोर्शी येथील प्रज्वल माथनकर यांच्या मालकीचा डंपर एमएच २७ डीटी ९७४८ असून त्यावर गजानन विठ्ठलराव नांदने वय ३५ रा. खंबीत बेलोरा ता. आष्टी आणि राजकुमार भीमराव चचाने वय २६ रा. हिवरखेड ता. मोर्शी हे चालक म्हणून काम करीत होते. दोघेही शुक्रवारी रात्री डंपर घेऊन परतवाडा येथून तीवसा मार्गे आर्वीला आले. त्यानंतर डंपर भंडारा जिल्ह्यातील पवनीकडे जात होता. दरम्यान, खरांगणाकडून आर्वीकडे दोन नवीन विनानंबरचे ट्रॅक्टर जात होते. त्याचवेळी मागून आलेल्या आयशर एमपी ०४ वायके ४७९३ च्या चालकाने ट्रॅक्टरला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. याचवेळी आयशरची डंपरला समोरून जोरदार धडक झाली. धडकेचा आवाजाने परिसर हादरला. आयशर पलटी होऊन दोन ट्रॅक्टरवर आदळल्याने चारही वाहनांचे मोठे नुकसान झाले.

या अपघातात डंपरचालक राजकुमार भीमराव चचाने आणि ट्रॅक्टरचालक शशिकांत जनार्धन सावरकर वय ४० रा. वडगाव कला ता. सेलू यांचा मृत्यू झाला. आयशरमधील चालक मकसूद हसन मेहमूद हसन रा. ओबीदुल्लागंज रायसेन मध्य प्रदेश याचाही मृत्यू झाला.

तर अजमीन हसन मकसूद हसन रा. ओबीदुल्लागंज, गजानन विठ्ठल नान्हे आणि गजानन आंबटकर हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघाताची माहिती मिळताच खरांगणा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह आणि जखमींना वाहनांमधून बाहेर काढण्यात आले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

याप्रकरणी डंपरचालक गजानन नांदने यांच्या तक्रारीवरून खरांगणा पोलिसांनी आयशर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार अंबादास टोपले यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय यशवंत गोहोत्रे आणि जमादार दिनेश धवने पुढील तपास करीत आहेत.

# नागरिकांना 'डिजिटल सापळ्यात' पकडले

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर आपले मत व्यक्त करत सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, केंद्र सरकारने युपीआय व्यवहारांवर मर्चंट डिस्काउंट रेट अर्थात सोप्या भाषेत युपीआय व्यवहारांवर अगदी सरसकट नाही पण शुल्क लावून भारतीयांवर मग ते व्यापारी असोत की ग्राहक यांच्यावर, डिजिटल सापळा लावल्याचा आरोप केला आहे.



नॅशनल पेमेंट्स कार्पोरेशन ऑफ इंडिया नुसार, १५ ऑक्टोबरपासून युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस या रिअल-टाइम डिजिटल पेमेंट प्रणालीद्वारे व्यापा-यांना (मर्चंट्सना) केल्या जाणा-या २,००० रुपयांवरील पेमेंट्सवर ०.४ टक्के शुल्क आकारले जाणार आहे. मात्र युपीआय पेमेंट्सवर चार्जेस लागणार असल्याचे समोर येताच विरोधक आक्रमक झाले आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी देखील केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. २१ ऑगस्ट २०२२ ला सरकारने युपीआय व्यवहारांवर कुठलंही शुल्क असणार नाही,असे घोषित केल्याचा पुरावा देत राज ठाकरे यांनी भल्या मोठ्या पोस्टमधून टीका केली आहे.आधी नोटबंदी करून मग आता आम्ही कसे डिजिटल व्यवहाराला चालना देतोय हे दाखवत युपीआय व्यवस्था आणली. मग त्याचा गाजवजा केला, स्वतःची स्तुती करून घेतली, लोकांना सवय लावली आणि अचानक एकेदिवशी घोषित करून टाकले की आता या व्यवहारांवर शुल्क लागेल. थोडक्यात नागरिकांना गुंगवत ठेवले आणि हळूच डिजिटल सापळ्यात पकडलं. मी गेली अनेक वर्ष सांगतोय की गाफील राहू नका किंवा सगळे किती आलबेल आहे आणि किती छान सुरु आहे असं अजिबात मानू नका. तुमच्या दारांवर हे सरकार कधीतरी टकटक करणार. आणि त्याची सुरुवात झाली आहे.राज ठाकरे पुढे म्हणाले की, सरकारने डिजिटल व्यवहारांसाठी युपीआय व्यवस्था आणली. तिला प्रतिसाद मिळेल असे बघितले आणि तिला प्रतिसाद मिळाला हे सगळं ठीक आहे. पण जर हेतू डिजिटल पेमेंट व्यवस्था आणून आर्थिक देवाणघेवाण सोपी करण इतका स्वच्छ होता, तर ज्या दिवशी या पेमेंटच्या इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये गुंतवणूक केली तेंव्हाच ती चालत राहावी आणि सामान्य माणसांच्या खिशाला झटका बसू नये म्हणून तरतूद का नाही केली ? अशा पेमेंट व्यवस्थांसाठी दीर्घकालीन देखभाल असो की सायबर सुरक्षा असो यासाठी पैसा लागणार मग त्याची तरतूद अर्थसंकल्पात कायम स्वरूपी का नाही केली? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.हा निर्णय घेताना केंद्र सरकारने कोणाशी सल्लामसलत केली, किंवा परदेशी कार्ड कंपन्या आणि जागतिक पेमेंट व्यवस्था यांची अस्वस्थता नव्हती असे सरकार ठाम सांगू शकेल ? उत्तर नाही असं आहे. सरकारवर कुठून तरी दबाव असेल, त्यांनी त्याचा फायदा स्वतःची तिजोरी भरून काढायला वापरला, असे राज ठाकरे म्हणाले.

# घरगुती एलपीजी सिलेंडर बुकिंगसाठी नवा नियम, आधार बायोमेट्रिक ऑथेंटिकेशन सक्तीचे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**घरगुती वापराच्या अनुदानित एलपीजी सिलेंडर बुकिंगसंदर्भात केंद्र सरकारकडून नवा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वाय मंत्रालयाने यासंदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. आता अनुदानित घरगुती वापराच्या सिलेंडर बुकिंगसाठी ऑथेंटिकेशन करावेच लागणार आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, '१ ऑक्टोबर २०२६ पासून, घरगुती LPG ग्राहकांना लागू असलेल्या सबसिडीसह नियंत्रित किरकोळ विक्री किमतीत सिलेंडर बुक करण्यासाठी बायोमेट्रिक आधार ऑथेंटिकेशन पूर्ण करणे आवश्यक असेल.'

बायोमेट्रिक ऑथेंटिकेशन कशासाठी?

मंत्रालयाने म्हटले आहे की,'BAA अर्थात बायोमेट्रिक आधार ऑथेंटिकेशन हे सबसिडी असलेला LPG ख-या आणि गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचेल याची खात्री करण्यासाठी केले जात आहे. प्रत्येक एलपीजी जोडणी आधार प्रमाणित ग्राहकाशी जोडल्याने सबसिडी असलेल्या घरगुती सिलिंडरचा व्यावसायिक आणि औद्योगिक वापरासाठी होणारा गैरवापर टाळला जाईल.''दुबार आणि अपात्र एलपीजी कनेक्शन बंद केले जातील आणि सबसिडीचे वितरण पारदर्शक आणि अचूकपणे होईल. योग्य कुटुंबाला ख्रक्र नाकारणे हा या प्रक्रियेचा उद्देश नाही. असेही केंद्राने म्हटले आहे.




**१ ऑक्टोबर २०२६ पासून काय बदलणार**

ज्या ग्राहकांनी आधीच BAA प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांना ती पुन्हा करण्याची गरज नाही. त्यांचे बुकिंग पूर्वीप्रमाणेच सुरू राहिल.

ज्या ग्राहकांनी BAA प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांचे ऑथेंटिकेशन पूर्ण झाल्यावरच सबसिडीसह डच्छ दराने एलपीजी बुकिंग सुरू केले जाईल.

**बायोमेट्रिक आधार ऑथेंटिकेशन कसे पूर्ण करायचे?**

सिलेंडर घेताना - डिलिव्हरी करणारी व्यक्ती ग्रक मोबाईल अप्लिकेशन वापरून जागेवरच प्रमाणीकरण पूर्ण करू शकते.

वितरकाच्या शोरूममध्ये - ग्राहक त्यांच्या ख्रक्रवितरकाकडे जाउन तेथे ऑथेंटिकेशन पूर्ण करू शकतात.

ग्रक मोबाईल अॅप्सवर - ग्राहक खालील अॅप्स वापरून घरबसल्या ही प्रक्रिया स्वत? पूर्ण करू शकतात.

१) इंडेन ग्राहकांसाठी IndianOil ONE, २) भारतगॅस ग्राहकांसाठी HelloBPCL, ३) HP गॅस ग्राहकांसाठी HP PAY

# गणेश मूर्तीच्या पायथ्याशी 'पॉर्न वेबसाईटचे क्यूआर कोड

## संतापजनक प्रकाराने खळबळ, तीन तरुणांना अटक

**अकोला/प्रतिनिधी :** धार्मिक, सांस्कृतिक, पवित्र व एकत्मतेचा प्रतीक असलेल्या गणेशोत्सव सणाला गालबोट लावण्याचा अयशस्वी प्रयत्न वाशीम शहरात झाला. शहरातील काळे फैल परिसरातील सार्वजनिक गणेश मंडळाच्या मंडपात गणेशमूर्तीच्या पायथ्याशी पार्न वेबसाईटची लिंक असलेला क्यूआर कोड चिकटवण्याचा संतापजनक प्रकार तीन माथेफिरू तरुणांनी केला. या प्रकरणात तपासाची सूत्रे वेगाने फिरवत पोलिसांनी त्या तरुणांना बेड्या ठोकल्या आहेत. न्यायालयाने आरोपींना २१ सप्टेंबरपर्यंतची पोलीस कोठडी सुनावली.

***नेमकं घडलं काय?***

वाशीम शहरातील जय भवानी गणेश मंडळाच्या मूर्तीजवळ १७ सप्टेंबर रोजी रात्री ११:०० वाजेच्या सुमारास अश्लील व्हिडिओ प्रसारित करणारा क्यूआर कोड लावण्यात आल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी राम अर्जुन काळबांडे (रा. काळे फैल, वाशीम) यांच्या तक्रारीवरून शहर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमांविरुद्ध भारतीय न्याय संहितेचे कलम २९९, ३५६ (२) बी सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००० च्या कलम ६७ आणि ६७ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.



पोलिसांनी चार पथके तयार करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची सूक्ष्म पाहणी केली. संशयितांची ओळख पटवली.

***आरोपींच्या मुसक्या आवळल्या***

पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकून तीन आरोपींना ताब्यात घेतले. यामध्ये तन्मय शंकर मुठाळ (वय १९ वर्ष, रा. चिवरा, (मालेगाव, ह.मु.माधव नगर, वाशीम), युगंधर मोहन अफुने (वय १८ वर्ष, रा. अंबिका नगर, लाखाळा, जि. वाशीम) आणि सुमित कैलास भोने (वय १८ वर्ष, रा. सावरगाव जिरे, जि. वाशीम) यांचा समावेश आहे. आरोपींची सखोल विचारपूस केली. त्यांनी कृत्य केल्याची कबुली दिली. आरोपींना वाशीम जिल्हा न्यायालयात हजर केले असता न्यायाधीशांनी त्यांना २१ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

**आरोपींची सखोल चौकशी होणार**

या आरोपींनी अशा प्रकारचे क्यूआर कोड इतर कुठे चिकटवले आहेत का? तसेच याव्यतिरिक्त त्यांनी इतर काही सायबर गुन्हे केले आहेत का? या दृष्टीने पोलीस सखोल चौकशी करणार आहेत. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर आढे व वाशीम शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांच्या नेतृत्वाखाली पथकाने केली.

## गणपतीपुळे मंदिरात ड्रेस कोड लागू

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीवरील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे येथील श्रीदेव गणपती मंदिरात आता १ जानेवारी २०२७ पासून भाविकांसाठी ड्रेस कोड सक्तीचा केला जाणार आहे. मंदिराचे पावित्र्य आणि परंपरा जपण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मंदिर देवस्थान प्रशासनाकडून देण्यात आली आहे. संस्थान श्रीदेव गणपतीपुळे या मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष नीलेश कोल्हटकर यांनी द इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या माहितीनुसार, मंदिरामध्ये गेल्या वर्षीच या वस्त्रसंहितेची प्राथमिक स्वरूपात अंमलबजावणी सुरू करण्यात आली होती. त्यानंतर भाविकांमध्ये याबाबत गैरसमज किंवा तक्रारी राहू नयेत म्हणून गेल्या काही महिन्यांपासून जनजागृती मोहीम राबवण्यात येत होती. आता पुढील वर्षाच्या १ जानेवारीपासून या नियमांची मंदिरात काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल. मंदिरात येताना गुडघ्यापेक्षा वर असणारे तोकडे कपडे, शार्ट्स किंवा स्कर्ट घालून येणा-या भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. हा नियम पुरुष आणि महिला या दोघांनाही समान रीतीने लागू असेल. तसेच १० वर्षांखालील मुलांना या नियमातून सूट देण्यात आली आहे. लहान मुलांना ड्रेस कोड लागू नसेल.

# 'व्यवस्थेला विद्यार्थी नकोय, अंधभक्त हवेत'

## राहुल गांधी यांचा तरुणांशी संवाद, 'छात्रों की गूंज'मधून सरकारवर टीका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** 'विद्यार्थ्यामध्ये जाणून घेण्याची जिज्ञासा असते आणि तो प्रश्न विचारतो. पण, व्यवस्थेला विद्यार्थी नकोय, तर अंधभक्तहवे आहेत', अशी टीका विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. मध्य प्रदेशातील इंदूरमध्ये छात्रों की गूंज कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात राहुल गांधींनी तरुण-तरुणींशी संवाद साधत त्यांचे प्रश्न जाणून घेतले.

शनिवारी झालेल्या या कार्यक्रमात बोलताना राहुल गांधी म्हणाले की, 'कोणतीही गोष्ट सांगितली की, विद्यार्थी लगेच स्वीकारत नाही. विद्यार्थी प्रश्न विचारतात. कोणत्याही व्यक्तीला मोठ्या संस्थेची जबाबदारी कशी मिळाली, हे ते विचारतात. क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन कसे बनले, असा प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारले पाहिजे.'

**प्रश्न विचारण्याची वृत्तीच विद्यार्थ्यांना विशेष बनवते**

मोठे उद्योगपती, न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग आणि देशातील इतर महत्त्वाच्या संस्थांचाही उल्लेख राहुल गांधी यांनी केला. ते म्हणाले, 'देशातील संस्थान व्यवस्थित काम का करत नाहीये, असे प्रश्न विचारण्याची सवयच विद्यार्थ्यांना विशेष बनवते. कोणत्याही गोष्ट डोळे झाकून स्वीकारण्याऐवजी विद्यार्थ्यांना त्यामागचे कारण समजून घ्यायचे असते.'



**विद्यार्थी धाडसी असतो म्हणून प्रश्न विचारतो-**राहुल गांधींनी विद्यार्थी आणि अंधभक्त शब्दाचाही उल्लेख केला. ते म्हणाले की, 'विद्यार्थ्यामध्ये जाणून घेण्याची उत्सुकता, जिज्ञासा असते. विद्यार्थी दुस-याचं म्हणणं ऐकून घेतो आणि स्वतःचे मतही मांडतो. गरज पडली तर प्रश्नही विचारतो. नवीन माहिती मिळाली, तर स्वतःच्या भूमिकेबद्दलही विचार करतो. विद्यार्थ्यांच्या उलट अंधभक्त असतो. तो प्रश्न विचारायचे टाळतो. तिरस्कार, गर्व आणि भीती असते', असे राहुल गांधी म्हणाले.

'तरुणांना जाणून घ्यायचे आहे की, शाळा-महाविद्यालयांची अवस्था खराब का झाली आहे. त्याच्या इमारती, पायाभूत सुविधा चांगल्या का नाहीत? प्रश्नपत्रिका का फुटत आहेत आणि तरुणांना रोजगार का मिळत नाहीये?', असे प्रश्न उपस्थित करत राहुल गांधींनी सरकारवर टीका केली.

**विद्यार्थ्यांनी मांडल्या समस्या**

यावेळी मध्य प्रदेशातील वेगवेगळ्या भागातून आलेल्या तरुण-तरुणींनी राहुल गांधींना त्यांच्या प्रश्न आणि अडचणी सांगितल्या. आदिवासी भागात आरोग्याच्या सुविधा नाहीत, वसतिगृह नाही, जमिनी आणि सरकारच्या रिक्त जागांबद्दल एका आदिवीसी विद्यार्थ्याने समस्या मांडली. काही विद्यार्थ्यांनी राज्य लोक सेवा आयोगाकडून घेतल्या जाणा-या परीक्षेतील गैरप्रकाराबद्दलचा मुद्दा मांडण्यात आला. इंदूरमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांना तिथे सामोरं जावं लागत असलेल्या अडचणी सांगितल्या. भाडेवाढ, शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणे, महागाई आणि शिक्षणाचा वाढलेला खर्च हे मुद्दे विद्यार्थ्यांनी राहुल गांधींसमोर मांडले.

## सिद्धिविनायकाच्या चरणी रणवीर-दीपिका

**मुंबई :** बालिवूडची लोकप्रिय जोडी रणवीर सिंग आणि दीपिका पदुकोण यांच्या घरी लवकरच पुन्हा एकदा चिमुकल्या पाहुण्याचे आगमन होणार आहे. दुस-यांदा आई-बाबा होणा-या या दांपत्याने गणेशोत्सवाच्या निमित्ताने मुंबईतील प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक मंदिरात जाउन बाप्पाचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले. यावेळी रणवीर प्रेग्नेटं असल्याने दिपीकाची काळजी घेताना दिसला.सिद्धिविनायक मंदिरात उपस्थित असताना दोघेही पारंपरिक वेशभूषेत लक्ष वेधून घेत होते. दीपिकाने मॅटर्निटी एथनिक पोशाख परिधान केला होता, तर रणवीरही सणाच्या पारंपरिक लुकमध्ये दिसला. मंदिर परिसरात गर्दी असल्याने रणवीरने दीपिकाचा हात धरला होता. गर्दीतून वाट काढत तो दीपिकाला सुरक्षितपणे पुढे घेउन जात होता.याआधी सप्टेंबर २०२४ मध्ये मुलगी दुआ हिच्या जन्मापूर्वीही या दोघांनी सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा दुस-या बाळाच्या जन्मापूर्वी त्यांनी बाप्पाच्या चरणी लीन होणे पसंत केले आहे. सिद्धिविनायक दर्शनाच्या एक दिवस आधी, गुरु वारी रात्री रणवीर सिंगने मुंबईतील प्रसिद्ध लालबागच्या राजाचेही दर्शन घेतले. करी रोड परिसरातील नवसाच्या गणपतीसमोर नतमस्तक होत त्याने आशीर्वाद घेतले होते.

# आदित्य ठाकरेंना 500 कोटींच्या मानहानीची नोटीस

**मुंबई/प्रतिनिधी :** दिशा सालियन मृत्यू प्रकरणावरून महाराष्ट्रातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले असून, या प्रकरणाला आता गंभीर कायदेशीर वळण मिळाले आहे. दिशा सालियन यांचे वडील सतीश सालियन यांनी आमदार आदित्य ठाकरे यांना ५०० कोटी रुपयांच्या मानहानीच्या दाव्याची नोटीस बजावली आहे. ही नोटीस देण्यासाठी सतीश सालियन स्वत? आज ठाकरे यांचे निवासस्थान असलेल्या 'मातोश्री' बंगल्या पोहोचले होते.यावेळी तिथे शिवसैनिकांचाही मोठी गर्दी केली होती. आदित्य ठाकरे यांच्या लोकांनी मातोश्रीबाहेर येउ नका अशी धमकी दिल्याचा आरोप दिशा सालियनच्या वडिलांनी केला. त्यांनी सांगितलं की, मातोश्रीवर जाउन नोटीस देण्याचा निर्णय आपण केवळ धमकी दिली गेल्यामुळेच घेलत्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, कला नगरच्या प्रवेश द्वारावर आदित्य ठाकरेंच्या वकिलांनी नोटीस स्वीकारली, अशीही माहिती त्यांनी दिली.या कायदेशीर नोटीसमध्ये आदित्य ठाकरे यांच्याकडून ५०० कोटी रुपयांच्या नुकसानभरपाईची मागणी करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात दिशा सालियन प्रकरणावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यावेळी वकील निलेश ओझा यांनी सांगितले की, धमक्यांमुळे कायदेशीर लढाई थांबणार नाही. यापूर्वी, सतीश यांनी म्हटले होते की, ते राजकीय व्यक्ती नाहीत आणि सीबीआयने योग्य तपास केला आहे. निलेश ओझा यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे एक कनिष्ठ सहकारी वकील त्याच वेळी ही कायदेशीर नोटीस बजावण्यासाठी उपस्थित होते. या नोटीसमध्ये बिनशर्त जाहीर माफी मागावी आणि ५०० कोटी रुपयांचा डिमांड ड्राफ्ट नुकसानभरपाई म्हणून द्यावा, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.



'घटनेनुसार देशात सर्वजण समान आहेत,' अशी ठाम भूमिका मांडत ओझा म्हणाले, 'आम्हाला वकिली करण्यापासून रोखण्याची थेट धमकी दिली, म्हणूनच आम्ही थेट मातोश्रीच्या दारात येउन ही नोटीस बजावली आहे. आता तुम्ही हवे तितके गुंड बोलवा किंवा जे करायचे ते करा.

# संपादकीय

## प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'राकाँ'ची पुनर्बांधणी?

अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर रोज कोणत्या ना कोणत्या नकारात्मक कारणांनी चर्चेत असलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वतःला सावरण्याच्या स्थितीपर्यंत येऊन ठेपला आहे, अशी (छोटीशी) आशा वाटू लागली आहे. २७ सप्टेंबरला पक्षाने नाशिकमध्ये राज्यव्यापी शिबीर आयोजित केले असून या शिबिरात पक्षाचे राज्यातले सहा-सातशे पदाधिकारी, महत्त्वाचे कार्यकर्ते आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा थेट संवाद होण्याची शक्यता आहे. शिबिरात केवळ व्यासपीठावरील निमंत्रितच बोलणार, की काही विचारी कार्यकर्त्यांनाही बोलण्याची संधी मिळणार, हे अजून स्पष्ट झाले नसले तरी या शिबिराच्या निमित्ताने सुनेत्रावहिनी आपली पक्षातली अधिक सक्रियता जाहीर करतील, असे म्हटले जाते आहे. 'वहिनी आहेत ना!' या बिरूद वाक्याने राष्ट्रवादी काँग्रेस राज्यभर विशेष अभियान छेडणार असून तेच सुनेत्रावहिनींचे 'रिलॉन्चिंग' असेल, अशा बातम्या काही ठिकाणी प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या खऱ्या, की खोट्या हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पण पक्षच 'रिलॉन्चिंग' वगैरे शब्दप्रयोग करणार असेल, तर आनंदी आनंदच म्हणायचा! राजकीय पक्ष आणि त्याच्या नेतृत्वाला हरघडी विविध अवस्थांतून जावे लागते. बाहेरची परिस्थिती बदलत असल्याने त्या बदलत्या परिस्थितीत टिकून राहण्यासाठी स्वतःत बदल करावे लागतात. ही सतत चालणारी प्रक्रिया असते. साप कधीतरी कात टाकतो आणि तरुण होतो, तसे राजकीय पक्ष आणि नेतृत्वाचे नसते. अशी कात टाकेपर्यंत ना परिस्थिती थांबत, ना आव्हाने वाट पाहात थांबून राहात. कार्यकर्त्यांसमोर आणि अन्य पक्षांच्या तुलनेत पक्षनेतृत्वाला कालसुसंगत राहणे भाग असते. त्यासाठीचा लढा त्याला रोज स्वतःशच द्यावा लागतो. या लढ्यात जे थकतात, ती नेतृत्व बाजूला पडतात. असे नेतृत्व कालविसंगत वाटू लागते. त्यांचे कोणतेही प्रतिपादन, आवाहन त्यांच्या कार्यकर्त्यांनाच पोकळ वाटू लागतं. सर्वसामान्य जनता तर त्याकडे दुर्लक्ष करते. सुनेत्रा पवार यांची राजकीय कारकीर्द आत्ताशी सुरू होते आहे. अजितदादा असतानाच लोकसभेतला पराभव पचवून त्यांनी राज्यसभा गाठली. पतीच्या आकस्मिक निधनाने त्यांना राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची धुरा स्वीकारावी लागली. सगळ्याच घडामोडी इतक्या आव्हानात्मक, अपरिहार्य आणि वेगवान होत्या, की आपल्या मर्जीने, सावधपणे पाऊल टाकण्याएवढी फुरसत त्यांच्याकडे नव्हती. आठ महिन्यांनंतर त्यांना थोडी स्थिरता वाटू लागली असेल आणि त्यांनी महाराष्ट्रात फिरण्याची तयारी सुरू केली असेल, तर त्यासाठी 'रिलॉचिंग' हा शब्द त्यांच्यासाठी अन्यायकारक आहे. कोणताही प्रादेशिक पक्ष हा एकखांबी तंबूच असतो. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्थापन केलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असो, की दिवंगत अजितदादा यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असो, दोन्हीही एकखांबी तंबूच आहेत. शरद पवार यांनी पक्ष स्थापन केला, तेव्हा त्यांच्यासोबत पी. ए. संगमा, तारीक अन्वर आणि आणखीही काही नेते होते. काँग्रेसला पर्यायी पक्ष स्थापन करण्याचा विडा त्यांनी उचलला होता. काँग्रेसमध्ये नसलेली लोकशाही त्यांना पक्षात आणायची होती. प्रत्यक्षात पक्ष केवळ शरद पवार यांच्याभोवती उरला आणि त्यांच्या सख्ख्या पुतण्याचाच जीव त्या पक्षात गुदमरू लागला! खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ आणि आमदार दिलीप वळसे-पाटील यांना आपणच नव्या पक्षाचे शिल्पकार आहोत, असं कितीही वाटत असले, तरी 'पवार' या आडनावाशिवाय हा पक्ष उभाच राहू शकत नाही, याची जाणीव यातल्या प्रत्येकाला होती; आहेही. म्हणूनच अजितदादा स्वतंत्र होण्यास तयार होईपर्यंत यातले बहुतेक नेते अडकून पडले होते. अजितदादांच्या निधनानंतरही या परिस्थितीत फरक पडला नाही. म्हणूनच पटेल-तटकरे यांनी घाईघाईने सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घ्यायला लावली. 'पवार'च हवा, फक्त तो आपल्या सोयीचा हवा, एवढाच त्यांचा त्यामागे किरकोळ स्वार्थ होता! सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्यानंतर लगेच त्या प्रभावीपणे पक्ष आणि सरकारातील स्थान हाताळू शकतील, अशी शक्यता नव्हती. त्याअर्थाने त्या नवख्या होत्या. महायुतीतल्या आपल्या वाट्याला न्याय द्यायला त्यांना थोडा वेळ लागणार होता. त्यासाठी त्यांना पार्थ पवार यांची मोठी मदत होती. पार्थही नवशिकेच होते. पण, अधूनमधून वडिलांबरोबर राहिल्याने त्यांना निदान वातावरणाचा थोडा सराव होता. वडिलांमागे बसून त्यांनी पक्षातले सगळे चेहरे नीट न्याहाळलेले होते. ते सगळ्यांना ओळखून असल्याने हाती सूत्र येताच त्याची प्रतिक्रिया त्यांच्या राजकीय वर्तनात दिसू लागली. परिणामी पक्षात गोंधळ उडाला. आजही तो पूर्ण शमला आहे, असं म्हणता येणार नाही. नाशिकच्या नियोजित शिबिराबाबत म्हणूनच उत्सुकता आहे. प्रादेशिक पक्षाच्या नेतृत्वाला पक्षाची सूत्रं एकहाती आपल्याकडेच ठेवावी लागतात. ती त्यांची गरज असते. देशातला एकही प्रादेशिक पक्ष या नियमाला अपवाद नव्हता, नाही आणि होण्याची शक्यताही नाही. अशा पक्षात ज्या नेत्यांना आपल्याच खांद्यावर पक्ष उभा आहे असे वाटते, त्यातला कोणीही कधी त्या पक्षाचा चेहरा होऊ शकलेला नाही. जिथे कुटुंबातलाच असा पर्यायी चेहरा तयार झाला, तिथे छोट्याशा पक्षाची आणखी छोटी शकले झाली! राष्ट्रवादी काँग्रेसमधला संघर्षही याच परिप्रेक्ष्यातून पाहावा लागेल. पटेल-तटकरे यांनी घाईघाईने सुनेत्रावहिनींना उपमुख्यमंत्री पदाची शपथ घ्यायला लावली, त्याचवेळी यापुढे पक्षाचा चेहरा त्याच असणार, हे निश्चित झाले. त्यांचे नेतृत्व आपल्या मतदाराच्या मनावर ठसवण्यासाठी आता पक्षाला कार्यक्रम उपक्रम हाती घ्यावे लागतील. या पक्षाचा मतदार आजही अजितदादांचाच मतदार आहे. तो भावनेने बांधलेला आहे. पक्षाची पुनर्बांधणी करतानाही ते विसरून चालणार नाही.

# शेती, शेतकरी व प्राप्त स्थितीत आवश्यक

शेतीचा विषय शेतकऱ्यांना आणि सर्वसामान्यांना माहित असतो, पण त्यातील समस्या, संकटे, व्यापारातील चढाओढ, नफेखोरी, मजुरांची वानवा, तुघलकी निसर्ग आणि बाजारपेठेत गोठलेले धान्याचे दर याची जाणीव सर्वसामान्यांना नसते. ती शेतकऱ्यांनाही नसते असे माझ्या निदर्शनास येते. त्यामुळे शेतकऱ्यावरच ते दुदैव उलटलेले दिसते. सर्वसामान्य जनता शासनावर आरोप करून मोकळी होते आणि शासन आपल्या शक्तीनुसार उपाययोजना करते, पण या दुष्टचक्रातून शेतकरी बाहेर पडत नाही.


**१९७० पूर्वीची स्थिती**

१९७० पर्यंत महाराष्ट्रात पारंपारिक पद्धतीने शेती होत होती. घरचेच बी-बियाणे, बैलजोडीने मशागत, घरचेच शेणखत आणि निसर्गाच्या पाण्यावर पीक घरी यायचे. रासायनिक खते व औषधांचा वापर नव्हता. बागायती शेतीत मोटेच्या पाण्याचा वापर आणि विहिरीवर मोट हाकलण्याचा आनंद घेणारी मुले, असा तो काळ होता. प्रत्येकजण आनंदात दिसत होता.

हरित क्रांती आणि वाट चुकलेला शेतकरी

या आनंदी वातावरणाला गालबोट लागले ते १९६८ आणि १९७२ च्या दुष्काळाने. त्याचवेळी भारत-पाक युद्धाच्या झळा जनतेला सोसाव्या लागल्या. पाऊस नाही, धान्य नाही. मिलो ज्वारीसारखे अन्न परदेशातून आयात करावे लागले. या परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने हरित क्रांतीचे धोरण आखले. हायब्रिड बियाणे, रासायनिक खते आली आणि दुप्पट-तिप्पट उत्पन्नाच्या मोहाने शेतकरी सुखावला, पण इथेच वाट चुकला.

'कमी वेळात भरपूर प्रगती' या मंत्राने पारंपारिक शेतीला फाटा दिला गेला. घरचे बियाणे, घरचे खत जाऊन विकतचे बियाणे, रासायनिक खते, फवारणीची औषधे यांची कास धरावी लागली आणि व्यापार करणाऱ्यांच्या गुलामगिरीत शेतकरी अडकला. उत्पन्न वाढले तरी पदरात पैसे पडले नाहीत.....





१९७० पूर्वी जे उत्पन्न यायचे ते खर्च वजा जाऊन पूर्ण पदरी पडायचे. १९७० नंतर बियाणे, खते, यांत्रिकीकरण व मजुरांवरील खर्च प्रचंड वाढला. त्या तुलनेत अत्यल्प बाजारभाव, मजूर दरवाढ आणि बँकेच्या व्याजामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊ लागला आणि आत्महत्या वाढू लागल्या. बियाण्यांचे भाव, कर्ज, खतांचे दर, मजुरांचा हट्टीपणा, अवकाळी पाऊस, शिक्षणाच्या फीमध्ये वाढ आणि वन्य प्राण्यांमुळे होणारी नासाडी या 'बर्मुडा ट्रँगल'मध्ये शेतकरी अडकला.

**पर्यायी मार्ग दाखवणारे प्रयोग**

**१. पद्मश्री सुभाष पाळेकर, अमरावती :** उत्पादन खर्च कमी व्हावा यासाठी शून्य मशागत तंत्राचा मंत्र दिला. दीर्घकालीन फायद्याची ही पद्धत आहे. त्यांच्या योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मश्री प्रदान केली.

**२. पद्मश्री सुभाष शर्मा, यवतमाळ :** १९७० पासून पारंपारिक शेती करत होते, पण १९९४ पासून विषमुक्त शेती सुरू केली. १५-२० एकर शेतीला १ गाय पुरेशी आहे व तिच्या शेण-मूत्राच्या वापराने रासायनिक खतांची गरज नाही, हे त्यांनी सिद्ध केले. गवत शेतातच टाका आणि माती समृद्ध करा, हा त्यांचा मंत्र. त्यांना २०२५ मध्ये पद्मश्री मिळाली.

**३. चंद्रशेखर भडसावळे, नेरळ (सगुणा रीजनरेटिव्ह टेक्निक - SRT) :** अमेरिकेत उच्च पदावर नोकरी करून २०१२ मध्ये मायदेशी परत आले. शेतात एकदाच नांगरणी करून ४.५ फुटावर बेड काढायचे, गवत कापून तिथेच टाकायचे. यामुळे जमिनीत ओलावा टिकतो, खताची गरज कमी होते, बियाणे कमी लागते. पारंपारिक पद्धतीने एकरी ३० किलो सोयाबीन लागते, तर या पद्धतीने १५ किलो लागते. विदर्भात गेल्या ५-६ वर्षांपासून शेतकरी याचा अवलंब करत आहेत.

**४. अंकुश पाटील, पलूस, सांगली :** यांना लोक 'विज्ञान संत' म्हणतात. सेंद्रिय पदार्थांचा वापर करून त्यांनी खर्च कमी, नफा जास्त आणि शाश्वत शेतीचा मंत्र दिला.

**५. पंकज काळे, निसर्ग फाऊंडेशन, अमरावती :** एम.एस्सी. कृषी असलेले काळे हे अंकुश पाटील यांच्या तंत्रज्ञानाचा प्रचार-प्रसार करतात. ठिकठिकाणी निःशुल्क प्रशिक्षण देऊन शेतकऱ्यांना स्वतःच्या निविष्ठा तयार करण्यास शिकवतात.

माझा अनुभव - खर्चात ९०% बचत

मी स्वतः SRT पद्धतीचा अवलंब केला आणि अंकुश पाटील व पंकज काळे यांच्या कार्यशाळेतून खते व औषधे बनवण्याचे तंत्र

| अ. क्र. | निविष्ठा | शेतावर स्वतः केल्यावर येणारा प्रति लिटरचा खर्च | बाजारातील प्रति लिटरची किंमत | बचत |
|---|---|---|---|---|
| १ | ॲमिनो ॲसिडे | रू. १००/- लि. | रू. १००० ते १२००/ लि. | ९०% |
| २ | सूक्ष्म अन्नद्रव्य (मायक्रो न्युट्रिएंट) | रू. २००/- लि. | रू. २५०० ते ३०००/ लि. | ९०% |
| ३ | सिलीकॉन स्टिकर | रू. २००/- लि. | रू. २००० ते ३०००/ लि. | ९०% |
| ४ | विद्राव्य खत ०:५२:३४ | रू. १००/- लि. | रू. १०००/ लि. | ९०% |
| | (वरील सर्व उदाहरणे म्हणून दाखविली आहेत.) | | | |

आपल्याला सवय पडली आहे रेडिमेडची - बॉटल विकत आणा, उघडा आणि फवारा. जर आपण स्वतः मेहनत घेतली, स्वतःचे बियाणे, खते व औषधे तयार केली आणि ऐंऊ पद्धतीचा अवलंब केला तर ७० ते ८० टक्के एकरी खर्च कमी होईल.

दुकानातील ब्रँडेड बियाण्याशिवाय पिके येतच नाहीत किंवा ब्रँडेड खते-औषधांशिवाय उत्पन्न येतच नाही, हा भ्रम मनातून काढून टाका. प्रत्येक शेतकऱ्याने आत्मचिंतन करावे, परिश्रम घ्यावेत. दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आपल्या मनावर अंकुश ठेवावा, तेव्हाच प्रत्येक दिवस जागृतीचा व प्रगतीचा येईल.

**डॉ. ॲड. गजानन बुल,**
अमरावती
मो. ७५८८५४५६६१

## दुष्काळाच्या बैठकीत काजू-बदाम?

नांदेडमध्ये दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. मराठवाड्यातील पिकांची परिस्थिती, पावसाची तूट, शेतकऱ्यांचे नुकसान आणि त्यांना मिळणारी मदत यावर या बैठकीत गांभीर्याने चर्चा होणे अपेक्षित होते. बैठकीनंतर प्रत्यक्ष शेतांवर जाऊन पिकांची पाहणीही नियोजित होती. मात्र बैठकीतील एका व्हिडिओमध्ये खासदार संजय जाधव काजू-बदाम खाताना दिसल्यानंतर हा विषय माध्यमांमध्ये चर्चेचा केंद्रबिंदू बनला. पण प्रश्न असा आहे की, दुष्काळाच्या बैठकीत नाश्त्याला काय ठेवले होते, हा खरोखरच त्या बैठकीचा मुख्य मुद्दा असायला हवा का? पत्रकारांनी आधी हा प्रश्न विचारायला हवा होता की बैठकीत दुष्काळावर काय चर्चा झाली?

बैठकीत चहा, नाश्ता किंवा अल्पोपहाराची व्यवस्था करणे हा प्रशासनाच्या व्यवस्थापनाचा भाग आहे. काजू-बदाम ठेवण्याचा निर्णय कोणी घेतला, त्यासाठी किती खर्च झाला, त्याची शासकीय नियमांनुसार तरतूद होती का, हे प्रश्न नक्कीच विचारता येतील. प्रशासनानेही अशा संवेदनशील बैठकीच्या पार्श्वभूमीवर अनावश्यक दिखाऊपणा होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. पण त्याचवेळी माध्यमांनीही दुष्काळाच्या मूळ प्रश्नापासून लक्ष विचलित होणार नाही, याची जबाबदारी घ्यायला हवी, जी आज काही माध्यमे घेताना दिसत नाहीत.

**अमोल भारसाकळे,** अमरावती
मो. ८४४६५७९१८२

## अवाजवी नफेखोरी नव्हे, ही तर दरोडेखोरी!

जीवनरक्षक आणि जीवनवर्धक औषधांच्या किमतींवर सरकारचे काही अंशी नियंत्रण असले तरी जीवनावश्यक वैद्यकीय उपकरणांना या नियंत्रणाबाहेर ठेवल्यामुळे खाजगी रुग्णालयांचे आणि कंपन्यांचे अतोनात फावले आहे. कायद्यातील त्रुटींचा आणि पळवाटांचा आधार घेत या खाजगी रुग्णालये आणि कंपन्या ११ रुपयांचे आयव्ही इन्फ्युशन सेट ३२५ रुपयांना (नफा २८४१ टक्के), ६.७५ रुपयांचे सिरिंज ५७ रुपयांना (नफा ७४७ टक्के), ४० रुपयांचे नेबप्लस नेबुलायझर ७१५ रुपयांना (नफा १६८७ टक्के) आणि २९ रुपयांचे कॅथेटर ३१० रुपयांना (नफा ९५५ टक्के) विकत आहेत. खरे तर व्यापारात वाजवी नफा मिळवणे समजण्यासारखे आहे, परंतु जेव्हा नफ्याचे प्रमाण २८४१ टक्क्यांवर जाते, तेव्हा त्याला अवाजवी नफेखोरी म्हणतात. खरे तर दरोडेखोरी म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. वास्तविक आधीच मानसिक दबावाखाली असलेले रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक रुग्णालयाकडून मिळणाऱ्या वैद्यकीय साहित्याच्या किंमती तपासण्याच्या

# संवाद

मनःस्थितीत नसतात. रुग्णाच्या याच अगतिकतेचा गैरफायदा खाजगी रुग्णालयांकडून घेतला जातो. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी नुकताच या अवाजवी नफेखोरीचा पर्दाफाश केला आहे. केंद्र सरकारने याची गंभीर दखल घेऊन सर्व अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणांच्या अवाजवी नफेखोरीवर कायदेशीर मर्यादा घालणे गरजेचे आहे.

**प्रदीप मोरे**

## सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण येणे आवश्यक

अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने वाढत्या सायबर गुन्ह्यांची दखल घेऊन रिझर्व्ह बँकेसह देशातील सर्व राज्यांना आणि केंद्रशासित प्रदेशांना काळजी घेण्याचे निर्देश दिले आहेत. ज्यावेळी देशाच्या सर्वोच्च न्यायालयाला एखाद्या गोष्टीची गंभीर दखल घ्यावी लागते त्यावेळी आपल्या यंत्रणेतील दोषसुद्धा स्पष्ट होतो. म्हणूनच सायबर गुन्ह्यांशी लढताना आपल्याकडे धोरणांपेक्षा अंमलबजावणीची भीषण कमतरता आहे. हेच नव्याने सिद्ध होत आहे. रिझर्व्ह बँकेला तातडीने मानक कार्यप्रणाली म्हणजेच एसओपी तयार करण्याचे आदेश दिले गेले. सध्या सायबर भामटे नागरिकांना फसवून ती रक्कम ज्या म्यूल खात्यांमध्ये अथवा बेनामी खात्यांमध्ये वळवतात, अशी खाती तात्काळ गोठविण्याचे आणि सायबर गुन्हेगारीच्या जाळ्यात अडकलेल्या सामान्यांच्या रकमा परत देण्याची प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची झाली आहे. सरकारकडून एकीकडे डिजिटल व्यवहाराला अधिक प्रोत्साहन देण्याचे धोरण राबवले जात आहे. तर दुसरीकडे सायबर गुन्ह्यांमुळे लोकांची होणारी फसवणूक वाढत चालली आहे. कष्टाने कमावलेले पैसे सायबर गुन्हेगार जर एका क्लिकमध्ये हडप करत असतील तर लोकांचा डिजिटल व्यवहारावरचा विश्वास कमी होऊ शकतो. त्यामुळेच न्यायालयाच्या निर्देशांचे रिझर्व्ह बँकेकडून काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे. तरच सायबर गुन्हेगारीला चाप बसू शकेल.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर

## सण नव्हे इव्हेंट

सण उत्सव हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. जगात सर्वाधिक सण भारतात साजरे केले जातात मुळातच भारत उत्सवप्रिय देश आहे. मात्र, अलीकडे हे सण उत्सवातील पावित्र्य नष्ट होत चालले आहे. ज्या उद्देशासाठी हे सण उत्सव साजरे केले जातात तो उद्देशच हरवला आहे. आता हे सण उत्सव म्हणजे इव्हेंट बनले आहेत. कोणताही सण घ्या तो सण न राहता इव्हेंट बनला आहे मग तो दिवाळी असो की गणेशोत्सव. दिवाळीमध्येही फटाक्यांचे प्रदूषण आणि आगीच्या घटना घडतातच दिवाळी हा दिव्यांच्या सण आहे मात्र अलीकडे तो फटाक्यांच्या सण बनला आहे. त्यामुळे ध्वनीप्रदूषणासोबतच वायू प्रदूषणही होते मात्र मोठ्या आवाजाचे प्रदूषण करणारे फटाके उडेवून दिवाळी साजरी करण्याकडेच अनेकांचा कल असतो. मागील काही वर्षात गणेशोत्सवाचे पावित्र्यही लोप पावले आहे. लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला तो उद्देशच आपण विसरलो आहोत. गणेशोत्सव म्हणजे राजकीय नेत्यांना पक्षांना आपले शक्तिप्रदर्शन करण्याचे हक्काचे व्यासपीठ वाटते. गणेश ही बुद्धीची देवता मानली जात असताना बुद्धी गुंडाळून त्याची खरी आराधना भक्ती करताच येत नाही. नवरात्रीमध्येही हीच परिस्थिती असते एकूणच आज सणांचे स्वरूप पूर्ण पालटले आहे. त्यातील पावित्र्य नष्ट झाले असून आता सण उत्सव म्हणजे केवळ इव्हेंट बनले आहे. सण उत्सव म्हणजे राजकीय नेत्यांसाठी शक्तीप्रदर्शन करण्याचे व्यासपीठ बनले आहे.

**श्याम ठाणेदार**

# न सोसता येणारी पानगळ!

ग्रामीण भागात आपण विचार करतो त्याहून परिस्थिती वाईट आहे. हवामान बदल त्याचा शेतीवर होणारा परिणाम, वाढते तापमान, जमिनीतली कमी झालेली पाणी पातळी, कमी झालेले उत्पन्न, वाढत असणारा खर्च याकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघण्याची वेळ हीच आहे, असे मला वाटते.

शेतात थांबायला मन धजावत नाही. होत चालेल रानं, या हिरवाई सोबतची शुष्कता, हे सगळे बघून पोटात गोळा येतो. ग्रामीण भागात विदारक परिस्थिती आहे, पिकांनी माना टाकलेल्या आहेत. हिरवळ जरी असली तरी त्यात ओसाडपणाची जाणीव होत आहे. रानमाळातून जीव निघून चालला आहे. पिकांना वाचविण्याची धडपड चालू आहे. पर्यायी स्त्रोतांचा वापर होतो आहे, परंतु आधीच पाणी नसल्याने म्हणावी तेव्हढी जमिनीत पाणीपातळी सुद्धा नाही. गावात आलेली स्तब्धता तुम्हाला गावात आल्यावर सहज जाणवेल, तुम्हाला चेहरे वाचता येत असतील तर आतल्या आत चालणाऱ्या संवादाच्या एकांकिका सापडतील. रानं भरगच्च असतात तेव्हा गावागावांत चैतन्य वाहते आणि त्या चैतन्याची नदी इतरत्र पसरत असते. हे ओसाडपण खाऊन टाकणार आहे.

शेतकऱ्यांच्या नशिबी हे दारिद्र्य कायमच असले, तरी नव्या फुटलेल्या समृद्ध जगण्याच्या आशा नव्या वर्षात नव्याने जन्म घेत असतात आणि दरवर्षी त्या अशा एखाद्या डौलदार झाडाची पाने करपून जावीत तशा करपून जातात. शेतातील पीक भरगच्च असतात तेव्हा माणसांना धीर येतो, वाळत चाललेली पिकं पाहून कणखर माणसं हतबल होऊन बसतात. लक्ष्मण खेडकर लिहितात, की

**दानेच भरले नाहीत कनसला**
**कसा धीर द्यावा रानातल्या माणसांना!**

कधी ओसंडून पाणी तर कधी पिण्याच्या पाण्याची भ्रांत, हवामान बदलाचे हे लोण आपल्या बांधावर येऊन कायमसाठी तर उभे नाही ना? गोपाल मापारी लिहितात, की -

**ऐन पेरणीत पाऊस आराम खायचा**
**पण ऐन काढणीला मुद्दाम यायचा**
**द्याव्या कुणास गरजा पोसायला आता**



**कोणाकडून उसना हंगाम घ्यायचा...**

ग्रामीण भागात आपण विचार करतो त्याहून परिस्थिती वाईट आहे. प्रचंड विदारकता आहे. हवामान बदल त्याचा शेतीवर होणारा परिणाम, पाणी पातळी, कमी झालेले उत्पन्न, वाढत असणारा खर्च याकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघण्याची वेळ हीच आहे, असे मला वाटते. हे अस्थिर जगणे सोईचे करण्यासाठी कुणाकडून उसने काही घेता येत नाही. शेतकरी म्हणून जन्माला आलं, की या अशाच अस्थिरतेच्या वाऱ्या करत जन्मभर चालत राहायचे का? हा साधा प्रश्न मला शेतकऱ्याच पोरगं म्हणून नेहमी पडतो.

आपली शेती आपल्याला मरू देत नाही, फक्त जिवंत ठेवते. जिवंत राहणे आणि मनापासून जगणे यातला फरक शेतकऱ्याच्या नशिबी येणार आहे का? ही विदारकता केवळ एखाद्या वर्षाच्या पावसाची नाही. वाढते तापमान, बदलते पावसाचे चक्र, कमी होत जाणारे उत्पन्न आणि त्याच वेळी वाढत जाणारा शेतीचा खर्च या सगळ्यांचा एकत्रित परिणाम आहे. हवामान बदलाची चर्चा आपण फक्त अनेकदा मोठ्या परिषदांमध्ये करतो.

म्हणूनच आता या सगळ्याकडे केवळ नशिबाचा भाग म्हणून पाहून चालणार नाही. पाऊस कमी पडला म्हणून आभाळाकडे पाहत बसण्यापलीकडेही आपल्याला काही करता येईल का, हा प्रश्न गावागावात विचारला गेला पाहिजे. पारंपरिक शेतीचे ज्ञान आपल्याकडे आहेच; पण त्याला नव्या वैज्ञानिक समजुतीची जोड द्यावी लागेल. बदलत्या हवामानात कोणती पिकं टिकतील, पाण्याचा वापर कसा कमी करता येईल, जमिनीची ओल कशी टिकवता येईल, शेतीचा खर्च कसा कमी करता येईल हे प्रश्न आता केवळ तज्ज्ञांच्या चर्चेचे राहिलेले नाहीत. ते आपल्या रोजच्या जगण्याचे झाले आहेत.

गावानेही या प्रश्नांकडे आपले म्हणून पाहण्याची वेळ आली आहे. पाणी अडवणे, जमिनीची पाणीधारण क्षमता वाढवणे, वृक्ष आणि स्थानिक परिसंस्था जपणे, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही कामे एखाद्या योजनेतून होण्याची वाट पाहत तर त्याचा अर्थ वेगळा असेल. यात गावातला तरुण, शेतकरी, ग्रामपंचायत, स्थानिक संस्था आणि प्रत्येक कुटुंबाची भूमिका आहे. गावागावांत हवामान बदल पूरक शेती आणि जगणे या सारख्या विषयावर सत्र व्हायला हवीत. ह्या सगळ्याचा संबंध बाजारपेठेवर परिणाम होतो, रोजगार कमी होतो, गावातून स्थलांतर वाढते आणि हळूहळू गावाच्या जगण्याची लय बदलते. म्हणून शेतीची समृद्धी ही एका संपूर्ण ग्रामीण जीवनपद्धतीला टिकविण्याचे काम करत असते.

**पिकांची पानगळ**
**शेतकऱ्यांच्या आशांची पानगळ**
**ग्रामीण चैतन्याची पानगळ**
**आर्थिक स्थैर्याची पानगळ..**
**ही पानगळ न सोसता येणारी..**

**विनायक सुनीता यशवंत**

रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# पावसाच्या खंडा मुळे शेतकरी हैराण खरीप हंगामावर संकट !

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १९ : तालुक्यात मागील दोन महीने झाले पावसाच्या खंडा मुळे खरीप हंगाम धोक्यात आला असून सप्टेबर महिना पाण्या अभावी कोरडा जात आहे ऑक्टोबर महीन्यात तर खरीप हंगाम काढण्याची लगभग असते पण या वर्षी पाऊस अल्पप्रमाणात झाला पाहिजे त्या प्रमाणात ओढे, नाल्यांना पूर नाही जुन महिन्यात थोडा पाऊस झाला पुन्हा उष्णता वाढली जुलै महिन्यात ऑग्रस्ट सप्टेंबर महिन्यात साधारण पाऊस झाला तो पाऊस कुठे झाला तर कुठे झाला नाही सर्वत्र ठिकाणी एक प्रकारची उष्णतेची लाट तयार झाली.**



**पावसाच्या खंडामुळे खरीप हंगाम धोक्यात सणाचा गोडवा हिरावला शासन शेतकऱ्यांना काय मदत देणार याकडे शेतकऱ्यांची प्रतिक्षा . उष्णतेची लाट वाढली सोयाबीन पिकांचे नुकसान . कृषी विभागाने तात्काळ पंचनामे करावे**

शेतकरी दिवसभर उन्हातान्हात खरीपाचे पिके वाचविण्यासाठी धावपळ करतात ज्याकडे स्वःताच्या विहीर बोअर ला पाणी पुरवठा आहे त्यांना विज वेळेवर मिळत नाही त्या शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. उष्णतेची प्रचंड प्रमाणात लाट आहे उष्णतेत शेतकरी खरीप हंगाम वाचविण्यासाठी धावपळ करित आहे. शेतकऱ्याचे मुख्य पिक सोयाबीन कापूस उडीद मुंग ज्वारी हळद भाजीपाला ऊस आहे.पण पाण्याअभावी पिके उद्ध्वस्त होत आहे ३० दिवसापासून पिकांना पाणी नसल्याने खरीप हंगामावर एक प्रकारे संकट आले शेतकऱ्यांच्या आशा मावळल्या आहे.खरीप हंगाम हातातून जाण्याचे चित्र पुढे आहे शेतकरी बिचारा लाखो रुपये खर्च करून शेतीची व्यवस्था केली. पाण्याअभावी पिकांची माती होत आहे सोयाबीन पिके हिरवीगार होती पाणी नसल्याने पिवळी पडून अनेक प्रकारचा रोग आला आता सोयबीन पिके उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. उमरखेड कृषी विभागाने तात्काळ शेतकऱ्यांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना न्याय दयावा अशी मागणी आहे शेतकऱ्यांनी शासनाकडे पाठपुरावा केला उमरखेड तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करावा शेतकऱ्यांना आर्थिक मदत दयावी सरसकट नुकसानग्रस्तांना. जनावरांना चारी पाणी मिळण्यासाठी छावणी करावी अश्या मागण्या आहेत या मागण्या शासणा केव्हा करणार यावर प्रतिक्षा आहे .

# आठवडी बाजारातील मटका, तितली-भंवरा जुगारावर कारवाईची मागणी

## AIMIM चे पोलिस प्रशासनाला निवेदन..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. १९ :** शहरातील आठवडी बाजार परिसरात विविध ठिकाणी जुगार, मटका, तितली व भंवरा यांसारखे प्रकार सुरू असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी असून, पोलिस प्रशासनाने या प्रकारांची गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी, अशी मागणी ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (AIMIM) च्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात AIMIMच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस प्रशासनाला लेखी निवेदन सादर केले. आठवडी बाजार परिसरातील ४ ते ५ ठिकाणी अशा प्रकारच्या गति विधी सुरू असल्याची माहिती मिळत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित ठिकाणी पोलिसांनी प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थितीची पडताळणी करावी आणि तक्रारीत तथ्य आढळल्यास कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. आठवडी बाजार परिसरात नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक व इतर नागरिकही या परिसरातून नियमितपणे ये-जा करतात. त्यामुळे सार्वजनिक



ठिकाणी सुरू असल्याच्या तक्रारी असलेल्या या प्रकारांकडे प्रशासनाने विशेष लक्ष देण्याची मागणी पदाधिकाऱ्यांनी केली.

निवेदन देताना AIMIMचे शहराध्यक्ष नौशाद तंवर, तालुकाध्यक्ष रियाज खान, तालुका संघटक अल्ताफ खान, कोषाध्यक्ष आकाश पिसारवार, सय्यद साजिद, साकिब खान यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या तक्रारींच्या अनुषंगाने पोलिस प्रशासनाकडून चौकशी व पुढील कारवाई काय होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात




### साईनाथ महाराज वसमतकर यांचे जातिभेद-अंधश्रद्धेविरोधातही प्रबोधन

**फुलसावंगी :** देशसेवेच्या २५ वर्षांच्या वाटचालीचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या 'एक दिवा आशीर्वादाचा विकसित भारताच्या संकल्पाचा' या उपक्रमांतर्गत फुलसावंगी येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.महाराष्ट्र शासनाचे स्वच्छता दूत साईनाथ महाराज वसमतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत गावातील विविध परिसरात स्वच्छता करण्यात आली. संत रविदास महाराज समाज मंदिरात आयोजित कार्यक्रमात बोलताना साईनाथ महाराज म्हणाले की,१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान संपूर्ण महाराष्ट्रात स्वच्छता अभियान राबविले जात आहे.गावाचा विकास केवळ योजनांनी नव्हे, तर स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरणातून होतो.त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारावी.यावेळी त्यांनी सामाजिक समरसतेचा संदेश देत जातिभेद दूर करून सर्वांनी बंधुभावाने वागण्याचे आवाहन केले. अंधश्रद्धेविरोधातही आसुड ओढत त्यांनी जन जागृती केली. कार्यक्रमाला भाजपा तालुकाध्यक्ष योगेश वाजपेयी,उपसरपंच कुणाल नाईक,माजी सभापती विजयराव महाजन,अमरदीप दळवे,अजय देशपांडे, वसंता भिसे,गणेश भगत, रमेश भगत,जंगलु खंदारे,ह.भ.प.गजानन मस्के,पाचंगे सर,बबन शेळके,जगदीश विनकरे,नागोराव विठ्ठुळकर,प्रमोद शेळके,धनंजय शेळके,गणपत शेकेवाड,विजय गोंडाडे,अंकुश चप्पलवाड,दत्ता पिंपळे महाराज,भाऊराव पाटील, संतोष अडकिने,प्रतिष अडकिने,शिरगिरे पाटील,मारुती वाघमारे,पांडुरंग पाचखंडे,संभाजी वाघमारे,योगेश चौधरी,रमेश पाचखंडे यांच्यासह मोठ्या संख्येने भक्त मंडळी उपस्थित होती.

### केळापूर मध्ये १ व ५ ऑक्टोबरला लोक अदालत

**पांढरकवडा :** महसूलविषयक प्रलंबित दावे आणि अपीलांमुळे




वर्षानुवर्षे कार्यालयांचे उंबरठे झिजविणाऱ्या नागरिकांना आता दिलासा मिळण्याची शक्यता आहे. केळापूर तालुक्यात जमीन व महसूल विषयक प्रकरणे परस्पर सामंजस्याने निकाली काढण्यासाठी 'महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार तसेच उपविभागीय अधिकारी स्तरावर विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.येत्या १ ऑक्टोबर २०२६ रोजी पांढरकवडा, केळापूर, चालबर्डी, करंजी, पहापळ, रेंझा आणि पाटणबोरी येथील मंडळ अधिकारी कार्यालयांमध्ये मंडळ स्तरावरील लोक अदालत होणार आहे. याशिवाय ५ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालय, केळापूर येथे नायब तहसीलदार व तहसीलदार स्तरावरील प्रकरणे, तर उपविभागीय अधिकारी कार्यालय, केळापूर येथे उपविभागीय अधिकारी स्तरावरील प्रलंबित दावे व अपीलांवर सुनावणी होणार आहे.

शेती, रस्ते, संजय गांधी योजना, पुरवठा तसेच अन्य महसूल विषयक प्रकरणांमध्ये तडजोड आणि सामंजस्याच्या माध्यमातून तोडगा काढण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. त्यामुळे प्रलंबित प्रकरणांतील संबंधित नागरिकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लोक अदालतीत प्रकरणे मांडण्यासाठी नागरिकांनी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत योग्य कागदपत्रे व लेखी पुराव्यांसह अर्ज दाखल करावा, असे आवाहन केळापूर तहसीलदारांनी केले आहे. महसूल प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यासाठी नागरिकांनी निर्धारित मुदतीत अर्ज करून सहभाग नोंदवावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### मज्जारज्जूच्या गाठीची शस्त्रक्रिया यशस्वी.. दोन आठवड्यांत महिला पुन्हा पायावर

**डॉ. मयुरेश रामपुरकर यांच्या नेतृत्वाखाली आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वी**

**उमरखेड :** मज्जारज्जूपासून सुरू होऊन मणक्याचे नुकसान करत फुफ्फुसापर्यंत पोहोचलेली गुंतागुंतीची गाठ नांदेड येथील डॉ. मयुरेश रामपुरकर यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे काढण्यात आली. ५० वर्षीय महिला अनेक महिन्यांपासून पाठीच्या व पायांच्या तीव्र वेदनांनी त्रस्त होती. पायांची ताकद कमी झाल्याने तिचे चालणेही बंद झाले होते. तपासणीत D३ स्तरावरील मज्जारज्जूच्या गाठीचे निदान झाले. शस्त्रक्रियेदरम्यान खराब झालेला मणका स्क्रू व रॉडच्या साहाय्याने स्थिर करण्यात आला. मज्जारज्जूच्या नसांपासून गाठ विलग करून फुफ्फुसाच्या दिशेने गेलेला भागही काढण्यात आला. शस्त्रक्रियेनंतर छातीत रक्त जमा झाल्याने उपचार पथकाने विशेष देखरेख केली. मात्र, अवघ्या दोन आठवड्यांत महिला कोणत्याही आधाराशिवाय चालत टाके काढण्यासाठी रुग्णालयात दाखल झाली. या यशामुळे नांदेडमधील अत्याधुनिक वैद्यकीय उपचारक्षमतेवर प्रकाश पडला आहे.

# खा.चंद्रशेखर आजाद यांच्या ताफ्या वरील हल्ल्याचा निषेध..!

## दोषींना अटक करण्याची मागणी, राष्ट्रपतींना निवेदन : Z+ सुरक्षा देण्यासह निष्पक्ष चौकशीची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १९ :** आजाद समाज पार्टी (कांशीराम) व भीम आर्मीच्या वतीने खासदार तथा आजाद समाज पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष भाई चंद्रशेखर आजाद यांच्या ताफ्यावर झालेल्या कथित हल्ल्याचा निषेध करण्यात आला. हल्ल्याची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना पाठविण्यात आले.

निवेदनानुसार, गोंडा येथील पीडित कुटुंबाला भेटण्यासाठी जात असताना शाहबपुर टोल गेट परिसरात खासदारांच्या ताफ्याला अडवून हल्ला करण्यात आल्याचा आरोप आहे. यात कार्यकर्ते जखमी झाल्याचे तसेच वाहनांची तोडफोड झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. CCTV फुटेजच्या आधारे हल्लेखोरांची ओळख पटवून तातडीने अटक करावी, जखमींना मोफत वैद्यकीय उपचार व नुकसानग्रस्त वाहनधारकांना भरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली. खासदार चंद्रशेखर आजाद यांना Z+ सुरक्षा देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली. कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला. यावेळी राजकुमार भगत, विशाल डाके, अजय लोखंडे, वैभव सूर्यवंशी यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# गणवेश निधी अभावी मुख्याध्यापकांची कोंडी..! शिक्षक समितीचे प्रशासनाला निवेदन

## पहिल्या गणवेशाचे ६० रुपये अद्याप थकीत, दुसऱ्या गणवेशावरून विद्यार्थ्यांमध्ये भेदभावाचा मुद्दा ऐरणीवर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. १९ :** शासनाच्या अपुऱ्या आर्थिक नियोजनाचा फटका शाळा व्यवस्थापनाला बसत असून, गणवेश निधीपासून सर्व्हिस बुक अद्ययावतीकरणापर्यंतच्या विविध प्रलंबित प्रश्नांमुळे मुख्याध्यापक व शिक्षक अडचणीत सापडले आहेत.

या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, शाखा राळेगावच्या वतीने गुरुवारी (दि. १७ सप्टेंबर) गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. शासनाच्या 'पहिल्या दिवशी गणवेश' उपक्रमांतर्गत वितरित केलेल्या पहिल्या गणवेशाची प्रतिविद्यार्थी ६० रुपयांची रक्कम अद्याप प्राप्त झालेली नाही. त्यामुळे पुरवठादारांकडून दुसरा गणवेश देण्यास अनिच्छा व्यक्त केली जात असल्याने मुख्याध्यापकांसमोर आर्थिक व प्रशासकीय पेच निर्माण झाला आहे. दुसऱ्या गणवेशासाठी मुली, अनुसूचित जाती-जमाती व बीपीएलधारक विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आल्याने उर्वरित विद्यार्थ्यांना गणवेशापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. शासनाने इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना सरसकट गणवेश द्यावा, अशी मागणी समितीने केली. यासोबतच SNA स्पर्श



खात्याशी संबंधित अडचणी, वित्तीय संस्थांच्या हप्त्यांनुसार चेक देण्यास होणारा विलंब आणि प्रलंबित सर्व्हिस बुक अद्ययावतीकरणाचा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. शिक्षकांचे आर्थिक व सेवाविषयक प्रश्न वेळेत निकाली काढण्याची मागणी करण्यात आली. राजु एकूणकर व महेश सोनेकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या भेटीत गट शिक्षणाधिकाऱ्यांनी मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत, संबंधित प्रश्नांची आपल्या स्तरावर पूर्तता करण्याचे आश्वासन दिले. तालुकाध्यक्ष हेमंत सिडाम, जिल्हा कोषाध्यक्ष संदीप टुले, सचिव अमोल पोहनकर यांच्यासह समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मोकाट गाढवांचा हैदोस, पांढरकवड्यात नागरिकाचा बळी!

## मोकाट जनावरांच्या बंदोबस्ताचा दावा हवेतच, नगरपरिषदेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. १९ :** पांढरकवडा शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, आता त्याची थेट किंमत नागरिकांना जीव गमावून मोजावी लागत आहे. १८ सप्टेंबर रोजी गोपाल कृष्ण मंदिरासमोर दोन मोकाट गाढवांनी केलेल्या हल्ल्यात किशोर बालमुकुंदजी पीपलवा (वय अंदाजे ६०) गंभीर जखमी झाले.

उमरी व नागपूर येथे उपचार घेतल्यानंतर १९ सप्टेंबर रोजी सकाळी ९.२८ वाजता त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने शहरातील मोकाट जनावरांच्या नियंत्रण व्यवस्थेचे अक्षरशः वाभाडे काढले आहेत. शहरातील रस्ते, बाजारपेठा, मंदिर परिसर आणि वर्दळीच्या ठिकाणी मोकाट जनावरांचा वावर वाढला असून, नागरिक, दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांना दररोज जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे. जनावरांच्या हल्ल्याचा तसेच अपघातांचा धोका निर्माण झाला असतानाही नगरपरिषद प्रशासनाकडून प्रभावी बंदोबस्ताची अपेक्षित अंमलबजावणी होत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कोंडवाडा व्यवस्थापनासाठी कंत्राटदार नियुक्त असताना मोकाट जनावरांना पकडणे, त्यांचे नियंत्रण आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कितपत केल्या जातात, याची चौकशी होणे गरजेचे आहे. एक नागरिकाचा जीव गेल्यानंतरही प्रशासन जागे होणार नसेल, तर आणखी किती बळींची प्रतीक्षा आहे? नगरपरिषद प्रशासनाने तातडीने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करून जबाबदारी निश्चित करण्यासाठी ठोस कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

# लिपिक निलंबित वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी तपासा?

## वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके महिनोमहिने प्रलंबित ठेवणाऱ्या यंत्रणेचीही चौकशी करा.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १९ :** जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांच्या प्रलंबित प्रकरणावरून संबंधित लिपिक स्वप्निल राठोड यांचे निलंबन करण्यात आले. जिल्हाधिकारी विकास मीना यांनी अचानक पाहणी करून दोनशेहून अधिक प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

मात्र, देयकांचा निपटारा करण्यास महिनोन्महिने दिरंगाई होत असताना केवळ लिपिकावरच कारवाई करून वरिष्ठ अधिकारी व कार्यालयीन प्रमुखांची जबाबदारी निश्चित झाली आहे का, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. 'फाईल कुठे अडली?' याचा शोध घेणार कोण? असा सवाल उपस्थित होत असून वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांच्या कामकाजावर नियमित देखरेख ठेवणे, प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेणे आणि निर्धारित कालमर्यादेत देयके निकाली काढण्यासाठी आवश्यक निर्देश देणे, ही वरिष्ठ प्रशासकीय यंत्रणेची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. यापूर्वी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी सप्टेंबर महिन्यात दोन आढावा बैठका घेतल्यानंतर १७८ देयके निकाली काढण्यात आली होती. असे असतानाही २०० दोनशे हून अधिक प्रकरणे प्रलंबित राहिली असल्यास, या कालावधीत संबंधित कक्षाच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात आले होते का, याची चौकशी होणे आवश्यक आहे. प्रलंबित देयकांची जबाबदारी केवळ संबंधित लिपिकापुरती मर्यादित आहे का, की त्यामागे कार्यालयीन पातळीवरील देखरेख आणि प्रशासकीय नियंत्रणातील त्रुटी आहेत, याचा सखोल तपास होणे गरजेचे आहे. कार्यालय प्रमुख तथा जिल्हा शल्यचिकित्सक सुखदेव राठोड यांच्या भूमिकेचीही निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी पुढे येत आहे. त्याचबरोबर वैद्यकीय देयक कक्षाशी संबंधित सर्व वरिष्ठ अधिकारी व पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांची भूमिका, आढावा प्रक्रिया, प्रलंबित फाईलींची नोंद आणि कार्यवाही यांची तपासणी करावी. लिपिकावर निलंबनाची कारवाई झाली असली तरी 'फाईल कुठे अडली, किती काळ अडली आणि त्यावर वेळेत कार्यवाही का झाली नाही?' या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. संपूर्ण प्रकरणातील जबाबदारीचा धागा वरिष्ठ स्तरापर्यंत तपासून निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. चौकशीत दोष आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बाभुळगाव तालुक्यात २८ सप्टेंबरपासून कुष्ठरोग शोध मोहीम

## गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांचे नागरिकांना आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभुळगाव, दि. १९ :** बाभुळगाव तालुक्यात कुष्ठरोगाचे वेळेत निदान करून संभाव्य अपंगत्व टाळण्यासाठी २८ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम राबविण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर मोहिमेच्या पूर्वतयारी व नियोजनासाठी पंचायत समिती बाभुळगाव येथे १७ सप्टेंबर रोजी तालुकास्तरीय समन्वय समितीची विशेष सभा गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून, त्याचे लवकर निदान व उपचार झाल्यास पुढील अपंगत्व टाळता येते. त्यामुळे आरोग्य पथके घरोघरी भेटी देणार असून, नागरिकांनी भीती व संकोच न बाळगता तपासणी करून घ्यावी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन ढोले यांनी केले. मोहिमेत समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका व स्वयंसेवक यांच्या माध्यमातून घराघरांत तपासणी करून संशयित रुग्णांचा शोध घेतला जाणार आहे. त्वचेवर संवेदना कमी असलेले फिकट किंवा लालसर चट्टे, त्वचा अथवा नसा जाड होणे, हात-पाय सुन्न पडणे आणि अशक्तपणा ही कुष्ठरोगाची संभाव्य लक्षणे आहेत. अशी लक्षणे आढळल्यास नागरिकांनी तातडीने आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा. बैठकीला सहायक गटविकास अधिकारी हेमंत निवल, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संघर्ष राठोड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. लीना मुसळे, विविध वैद्यकीय अधिकारी, गटशिक्षण अधिकारी राजू मडावी, बालविकास प्रकल्प अधिकारी सचिन पाटील यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# तायक्वांदोमध्ये आमणीच्या प्रियदर्शनी कॉन्व्हेंटची सुवर्णझेप!

## तीन खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड, दोन विद्यार्थ्यांना रौप्यपदक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. १९ :** महागाव तालुक्यातील आमणी येथील प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत दमदार कामगिरी करत क्रीडा क्षेत्रात आपली छाप पाडली. यवतमाळ येथील जिल्हा क्रीडा संकुल, नेहरू स्टेडियम येथे १६ व १७ सप्टेंबर रोजी झालेल्या स्पर्धेत शाळेच्या तीन खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावले, तर दोघांनी रौप्यपदक मिळविले.

१४ वर्षे वयोगटात शिवम किशोर जाधव (३८–४१ किलो), श्रेयश मनोज राठोड (३५–३८ किलो) आणि शरयू किशोर जाधव (२९–३२ किलो) यांनी सुवर्णपदक जिंकत विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. तर १७ वर्षे वयोगटात आराध्य दत्तराव आढाव आणि भाविका मंचकराव कदम यांनी रौप्यपदक मिळविले. या यशाबद्दल सचिव वनमालाताई राठोड, मुख्याध्यापक अभिषेक राठोड, समन्वयक वैष्णवी राठोड, क्रीडा शिक्षक तथा प्रशिक्षक मारुती बाभळे यांच्यासह शिक्षकवृंद व पालकांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# लोकप्रतिनिधींचे दुष्काळसदृश परिस्थितीकडे दुर्लक्ष?

## पावसाअभावी पिके संकटात; शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रश्न ऐरणीवर

**अमरावती/का.प्र.**

पावसाने दडी मारल्याने महाराष्ट्रातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी मोठ्या संकटाचा सामना करत आहेत. पिकांना आवश्यक पाऊस न मिळाल्याने उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत दिवसेंदिवस भर पडत आहे.

पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत स्थानिक पातळीवरून प्रशासनाकडे विविध अहवाल सादर करण्यात आले असले, तरी शेतकऱ्यांना अपेक्षित शासकीय मदत अद्याप प्रत्यक्षात पोहोचलेली नसल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत. अशा परिस्थितीत संबंधित लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन आपल्या मतदारसंघातील वास्तविक परिस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देणे आणि तातडीच्या मदतीसाठी पाठपुरावा करणे अपेक्षित आहे.

मात्र, शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर अपेक्षित तीव्रता दिसून येत नसल्याची चर्चा ग्रामीण भागात सुरू आहे. निवडणुका, राजकीय समीकरणे आणि वैयक्तिक राजकीय घडामोडींना प्राधान्य देण्यापेक्षा सध्या शेतकऱ्यांच्या अडचणी शासनदरबारी मांडणे अधिक महत्त्वाचे असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.



शेतकऱ्यांना आश्वासन नव्हे, ठोस मदतीची गरज आहे

पिके हातातून जाण्याची भीती, वाढता उत्पादन खर्च आणि पावसाची अनिश्चितता यामुळे शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. त्यामुळे केवळ पाहणी, आश्वासने किंवा कागदी अहवालांपुरते प्रयत्न न राहता प्रत्यक्ष पंचनामे, नुकसानभरपाई आणि आवश्यक त्या शासकीय उपाययोजना तातडीने करण्याची मागणी होत आहे.

लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधी म्हणून निवडून येतात. त्यामुळे संकटकाळात जनतेच्या प्रश्नांसाठी शासनदरबारी आवाज उठविणे ही त्यांची महत्त्वाची जबाबदारी आहे. आता राजकारणापेक्षा शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन प्रत्यक्ष मदत मिळवून देण्यासाठी कोण पुढाकार घेणार? हा प्रश्न सध्या शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात आहे.



नितीन पांडे कुऱ्हा



रमेश नेरकर कुऱ्हा



दत्ता गर्गे



अशोकपंत भारती महाराज



मधुसुदन ठाकुर

### चायना मांजामुळे युवक गंभीर जखमी

**अचलपूर-** शहरातील सराफा लाइन ते देवडी परिसरातून दुचाकीने जात असलेल्या युवकाने चायना मांजा पासून संरक्षण करण्यासाठी अचानक हात आडवा केला. त्यामुळे त्याची मान चायना मांजामुळे कापण्यापासून वाचली, पण हाताला गंभीर जखम झाली आहे.प्राप्त माहितीनुसार,पराग गिरधारी ककरानिया (३२, रा. बिलनपुरा, अचलपूर) असे जखमीचे नाव आहे. त्याच्या डाव्या हाताला इजा झाली असून चार टाके लागले आहेत. मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेत आहे. तो खासगी बँकेच्या डेली कलेक्शनकरिता दुचाकीने सराफा बाजारातून जात असताना अचानक गळ्यासमोर चायना मांजा आला. प्रसंगावधान राखून परागने तात्काळ आपला डावा हात समोर करून मांजा पकडला. तरी देखील हात व गळ्याला जखम झाली आहे.

# अस्वल हल्ल्यातील जखमींची आ.काळे यांनी घेतली भेट

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर-मेळघाट परिसरात अस्वलाच्या हल्ल्याच्या घटनांमध्ये जखमी झालेल्या नागरिकांच्या प्रकृतीची काल अमरावती येथील जिल्हा रुग्णालयात जाऊन विचारपूस करण्यात आली. मोझरी येथील जयराम जामुनकर तसेच नागापूर येथील खणाय पटोकार यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची माहिती घेण्यात आली.यावेळी जिल्हा वैद्यकीय अधीक्षक डॉ. नीरवाणे यांच्याशी चर्चा करून दोन्ही जखमींवर सुरू असलेल्या उपचारांची माहिती घेण्यात आली.अस्वलाच्या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अशा घटनांमध्ये जखमी नागरिकांना तातडीने आणि योग्य वैद्यकीय उपचार मिळणे आवश्यक आहे.



जखमींना रुग्णालयात आवश्यक त्या सर्व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.तसेच जखमी नागरिक व त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांना धीर देण्यात आला.प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक ती मदत आणि उपचार उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल असे यावेळी आ.केवलराम काळे यांनी सांगितले.यावेळी नागापूरचे सरपंच सुजित भास्कर ,आकाश जयस्वाल,स्वप्नील भक्ते, स्वीय सहाय्यक आकाश खैरकर उपस्थित होते.अस्वल हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर वनविभाग व प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवाव्यात, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. जंगलालगतच्या गावांमध्ये नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्याबरोबरच वन्यप्राण्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून संभाव्य हल्ले टाळण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी आमदार केवलराम काळे यांनी केली.

# मोझरीत गणेश विसर्जनासाठी कृत्रिम तलावाच्या निर्मितीसाठी पुढाकार

## -पर्यावरणपूरक गणेश विसर्जनासाठी रामचंद्र संस्थानचा स्तुत्य उपक्रम..

**तिवसा/वार्ताहर**

यावर्षी तिवसा तालुक्यात अत्यल्प पाऊस झाला.त्यामुळे नदी-नाले कोरडे पडले आहे. अश्यावेळी लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी व गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी नदीमध्ये पाणी नसल्याने गणेशभक्तांसमोर प्रश्न निर्माण झाला असतांना यातून गणेश मूर्तीची विटंबना होण्याची दाट शक्यता लक्षात



घेता मोझरी येथील रामचंद्र संस्थान च्या वतीने कृत्रिम तलावाची निर्मिती करून पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महत्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

या स्तुत्य उपक्रमांतर्गत मोझरी येथील नवीन हनुमान मंदिर रस्ता परिसरात या कृत्रिम तलावाची सुसज्ज व्यवस्था करण्यात आली आहे. नदीपात्रात पाणी नसल्याने मूर्ती विसर्जनास येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी संस्थानने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामुळे भाविकांना सुरक्षित आणि अत्यंत सन्मानपूर्वक पद्धतीने लाडक्या गणरायाला निरोप देता येणार आहे.

नदीला पाणी नसल्यामुळे मूर्तीची कुठेही विटंबना होणार नाही याची प्रत्येकाने दक्षता घ्यावी. सर्वांनी आपल्या गणेश मूर्तीचे विसर्जन नवीन हनुमान मंदिर रस्त्यावरील कृत्रिम तलावातच करावे.पर्यावरणाचे रक्षण करत बाप्पाला सन्मानाने आणि भक्तीभावाने निरोप देण्यासाठी सर्व गणेशभक्तांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.

**-सदानंद आखरे**
श्री रामचंद्र संस्थान,
मोझरी

# विद्यापीठस्तरीय निवड चाचणीतून राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक निवडणार

## १७७ स्वयंसेवकांचा सहभाग, शारीरिक व सांस्कृतिक कौशल्यांची होणार कसोटी

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय शिबिरांसाठी स्वयंसेवकांची निवड करण्याकरिता सोमवार २१ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह (दृकश्राव्य सभागृह) येथे विद्यापीठस्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ परिसरात होणा-या या निवड चाचणीत अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम या पाच जिल्ह्यांमधून जिल्हास्तरावर निवड झालेले १७७ राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

निवड चाचणीच्या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते राहणार असून, उद्घाटक म्हणून एनसीसी मुख्यालय, अमरावती येथील ८ महाराष्ट्र बटालियनचे ए.ओ. लेफ्टनंट कर्नल सौरभ मेहरोत्रा उपस्थित राहणार आहेत. तसेच विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसाठी दरवर्षी प्रजासत्ताक दिन पथसंचलन शिबिर, साहसी क्रीडा शिबिर, 'आव्हान', 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर', राष्ट्रीय एकात्मता शिबिर, 'उत्कर्ष' सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव, 'प्रेरणा', नेतृत्वगुण विकास शिबिर आदी विविध शिबिरांचे आयोजन केले जाते. या शिबिरांमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे स्वयंसेवक सहभागी होऊन विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतात.

या निवडीची प्रक्रिया जिल्हास्तरापासून सुरू करण्यात आली होती. दि. ८ ते १६ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत पाचही जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय निवड चाचणी घेण्यात आली. अमरावती जिल्ह्यासाठी विद्याभारती महाविद्यालय, अमरावती, अकोला जिल्ह्यासाठी श्रीमती एल.आर.टी. वाणिज्य महाविद्यालय, अकोला, बुलढाणा जिल्ह्यासाठी पंकज लद्द्ड इंजिनिअरिंग कॉलेज, बुलढाणा, यवतमाळ जिल्ह्यासाठी अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ, तर वाशिम जिल्ह्यासाठी श्री तुळशीरामजी जाधव महाविद्यालय, वाशिम येथे निवड चाचण्या घेण्यात आल्या.या जिल्हास्तरीय निवड चाचण्यांना पाचही जिल्ह्यांतील एकूण १,१०४ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी तज्ज्ञ परीक्षकांद्वारे अमरावती जिल्ह्यातून ५६, अकोला ३०, बुलढाणा ३७, यवतमाळ ३४ आणि वाशिम जिल्ह्यातून २० अशा एकूण १७७ स्वयंसेवकांची विद्यापीठस्तरीय निवड चाचणीसाठी निवड करण्यात आली आहे.

विद्यापीठस्तरीय निवड चाचणीत शारीरिक सक्षम गटातील स्वयंसेवकांची वजन, उंची, छाती, फ्लॅट फूट, नॉक नी, परेड, रनिंग, चिन-अप, पुश-अप, सीट-अप आदी विविध शारीरिक चाचण्यांद्वारे क्षमता तपासली जाणार आहे. त्याचप्रमाणे सांस्कृतिक गटातील स्वयंसेवकांच्या कलागुणांचीही कसोटी घेतली जाणार असून नृत्य, गायन, वाद्य वादन, वक्तृत्व, एकांकिका, प्रहसन, मूकनाट, नकला, ललित कला आदी विविध कला प्रकारांमध्ये त्यांचे परीक्षण करण्यात येणार आहे.

विद्यापीठा मार्फत नियुक्त करण्यात आलेल्या तज्ज्ञ परीक्षकांच्या माध्यमातून या सर्व स्वयंसेवकांचे कौशल्य, क्षमता व कामगिरीचे परीक्षण केले जाणार आहे. या निवड चाचणीतून निवड होणारे उत्कृष्ट स्वयंसेवक आगामी केंद्र व राज्य शासनाच्या विविध शिबिरांमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचो प्रतिनिधित्व करणार आहेत.

## संक्षिप्त

### आज खुली रांगोळी, चित्रकला स्पर्धा

**अमरावती-**श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयातील विद्यार्थी गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.२० सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता नेताजी सुभाषचंद्र बोस इनडोअर स्टेडियम येथे खुली रांगोळी व चित्रकला स्पर्धेचे आयोजन, दि. २१ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता स्व. सोमेश्वर पुस्तकर सभागृहात खुली वाद-विवाद स्पर्धा होणार आहे.गणेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांसोबतच कला, वक्तृत्व, सर्जनशीलता, सामाजिक सहभाग आणि संघभावना वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने या विविध कार्यक्रमांचे आयोजनाबाबत मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, कोषाध्यक्ष व प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, प्रा. विकास कोळेश्वर, प्रा. रवींद्र खांडेकर यांनी केले समन्वयक व आयोजकांचे अभिनंदन केले आहे. इच्छुक स्पर्धकांना सहभाग घेण्यासाठी ७८८७५५१७८२ व ९०२२०९९४५९ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

### रुग्ण सुरक्षा दिन साजरा



**अमरावती-**येथील पी.आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयात 'विश्व रुग्ण सुरक्षा दिन' मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रातील रुग्ण सुरक्षा, औषधोपचारातील सतर्कता आणि आरोग्यविषयक जनजागृती या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.प्राध्यापिका डॉ. अनुपमा काळे यांच्या प्रास्ताविक व सूत्रसंचालनाने झाली. त्यांनी अत्यंत प्रभावीपणे कार्यक्रमाची रूपरेषा मांडत उपस्थितांचे स्वागत केले. यानंतर महाविद्यालयाच्या फार्माकोव्हिजिलन्स सेलच्या समन्वयक डॉ. प्राची शहाणे यांनी औषधांचे संभाव्य दुष्परिणाम कसे ओळखावेत आणि आरोग्य केंद्रात त्यांची रीतसर नोंदणी कशी करावी, याविषयी उपस्थितांना महत्त्वपूर्ण माहिती दिली.अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन नवले यांनी मार्गदर्शन केले.पाहुणे डॉ. दिलीप चऱ्हाटे यांनी आधुनिक वैद्यकशास्त्र व आयुर्वेदिक वैद्यकीय पद्धतीत नियमित औषध निरीक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. तर मुख्य वक्ता डॉ. चैतन्य कावलकर यांनी आयुर्वेदिक औषधांचा योग्य वापर, योग्य डोस आणि औषधांच्या संभाव्य दुष्परिणामांविषयी सखोल तांत्रिक मार्गदर्शन केले.प्राध्यापिका डॉ. मेघा गौरखेडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### 'ऑपरेशन कवच' अंतर्गत हेल्मेट वाटप



**मोर्शी-**चालक दिनाचे औचित्य साधून जिल्ह्याचे ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली 'ऑपरेशन कवच' या संकल्पनेतून दुचाकी वाहन चालकांना विनामूल्य हेल्मेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.मोर्शी वरुड रस्त्यावर असलेल्या पाळा टी पॉइंट येथे पोलीस उपविभागीय अधिकारी उमेश पाटील, ठाणेदार राहुल आठवले, नगराध्यक्षा सौ. प्रतीक्षाताई गुल्हाने, उपाध्यक्ष डॉ.प्रदीप कुऱ्हाडे,काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव विपुल भडांगे,नगरसेवक भूषण कोकाटे,प्रदीप खोडसकर, पत्रकार बांधव,गोपनीय विभागाचे योगेश सांभारे,पोलीस कर्मचारी यांच्या हस्ते दुचाकी वाहन धारकांना थांबवून ज्यांच्याकडे लायसन्स तथा सर्व कागदपत्र उपलब्ध असलेल्या दुचाकी वाहन धारकांना हेल्मेट देऊन गौरविण्यात आले.हेल्मेट वापरणे दुचाकी वाहन धारकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.रस्ते अपघातात सन २०२५ मध्ये ७० टक्के अपघात दुचाकी स्वारांचे झाले असून डोक्याला झालेल्या दुखापतीमुळे त्यांचा मृत्यू झाला.जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी एका व्हिडिओद्वारे जनजागृती केली आहे. त्या अनुषंगाने जून २०२६ मध्ये सर्व दुचाकी चालक प्रवाशांना हेल्मेटची सक्ती केली असून हेल्मेट न घालता दुचाकी चालविणाऱ्या वाहन चालकांवर दंडात्मक कार्यवाही करण्याऐवजी त्यांचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले होते.

### नारायण विद्यालयाच्या कुस्तीपटूची विभागावर भरारी



**आसेगाव पूर्णा-** टाकरखेडा पूर्णा येथील नारायण कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी शुभम रामचंद्र बारकडे याने जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत चमकदार कामगिरी करत यू-१९ ग्रीको-रोमन ५५ किलो वजनगटात जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. त्यामुळे त्याची विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती तसेच अमरावती शहर व जिल्हा कुस्ती संघाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, अमरावती येथे ही स्पर्धा झाली. दरम्यान, चांदूरबाजार येथे झालेल्या तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत नारायण विद्यालयाच्या मुलींच्या संघाने उपविजेतेपद मिळविले. दोन्ही संघांच्या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत भर पडली आहे. शुभम बारकडे याच्या यशामागे त्याची जिद्द, चिकाटी व सातत्यपूर्ण मेहनत महत्त्वाची ठरली असून, त्याला क्रीडा शिक्षक अक्षय एकोणकर व प्राचार्य शरद नवले यांचे मार्गदर्शन लाभत आहे. संस्थेच्या अध्यक्षा माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख, सचिव प्रा. अभय दादा देशमुख व प्रशासकीय संचालक प्राचार्य जीवनराव देशमुख यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. विभागीय स्पर्धेसाठी शुभमला शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या

# टाटा समूहातील सत्ता संघर्ष



टाटा समूहातील सुरू असणारा सत्ता संघर्ष इंग्रजी भाषेतील इकॉनॉमिक वर्तमानपत्रात येणे स्वाभाविक आहे. पण तो अगदी मराठी वर्तमानपत्रात गाजत आहे. जी चांगली गोष्ट आहे.

तुम्ही एन चंद्रशेखरन यांच्या बाजूचे की नोएल टाटा यांच्या बाजूचे हा मुद्दा बाजूला ठेवूया आणि या सगळ्यात जी थर्ड पार्टी आहे त्या रिझर्व्ह बँकेकडे वळूया. रिझर्व बँकेने टाटा सन्स या कंपनीला एन बी एफ सी म्हणून पब्लिक इश्यू काढून सूचीबद्ध होण्यास सांगितले. त्यानंतर टाटा समूहातील अंतर्गत मतभेद, जे आधीच अनेक दिवस उकळत होते, ते बाहेर येऊ लागले.

रिझर्व बँक नियामक मंडळ/ रेग्युलेटर आहे त्यामुळे साहजिकच तिने नियमानुसार, नियामक मंडळाची घटनादत्त जबाबदारी आहे त्यानुसार काम करणे अपेक्षित आहे. रेग्युलेटरचे हे काम आहे की त्याला रिपोर्ट करणाऱ्या ज्या बँका, नॉन बँका आणि इतर अनेक एंटीटी आहेत त्यांचा कारभार पारदर्शी असला राहील हे बघितले पाहिजे.

स्टॉक मार्केट वर सूचीबद्ध झाल्यामुळे टाटा सन्सची पारदर्शकता वाढेल असे रिझर्व बँकेचे इतर अनेक प्रतिपादनापैकी एक महत्वाचे प्रतिपादन आहे. फाईन मुद्दा रेग्युलेटी एंटीटीच्या पारदर्शकतेचा आहे तसाच तो रिझर्व्ह बँक या पारदर्शकतेमुळे सार्वजनिक होणारी जी माहिती आणि आकडेवारी आहे त्याचे रेग्युलेटर म्हणून नक्की काय करते हा देखील आहे. खरेतर रिझर्व बँकेला कायद्याने एवढे अधिकार आहेत की ती आपल्या रेग्युलेटी एंटीटी कडून कोणतीही माहिती, आकडेवारी मागू शकते आणि रेग्युलेटी एंटीटीला ती देणे बंधनकारक असते. रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांना देखील कागदपत्रे तपासण्याचे अधिकार असतात.

आठवून बघा गेल्या अनेक वर्षातील रिझर्व बँकेच्या नाकाखाली सार्वजनिक बँका, खाजगी बँका, नागरी सहकारी बँका, अनेक वित्त कंपन्या, सूक्ष्म कर्ज कंपन्या यांमध्ये झालेले गैरव्यवहार आणि चक्क भ्रष्टाचार...विस्तार भयासत्व ती यादी बनवत नाही. दोन चार पाने भरतील. पण सगळे काही पब्लिक डोमेन मध्ये आणि नागरिकांच्या आठवणीत उपलब्ध आहे.

रेग्युलेटरला रेग्युलेट कोण करणार? Who will regulate the Regulator? हा प्रश्न विचारणे म्हणजे देशातील लोकशाही प्रणाली बळकट करणे. आपण सारखे राजकीय नेत्यांना दोष देतो पण देशातील अनेकानेक सार्वजनिक संस्था, विशेषतः नियामक मंडळे, मध्यमवर्गीय प्रोफेशनल्स चालवतात. त्यांची बांधिलकी, तत्कालीन राज्यकर्त्या व्यक्तींशी, मंत्र्यांशी नाही तर...कायदा, नियमवही यांच्याशी असणे अपेक्षित आहेष्ठ. ज्या सगळ्याच्या केंद्रस्थानी सार्वजनिक हित, नागरिकांच्या हिताचे रक्षण हे हेतू आहेत. या मध्यमवर्गीय प्रोफेशनल्स बद्दल फारशा चर्चा होत नाहीत. यात चार्टर्ड अकाऊंटट पासून अनेक व्यावसायिक देखील मोडतात.

ज्या देशात सामान्य नागरिकांची अर्थ वित्त कायदा साक्षरता अत्यंत प्राथमिक आहे, सिव्हिक सोसायटी चळवळ कमकुवत आहे....त्या देशांत तर त्यांच्यावरची ही जबाबदारी किती पटींनी जास्त आहे हे ही लोक जाणत नाहीत ? काय चाटायचे त्या उच्च शिक्षणाला ?

इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाच्या जोरावर, उद्या कोर्ट कचेरी झाली तरी, ते आपल्या निर्णयाचे समर्थन करतात. पण कायद्यात जसा शब्द महत्वाचा असतो तेव्हढाच त्यामागील हेतू, ग्हाहू, स्पिरीट महत्वाचे असते हे वैश्विक सर्वमान्य तत्व आहे. या मध्यमवर्गीय प्रोफेशनल्सनी सामान्य नागरिकांच्या विश्वासाला तडा दिला आहे. त्यातून अनेक प्रश्न तयार झाले आहेत.

**संजीव चांदोरकर**

# ‘रेअर अर्थ मेटल्स’ आणि भारताची नवी जागतिक रणनीती

नवी दिल्ली येथे पार पडलेल्या ब्रिक्स शिखर परिषदेनंतर ‘रेअर अर्थ मेटल्स’ हा विषय जागतिक राजकारण आणि अर्थकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे. पिरिऑडिक टेबलमधील १७ घटकांच्या समूहाला ‘रेअर अर्थ मेटल्स’ म्हटले जाते. यात स्कँडियम, इट्रियम, लॅन्थेनम, सीरियम, निओडिमियम, सॅमेरियम, युरोपियम, गॅडोलिनियम सह इतर घटकांचा समावेश होतो. वजनाच्या दृष्टीने यांचा वापर सूक्ष्म प्रमाणात होत असला, तरी त्यांच्याशिवाय आजचे कोणतेही आधुनिक तंत्रज्ञान चालू शकत नाही. मोबाईल फोन, संगणक, इलेक्ट्रिक वाहने, फ्लॅट स्क्रीन टीव्हीपासून ते संरक्षण क्षेत्रातील रडार, लेझर, क्षेपणास्त्र प्रणाली आणि अंतराळ तंत्रज्ञानापर्यंत प्रत्येक ठिकाणी हे धातू प्राणवायूसारखे काम करतात. जपानमध्ये यांना ‘तंत्रज्ञानाची बीजे’ असे म्हटले जाते.

नावात ‘रेअर’ किंवा दुर्मीळ शब्द असला, तरी हे धातू पृथ्वीच्या पोटात दुर्मीळ नाहीत. उदा. सीरियम हा तांब्याइतकाच मुबलक आहे. खरा प्रश्न त्यांच्या उपलब्धतेचा आहे. हे धातू एकाच ठिकाणी मोठ्या साठ्यात न सापडता इतर खनिजांसोबत विखुरलेल्या अवस्थेत असतात. त्यांना वेगळे करणे आणि शुद्ध करणे ही अत्यंत गुंतागुंतीची आणि खर्चिक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतून मोठ्या प्रमाणावर विषारी रसायने आणि किरणोत्सर्गी कचरा निर्माण होतो. याच पर्यावरणीय धोक्यामुळे अमेरिका आणि युरोपने ९० च्या दशकात अनेक खाणी बंद केल्या. या संधीचा फायदा घेत चीनने पर्यावरणाची पर्वा न करता स्वस्तात उत्खनन सुरू केले. आज जगातील ८५ टक्क्यांपेक्षा जास्त रेअर अर्थ मेटल्सचे उत्पादन आणि शुद्धीकरण एकटा चीन करतो.

**भूराजकीय हत्यार**

आज हा विषय केवळ व्यापाराचा राहिलेला नसून ते एक प्रभावी भूराजकीय हत्यार बनले आहे. २०१० मध्ये सागरी हद्दीच्या वादानंतर चीनने जपानला होणारी निर्यात अचानक थांबवली होती. त्यामुळे जपानचा तंत्रज्ञान उद्योग ठप्प झाला. या घटनेने जगाला चीनच्या मक्तेदारीचा धोका समजला. अमेरिकेने स्वतःच्या देशात उत्खनन सुरू करण्यासाठी परवानगी दिली असता, चीनशी संबंधित बनावट सोशल मीडिया खात्यांनी अमेरिकन नागरिकांना पर्यावरणीय धोक्यांबद्दल भडकवण्याचा प्रयत्न केला. तपासात यामागे चिनी यंत्रणांचा हात असल्याचे स्पष्ट झाले.

**भारतातील आव्हान**

या स्पर्धेत भारताचे स्थान आव्हानात्मक आहे. भारताकडे जगातील चौथा सर्वात मोठा साठा असूनही आपण गरजांसाठी आयातीवर आणि पर्यायाने चीनवर अवलंबून आहोत. यामागे धोरणात्मक कारण आहे. भारतात या खनिजांना ‘अणु खनिज’ दर्जा देण्यात आला आहे. कारण जिथे ही खनिजे आढळतात, तिथे थोरियम आणि युरेनियमसारखी किरणोत्सर्गी खनिजेही सापडतात. राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव उत्खननाचे अधिकार केवळ ‘इंडियन रेअर अर्थ्स लिमिटेड’ आणि ‘केरल मिनरल्स अँड मेटल्स लिमिटेड’ या दोनच सरकारी कंपन्यांकडे आहेत. देशाची गरज पाहता या दोन कंपन्यांची क्षमता तोकडी पडते.

**भारताची दुहेरी रणनीती**

ही कोंडी फोडण्यासाठी भारताने आता जागतिक व्यासपीठावर मुत्सद्दी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. चीनची मक्तेदारी मोडण्यासाठी भारत ‘क्वाड’ आणि ‘ब्रिक्स’ या दोन्ही आघाड्यांचा हुशारीने वापर करत आहे. एकीकडे तंत्रज्ञान आणि भांडवलासाठी भारत अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या ‘क्वाड’ देशांसोबत भागीदारी करत आहे. जपानकडील कमी पर्यावरणीय हानी करणारे प्रक्रिया तंत्रज्ञान, ऑस्ट्रेलियाचा खाणकामातील अनुभव आणि अमेरिकेचे आर्थिक पाठबळ भारतासाठी उपयुक्त ठरणार आहे. ई-कचऱ्यातून हे धातू पुन्हा मिळवण्याच्या तंत्रज्ञानावरही भर दिला जात आहे. दुसरीकडे कच्च्या मालाच्या सुरक्षित स्रोतासाठी भारताने ‘ब्रिक्स’वर लक्ष केंद्रित केले आहे. रशिया, ब्राझील आणि आफ्रिकन देशांकडे या खनिजांचे प्रचंड साठे आहेत. या देशांसोबत भागीदारी केल्यास भारताला कच्च्या मालाचा थेट पुरवठा सुनिश्चित करता येईल. कच्च्या मालासाठी ब्रिक्स आणि तंत्रज्ञानासाठी क्वाड अशी दुहेरी रणनीती राबवत भारताने स्वतःला केवळ ग्राहक न ठेवता, क्रिटिकल मिनरल्सच्या क्षेत्रातील भविष्यातील ‘ग्लोबल हब’ बनण्याच्या दिशेने दमदार पाऊल टाकले आहे.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,**
वर्धा


## दिवाळी विशेषांक - २०२६

दरवर्षी प्रमाणे यंदाही आम्ही ‘जनमाध्यम’ दिवाळी विशेष अंक प्रकाशित करणार आहोत. या अंकाच्या माध्यमातून आम्ही नवसाहित्यीकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यीकांचे राजकीय, सामाजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद, प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपावावा असा नसून एक संग्राह्य असा आहे. तरी या दिवाळी अंकाकरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश करावा अशी दैनिक ‘जनमाध्यम’ तर्फे विनंती...आपले साहित्य atimadhyam@gmail.com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सअँप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार ‘जनमाध्यम’कडे राखीव राहील. इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि. २० ऑक्टो. २०२६ पर्यंत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.


# गणपती : श्रद्धेपलीकडील तार्किक आणि आध्यात्मिक जीवनदर्शन

दरवर्षीप्रमाणे यंदाही आपण आपल्या घरात, मंडळात मोठ्या उत्साहात विघ्नहर्ता गणपती बाप्पाची स्थापना केली. भारतीय संस्कृतीत गणपतीला विशेष स्थान आहे. कोणतेही शुभकार्य सुरू करण्यापूर्वी न चुकता स्मरण केले जाते ते आपल्या लाडक्या बाप्पाचे. विघ्नहर्ता, मंगलमूर्ती, एकदंत अशा कितीतरी नावांनी त्याला संबोधले जाते. महाराष्ट्रात तर गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक आणि सांस्कृतिक एकतेचा उत्सव बनला आहे. गणरायाकडे आजपर्यंत आपण बहुधा श्रद्धेच्या दृष्टिकोनातून पाहत आलो आहोत. परंतु गणपती बाप्पाला समजण्यासाठी केवळ श्रद्धा पुरेशी आहे का? गणपतीच्या मूर्तीमध्ये मानवी जीवनासाठी काही महत्त्वाचे संदेशही दडलेले आहेत का? हेच जाणून घेण्याचा हा प्रयत्न.

गणपतीच्या मूर्तीतील प्रत्येक अवयव, त्याचे वाहन आणि गणेशोत्सवातील विविध परंपरा यांचा जर प्रतीकात्मक अर्थ समजून घेतला, तर त्यामध्ये आपल्याला बुद्धी, एकाग्रता, संयम, परिस्थितीनुसार बदलण्याची क्षमता, अहंकारावर नियंत्रण आणि जीवनातील अनिश्चितता स्वीकारण्याचे तत्त्वज्ञान दिसून येते. म्हणून गणपतीकडे श्रद्धेबरोबरच तार्किक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहणेही अर्थपूर्ण ठरते.

विघ्नहर्ता म्हणजे काय?

आपल्याला माहित आहे की गणपतीला सर्वप्रथम पूजले जाते. यामागचे तर्कशुद्ध कारण काय? कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी मन शांत असावे, परिस्थितीला अनुरूप विचार करावा आणि तेव्हाच योग्य निर्णय घ्यावा. सर्वप्रथम गणपतीची पूजा करणे म्हणजे केवळ काम यशस्वी होण्याची प्रार्थना नसून, योग्य विचार करण्याची मानसिक तयारी आहे. मानवी जीवनात अडचणी येणारच आहेत. प्रत्येक अडचण बाहेरून कोणीतरी दूर करेलच असे नाही. बुद्धीचा योग्य वापर, संयम आणि निर्णयक्षमता असेल तर आपण अडचणींवर मात करू शकतो. याच अर्थाने गणपतीला ‘विघ्नहर्ता’ म्हणणे अधिक अर्थपूर्ण वाटते. विघ्न दूर होण्यापेक्षा विघ्नांवर मात करण्याची बुद्धी मिळणे अधिक महत्त्वाचे आहे.

**मोठे मस्तक - व्यापक विचारांचे प्रतीक**

गणपती बाप्पा त्यांच्या हत्तीच्या मोठ्या मस्तकासाठी ओळखले जातात. हे मस्तक ज्ञान आणि व्यापक विचारांचे प्रतीक मानले जाते. मोठे डोके म्हणजे केवळ जास्त ज्ञान नव्हे, तर एखाद्या परिस्थितीकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता. आजच्या काळात छोट्या समस्येमुळे आपण लगेच तणावात येतो. एखाद्याने चुकीचे बोलले की लगेच उत्तर देतो. एखाद्या कामात अपयश आले की सर्व संपले असे वाटते. गणपतीचे मोठे मस्तक जणू सांगते, ‘क्षणिक परिस्थितीपेक्षा संपूर्ण चित्र पाहा.’ भावनेवर निर्णय न घेता व्यापक विचार करा, हा त्याचा संदेश आहे.

**मोठे कान - ऐकण्याचे प्रतीक**

गणपतीचे मोठे कान ऐकण्याचे प्रतीक मानले जातात. आजच्या काळात आपण सर्वजण बोलण्यासाठी उत्सुक असतो, पण ऐकण्यासाठी किती जण तयार असतात? कुटुंबातील वाद असो, कार्यालयातील मतभेद असो किंवा मित्रांमधील गैरसमज असो, अनेक समस्या नीट ऐकून घेतल्यास कमी होऊ शकतात. आध्यात्मिक दृष्टिकोनातून मोठे कान सांगतात की ज्ञान मिळवण्यासाठी प्रथम ऐकण्याची तयारी असावी. तार्किक दृष्टिकोनातून चांगले ऐकणे हे प्रभावी संवादाचे मूलभूत कौशल्य आहे.

छोटे डोळे - एकाग्रतेचे प्रतीक

गणरायाचे डोळे छोटे आहेत, जे एकाग्रतेचे प्रतीक मानले जातात. आजच्या डिजिटल युगात आपले लक्ष सतत बदलत असते. मोबाईल, सोशल मीडिया यामुळे एकाच कामावर लक्ष केंद्रित करणे कठीण होते. गणपतीचे छोटे डोळे आपल्याला साधा संदेश देतात, ’महत्त्वाच्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करा.’



सोंड - परिस्थितीनुसार बदलण्याची क्षमता

हत्तीची सोंड ही अत्यंत शक्तिशाली आणि त्याचवेळी अत्यंत संवेदनशील अवयव आहे. ती मोठे वजन उचलू शकते आणि त्याचबरोबर नाजूक वस्तूही हाताळू शकते. यामध्ये जीवनाचा सुंदर धडा आहे, ‘परिस्थितीनुसार आपली शक्ती आणि वागण्याची पद्धत बदलता आली पाहिजे.’ कठीण प्रसंगी कठोर निर्णय घ्यावा लागू शकतो, पण नातेसंबंधांमध्ये प्रेम, संयम आणि संवेदनशीलता आवश्यक असते. शक्ती असणे महत्त्वाचे आहे, पण ती कुठे आणि किती वापरायची हे समजणे त्याहून महत्त्वाचे आहे.

**वाहन उंदीर - इच्छांवर नियंत्रण**

गणपतीचे वाहन उंदीर आहे. उंदीर सतत हालचाल करणारा प्राणी आहे. प्रतीकात्मक अर्थाने तो मानवी मन आणि सतत निर्माण होणाऱ्या इच्छांचे प्रतिनिधित्व करतो. आपल्या मनात एका क्षणी अनेक विचार येतात - मला हे हवे आहे, मला त्याच्यापेक्षा जास्त मिळाले पाहिजे, लोकांनी माझे कौतुक केले पाहिजे. हीच इच्छा नियंत्रणाबाहेर गेली तर तणाव आणि असंतोष वाढतो. गणपती उंदरावर आरूढ आहे, याचा सुंदर संदेश आहे, ‘मनुष्याने इच्छांचा गुलाम न होता इच्छांवर नियंत्रण ठेवावे.’

**मोदक - आंतरिक समाधानाचा संदेश**

गणपतीला मोदक प्रिय आहे. हा मोदक बाहेरून साधा दिसतो, पण त्याचा गोडवा आतमध्ये असतो. यातून सुंदर संदेश मिळतो की खरे ज्ञान आणि समाधान हे बाह्य दिखाव्यात नसून अंतर्मनात असते. आज आपण यशाची तुलना पैसा, पद, प्रसिद्धीशी करतो. पण बाहेरून यशस्वी दिसणाऱ्या व्यक्तीला आतून समाधान असेलच असे नाही. मोदक आपल्याला आठवण करून देतो की बाह्य यशाबरोबर अंतर्गत समाधानही आवश्यक आहे.

**विसर्जन - परिवर्तनशीलतेचा संदेश**

गणेशोत्सवातील सर्वात भावनिक क्षण म्हणजे विसर्जन. काही दिवस आपण गणपतीची स्थापना करतो, पूजा करतो, आनंद साजरा करतो आणि शेवटी त्याला निरोप देतो. ही परंपरा जीवनाचे महत्त्वाचे सत्य सांगते, जगातील प्रत्येक गोष्ट परिवर्तनशील आहे. मातीपासून मूर्ती तयार होते आणि शेवटी ती पुन्हा निसर्गात विलीन होते. आध्यात्मिक दृष्टिकोनातून हा अनित्यता आणि आसक्तीचा त्याग शिकवणारा संदेश आहे. पालक आपल्या मुलाला लहानपणापासून सांभाळतात, पण मुलगा मोठा झाल्यावर त्याला स्वतंत्र निर्णय घ्यावे लागतात. पालकांनी आयुष्यभर त्याला स्वतःजवळ ठेवणे शक्य नसते. गणेश विसर्जन आपल्याला हाच नियम समजावते, ज्यावर प्रेम करतो त्याच्याशी आसक्ती असते, पण योग्य वेळी त्याला स्वतंत्र सोडण्याची तयारीही प्रेमाचाच भाग आहे.

गणपतीबद्दल दोन टोकाचे विचार केले जाऊ शकतात. एक विचार म्हणतो की पूजा केली की सर्व समस्या आपोआप दूर होतात, तर दुसरा विचार म्हणतो की या सर्व गोष्टी केवळ अंधश्रद्धा आहेत. परंतु यांच्यामध्ये एक सुंदर मधला मार्ग आहे. गणपतीची पूजा एखाद्या व्यक्तीला मनःशांती, सकारात्मकता, एकाग्रता आणि आशावाद देऊ शकते. त्याचवेळी गणपतीच्या प्रतिमेमागील प्रतीकात्मक संदेश व्यक्तीला स्वतःच्या वर्तनाचा आणि निर्णयांचा विचार करण्यास प्रेरित करू शकतो. म्हणून श्रद्धा आणि तर्क हे नेहमी एकमेकांचे विरोधक असतीलच असे नाही. श्रद्धा मनाला आधार देऊ शकते आणि तर्क बुद्धीला दिशा देऊ शकतो.

उदाहरणार्थ, घरामध्ये छोट्या विषयावरून पती-पत्नीमध्ये वाद झाला आणि दोघेही आपापले म्हणणे सिद्ध करण्याचा प्रयत्न करत राहिले तर वाद वाढत जाईल. पण जर दोघांनी गणपतीच्या ‘मोठ्या कानांचा’ संदेश लक्षात घेऊन आधी एकमेकांचे म्हणणे शांतपणे ऐकले, तर समस्या सोडवण्याची शक्यता वाढते. इथे गणपतीने बाहेरून येऊन वाद सोडवला असे नाही, तर त्याच्या प्रतीकातून मिळालेली शिकवण वापरून माणसाने स्वतः समस्या सोडवली. हीच श्रद्धा आणि तर्क यांची सुंदर सांगड आहे. गणपती हा भारतीय संस्कृतीतील केवळ पूजेचा विषय नसून त्याच्याकडे श्रद्धा, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि जीवनमूल्ये या विविध अंगांनी पाहता येते. म्हणूनच गणपतीचा उत्सव हा केवळ उत्सव न राहता, स्वतःच्या विचारांचा, वर्तनाचा आणि जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचा उत्सव बनू शकतो. गणपती बाप्पा मोरया! बुद्धी, विवेक आणि सद्विचार मोरया!

**भूषण पाडर,**
अमरावती

## निर्माल्य रथ

देवपूजेचे निर्माल्य
फेकू नये नदीत
जमा करून ठेवावे
टाका शेतामध्ये मातीत..

जल प्रदुषणाला तर
बसेलच आळा
शेतीचा पोत ही सुधरेल
हा नियम पाळा...!

पुजेच्या निर्माल्याचे
करण्या योग्य विसर्जन
निर्माल्य रथाची संकल्पना
गावात राबवु या सर्वजण..!

**प्रा. अशोक सारडा** मेहकर
(९४२१३९४३३९)

# अल्झायमर : विस्मरणातही वृद्धत्वाचा सन्मान जपूया

२१ सप्टेंबर हा दिवस जगभरात ‘जागतिक अल्झायमर दिन’ म्हणून पाळला जातो. अल्झायमर हा केवळ स्मरणशक्ती कमी होण्याचा आजार नसून व्यक्तीच्या दैनंदिन जीवनावर, कुटुंबीयांशी असलेल्या संबंधांवर आणि आत्मसन्मानावर परिणाम करणारी गंभीर आरोग्यविषयक आणि सामाजिक समस्या आहे. वृद्ध व्यक्तींमध्ये विस्मरणाच्या तक्रारी आढळल्यास त्याकडे ‘वय झाले म्हणून असे होते’ या दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. हा दिवस केवळ आजाराबद्दल जनजागृतीचा नसून वृद्ध व्यक्तींच्या आरोग्याचा, सन्मानाचा आणि मूलभूत अधिकारांचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे.


वृद्धत्वाकडे समाजाने अनेकदा दुर्बलता आणि परावलंबित्व म्हणून पाहिले आहे. प्रत्यक्षात वृद्धांचा अनुभव, ज्ञान आणि जीवनातून मिळालेली शिकवण ही कुटुंबाची आणि समाजाची मौल्यवान संपत्ती असते. अल्झायमरमुळे काही आठवणी पुसट होत गेल्या तरी त्या व्यक्तीचे आयुष्य, भावना आणि मानवी प्रतिष्ठा कायम असते. म्हणूनच अल्झायमरकडे पाहताना आजारापेक्षा आधी माणसाकडे पाहण्याची गरज आहे.

**सामान्य विस्मरण आणि अल्झायमरमधील फरक**

वृद्धत्वात एखादी वस्तू कुठे ठेवली हे क्षणभर न आठवणे किंवा नाव लगेच न आठवणे हे स्वाभाविक असू शकते. मात्र विस्मरणाचे प्रमाण वाढून दैनंदिन जीवनावर परिणाम होऊ लागला, परिचित व्यक्ती ओळखता येईनाशा झाल्या, नेहमीची कामे करण्यात अडचण येऊ लागली किंवा परिचित ठिकाणीही दिशाभूल होऊ लागली, तर त्याकडे गांभीर्याने पाहून वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.

**गैरसमज टाळावेत**

अल्झायमरभोवती अनेक गैरसमज आहेत. वृद्ध व्यक्ती विसरभोळी झाली की तिची चेष्टा करणे किंवा ‘वयामुळे असेच होते’ म्हणून दुर्लक्ष करणे योग्य नाही. अशा वर्तनामुळे वृद्ध व्यक्तीला आपण कुटुंबासाठी ओझे आहोत, अशी भावना निर्माण होऊ शकते. त्यांच्याशी संयमाने, प्रेमाने आणि आदराने संवाद साधणे ही कुटुंबाची जबाबदारी आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे संयुक्त कुटुंबे कमी होऊन एकटेपणा, संवादाचा अभाव आणि भावनिक आधाराची कमतरता वाढली आहे. अल्झायमर असलेल्या वृद्धांसाठी ही परिस्थिती अधिक आव्हानात्मक आहे. त्यामुळे त्यांची काळजी ही केवळ औषधे देण्यापुरती मर्यादित न ठेवता त्यांच्याशी नियमित संवाद साधणे आणि सामाजिक जीवनात सहभागी करून घेणे आवश्यक आहे.



**काळजी ही सामूहिक जबाबदारी**

रुग्णाची काळजी एकाच व्यक्तीवर टाकल्यास काळजीवाहू व्यक्तीवर शारीरिक, मानसिक आणि आर्थिक ताण वाढतो. त्यामुळे ही जबाबदारी संपूर्ण कुटुंबाची असली पाहिजे. घरातील प्रत्येकाने वेळ देणे आणि कामे वाटून घेणे आवश्यक आहे. स्मरणशक्ती कमी झाली म्हणून वृद्धांशी लहान मुलाप्रमाणे वागणे किंवा त्यांच्या निर्णयक्षमतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे योग्य नाही. त्यांच्या क्षमतेनुसार स्वतःची कामे करण्याची संधी द्यावी. ‘तुम्हाला काहीच कळत नाही’ या भूमिकेऐवजी ‘तुम्ही काय करू शकता आणि आम्ही कुठे मदत करू शकतो’ हा दृष्टिकोन ठेवावा.

**जीवनशैली आणि सुरक्षितता**

नियमित शारीरिक हालचाल, संतुलित आहार, पुरेशी झोप, रक्तदाब व मधुमेहाचे नियंत्रण आणि सामाजिक सक्रियता यांचा मेंदूच्या आरोग्याशी संबंध आहे. मात्र यापैकी कोणतीही गोष्ट अल्झायमरपासून पूर्ण संरक्षणाची हमी देत नाही. त्यामुळे अतिसुलभीकरण टाळून तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. ग्रामीण भागात तज्ज्ञांची कमतरता, आर्थिक मर्यादा आणि अपुरी माहिती यामुळे निदानाला विलंब होऊ शकतो. स्मरणशक्ती कमी झालेल्या व्यक्ती घराबाहेर पडून हरवू शकतात किंवा आर्थिक फसवणुकीला बळी पडू शकतात. त्यामुळे घरातील वातावरण सुरक्षित करणे, औषधांचे नियोजन आणि आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता ठेवणे गरजेचे आहे. मात्र सुरक्षिततेच्या नावाखाली त्यांना पूर्णपणे बंदिस्त करणे योग्य नाही.

**सन्मान जपणे महत्त्वाचे**

समाजाने वृद्धांना ‘उपयोग नसलेला घटक’ मानण्याची मानसिकता बदलली पाहिजे. निवृत्तीनंतरही त्यांचे योगदान संपत नाही. माध्यमांनीही अल्झायमरचे चित्रण केवळ विस्मरण किंवा असहायता म्हणून न करता मानवी प्रतिष्ठेला केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. २१ सप्टेंबरनिमित्त आपण एक साधा संकल्प करूया - विस्मरणाकडे उपहासाने नव्हे तर समजुतीने पाहूया, वृद्धत्वाकडे दयेने नव्हे तर सन्मानाने पाहूया. स्मरणशक्ती हरवू शकते, काही ओळखी धूसर होऊ शकतात, पण माणसाचा सन्मान हरवता कामा नये. अल्झायमरच्या सावलीतही वृद्ध व्यक्तीचे माणूसपण उजळत राहावे, हीच या दिवसाची खरी जाणीव ठरावी.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# पणजच्या महालक्ष्मी यात्रेत हजारो भाविकांची मांदियाळी

## महाप्रसादाचा भाविकांनी घेतला लाभ ; नदीपात्रात एकलव्य बचाव पथकाची सेवा

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील पणज येथील पुरातन व जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री महालक्ष्मी माता यात्रेत शुक्रवारी हजारो भाविकांनी उपस्थिती लावत मातेचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला. गौरी पूजनानिमित्त दरवर्षी आयोजित होणाऱ्या या यात्रेत पणजसह परिसरातील गावांमधून तसेच माहेरवाशिणी मोठ्या भक्तिभावाने सहभागी झाल्या. मातेच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

बोर्डी नदीच्या काठावर असलेल्या महालक्ष्मी मंदिर परिसरात भाविकांची सकाळपासूनच मोठी गर्दी झाली होती. भाविकांनी शिस्तबद्ध रांगेत उभे राहून मातेचे दर्शन घेतले. चारचाकी व दुचाकी वाहनांसाठी स्वतंत्र वाहनतळाची व्यवस्था ग्रामस्थ व ग्रामीण पोलिसांकडून करण्यात आली होती.

यात्रेदरम्यान सेवाधारी महिला मंडळ, पुरुष मंडळ आणि युवकांनी विविध व्यवस्थांमध्ये योगदान दिले. अंजणगाव



येथील महालक्ष्मी दुर्गा उत्सव मंडळ आणि अकोट येथील विठू माऊली ग्रुपच्या वतीने भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. पोपटखेड येथील एकलव्य बचाव पथकाने नदीपात्रात सेवा बजावत सुरक्षिततेची जबाबदारी सांभाळली.

मंदिर परिसरात धरणाचे बॅकवॉटर असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली. अकोटचे उपविभागीय पोलिस अधिकारी निखिल पाटील आणि अकोट ग्रामीण पोलिस ठाण्याचे ठाणेदार श्रीधर गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक वैभव तायडे, बीट जमादार प्रदीप राऊत, भास्कर सांगळे, शुभम लुंघे यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला. प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या डॉ. राणी लबडे, आरोग्य सेविका सौ. मुळे आणि आशा स्वयंसेविकांनी यात्रेदरम्यान वैद्यकीय सेवा दिली. यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी मदत करणाऱ्या महिला बचत गट, स्वयंसेवक, सेवाधारी, सार्वजनिक श्रीराम सेना मंडळ, भजनी मंडळ, एकलव्य बचाव पथक तसेच इतर सेवाभावी व्यक्तींचा महालक्ष्मी मंदिर प्रशासन व ग्रामस्थ मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### राष्ट्रीय महामार्गावरील अंधाराचा भाविकांना त्रास

दरम्यान, पणजकडे येणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागला. यात्रेसाठी मोठ्या संख्येने भाविक व वाहने येत असताना महामार्गावरील अंधारामुळे अपघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने संबंधित यंत्रणेने पथदिवे तातडीने सुरू करावेत, अशी मागणी ग्रामस्थ व भाविकांकडून करण्यात आली.

# नो हॉकर्स झोनमधील अतिक्रमणांवर सोमवारपासून कडक कारवाई



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील मुख्य रस्ते आणि नो हॉकर्स झोनमध्ये अतिक्रमणाचा विळखा कायम असतानाच, सोमवारपासून अतिक्रमणधारकांविरुद्ध कडक कारवाई करण्याचे संकेत मनपा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी दिले. यापूर्वी सूचना देऊनही काश्मीर लॉजसमोरील रस्त्यासह विविध भागांतील अतिक्रमणे जैसे थे असल्याने त्यांनी अतिक्रमण विभागाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली.

मनपा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली १७ सप्टेंबर रोजी मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या उपस्थितीत अतिक्रमण विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. नगरसेवक सिद्धार्थ उपरवट यांच्यासह मनपाचे संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. ९ सप्टेंबर रोजी झालेल्या आढावा बैठकीत मुख्य रस्ते आणि नो हॉकर्स झोनमधील अतिक्रमणांवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. काश्मीर लॉजसमोरील रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे, नो हॉकर्स झोनमधील अतिक्रमणे पूर्णपणे हटविणे तसेच संबंधित झोनमध्ये नियमित कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते. याशिवाय दुपारी १२ ते रात्री १० वाजेपर्यंत अतिक्रमणविरोधी पथके कार्यरत ठेवण्याच्या सूचनाही करण्यात आल्या होत्या. मात्र, प्रत्यक्षात परिस्थितीत अपेक्षित बदल न झाल्याने अग्रवाल यांनी विभागाच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली.

### अतिक्रमण विभागाच्या कामावर सभापती अग्रवाल नाराज; आयुक्तांचेही कठोर निर्देश

#### रस्त्यांवर फलक, ध्वनिक्षेपकाद्वारे सूचना

दरम्यान, नो हॉकर्स झोनअंतर्गत येणाऱ्या सर्व रस्त्यांवर स्पष्ट सूचना फलक लावण्याचे निर्देश आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी दिले. अतिक्रमणे हटविण्यापूर्वी संबंधित भागात ध्वनिक्षेपकाद्वारे घोषणा करून अतिक्रमणधारकांना सूचना द्याव्यात. ताकीद देऊनही अतिक्रमण न हटविल्यास ते जागेवरच हटवून आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. बैठकीस सहायक आयुक्त गणेश शहाणे, उपायुक्त विजय पारतवार, शहर अभियंता अजय गुजर, सहायक अतिक्रमण निर्मूलन अधिकारी प्रवीण मिश्रा, चंद्रशेखर इंगळे, शहर प्रकल्प अधिकारी प्रमोद गायकवाड यांच्यासह अतिक्रमण विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

# श्री शिवाजी विद्यालयाचा कबड्डी संघ तालुक्यात प्रथम

## तालुकास्तरीय १९ वर्षांखालील शालेय क्रीडा स्पर्धेत दमदार कामगिरी; जिल्हास्तरासाठी पात्र



■ प्रतिनिधी | अकोट ■

तालुकास्तरीय १९ वर्षांखालील शालेय क्रीडा स्पर्धेत श्री शिवाजी विद्यालयाच्या मुलींच्या कबड्डी संघाने दमदार कामगिरी करत अकोट तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला. विविध प्रतिस्पर्धी संघांवर मात करत संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले.

या विजयी संघात भक्ती तेलगोटे, गौरावी चंदन, निकिता गावंडे, अपर्णा तेलगोटे, प्रांजली पचांग, गुंजन भारसाकडे, सृष्टी ओळंबे, तेजस्विनी सोळंके, प्रतीक्षा रेखाते, मानसी तेलगोटे, अक्षरा वानखडे, भाग्यश्री टेकाम आणि दीक्षा तेलगोटे या विद्यार्थिनींचा समावेश आहे.

संघाला क्रीडाशिक्षक सुनील भोजने व पर्यवेक्षिका अंजली सपकाळ यांचे मार्गदर्शन लाभले. संघाच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख, उपाध्यक्ष गजाननराव पुंडकर व केशवराव मेतकर, कार्यकारिणी सदस्य सुरेशदादा खोटरे, शाळा तपासणी अधिकारी उद्धवराव विखे, प्राचार्य शैलेश ठाकरे, उपप्राचार्य वर्षा सिरसाट, पर्यवेक्षक प्रवीण मोहोड, शिक्षक प्रतिनिधी प्रतिभा पाचडे, कमवी प्रभारी कपिल धर्माळे, क्रीडा समिती सदस्य सुबोध कराळे व पंकज गिरी यांच्यासह शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले.

## 'द नर्चर्ड वुम्ब' पुस्तकाचे थाटात लोकार्पण संपन्न

**अकोला :** सारास प्रेग्ना वर्ल्डच्या संस्थापक डॉ. ऐश्वर्या एस. अंबाडेकर यांच्या 'द नर्चर्ड वुम्ब' (Nurtured Womb) या पुस्तकाचे लोकार्पण अलीकडेच मोठ्या उत्साहात पार पडले. 'द नर्चर्ड वुम्ब' म्हणजेच 'गर्भसंस्कार' या विषयावर आधारित हे पुस्तक आहे. गर्भावस्थेदरम्यान आईच्या भावविश्वाचा, आई आणि बाळाच्या भावनिक संबंधांचा आणि 'पेरिनेटल नर्चरिंग' (Perinatal Nurturing) या संकल्पनेचा जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हे पुस्तक साकार करण्यात आले आहे.

# पॉक्सो प्रकरणातील दोन सहआरोपींना जामीन

### तपासाचा बहुतांश भाग पूर्ण; मुख्य आरोपींच्या तुलनेत भूमिका मर्यादित असल्याचे न्यायालयाचे निरीक्षण

**अकोला :** पॉक्सो कायद्यासह भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांन्वये दाखल गंभीर गुन्ह्यात अटकेत असलेल्या जाहिद अली आणि शाहीद अली जाफर तुरुक या दोन सहआरोपींना जिल्हा व सत्र न्यायालय तसेच विशेष पॉक्सो न्यायालयाने अटी व शर्तींच्या अधीन राहून जामीन मंजूर केला.

जुने शहर पोलिस ठाण्यात अल्पवयीन मुलाच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून संबंधितांविरुद्ध पॉक्सो कायद्यातील विविध कलमांसह भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), १३७(२), १८९(२) आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर दोन्ही आरोपींनी न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला. बचाव पक्षाच्या वतीने ॲड. नागेश दादाराव म्हसाये यांनी युक्तिवाद करताना प्रकरणाचा बहुतांश तपास पूर्ण झाल्याने आरोपींना पुढील कोठडीची आवश्यकता नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच मुख्य आरोपींच्या तुलनेत या दोन्ही अर्जदारांची कथित भूमिका मर्यादित असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. घटनेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित असल्याचा प्राथमिक आरोप वगळता त्यांच्याविरुद्धची भूमिका मुख्य आरोपींच्या तुलनेत वेगळी असल्याचे बचाव पक्षाने मांडले. आरोपींना या प्रकरणात खोट्या पद्धतीने गोवण्यात आल्याचाही दावा करण्यात आला.

न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद, सरकारी पक्षाचे म्हणणे आणि रेकॉर्डवरील कागदपत्रांचा विचार केला. गुन्ह्याचा बहुतांश तपास पूर्ण झाल्याची बाब तसेच मुख्य आरोपी क्रमांक १ आणि आरोपी क्रमांक ४ यांच्यावरील आरोपांच्या तुलनेत प्रस्तुत अर्जदारांवरील आरोप तुलनेने कमी गंभीर असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. तपासात सहकार्य करण्यासह न्यायालयाने घालून दिलेल्या विविध अटी व शर्तींचे पालन करण्याच्या अधीन राहून दोन्ही सहआरोपींचा जामीन मंजूर करण्यात आला. या प्रकरणात आरोपींच्या वतीने ॲड. नागेश दादाराव म्हसाये, ॲड. अपर्णा नागेश म्हसाये, ॲड. पुरुषोत्तम विठ्ठलराव चिकटे आणि ॲड. प्रमोद बोपटे यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले.

**अकोला :** स्व. अथर्व अनिल मुळे यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त स्व. अथर्व अनिल मुळे मल्टीपर्पज फाऊंडेशन, गोकुळ कॉलनी, अकोला यांच्या वतीने दि. ४ ते ८ सप्टेंबर २०२६ दरम्यान सलग पाच दिवस अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला.

# पॉक्सो प्रकरणातील आरोपीस नियमित जामीन मंजूर

## ॲड. श्रीकांत बी. वाहुरवाघ यांचा यशस्वी युक्तिवाद

**अकोला :** अल्पवयीन मुलीचा हात पकडून तिला दुचाकीवर बसण्यास सांगितल्याच्या आरोपावरून पॉक्सो कायद्यासह भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४ अंतर्गत दाखल गुन्ह्यातील आरोपी ज्ञानेश्वर जानु पवार यास जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला येथील विशेष पॉक्सो न्यायालयाने अटी व शर्तींसह नियमित जामीन मंजूर केला. आरोपीच्या वतीने ॲड. श्रीकांत बी. वाहुरवाघ यांनी केलेला युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ ऑगस्ट २०२६ रोजी संताजी नगर, राम मंदिरासमोर, कृषिनगर, अकोला येथे आरोपीने पीडितेचा हात पकडून, 'मी तुला ट्युशनला सोडतो, माझ्या गाडीवर बस', असे म्हणत तिला जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. यावेळी पीडितेच्या मैत्रिणीने आरोपीच्या हाताला चिमटा घेतल्यानंतर दोघी तेथून निघून गेल्या. त्यानंतर हा प्रकार पीडितेच्या कुटुंबीयांना समजला.

२७ ऑगस्ट रोजी पीडितेने एका अनोळखी इसमाकडे आरोपी म्हणून बोट दाखविल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले. या प्रकरणी सिव्हिल लाइन्स पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेचे कलम ७४ तसेच पॉक्सो कायद्याच्या कलम ११ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यानंतर आरोपीच्या वतीने ॲड. श्रीकांत बी. वाहुरवाघ यांनी जिल्हा व सत्र न्यायालयात नियमित जामिनासाठी अर्ज दाखल केला. फिर्यादीच्या वतीने जामिनास विरोध करण्यात आला. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर ॲड. वाहुरवाघ यांनी आरोपीची कायदेशीर बाजू न्यायालयासमोर मांडली. विशेष पॉक्सो न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरत आरोपीचा नियमित जामीन अटी व शर्तींसह मंजूर केला. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. श्रीकांत बी. वाहुरवाघ यांनी बाजू मांडली. त्यांना ॲड. यथार्थ राजविलास वानखडे, ॲड. वैष्णवी हागोणे, ॲड. कपिल दुर्योधन इंगळे, ॲड. सुरज चंदनकर, ॲड. सुबोध कु-हाडे, अमोल धारपवार आणि दीपक ताजने यांनी सहकार्य केले.

## राज्यस्तरीय सर्वधर्म समभाव डॉ. महाकवी वामनदादा कर्डक यांचा जयंती उत्साहात



**अकोला :** अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समिती, अकोला जिल्हा कलावंत समिती तसेच बौध्द समाज संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय सर्वधर्म समभाव डॉ. वामनदादा कर्डक यांचा १०४ वा. जयंती महोत्सव नुकताच स्थानिक प्रमिलाताई ओक हॉल येथे १०.०० ते रात्री १०.०० वाजे पर्यंत महोत्सव उत्साहात संपन्न झाले.

या जयंती महोत्सव कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. संतोष हुशे तसेच उद्घाटक खासदार बळवंत वानखडे, स्वागताध्यक्ष देवश पातोडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून महाराष्ट्रातील प्रसिध्द गायक-गायीका मनोजराजा गोसावी, राहुल अन्वीकर, भिमेश भारती, बबन दिपके, प्रा. किशोर वाघ, महेंद्र सावंग, सुषमादेवी, निशाताई धोंगडे, दिपालीताई इंगळे यांच्या भारदार गितगायनाने, प्रबोधन करण्यात आले. या दरम्यान विविध क्षेत्रांतील उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २८०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## आमसभा सुचना

दिनांक :- २०/०९/२०२६
वार:- रविवार

दि. ब्लाईंड वेलफेअर ॲन्ड रिहॅबिलीटेशन असोशीएशन, अकोला या संस्थेच्या आजिवन सदस्यांची आमसभा दिनांक २७/०९/२०२६ वार रविवार रोजी सकाळी ११.०० वाजता स्व. कनुभाई वोरा अंध विद्यालय मलकापुर अकोला सभागृह येथे घेण्याचे ठरविले आहे.

तरी संस्थेच्या सर्व आजिवन सदस्यांनी सभेला वेळेवर उपस्थित रहावे.

कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास दिनांक २७/०९/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता स्व. कनुभाई वोरा अंध विद्यालय, मलकापुर, अकोला सभागृह येथे घेण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**सभेपुढे येणारे विषय**

विषय क्र. ०१. मागील आमसभेचे इतीवृत्त वाचुन कायम करणे
०२. सन २०२५-२६ मध्ये संस्थेच्या व शाळेच्या झालेल्या खर्चास मान्यता देणे
०३. सन २०२५-२६ मध्ये संस्थेच्या कार्यकारी मंडळाने घेतलेले निर्णय व केलेल्या पत्रव्यवहारास मंजुरी देणे
०४. कार्यकारी / संचालक मंडळातील ०२ रिक्त पदाबाबत चर्चा करुन निर्णय घेणे
०५. अध्यक्षाच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

**सचिव**
दि. ब्लाईंड वेलफेअर ॲन्ड रिहॅबिलीटेशन असोशीएशन, अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १५५०/२०२६ — प्रोसेस नं.११७९४/२०२६
चौ.ता. २२/१०/२०२६ — दिनांक : १६/०९/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती रुकमिणी गंगाराम वाडेकर, वय अं. ६४वर्षे, धंदा - घरकाम, २. गणेश गंगाराम वाडेकर, वय अं. ४२वर्षे, धंदा- मजूरी, ३. रामेश्वर गंगाराम वाडेकर, वय अं. ४० वर्षे, धंदा- मजूरी, ४. संदिप गंगाराम वाडेकर, वय अं. ३१वर्षे, धंदा - मजूरी, क. १ते ४ रा. चिखलगांव, ता. जि. अकोला. ५. विद्या संजय बळकार, वय अं. ३७वर्षे, धंदा - घरकाम, रा. मोप, ता. रिसोड, जि. वाशिम.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गंगाराम शिवराम वाडेकर
**पत्ता :-** रा. चिखलगांव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गंगाराम शिवराम वाडेकर यांचे दि.१८/०५/२०१४ रोजी मौजे चिखलगांव, ता. जि.अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी.अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ३१७/२०२६ — प्रोसेस नं.१०११/२०२६
चौ.ता. १९/१०/२०२६ — दिनांक : १६/०९/२०२६

**अर्जदार :** १. दिनेश गोपाळराव वाघ- वय ६१ वर्षे, धंदा-शेती २. मनोहर गोपाळराव वाघ -वय ६५ वर्षे, धंदा - शेती ३. जनार्दन गोपाळराव वाघ -वय ६३ वर्षे, धंदा-शेती ४. ज्ञानेश्वर गोपाळराव वाघ -वय ५८ वर्षे, धंदा-शेती ५. प्रमिला वासुदेव नवलकार- वय ७० वर्षे, धंदा- घरकाम अर्जदार क. १ ते ४ रा. सिरसोली, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क. ५ रा. दहिगांव (गावंडे), ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र. १ ते ५ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १ ते ५ चे वडील मयत नामे गोपाळ गोविंदा वाघ हे दि. ०६/११/२००२ रोजी तेसच अर्जदार क. १ ते ५ ची आई व मयताची पत्नी नामे शांताबाई गोपाळ वाघ ही दि. ०९.१२.२०१८ रोजी दोघेही मौजे सिरसोली, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक १९/१०/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ११/०९/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा

## जाहीर नोटीस

### विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. २९३/२०२६ — प्रोसेस नं.९३६/२०२६
चौ.ता. ३०/०९/२०२६ — दिनांक : १९/०८/२०२६

**अर्जदार :** १. माधवराव श्रीकृष्ण वाघ -वय ६७ वर्षे, धंदा- शेती २. माधुरी सुभाष भाकरे - वय ६९ वर्षे, धंदा-घरकाम ३. निलिमा प्रमोद राउत -वय ५५ वर्षे, धंदा-घरकाम ४. संगिता धनंजय वाघ -वय ५७ वर्षे, धंदा घरकाम ५. सुरज धनंजय वाघ -वय ३६ वर्षे, धंदा-शेती ६. किरण प्रतोड ठाकरे -वय ३५ वर्षे, धंदा घरकाम ७. उज्ज्वला उमेश वाघ -वय ५६ वर्षे, धंदा- घरकाम ८. प्रशांत उमेश वाघ -वय ३४ वर्षे, धंदा-शेती ९. निशांत उमेश वाघ -वय ३२ वर्षे, धंदा नोकरी अर्जदार १ रा. हिंगणी खु., ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क. २ रा. डाबकी रोड, अकोला, ता.जि. अकोला अर्जदार क. ३ रा. गुरू गणेश नगर, कोथरूड, पुणे ता.जि. पुणे अर्जदार ४,५,७,८,९ रा. शनिवारपुरा, अकोट, ता. अकोट, जि. अकोला अर्जदार ६ रा. वारकरी नगर, शेगांव, ता. शेगांव, जि. बुलढाणा

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र. १ ते ९ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १,२ व ३ चे वडील व अर्जदार क. ४ ते ७ यांचे सासरे तसेच अर्जदार क. ५.६.८.९ यांचे आजोबा मयत नामे श्रीकृष्ण भिकाजी वाघ हे दि. ०६/०३/२००७ रोजी मौजे अकोट ता. अकोट, जि. अकोला येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ३०/०९/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर, तेल्हारा

## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ८४०/२०२६ — प्रोसेस नं.७४८८/२०२६
चौ.ता. २६/१०/२०२६ — दिनांक : १२/०६/२०२६

**अर्जदार :** १. नरेश निळकंठ देशमुख २. निलेश निळकंठ देशमुख दोघेही रा. भारती प्लॉटस, शिव नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ४४४००१

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शालिनी निळकंठराव देशमुख
**पत्ता :-** रा. भारती प्लॉटस, शिव नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शालिनी निळकंठराव देशमुख यांचे दि. २०/१०/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले.

अर्जामध्ये पूढे असेही नमूद आहे की सदरहू मयत शालिनी निळकंठराव देशमुख यांचे नावे खालील जंगम मालमत्ता / रक्कम आहे

१. स्टेट बँक ऑफ इंडिया, जवाहरलाल नेहरू मार्ग शाखा, अकोला येथील बचत खाते क. ३०९६६९४३९८७ मधील रक्कम रू.२०,९९६/-

२. स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा जवाहरलाल नेहरू मागे, अकोला येथील बचत खाते क्र. १११२५२२५५७० मधील रक्कम रू. २३,१६६/-

**एकूण रक्कम रू. ४४,१६२/-**

सदरहू रकमेचा लाभ मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, वरील अर्जदार यांचे शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०८६/२०२६ — प्रोसेस नं.९३३१/२०२६
चौ.ता. २९/०८/२०२६ — दिनांक : २२/०७/२०२६

**अर्जदार :** १. माया अंबादास खंडारे लग्नापुर्वीचे नाव–माया सुखदेव जगताप २. आनंद सुखदेव जगताप दोघेही रा. आंबेडकर नगर, शिवनी, अकोला. ता. जि. अकोला. ३. नालंदा राहुल इंगळे लग्नापुर्वीचे नाव–नालंदा सुखदेव जगताप रा. बी - २०१, शिवाई अपार्टमेंट, गजानन महाराज मंदिर मागे, ठाणे. ४००६०६ ४. मिलिंद सुखदेव जगताप रा. चांदुरं, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. सुखदेव रावजी जगताप २. दुर्गाबाई सुखदेव जगताप
**पत्ता :-** रा. शिवणी, आंबेडकर चौक, शिवनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुखदेव रावजी जगताप यांचे दि ०२/०३/२०१३ रोजी व मयत दुर्गाबाई सुखदेव जगताप यांचे दि. १९/१०/२०२१ रोजी शिवणी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निदींष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# लाखोंची शौचालये, घाणीचे साम्राज्य

## साहूर ग्रामपंचायतीचा कारभार चव्हाट्यावर

## वापराआधीच सार्वजनिक स्वच्छतागृहाची दुरवस्था

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

नागरिकांच्या मूलभूत सुविधां साठी शासनाचा निधी खर्च केला जातो. मात्र सुविधा उभारल्यानंतर तिच्या देखभालीकडेच पाठ फिरवली जात असेल तर हा खर्च नेमका कुणासाठी, असा प्रश्न साहूर ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. आष्टी तालुक्यातील साहूर येथे सन २०२०-२१ मध्ये लाखो रुपये खर्चून उभारण्यात आलेले सार्वजनिक स्वच्छतागृह आज घाणीच्या विळख्यात सापडले आहे. स्वच्छतागृहाच्या परिसरात शेणखताचे उकिरडे आणि कचऱ्याचे ढीग साचले असून दरवाजे तुटले आहेत. नळांच्या पाईपचीही नासधूस झाल्याचे दिसून येत आहे.

नागरिकांसाठी उभारलेली ही सुविधा प्रत्यक्षात वापरात येण्यापूर्वीच मोडकळीस आल्याने ग्रामपंचायत प्रशासनाच्या देखभाल व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सार्वजनिक निधीतून उभारलेल्या वास्तूची अशी अवस्था होत असताना ग्रामपंचायत प्रशासन नेमके काय करीत आहे, असा सवाल ग्रामस्थ करीत आहेत.

**शाळा बाजार अन् स्मशानभूमीच्या परिसरातच घाणीचा विळखा**

सदर स्वच्छतागृहाच्या शेजारी स्मशानभूमी असून काही अंतरावर जिल्हा परिषद शाळा आहे. याच परिसरात आठवडी बाजार भरत असल्याने नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र परिसरात स्वच्छतेचा अभाव असल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छतेचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. स्मशानभूमी परिसरात झाडे झुडपे वाढली असून स्वच्छतेकडे दुर्लक्ष



झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

याच ठिकाणी असलेल्या पाण्याच्या हौदातून टाकी भरल्यानंतर मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याची तक्रारही नागरिकांनी केली आहे. गावात पाणीटंचाईची परिस्थिती असताना हजारो लिटर पाण्याची नासाडी होत असल्यास प्रशासनाने त्याची दखल घेणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

**मुख्य प्रवेशद्वारापासून अंगणवाडीपर्यंत कचऱ्याचे ढीग**

साहूरच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर तसेच अंगणवाडी परिसरात कचरा साचल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. कचरा उचलण्यासाठी प्रभावी व्यवस्था नसल्याने दुर्गंधी पसरत आहे. अंगणवाडी परिसरात लहान मुलांची ये जा असल्याने या अस्वच्छतेकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

तक्रारी करूनही प्रशासनाचे दुर्लक्ष

स्वच्छता आणि सार्वजनिक सुविधांबाबत ग्रामपंचायत प्रशासनाला वेळोवेळी माहिती देऊनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. ग्रामपंचायत अधिकारी मुख्यालयी न राहता तळेगाव येथून कारभार पाहत असल्याचाही नागरिकांचा आरोप आहे. या आरोपाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वस्तुस्थिती तपासावी, अशी मागणी होत आहे.

**लाखोंची वास्तू जाणीवपूर्वक दुर्लक्षित**

कृष्णा हरले, सामाजिक कार्यकर्ते, साहूर म्हणाले की, साहूर ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक स्वच्छतागृह बांधकाम झाल्यापासून अद्याप सुरू झालेले नाही. वास्तूजवळ शेणखताचा उकिरडा टाकण्यात आला आहे.दरवाजे तुटले असून लाखो रुपये खर्चून उभारलेली वास्तू घाणीच्या विळख्यात आहे. ग्रामपंचायत प्रशासनाला वेळोवेळी माहिती देऊनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

सार्वजनिक स्वच्छतागृह, स्मशानभूमी, पाण्याचा हौद, मुख्य प्रवेशद्वार आणि अंगणवाडी परिसराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करावी. स्वच्छतागृहाची दुरवस्था, देखभाल आणि सार्वजनिक निधीच्या वापराबाबत वस्तुस्थिती तपासावी. तसेच ग्रामपंचायत प्रशासन नागरिकांना नियमित सेवा देत आहे की नाही, याचीही चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.




### शेतशिवारातून तीन मोटारींसह केबल चोरी

**वर्धा -** शेतातील विहिरीवर लावलेल्या पाण्याच्या मोटारी आणि केबल चोरट्यांनी लंपास केल्याची घटना पडेगाव शेतशिवारात उघडकीस आली. शेतकरी राजेंद्र डाळगव्हाणे हे शेतात गेले असता विहिरीतील मोटार आणि केबल गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी परिसरात पाहणी केली असता शेजारील शेतकरी दिलीप मसराम आणि सुनील रेवतकर यांच्या शेतातील मोटार आणि केबलही चोरीला गेल्याचे समोर आले. अज्ञात चोरट्यांनी तिन्ही शेतकऱ्यांच्या शेतातील साहित्य लंपास केले. चोरी गेलेल्या मोटारी आणि केबलची एकूण किंमत सुमारे २२ हजार ५०० रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. याप्रकरणी राजेंद्र डाळगव्हाणे यांच्या तक्रारीवरून सावंगी मेघे पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून चोरट्यांचा शोध सुरू आहे.

### बसस्थानकात महिलेच्या पर्समधून सोन्याच्या अंगठ्या लंपास

**वर्धा -** बसमधून उतरत असताना महिलेच्या पर्समधून सोन्याच्या दोन अंगठ्या लंपास केल्याची घटना वर्धा बसस्थानक परिसरात घडली. नागपूर येथील कीर्ती जाधव या नातेवाईकाच्या कार्यक्रमासाठी वर्ध्यात आल्या होत्या. बसमधून उतरत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात महिलेने त्यांच्या पर्समधील सोन्याच्या दोन अंगठ्या लंपास केल्या. चोरी गेलेल्या अंगठ्यांची किंमत सुमारे २० हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. अंगठ्या चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर जाधव यांनी परिसरात शोध घेतला. मात्र त्याचा उपयोग झाला नाही. चोरी करणारी महिला स्कार्फ बांधून असल्याचे तक्रारीत सांगण्यात आले आहे. या घटनेमुळे बसस्थानकातील गर्दीच्या ठिकाणी प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. याप्रकरणी कीर्ती जाधव यांच्या तक्रारीवरून वर्धा शहर पोलिसांनी अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### रस्त्याचे काम ठरले महावितरणला महागात

**सेलू -** रस्त्याचे बांधकाम सुरू असताना महावितरणची केबल तुटल्याने कंपनीचे तब्बल दोन लाख ७५ हजार रुपयांचे नुकसान झाले. सेलू ते रेहकी मार्गावर सिमेंट रस्त्याचे बांधकाम सुरू आहे. काम सुरू असताना खोदकामाच्या प्रक्रियेत महावितरणची केबल तुटली. त्यामुळे वीज वितरण यंत्रणेचे मोठे नुकसान झाले. केबल तुटल्याने महावितरणच्या साहित्याचे सुमारे दोन लाख ७५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी महावितरणकडून पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीच्या आधारे सेलू पोलिसांनी इंद्रदिप इन्फ्रा इंडिया लिमिटेड कंपनी उल्हासनगर, कंपनीचे एरिया मॅनेजर निर्मल घारा तसेच जेसीबी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रस्त्याच्या कामादरम्यान आवश्यक ती खबरदारी न घेतल्याचा ठपका तक्रारीत ठेवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सेलू पोलिस करीत आहेत.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**हिंगणघाट -** अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत ५४ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना जाम ते हिंगणघाट मार्गावर घडली. सुरेश कवडूजी फुलकर रा. मेहता गार्डनजवळ हिंगणघाट असे मृताचे नाव आहे. सुरेश फुलकर हे एमएच ३१ डीएन १०९८ क्रमांकाच्या दुचाकीने प्रवास करीत होते. दरम्यान अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या सुरेश फुलकर यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. अपघातानंतर धडक देणारे वाहन घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेमुळे मार्गावरील वाहतुकीच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याप्रकरणी तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून अपघातास कारणीभूत वाहनाचा शोध सुरू आहे.

### पंतप्रधानांबाबत आक्षेपार्ह व्हिडीओ प्रसारित केल्याचा आरोप

**देवळी -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत आक्षेपार्ह व्हिडीओ समाजमाध्यमावर प्रसारित केल्याच्या आरोपावरून देवळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवळी येथील भाजयुमो जिल्हाध्यक्ष योगेश आदमने हे मोबाईलवर समाजमाध्यमावरील पोस्ट पाहत असताना शंकर केवदे या नावाच्या फेसबुक प्रोफाईलवर आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडीओ प्रसारित झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तक्रारीनुसार हा व्हिडीओ एआयच्या माध्यमातून तयार करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या पार्श्वभूमीवर हा प्रकार समोर आल्याने प्रकरणाची चर्चा सुरू झाली. आदमने यांनी याबाबत देवळी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून शंकर केवदे नावाच्या फेसबुक प्रोफाईलविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रकरणातील व्हिडीओचा स्त्रोत आणि प्रसारणाबाबत पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### सत्तूर घेऊन दहशत माजविणाऱ्यावर गुन्हा

**हिंगणघाट -** हातात सत्तूर घेऊन परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या व्यक्तीवर हिंगणघाट पोलिसांनी कारवाई केली. काळी सडक मार्गावर पोलिस गस्त घालत असताना सागर हिवंज रा. संत माता मंदिर वॉर्ड हिंगणघाट हा सत्तूर बाळगून संशयास्पदरीत्या फिरताना आढळून आला. त्याच्या हालचालींमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी तत्काळ त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडील सत्तूर जप्त करण्यात आला. सार्वजनिक ठिकाणी शस्त्र घेऊन फिरत दहशत निर्माण करण्याच्या प्रकारामुळे पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाण्यात संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अकोला कृषि विद्यापीठातील शिवार फेरीच्या माध्यमातून

# शाश्वत शेती तंत्रज्ञान जाणून घ्यावे - जिल्हाधिकारी वान्मथी सी यांचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे तब्बल २५ एकर प्रक्षेत्रावर एकाच ठिकाणी जिवंत पिक प्रात्यक्षिके साकारली आहेत, ती प्रात्यक्षिके जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी बघावी, जेणेकरून जागतिक हवामान बदलाच्या परिस्थितीत 'शाश्वत शेती व संपन्न शेतकरी' संकल्पना आत्मसात करता येईल. कालसुसंगत आधुनिक शेती तंत्रज्ञाना सोबतच शेती पूरक जोडधंदे, गावपातळीवर करता येणारे शेतमाल प्रक्रिया उद्योग आदी संबंधी माहिती मिळेल



आणि कृषी विद्यापीठा सोबतच इतरही सलग्न संस्थाद्वारे निर्मित शेती विषयक तंत्रज्ञान तथा पीक वाणांचे शेतकरी बांधवांना प्रत्यक्ष अवलोकन करता येईल, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. २० ते २२ सप्टेंबर दरम्यान शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले असून या तीन दिवसीय शिवार फेरीसाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकरीता सोमवार २१ सप्टेंबर हा दिवस देण्यात आलेला आहे. नोंदणीनंतर २० हूनही अधिक विविध प्रक्षेत्र व संशोधन विभागाना प्रत्यक्ष भेटी देण्याची संधी शेतकरी बांधवांना उपलब्ध केल्या गेली आहे.

शिवार फेरीत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना खरीप हंगामातील जवळपास सर्व पिके व त्यांचे तंत्रज्ञान प्रत्यक्ष बघता यावे या हेतूने गहू संशोधन विभागाचे प्रक्षेत्रावर शेतकरी बांधवाना पाहण्यासाठी एकाच ठिकाणी खरीप पिकांचे विविध जातीचे पीक प्रात्यक्षिक घेण्यात आलेले आहेत. त्यामध्ये विविध पिकांच्या जाती लावण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने तेलबिया, कडधान्य, तृनधान्य, कापूस, चारापिके, भाजीपाला पिके व फुलांच्या जाती येथे लावण्यात आलेल्या आहेत. तसेच विद्यापीठाचे महत्वाचे शिफारशीचे पण प्रात्यक्षिक येथे घेण्यात आले आहेत.जिल्ह्यातील शेतकरी बंधू भगिनींनी या शिवार फेरीचा लाभ घ्यावा व येणारा हंगाम यशस्वी करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी. तसेच कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.जिवन कतोरे यांनी केले आहे.

## गुणवंत विद्यार्थी व जेष्ठ वीरशैव लिंगायत पुरुष-महिला सत्कार समारोह

**वर्धा/जनमाध्यम**

वीरशैव सेवा मंडळ, वर्धा च्या वतीने रामनगर येथील शिवमंदीरात दरवर्षीप्रमाणे यंदाही धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात लघुरुद्राभिषेक, गणपती अथर्वशीर्ष, सामुहिक इष्टलिंग पूजा, महिलांचे भजन, भजन संध्या, गुणवंत विद्यार्थी सत्कार व पुरस्कार, जेष्ठ नागरिक (महिला व पुरुष) सत्कार व महाप्रसाद इत्यादी कार्यक्रमांचा समावेश होता.समारोह प्रसंगी अध्यक्ष श्री संत सयाजी महाराज, सुधीर पांगुळ (न.प. अध्यक्ष), ह. भ. प. मयूर महाराज, शुभांगी कोलते (सभापति, पाणीपुरवठा), वंदना भुते (सदस्या, न.प. वर्धा), जेष्ठ नागरिक रंगाप्पा कुबडे, प्रा. ओंकार मरडवार, शामराव आनपान, रविंद्र बाळापुरे, महिला अध्यक्षा अरुणा



बाजारे प्रमुख उपस्थित होते.जेष्ठ नागरिक दत्तात्रय जिडेवार (सपत्नीक), प्रभाकर कापसे, सिंधू जळगांवकर, बेबी आनपान तसेच गुणवंत विद्यार्थी मंजीरा पुणेवार, सिमरण पाटील, खुशी लटी, स्वराज कापसे, रिधम ठोंबरे, इशांत आनपान, स्वरांगी विपुलवार, अथर्व शेवाळकर, अविनाश कोमलवार, रंजना देशकर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे संचालन व आभार अभय नगरे यांनी केले, प्रस्तावना अध्यक्ष शामराव आनपान यांनी केली.

# खापरीत बिबट्याची दहशत; गोठ्यात घुसून दोन बकऱ्यांचा फडशा

## शेतकऱ्यांच्या दारातच हिंस्त्र वन्यजीवांचा वावर

**सेलू/जनमाध्यम**

सेलू तालुक्यात वन्यप्राण्यांचा उपद्रव दिवसेंदिवस गंभीर होत असताना आता बिबट्याने थेट शेतकऱ्यांच्या गोठ्यांनाच लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. खापरी मुंगापूर परिसरातील शेतात गोठ्यात बांधलेल्या दोन बकऱ्यांवर बिबट्याने हल्ला करून त्यांचा फडशा पाडल्याची घटना १९ सप्टेंबरच्या पहाटे उघडकीस आली.या घटनेमुळे खापरी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी आणि शेतमजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

खापरी सेलू रोडलगत सर्वे क्रमांक ४३/२ मध्ये शेतकरी पुरुषोत्तम वैद्य यांचे शेत आहे. त्यांच्या शेतातील गोठ्यात एक शेळी आणि एक बोकड बांधण्यात आले होते. पहाटेच्या सुमारास दबा धरून बसलेल्या बिबट्याने गोठ्यात प्रवेश करून दोन्ही जनावरांवर हल्ला केला. या हल्ल्यात दोन्ही बकऱ्यांचा मृत्यू झाला.शनिवारी सकाळी शेतकरी पुरुषोत्तम वैद्य शेतात गेले असता गोठ्यातील विदारक दृश्य त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तातडीने गावकऱ्यांना आणि वनविभागाला माहिती दिली. वनरक्षक छाया पेटे यांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. या घटनेत शेतकऱ्याचे सुमारे २० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.खापरी परिसरात बिबट्याचा वावर वाढत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून होत आहेत. बिबट्याच्या दहशतीसोबतच वानरांचा उपद्रवही वाढल्याने ग्रामीण भागातील नागरिक दुहेरी संकटात सापडले आहेत. रात्रीच्या वेळी शेतात जाणे तर दूरच, दिवसाही शेतकरी आणि मजूर सावधगिरीने हालचाल करीत आहेत.या घटनेनंतर खापरीचे माजी सरपंच प्रमोद शंकरराव गव्हाळे यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी परिसरात रात्रीची गस्त वाढवावी. वनविभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्याला नियमानुसार पूर्ण नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### रेल्वेच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**वर्धा -** रेल्वेच्या धडकेत ५५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना वर्धा ते चितोडा रेल्वे मार्गावर घडली. शाकीन अब्दुल रब्ब रा. आनंदनगर वर्धा असे मृत महिलेचे नाव आहे. रेल्वे मार्गावर त्या असताना रेल्वेची धडक बसल्याने हा अपघात घडला. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र महिलेचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आल्यानंतर वर्धा शहर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. महिलेचा मृत्यू कोणत्या परिस्थितीत झाला तपास सुरू आहे.

## नाली पालिकेची, मालकी अतिक्रमणधारकांची

# आर्वीत 'नंबर प्लेट' लावून फुटपाथवर कब्जा; मुख्य रस्त्यांवर बेकायदा धंद्यांचे साम्राज्य

**आर्वी/जनमाध्यम**

नगरपरिषदेची नाली आणि सार्वजनिक रस्ता. पण त्यावर हक्क सांगणाऱ्या अतिक्रमण धारकांची दादागिरी आर्वी शहरात चांगलीच वाढल्याचे चित्र आहे. इंदिरा चौक ते जुने कोर्ट तसेच शिवाजी चौक ते गांधी चौक या शहरातील प्रमुख वर्दळीच्या मार्गावर अतिक्रमणाने अक्षरशः विळखा घातला आहे. एवढेच नव्हे तर पालिकेच्या सार्वजनिक जागेवरच नाव आणि मोबाईल क्रमांकाच्या पाट्या लावून जागेवर खासगी मालकीचा आभास निर्माण करण्याचा 'नंबर प्लेट' फॉर्म्युला सुरू असल्याचे दिसून येत आहे.

इंदिरा चौक ते जुन्या कोर्टाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर नालीचे बांधकाम सुरू आहे. काम सुरू होताच काही अतिक्रमणधारकांनी आपली दुकाने आणि हातगाड्या तात्पुरत्या स्वरूपात मागे घेतल्या. मात्र नालीचे काम पूर्ण होताच पुन्हा त्याच जागेवर कब्जा करण्याची तयारी सुरू असल्याचे चित्र आहे.शिवाजी चौक ते गांधी चौक या मुख्य मार्गावरही अतिक्रमणाचा प्रश्न गंभीर आहे. जुन्या तहसील कार्यालयाच्या भिंतीलगत असलेल्या नालीचे काम सध्या सुरू आहे. यापूर्वी याच भागातील फुटपाथवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले होते.दोन्ही मार्ग शहरातील महत्त्वाचे आणि सतत वर्दळीचे रस्ते आहेत. फुटपाथवर अतिक्रमण झाल्याने पादचाऱ्यांना थेट रस्त्यावरून चालावे लागते. त्यात शाळकरी विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

बेरोजगारांना व्यवसायाची संधी मिळणे गरजेचे आहे. मात्र त्यासाठी सार्वजनिक रस्ते आणि पादचारी मार्ग ताब्यात घेणे हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. नगरपरिषदेने शहरातील अतिक्रमणाचे सर्वेक्षण करून प्रत्येक व्यावसायिकासाठी मर्यादित आणि आखीव जागा निश्चित करावी. 'एक मालक एक व्यवसाय आणि मर्यादित जागा' या धर्तीवर व्यवस्था केल्यास व्यवसायालाही वाव मिळेल आणि नागरिकांचे रस्तेही मोकळे राहतील.

प्रा. डॉ. सुधाकर भुयार म्हणाले की, नगरपरिषद नाली बांधते; मात्र अतिक्रमण काढण्याबाबत ठोस कारवाई होत नाही. नालीचे काम पूर्ण होताच दुसऱ्याच दिवशी त्या जागेवर खासगी मालकीचा दावा करीत मोठमोठे ठेले उभे राहतात.

भरत जयसिंगपूरे, जागरूक नागरिक, आर्वी यांनीही बेरोजगारीचा प्रश्न मान्य असल्याचे सांगत मुख्य रस्ता अडविणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले. पालिकेने सर्वेक्षण करून प्रत्येक व्यावसायिकासाठी मर्यादित जागा आखून द्यावी.

त्यामुळे व्यवसायही सुरू राहील आणि वाहतूकही सुरळीत होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक - २९४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# गणेशोत्सवात आरोग्यसेवेचा जागर

## ५०० हून अधिक रुग्णांनी घेतला कौटुंबिक आरोग्य कार्डचा लाभ

**वर्धा/जनमाध्यम**

गणेशोत्सवानिमित्त दत्ता मेघे आयुर्विज्ञान संस्था अभिमत विद्यापीठ अंतर्गत आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे येथे १५ ते १७ सप्टेंबरदरम्यान आयोजित विविध विशेष आरोग्य शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तीन दिवसांत ५०० हून अधिक रुग्णांनी विविध आरोग्यसेवा आणि कौटुंबिक आरोग्य कार्डचा लाभ घेतला.

शिबिरात मधुमेह व उच्च रक्तदाब, रोबोटच्या सहाय्याने होणाऱ्या शस्त्रक्रिया, बृहदान्त्र व गुदाशय विकार, उच्च जोखमीची गर्भधारणा, महिलांमधील कर्करोग, बाल हृदयरोग यासह विविध आजारांची तपासणी करण्यात आली. मणक्याच्या व सांध्यांच्या शस्त्रक्रिया, मोतीबिंदू व काचबिंदू, कर्णावर्त प्रत्यारोपण, स्वरयंत्र विकार, त्वचारोग, दमा, गंभीर मानसिक विकार, व्यसनमुक्ती आणि वेदनानियंत्रणाबाबतही तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.

शिबिरातील सहभागी रुग्णांना बाह्यरुग्ण आणि आंतररुग्ण सेवांवर १० टक्के सवलत देण्यात आली. कौटुंबिक आरोग्य कार्डद्वारे उपलब्ध सुविधांची माहितीही देण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी, आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन आणि पुढील उपचारांची माहिती मिळाल्याने रुग्णांनी समाधान व्यक्त केले. रुग्णांनी व्यवस्थापन आणि वैद्यकीय पथकाचे आभार मानले.

# महानुभाव साहित्याचे जतन करणे सर्व मराठी भाषिकांचे कर्तव्य

## -उद्घाटक डॉ.महेंद्र ढोरे -तिसरे महानुभाव साहित्य संमेलन



**अमरावती/प्रतिनिधीः-** महानुभाव साहित्यातून आम्हाला मूल्यात्मक शिकवण व नैतिक आचरण मिळत राहते.महानुभाव साहित्याचे चांगल्या रीतीने जतन करणे सर्व मराठी भाषिकांची सामूहिक जबाबदारी आहे असे उद्बोधन तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनाचे उद्घाटक डॉ.महेंद्र ढोरे प्र. कुलगुरू संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी केले.

यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. गिरीश गांधी अध्यक्ष विदर्भ साहित्य संघ नागपूर म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून, डॉ. महंत सोनपेठकर समन्वयक महानुभाव अध्यासन केंद्र,डॉ अविनाश आवलगावकर कुलगुरू मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर तालुका मोर्शी, डॉ आराधना वैद्य अध्यक्ष भारतीय विद्या मंदिर अमरावती ,न्यायमूर्ती डॉ.कीर्ती कुलकर्णी, डॉ.भैय्यासाहेब मेटकर, सुभाष पावडे, डॉ संतोष आगरकर सत्कारमूर्ती हर्षीकर बाबा शेवलीकर, विजयराज पंजाबी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी सकाळी महानुभाव पंथीय साहित्य ग्रंथदिंडी श्रीकृष्ण मंदिरापासून परशुराम पॅलेस या संमेलन स्थळापर्यंत काढण्यात आली. यात भारतीय महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व महानुभाव पंथीय तसेच साहित्य प्रेमी मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. साहित्य संमेलनाचे स्वागत पर प्रस्तावित डॉ.संतोष आगरकर प्राचार्य भारतीय महाविद्यालय मोर्शी यांनी केले. याप्रसंगी डॉ.अविनाश आवलगावकर, डॉ. आराधना वैद्य न्यायमूर्ती कीर्ती कुलकर्णी यांनी समयोचीत मार्गदर्शन केले.

यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ गिरीश गांधी यांनी आजचा माणूस द्वीप्रातिमेत जगत असल्यामुळे साहित्यातून समाज निर्मिती होत नसल्याची खंत व्यक्त केली. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी केले. दुपारच्या सत्रात महानुभाव पंथाचे वर्तमानकालीन सृजनात्मक साहित्य या परिसंवादाचे अध्यक्षस्थानी गोपीराज बाबा शास्त्री होते तर डॉ.भारतभूषणशास्त्री जामोदेकर, डॉ अण्णा वैद्य, प्रा चक्रधर कोठी यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉअर्चना शिरस्कार यांनी केले.

यावेळी कवि संमेलनाने या साहित्य संमेलनाची रंगत आणली. संमेलनाचे आयोजन भारतीय महाविद्यालय मोर्शी, श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव समिती मोर्शी, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, विदर्भ साहित्य संघ रिद्धपुर,महानुभाव अध्यासन केंद्र अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

# विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागात शिक्षक दिन व इंडक्शन कार्यक्रम उत्साहात



**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात शिक्षक दिनानिमित्त कृतज्ञता सोहळा आणि नवोदित विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कार्यक्रमाचे संयुक्तपणे उत्साहात आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांना विभागाची शैक्षणिक रचना, कार्यपद्धती, उपलब्ध सुविधा आणि विविध उपक्रमांची माहिती व्हावी, तसेच त्यांना नव्या वातावरणाशी सहजपणे जुळवून घेता यावे, हा यामागचा मुख्य उद्देश होता.

शिक्षक दिनानिमित्त आयोजित मनोगतामध्ये विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या ज्ञानदानातील योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्व विकासात आणि समाजाच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका किती महत्त्वाची आहे, हे सांगत त्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

इंडक्शन कार्यक्रमामुळे नवप्रवेशित विद्यार्थ्यांना विभागातील शिक्षक तसेच सहका-यांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. परस्पर संवादातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मीयता निर्माण होऊन गुरु -शिष्य नात्यातील स्नेह अधिक दृढ झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारताचे माजी राष्ट्रपती महान शिक्षणतज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस अभिवादन करून मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती पवार आणि केतन चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाला विभागातील शिक्षक डॉ. जी.जी. मुळे, प्रा. राज पारखी, प्रा. गौरव सातव, प्रा. वैदेही बोम्बटकर यांच्यासह एम.एसस्सी. भाग - १ व २ चे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# एनआयटी वरंगलमधून श्रृती शर्मा हिची बी.टेक. पदवी पूर्ण

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर नगरपरिषदेचे अभियंता मनीष शर्मा यांची कन्या श्रृती मनिष शर्मा हिने तेलंगणा राज्यातील वरंगल येथील मानाच्या 'एनआयटी' (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) या संस्थेमधून इलेक्ट्रॉनिक अँड टेली कम्युनिकेशन' या विभागातून बी.टेक.' (B.Tech) ही पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. नुकत्याच पार पडलेल्या संस्थेच्या दीक्षांत समारंभात तिला ही पदवी अधिकृतपणे प्रदान करण्यात आली.वरंगल येथील एनआयटी संस्थेत अत्यंत उत्साहात पार पडलेल्या या दीक्षांत समारंभाला



संस्थेचे संचालक तथा कुलगुरू प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांच्या हस्ते श्रुतीला ही पदवी देऊन गौरविण्यात आले. देशातील अत्यंत नामांकित आणि कठीण समजल्या जाणाऱ्या एनआयटी संस्थेतून अभियांत्रिकी शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले.

श्रुतीच्या या घवघवीत यशाबद्दल अचलपूर नगरपालिकेचे कर्मचारी, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांनी तिचे व शर्मा कुटुंबाचे अभिनंदन केले असून, तिच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत स्वच्छता व आरोग्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका अमरावतीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत विकास विद्यालय, विलास नगर, अमरावती येथे विद्यार्थ्यांना स्वच्छता व आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी महानगरपालिका अमरावतीचे स्वच्छता निरीक्षक ए. एम. सय्यद सर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत दैनंदिन जीवनातील स्वच्छता, आरोग्य आणि कचरा व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

महानगरपालिका आयुक्त यांच्या संकल्पनेतून वर्गनिहाय 'स्वच्छता दूत' ही संकल्पना राबविण्यात येत असून, विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जाणीव-जागृती निर्माण करणे आणि स्वच्छतेच्या सवयी दैनंदिन जीवनाचा भाग बनविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे सय्यद यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी ओला कचरा, सुका कचरा आणि घातक कचरा यांचे योग्य वर्गीकरण कसे करावे, तसेच घरातील कचऱ्याचे योग्य पद्धतीने विभाजन व विल्हेवाट कशी लावावी, याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. सॅनिटरी नॅपकिनची सुरक्षित व योग्य विल्हेवाट कशी लावावी, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनातून विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा मेश्राम यांनी स्वच्छतेची सुरुवात स्वतःपासूनच झाली पाहिजे, असे सांगत विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता, परिसर स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व पटवून दिले. विविध विषयांच्या माध्यमातून आपण अनेक गोष्टी शिकतो; मात्र स्वच्छ आणि निरोगी जीवनासाठी स्वच्छतेच्या चांगल्या सवयी प्रत्यक्ष आचरणात आणणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची जाणीव, आरोग्यविषयक सजगता आणि सामाजिक जबाबदारी निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

# आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय दर्यापूर येथे 'सेवा संकल्प' अभियानाचा जागर

**दर्यापूर/प्रतिनिधीः-** विविध शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले जात व उत्पन्न प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना सुलभतेने उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, अमरावती, तहसील कार्यालय दर्यापूर आणि पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' आज आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापूर येथे तालुकास्तरीय शिबिर घेण्यात आले.



तहसीलदार डॉ. रवींद्रकुमार कानडजे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात समाज कल्याण निरीक्षक रवींद्र माहुलकर यांनी विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती देत आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. गटशिक्षणाधिकारी नंदकुमार जाधव यांनी विद्यार्थ्यांनी उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

शिबिराच्या आयोजनासाठी आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मनोज देशमुख यांच्यासह तहसील कार्यालयातील तलाठी पूजा चेंडीकापूरे, अंजली वसु, आकांक्षा ढोके तसेच महसूल सेवक अमोल नवलकर व गजानन आमझरे यांनी विशेष सहकार्य केले.

दरम्यान, तालुक्यातील सेतू संचालक व तालुकाध्यक्ष सत्यपाल

## शिष्यवृत्तीसाठी प्रमाणपत्रांची अडचण दूर

इंगळे यांच्यासह सचिन देशमुख, सुमित होले, शैलेंद्र दुधंडे व प्रणव पतिंगे यांनी विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र काढण्याच्या प्रक्रियेत सहकार्य केले. त्यामुळे शिष्यवृत्तीसाठी आवश्यक प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांसह पालकांची होणारी धावपळ कमी झाली.

शिबिरास तालुक्यातील विद्यार्थी व पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविला. प्रशासनाच्या विविध विभागांच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ झाली. शिबिराचे संचलन व आभार प्रदर्शन गटसमन्वयक सुनील स्वर्गीय यांनी केले.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१८७३/२०२६
Sapana Ramesh Pinjani +2 Versus Chandri Sachhanand Lulla +1
पुढील ता.३०.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants**
1. **Sapana Ramesh Pinjani,** Aged about 50 yrs. Occ.- Household, R/o. G-1, Nilambari Apartment, Sahakar Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
2. **Bhartidevi @ Arti Mohandas katyani,** Aged about 58 yrs. Occ.- Household, R/o. Arvi , Tq. Arvi, Dist. Wardha
3. **Rekha Hansraj Tahaliyani,** Aged about 52 yrs. Occ.- Household, R/o. Bapu Nagar, Ward No.4, Lakhani, Tq. & Dist. Bhandara

---Versus----

**Non-Applicant -**
1. **Chandri Sachhanand Lulla,** Aged about 52 yrs. Occ.- Household, R/o. 2nd floor, Vastu Vaibhav Apartment, Opposite Petrol Pump, Farshi Stop, Amravati, Tq. & Dist. Amravati
2. **Sangeeta @ Urvashi Pradip Vishindasani,** Aged about 47 yrs. Occ.- Household, R/o.Deep Apartment, Near Bridge No.10, Indora Nagar, Tq. & Dist. Nagpur - 440 004

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत deceased Puribai Sevakram Pinjani** हे दिनांक ०८.०५.२०२१ रोजी अमरावती येथे मयत झाले आहे. **Sapana Ramesh Pinjani+2 Versus Chandri Sachhanand Lulla+1** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Sapana Ramesh Pinjani+2 Versus Chandri Sachhanand Lulla+1** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.११.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## जाहीर नोटीस

**वि.८ वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), अमरावती यांचे न्यायालयात**

सक्सेशन नं.१७०८/२०२६ चौ.ता.०३.१०.२०२६

**अर्जदार -** **Smt. Rukmanidevi Wd/o. Mohanlal Sharma (Jangid)**
Age 88 years, Occu-Home-maker
R/o. C/o. Laxmi Vihar Sharda Nagar, Shilangaon Road, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -**
1. **Kishor S/o. Mohanlal Jangid (Sharma)**
Age 59 years, Occu-Business
2. **Sunil S/o. Mohanlal Jangid (Sharma)**
Age 56 years, Occu-Business
3. **Dharmendra S/o. Mohanlal Jangid (Sharma) (Dead)**
**Through Legal Heirs and Representative**
A) **Smt. Anita Wd/o. Dharmendra Jangid (Sharma)**
Age 54 years, Occu-Homemaker
B) **Mrs. Seema W/o. Nirajkumar Sharma**
**Name before Marriage -**
**Seema d/o. Dharmendra Jangid (Sharma)**
Age 35 years, Occu-Homemaker
C) **Uday s/o. Dharmendra Jangid (Sharma)**
Age 33 years, Occu-Business
No. 1 to 3 R/o. 101, Sharda Nagar, Shilangaon Road, Amravati
4. **Rajesh S/o. Mohanlal Jangid (Sharma)**
Age 53 years, Occu-Service,
R/o. B-602, Swastik Ganga Gohrpadi Behind Empress Garden, Pune

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालयात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, **मयत मोहनलाल रामकुमार शर्मा** यांचे **निधन दि.१०/०९/२०२५** रोजी अमरावती येथे झाले असून वरील अर्जदार त्याचे कायदेशिर उत्तराधिकारी आहेत व इतर कोणीही मय्यतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकिला मार्फत वि.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोद घ्यावी.

आज दि.१७/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का
**आदेशानुसार,**
**सहाय्यक अधीक्षक (प्रशासन )**
**दिवाणी न्यायालय,(व.स्तर) अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज क्र.१८१४/२०२६
सुशिलाबाई + ४- वि.निरंक
पुढील ता.३०.०९.२०२६

अर्जदार :-
1. **Sushilabai Laxman Nagaeshwar**
Aged 72 years, Occu.: Housewife
R/o. Sahajanand Nagar, Arjun Nagar, Morshi Road, Amravati
2. **Sudhir Laxmanrao Nageshwar (Death),**
**Through Legal Hair**
a) **Kavita Sudhir Nageshwar,** Aged 48 years. Occu.: Service
R/o. Amba Apartment, Morshi Road,
Near Bus stop, Arjun Nagar, Amravati
b) **Harsh Sudhir Nageshwar,** Aged 25 years. Occu.: Job
R/o. Amba Apartment, Morshi Road,
Near Bus stop, Arjun Nagar, Amravati
3. **Manoj Laxman Nageshwar,** Aged 51 year, Occu.: Job
R/o. Sahanjanand Nagar, Arjun Nagar, Morshi Road, Amravati
4. **Vinod Laxman Nageshwar,** Aged 49 year, Occu.: Private Job
R/o. Lotus Sanskruti Apartment, Flat No. 101 B, Malwalenagar, Kiwale Mawal Pune, Tq. Dist. Pune
5. **Pramod Laxmanrao Nageshwar,** Aged 46 year, Occu.: Service
R/o. Sahajanand Nagar, Arjun Nagar, Morshi Road, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- **Nil**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Laxman Punjaji Nageshwar** हे दिनांक २८.०३.२०२६ रोजी अमरावती येथे व **Sudhir Laxmanrao Nageshwar** हे दि.१८.०९.२०२४ रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार Sushilabai Laxmanrao Nageshwar + 4** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Sushilabai Laxmanrao Nageshwar + 4** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०४.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१८६१/२०२६
कुसुम पुंडलिकराव दातीर व इतर वि.निरंक
पुढील ता.२२.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
१. **कुसुम पुंडलिकराव दातीर,** वय ७४ वर्षे, धंदा-नील/काही नाही
रा.इंगोले पुरा, जुनी वस्ती, बडनेरा, ता.व जि.अमरावती
२. **विनोद पुंडलिकराव दातीर,** वय ५८ वर्षे, धंदा-व्यापार
रा.निर्मला कॉलनी, जुनी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती
३. **राजेश पुंडलिकराव दातीर,** वय ५२ वर्षे, धंदा- शेती
रा.इंगोले पुरा, जुनी वस्ती, बडनेरा, ता.व जि.अमरावती
४. **मोहन पुंडलिकराव दातीर,** वय ४८ वर्षे, धंदा- शेती
रा.इंगोले पुरा, जुनी वस्ती, बडनेरा, ता.व जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत पुंडलिकराव अमृतराव दातीर** हे दिनांक ०२.०८.२०२३ अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार कुसुम पुंडलिकराव दातीर व इतर वि. निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कुसुम पुंडलिकराव दातीर व इतर वि. निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०९.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२६५/२०२६ ने.ता.१४.१०.२०२६

१. **गिता उमाकांत जाधव**
रा.साई नगर, देवरणकर लेआउट, वर्धा, ता.जि.वर्धा
२. **निता रविंद्र गोडे**
रा.गिताई नगर, तिवारी लेआउट, वर्धा ता.जि.वर्धा
३. **सविता दिनेश गोवरे**
रा.बोथडी किन्हाळा, ता.आर्वी, जि.वर्धा

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी **मयत सुमित्राबाई @ सोमीत्राबाई प्रल्हादराव मोरे** यांचा **मृत्यू दि.२२.१२.२००९** मध्ये पळसमंडळ, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे पती नामे **प्रल्हादराव बालाजी मोरे** यांचा **मृत्यू दि.०९.१२.२०२३** मध्ये **साईनगर, वर्धा, ता.जि.वर्धा** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ ते ३ हया मुली आहेत.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १९ सप्टेंबर २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

## जाहीर नोटीस

प्रो.नं.२००२/२०२६
दिवाणी न्यायालय व.स्तर, दर्यापूर
दि.१४.०८.२०२६

**वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर, जि.अमरावती येथील यु.एन.पाटील, सह दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.३३९/२०२६ ने.ता.२१.१०.२०२६

अर्जदार -
१. **चंद्रकला रायभान दहाट,** वय ७३ वर्षे, धंदा - घरकाम
२. **वंदना प्रफुल्ल देशभ्रतार,** वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.९८, स्टेशन फैल, वार्ड नं.३१, देवळी रोड, बुध्द विहार जवळ, वर्धा
३. **उषा संजय कावरे,** वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.भिम नगर, वलगांव, ता.जि.अमरावती
४. **अमोल रायभान दहाट,** वय ३९ वर्षे, धंदा - मजुरी
अ.क्र.१ ते ४ रा.चंद्रपूर खल्लार, ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

या नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **रायभान मोतीराम दहाट** हे दिनांक १५.१२.१९९५ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ चे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१४.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१८६२/२०२६
Kanta Madhukarrao Abhyankar
(Through her power of Attorney Holder)
Madhukar Sukhdevrao Abhyankar Versus NIL
पुढील ता.०७.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants**
1. **Kanta Madhukarrao Abhyankar,** Age 75 yrs. Occ.- NIL
**Through her Power of Attorney Holder)**
Madhukarrao Sukhdevrao Abhyankar,
Age-82 yrs, Occ- NIL
R/o. Jay Niwas, Near Congress Nagar, Bhuiputra Colony Rukhmini Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati

---Versus----

**Non-Applicant - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Jay Madhukarrao Abhyankar** हे दिनांक २९.१०.२०२५ रोजी अमरावती येथे मयत झाले. **Kanta Madhukarrao Abhyankar (Through her power of Attorney Holder) Madhukar Sukhdevrao Abhyankar Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Kanta Madhukarrao Abhyankar (Through her power of Attorney Holder) Madhukar Sukhdevrao Abhyankar Versus NIL** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१६.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१९०५/२०२६
Shakila Bano Mohammad Yunus + 3 Versus NIL
पुढील ता.२७.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants**
1. **Shakila Bano Mohammad Yunus,** Age 70 yrs. Occ.- Housewife, R/o. Momid Pura, New Town, Badnera, Amadapur, Amravati, Tq. & Dist. Amravati
2. **Shahin Tabsum @ Shahin Tabsum Ayyaz Ahmed,** Age 46 yrs. Occ.- Housewife, R/o. 29/1, Ward No. 29, Behind Gulmohar Market, Dr.Jakir Hussain Ward, Burhanpur, Tq. & Dist. Burhanpur (M.P.)
3. **Nasreen Bano @ Nasreen Bano Mohd. Arif,** Age 46 yrs. Occ.- Housewife, R/o. 155, Jakir Hussain Ward 24, Near Sai Mandir, Garg Colony, Badora, Betul (M.P.)
4. **Mohd. Shoeb Mohammad Yunus,** Age 36 yrs. Occ.- Labour, R/o. Momin Pura, New Town, Amdapur, Amravati, Tq. & Dist. Amravati

---Versus----

**Non-Applicant - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत deceased Mohammad Yunus Abdul Kadar** हे दिनांक १४.०६.२०२४ रोजी अमरावती येथे मयत झाले. **Shakila Bano Mohammad Yunus+3 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Shakila Bano Mohammad Yunus+3 Versus NIL** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१५.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

प्रो.क्र.८१८/२०२६

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

**मा.विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक ३०९/२०२६ ने.ता.२९.१०.२०२६

**अर्जदार :**
१. **शालिनी सुरेशराव राणे, (पत्नी)** वय ६८ वर्षे, व्यवसाय- घरकाम
२. **राजेंद्र सुरेश राणे (मुलगा),** वय ३९ वर्षे, व्यवसाय - खाजगी काम
दोघेही रा.वायगाव, पो.वायगाव, ता.भातकुली, जि.अमरावती
३. **सारिका प्रमोद डोंगरे, (मुलगी)** वय ४० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.पिंपळखुटा, पो.सासण, रामपुर, ता.दर्यापूर,जि.अमरावती
४. **मनिषा उमेश जुमळे, (मुलगी)** वय ३५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.आष्टी, पो.आष्टी, ता.भातकुली, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **सुरेश उत्तमराव राणे हे दि.१५.०८.२०२० रोजी मयत झाले.** अर्जदार **शालिनी सुरेशराव राणे (पत्नी), वय ६८ वर्षे,व्यवसाय-घरकाम,रा.वायगाव, ता.भातकुली, जि.अमरावती व इतर यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा,१८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता** या न्यायालयामध्ये दि.**११.०९.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **सुरेश उत्तमराव राणे** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **सुरेश उत्तमराव राणे** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १७.०९.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का
आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,भातकुली
दि.१७/०९/२०२६

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक १७**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# रेवसा गावात 'लोकसंवाद'; पथनाट्यातून सावकारीविरोधात जनजागृती

## कर्जमुक्ती योजनेसह कृषी विभागाच्या योजनांचाही संदेश

**अमरावती/का.प्र.**

कमी पाऊस, नापिकी आदी समस्यांमुळे सावकारांकडून कर्ज काढत शेती व संसाराचा गाडा हाकणारा शेतकरी हा सावकारी पाशात कसा अडकतो व त्याचा कुटुंब व समाजावर होणारा विपरीत परिणाम चफकलपणे मांडून जिल्हा उप निबंधक कार्यालयाच्या अधिकारी- कर्मचाऱ्यांनी रेवसा येथील शिवतांडव गणेशोत्सव मंडळात आयोजित 'लोकसंवाद' कार्यक्रमात गावकऱ्यांचे प्रबोधन केले.




'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना', या योजनेचा गावकऱ्यांनी घेतलेला लाभ,त्यांना येत असलेल्या अडचणी आदींबाबत त्यांच्या मनातील भावना जाणून घेण्यात आल्या. अडचणींच्या सोडवणुकीसाठी उपलब्ध कार्यालये, यंत्रणा व संकेतस्थळ,पोर्टल आदींची माहिती देण्यात आली.तत्पूर्वी, जिल्हा माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी रितेश भुयार यांनी सेवासंकल्प मोहिमे अंतर्गत माहिती व जनसंपर्क विभागाद्वारे राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद' कार्यक्रमाची माहिती उपस्थित गावकऱ्यांना दिली.

यानंतर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या सहाय्यक निबंधक स्वाती गुडधे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक निबंधक अनिरुद्ध राऊत आणि छाया देशमुख व अन्य कर्मचारी अशा एकूण १५ जणांच्या चमूने 'सावकारी पाश' हे पथनाट्य सादर केले. सादरीकरणानंतर प्रत्यक्ष जनतेशी संवाद साधून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ हा महाराष्ट्रातील गरिबांचे, शेतकऱ्यांचे आणि सर्वसामान्यांचे बेकायदेशीर व अनिर्बंध सावकारीच्या जाचातून व आर्थिक शोषणातून संरक्षण करण्यासाठी लागू करण्यात आलेल्या महत्त्वाच्या कायद्याविषयी माहिती देण्यात आली.

कृषी विभागाच्या वतीने रेवसा येथील सहाय्यक कृषी अधिकारी छाया देशमुख यांनी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, कृषी यांत्रिकीकरण उप-अभियान,मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना,मागेल त्याला शेततळे,नमो शेतकरी महासन्मान निधी योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना,नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना,राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान व फलोत्पादन विकास आदींबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली.

रेवसा गावच्या पोलीस पाटील छाया वानखडे यांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले व 'लोकसंवाद' उपक्रमाच्या माध्यमातून जनतेला देण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या माहितीबद्दल समाधान व्यक्त केले.शिव तांडव गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वानखडे,मंडळाचे पदाधिकारी, महिला,पुरुष व तरुण-तरुणी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.माहिती व जनसंपर्क विभागाद्वारे संपूर्ण राज्यभर जिल्हा माहिती कार्यालयांच्या माध्यमातून १६ ते २४ सप्टेंबर या कालावधीत 'लोकसंवाद' उपक्रम राबविण्यात येत आहे.



त्रिमूर्ती सार्वजनिक गणेश मंडळ,अचलपूर



जय जाणाई गणेश उत्सव मंडळ अचलपूर

## पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयाचा
# इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम्युनिकेशन विभागाला बेस्ट आयईआय स्टुडंट्स चॅप्टर अवॉर्ड

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या आयईआय विद्यार्थी प्रकोष्ठास बेस्ट आयईआय स्टुडंट्स चॅप्टर अवॉर्ड तसेच संपूर्ण विदर्भ विभागात प्राप्त करणारे महाविद्यालय म्हणून पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाचा विशेष सत्कार करण्यात आला. अभियंता दिनानिमित्त दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया),अमरावती लोकल सेंटरच्या वतीने अभियंता भवन,शेगाव नाका, अमरावती येथे आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार व सन्मान प्रदान करण्यात आला.

इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या आयईआय विद्यार्थी प्रकोष्ठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या तांत्रिक व व्यावसायिक विकासासाठी वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये तांत्रिक कार्यशाळा, तज्ज्ञ व्याख्याने, औद्योगिक भेटी, प्रकल्प स्पर्धा, कौशल्यविकास प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन आणि विविध विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांचा समावेश आहे.महाविद्यालयाचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मोहम्मद झुहैर, अधिष्ठाता विद्यार्थी कल्याण डॉ. एस. के. नंदा आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. यू. डब्ल्यू. होरे यांच्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे हा गौरव प्राप्त झाल्याचे



सांगण्यात आले.

आयईआय विद्यार्थी प्रकोष्ठाचे प्राध्यापक सल्लागार प्रा. एस. पी. भोंगे, आयईआय विद्यार्थी प्रकोष्ठाचे अध्यक्ष पियुष खांगर, उपाध्यक्ष रक्षा चव्हाण, सचिव पूर्वा टेकाडे तसेच विभागातील सर्व प्राध्यापक, आयईआय समन्वयक आणि विद्यार्थी सदस्यांनी पुरस्कारासाठी विशेष योगदान दिले.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाविद्यालयाच्या वतीने आयईआय विद्यार्थी प्रकोष्ठाचे अभिनंदन करण्यात आले.

# भारतीय महाविद्यालयात शिक्षक दिनी सेवापूर्ती व सन्मान सोहळा उत्साहात

**मोर्शी/वार्ताहर**

भारतीय विद्या मंदिर, अमरावतीद्वारा संचालित भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे सेवापूर्ती व सन्मान सोहळा तसेच शिक्षक दिनानिमित्त विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय विद्या मंदिर, अमरावतीच्या अध्यक्ष डॉ. आराधना वैद्य होत्या. प्रमुख अतिथी म्हणून भारतीय विद्या मंदिरचे उपाध्यक्ष डॉ. सतीश कुलकर्णी, सरचिटणीस डॉ. प्रशांत भागवतकर, तर कोषाध्यक्ष अनंत सोमवंशी, आयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष आगरकर उपस्थित होते.



याप्रसंगी सत्कारमूर्ती निता विलासराव क-हे व विलासराव क-हे तसेच रामदास गंगारामजी इंगळे व सुषमा रामदास इंगळे यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन अतिथी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. लाजवंती टेंभुर्णे यांनी केले. यानंतर सेवापूर्ती झालेल्या मान्यवरांबद्दल मनोगत व्यक्त करताना एच.एस.सी. व्होकेशनल शाखेच्या प्रतिनिधी पंचगाम, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रतिनिधी विनायक देशपांडे आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रतिनिधी डॉ. रजनीश बांबोळे यांनी सत्कारमूर्तींच्या कार्याचा गौरव केला.यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष आगरकर यांनी सेवापूर्ती व सन्मान सोहळा तसेच शिक्षक दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले.

शिक्षक दिनाचेऔचित्य साधून आमंत्रित अतिथी मान्यवर सेवानिवृत्त प्राध्यापक जोशी,प्रा.खांडेकर, प्रा.वैद्य, प्रा.मंडल, प्रा.बोरकर, प्रा.गुलवाडे यांचे अथिती मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. आराधना वैद्य यांनी सेवापूर्ती झालेल्या मान्यवरांच्या कार्याचा गौरव केला.कार्यक्रमाचे संचालन साकेत चिंचमलातपुरे यांनी तर आभार सुरज खोब्रागडे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास निता क-हे आणि रामदास इंगळे यांचे कुटुंबीय व मित्रपरिवार, तर महाविद्यालयातील प्रा. डॉ.आर. जी.बांबोळे, डॉ.दीपक काळे, डॉ.एल.आर. टेंभुर्णे, डॉ. संदीप राऊत, डॉ.सावन देशमुख,डॉ. शिरीष टोपरे,डॉ. भगवान साबळे, डॉ.अरविंद पाझारे,प्रा. गोपाल भलावी, प्रा.मृणाक काळमेघ, प्रा.तट्टे, प्रा. वैशाली पळसापुरे, प्रा.सुरेंद्र पांडे,प्रा.सिद्धोदन पाटील,प्रा. विजय बोरवार,रुपेश मेश्राम, प्रभाकर सिडाम,विनोद जाधव,वैभव परांजपे, सचिन कथे, अभिनव सिडाम, राठोड,प्रतिक वाहिले, आदित्य सोमवंशी तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणेशोत्सवाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे वेदना मांडण्याचा प्रयत्न -आ. कडू

## पिकांचे नुकसान थांबविण्यासाठी ठोस ॲक्शन प्लॅन आवश्यक

**अचलपूर/वार्ताहर**

गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचा उपक्रम प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने राबवण्यात येत आहे. विधानपरिषद आ.बच्चू कडू यांच्या शिवसेना-प्रहार कार्यालयाच्या वतीने कुरळपुर्णा येथे गणपती बाप्पांची मूर्ती स्थापना करून गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. यावेळी विधानपरिषद आ.बच्चू कडू यांनी गणेशोत्सव हा चळवळीचा उत्सव आहे.त्यामुळे गणेशोत्सव विचार आणि चळवळीचा उत्सव झाला झाला पाहिजे अशी भूमिका त्यांनी मांडली.



यावेळी आस्मानी संकट,शेतकऱ्यांचा व्यथा,वन्यप्राणीमुळे मृत्युमुखी झालेल्या ची संख्या असे विविध बॅनर या मंडपात लावण्यात आलेले आहे.यामुळे विष्णपरिषद आ.बच्चू कडू यांचा हा आगळावेगळा उपक्रम चर्चेचा विषय ठरत आहे. शासन स्तरावरून या विविध प्रश्नाबाबत कोणती ठोस कारवाई केली जाते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.आमच्या प्रतिनिधीशी बोलताना विधानपरिषद आ.बच्चू कडू यांनी शेतीसमोरील दुष्काळाचे संकट आणि वन्यप्राण्यांच्या हल्ल्याचा मुद्दा त्यांनी अधोरेखित केला. यावेळी गणपती बाप्पांची आरती विधानपरिषद आ. बच्चू कडू यांच्या हस्ते करण्यात आली.यानंतर आ. बच्चू कडू यांनी सांगितले की,अमरावती जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यात तीन जणांचा बळी जाईपर्यंत प्रशासनाने तत्काळ मोठ्या प्रमाणात कारवाई केली नाही.वन्यप्राण्यांमुळे राज्यात दरवर्षी शेतपिकांचे मोठे नुकसान होते,या शेतपिकाच्या नुकसानीपोटी सरकार शेतकऱ्यांना मदत म्हणून देत नाही तेवढे प्रचंड प्रमाणात शेतपिकांचे दरवर्षी नुकसान होत असल्याच्या मुद्दाही विधानपरिषद आ.बच्चू कडू यांनी मांडला.

वन्यप्राण्यांमुळे राज्यात दरवर्षी १० ते ४० हजार कोटी रुपयांचे शेतपिकांचे नुकसान होते. राज्याचे कृषी खात्याचे जेवढे बजेट नाही त्यापेक्षा जास्त प्रमाणात शेतपिकांचे वन्यप्राण्यांकडून नुकसान होते. वन्यप्राण्यामुळे जाणाऱ्या बळींचीच संख्या २०० ते ३०० एवढी जाते. ही सगळी संकटे दूर करण्यासाठी ॲक्शन प्लॅन असणे गरजेचे आहे.

# गणेश विसर्जनासाठी महापालिकेचे विशेष नियोजन

## २२ कृत्रिम विसर्जन टँकची व्यवस्था

**अमरावती/का.प्र.**

श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या स्वच्छता विभागाने गणेशमूर्ती विसर्जनासाठी व्यापक नियोजन केले आहे. शहरातील विविध प्रभागांमध्ये नागरिकांना त्यांच्या परिसरातच गणेशमूर्तींचे सुरक्षित,सुव्यवस्थित व पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन करता यावे,यासाठी २२ ठिकाणी कृत्रिम श्री गणेश विसर्जन टँक/टब उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

शहरात १४ सप्टेंबरपासून गणेशोत्सव सुरू आहे. विविध प्रभागांमध्ये लहान आकाराच्या गणेशमूर्तींचे मोठ्या प्रमाणात विसर्जन केले जाते. मुख्य विसर्जन स्थळांवरील गर्दी व ताण कमी करण्याच्या उद्देशाने ही व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील कृत्रिम विसर्जन टँकचा वापर करावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

कृत्रिम विसर्जन टँकच्या प्रत्येक ठिकाणी संबंधित प्रभागातील दोन कर्मचारी/बिट पथक नियुक्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. स्वास्थ निरीक्षकांमार्फत या व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यात येणार आहे. कृत्रिम विसर्जन टैंक भरल्यास आवश्यकतेनुसार पाणी बदलणे, निर्माल्य व कचरा काढणे यासाठी संबंधित विभाग आणि कंत्राटदाराशी तत्काळ समन्वय साधण्याचे आदेश देण्यात आले आहेत. टँकच्या ठिकाणी निर्माल्य संकलनासाठी घंटागाडी २५ सप्टेंबर रोजी सकाळपासून गणेश विसर्जन पूर्ण होईपर्यंत उपलब्ध ठेवण्यात येणार आहे. विसर्जनानंतर निर्माण होणारे फुले, हार, निर्माल्य तसेच इतर संबंधित कचरा घंटागाडीमार्फत स्वतंत्रपणे संकलित करून निर्धारित ठिकाणी नेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शहरातील तसेच विसर्जन स्थळांच्या परिसरात निर्माण होणारा कचरा तातडीने उचलण्यासाठी संबंधित कंत्राटदारामार्फत व्यवस्था करण्यात येणार आहे. कोणत्याही ठिकाणी कचरा साचणार नाही,याची दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

श्री गणेश विसर्जनाच्या दिवशी कृत्रिम तसेच निश्चित विसर्जन स्थळांवर आवश्यकतेनुसार अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. नियुक्त स्वास्थ निरीक्षकांनी प्रत्यक्ष भेट देऊन कर्मचारी उपस्थिती, स्वच्छता, निर्माल्य संकलन, घंटागाडी आणि कचरा उचलण्याच्या व्यवस्थेची पाहणी करावी,असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. महापालिकेच्या आदेशानुसार २५ व २६ सप्टेंबर रोजी संबंधित विसर्जन स्थळांवर प्रत्यक्ष भेट देऊन व्यवस्था तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विसर्जन स्थळांवरील गणेशमूर्तींची संख्या, नोंद आणि इतर आवश्यक अहवाल तयार करण्याची जबाबदारीही संबंधित कर्मचाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. कोंडेश्वर येथे श्री गणेश विसर्जनाच्या अनुषंगाने २५ व २६ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून विसर्जन पूर्ण होईपर्यंत विशेष ड्युटी लावण्यात आली आहे.

## संक्षिप्त

### श्री मारुती देवस्थान सप्ताहाची भक्तीमय शोभा यात्रा

**कुऱ्हा** - तिवसा तालुक्यातील वऱ्हा येथील श्री. मारुती देवस्थान अशा पुरातन प्राचीन मंदीरामध्ये दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विविध धार्मिक कार्यक्रमाने मोठ्या उत्साहात साजरा करण्यांत येतो.या सप्ताहामध्ये दररोज सकाळी पासून अखंड हरिनाम सप्ताह सुरु होता. व हरिपाठ, भजन आदी कार्यक्रम असून १९ सप्टेबर ला श्री.मारुती देवस्थान मधून शोभा यात्रा काढण्यांत आला.या सर्व ग्रामस्थांमधील वारकरी भजन मंडळ, इतर भजन मंडळाचा सहभाग यामध्ये दिंड्या, पथाका, बॅन्ड वाद्य, अवधूत भजन मंडळ, महिला भजन मंडळ आणि समस्त वऱ्हा गावकरी महिला, पुरुष युवक वृद्ध यांचा समावेश राहुन ही शोभा यात्रा गावाच्या परिक्रमाने संपूर्ण वऱ्हा नगरी भक्तीमय वातारणाने दुमदुमुन गेली ही शोभा यात्रा जुने बस स्टॉप वरील भवानी मंदिरा समोर येवून दहिहांडी फोडून ही शोभा यात्रा श्री मारुती देवस्थान मंदीरामध्ये परत येवून गोपाल काल्याचे किर्तन होऊन प्रसाद वाटप करण्यात आले.



### गांधी विद्यालयात स्व.भाऊसाहेब दातीर यांची पुण्यतिथा

**अंजनगाव बारी** -येथील गांधी विद्यालयात न्यू एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा स्वातंत्र्यसंग्राम सेनानी स्व. भाऊसाहेब दातीर यांची पुण्यतिथी श्रद्धापूर्वक साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या प्रारंभी न्यू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. हेमंतजी देव यांच्या हस्ते स्व. भाऊसाहेब दातीर यांच्या पुतळ्याचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिक्षक व विद्यार्थ्यांनीही पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. यावेळी डॉ. हेमंतजी देव यांनी स्व. दातीर यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या दूरदृष्टी व समाजसेवेच्या भावनेतून न्यू एज्युकेशन सोसायटीसह विविध शैक्षणिक संस्थांची उभारणी झाल्याचे नमूद केले.याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. आनंदरावजी इंगोले, राजेश टारपे, गांधी विद्यालय शाळा समितीचे सभापती रामेश्वरजी लाड,प्राचार्य विनोद चिंचोळकर,पर्यवेक्षक दिगंबर करडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. संचालन अनिश बडगुजर यांनी, तर आभार प्रशांत दुधे यांनी मानले.



### ऑपरेशन कवच' अंतर्गत दुचाकीस्वारांना मोफत हेल्मेट वाटप

**तिवसा** - दुचाकीस्वारांच्या सुरक्षिततेसाठी हेल्मेट वापराबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने तिवसा पोलिसांतर्फे 'ऑपरेशन कवच' अंतर्गत पंचवटी चौकात दुचाकीस्वारांना मोफत हेल्मेटचे वाटप करण्यात आले. यावेळी वाहनचालकांना रस्ते सुरक्षेचे महत्त्व पटवून देत वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.दुचाकी चालविताना हेल्मेट वापरणे ही केवळ कायदेशीर बाब नसून, स्वतःच्या जीविताच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेली जबाबदारी आहे. अपघाताच्या प्रसंगी हेल्मेटमुळे डोक्याला होणाऱ्या गंभीर दुखापतींचा धोका कमी होण्यास मदत होते. त्यामुळे दुचाकीस्वारांनी दर्जेदार हेल्मेटचा वापर करावा, हेल्मेटची पट्टी व्यवस्थित बांधावी, वेगावर नियंत्रण ठेवावे आणि वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले.पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली 'ऑपरेशन कवच' अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी तिवसा पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय, प्रसिद्ध रीलस्टार विजय खंडारे, तृप्ती खंडारे, शरद अहिरे, विद्या कळसे, अक्षय कडव, वाहतूक पोलीस सागर डोंगरे, शरद खेडकर, अरविंद गावंडे, महेश काळे, उत्कर्ष खुरकटे, आदित्य ठाकूर आदी उपस्थित होते.



### शिराळा गाव विकासापासून कोसो दूर

**शिराळा** - अमरावती तालुक्यातील मोठे असलेले गाव म्हणजे शिराळा मात्र गेल्या पाच वर्षांपासून कोणतेही ठोस काम झाले नाही. नाल्या व्यावस्थित नासल्यामुळे नालीतील पाणी रस्त्यावर वाहत आहे. धड रस्ते नाही. काही रस्ते कॉंकरेट झाले पण बाजुला चिखल आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला गटु नाही.सर्व कामे अर्धवट आहेत. बाजारातील शेडवर टिनपत्रे टाकण्यात आले नाही.गावाला मोझरी विकास आराखड्यातुन दहा कोटी निधी आला तेव्हा पासून कोणी निधी दिला नाही. मोझरी विकास आराखड्यातील निधी सुध्दा पळवून नेला.हा निधी कोठे गेला हा यक्षप्रश्न ग्रामस्थांना पडला आहे.गाव मोठे लक्षणं खोटे असे म्हटले तरी वावगे होणार नाही. या गावावर शेजारील अनेक खेडी अवलंबून आहे. मात्र शिराळा येथील रेल्वे स्टेशन बंद झाले आहे. या बाबीची दाखल कोणत्याही नेत्यांनी घेतली नाही.कारण नेते मंडळीं शिराळा राहत नाही.त्यांना गावाचे काही देणे घेणे नाही.मतापुरती राजकारण केले म्हणजे झाले.धड स्मशानभुमित जाण्यासाठी कॉंकरेट रस्ता नाही. पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही. विद्युत पोल खुप जुने झाले. त्यामुळे कधीही विद्युत पोल पडतील याचा नेम नाही. अर्धवट केबल विद्युत मंडळानी लावले आहे. तरी गावातील विविध विकासकामे त्वरित करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. निवडणूकी पुरते आश्वासन देवून चालणार नाही. गावांसाठी ठोस निर्णय घेण्याची वेळ आली आहे.गावाचा विकास करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



# बंद घरात आढळला महिलेचा कुजलेला मृतदेह

## लिव्ह-इन पार्टनर फरार, दाभा गावातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दाभा गावात एका बंद घरात ४८ वर्षीय महिलेचा कुजलेला मृतदेह आज शनिवार १९ सप्टेंबरच्या सकाळी आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. घराला बाहेरून कुलूप लावलेले होते. दुर्गंधी पसरल्यानंतर ही घटना उघडकीस आली.

मृत महिलेची ओळख वैशाली ठाकरे उर्फ वैशाली मेहरे (वय ४८) अशी झाली आहे. ती मागील काही वर्षांपासून ललित सुनील मेहरे (वय ३५ ते ४०) याच्या सोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये त्याच घरात राहत होती, अशी माहिती ग्रामस्थांनी पोलिसांना दिली आहे. माहितीनुसार शनिवारी



सकाळी या बंद घरातून दुर्गंधी येऊ लागल्याने परिसरातील नागरिकांनी याची माहिती गावाचे पोलीस पाटिल यांना दिली. पोलीस पाटलाने बडनेरा पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला असता, महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळला. घर गेल्या तीन दिवसांपासून बंद होते. मृतदेहाच्या स्थितीवरून महिलेचा मृत्यू काही ☞(पान २ वर)

### शरीरावर मारहाणीच्या खुणा; हत्येचा संशय

शवविच्छेदनादरम्यान महिलेच्या शरीरावर अनेक ठिकाणी मारहाणीच्या खुणा आढळल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यामुळे महिलेचा मृत्यू नैसर्गिक नसून तिच्यावर मारहाण करून हत्या करण्यात आली असावी, या दिशेने पोलिसांचा तपास सुरू आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. महिलेसोबत राहणारी संबंधित व्यक्ती १८ सप्टेंबरपर्यंत परिसरात असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे. त्यानंतर तो फरार झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. घर अनेक दिवस बंद असणे, आत महिलेचा कुजलेला मृतदेह आढळणे आणि तिच्यासोबत राहणाऱ्या व्यक्तीचे अचानक गायब होणे या बाबींचा तपासाच्या दृष्टीने पोलिसांकडून बारकाईने तपास केला जात आहे. संशयिताचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके रवाना केली असून, मृत्यूची नेमकी वेळ, हत्येमागील कारण आणि घटनेच्या वेळी घरात कोण उपस्थित होते, याचा तपास सुरू आहे. संशयित व्यक्ती सापडल्यानंतरच या हत्येचे गूढ उकलण्याची शक्यता आहे.

# सोयाबीनचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करू

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आश्वासन

**-तिवसा तालुक्यातील सोयाबीनची पाहणी**

**तिवसा/प्रतिनिधीः-** संपूर्ण जिल्ह्यात जवळपास पावसाचा खंड ३९ दिवसाचा आहे, त्यामुळे सोयाबीनचे सर्वाधिक नुकसान दिसून येत आहे. पावसाचा खंड पडल्यामुळे ही नैसर्गिक आपत्ती आहे.

नैसर्गिक आपत्तीच्या काळात सरकारने शेतकऱ्याचे पाठीशी उभे राहिले पाहिजे ही प्राथमिकता आहे. त्यामुळे सर्व नुकसानिचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्याचे नियोजन येत्या मंत्रीमंडळाच्या बैठकींत



घेऊ, त्यासाठी केंद्राच्या मदतीची वाट पाहण्याची गरज नाही, ती जेव्हा येईल तेव्हा येईल असे आश्वासन महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तिवसा तालुक्यातील सोयाबीन नुकसानीचीं ☞(पान २ वर)

# अभिजीत दीपकेंच्या सभेत गो बॅक...गोदी मीडियाच्या घोषणा



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावतीला विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी शहरात आलेले कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक आणि राष्ट्रीय संयोजक अभिजीत दिपके यांच्या बैठकी दरम्यान मीडिया विरोधी घोषणाबाजी झाल्याचा दावा समोर आला आहे. सभास्थळी उपस्थित असलेल्या काही पत्रकारांना 'गो बॅक गोदी मीडिया' अशा घोषणा देत बाहेर जाण्यास सांगण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या कथित ☞(पान २ वर)

### दावे आणि व्हिडिओची अधिकृत तपासणी

पत्रकारांच्या उपस्थितीत झालेल्या कथित घोषणाबाजीमुळे सार्वजनिक कार्यक्रमामध्ये माध्यमांच्या वार्तांकनाच्या भूमिकेबाबत चर्चा सुरू झाली आहे. माध्यमांच्या वृत्तांकनाशी असहमती व्यक्त करणे आणि पत्रकारांना वार्तांकनापासून रोखणे या दोन वेगळ्या बाबी असल्याने अमरावतीतील घटनेत प्रत्यक्षात काय घडले, हे स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे.कॉकरोच जनता पार्टीने विद्यार्थी, बेरोजगारी आणि शिक्षणाशी संबंधित मुद्द्यांवर विविध उपक्रम राबविले आहेत. या कथित घोषणाबाजी बाबत अभिजीत दिपके किंवा कॉकरोच जनता पार्टीकडून अधिकृत स्पष्टीकरण समोर आले आहे का, याची स्वतंत्र पुष्टी ☞(पान २ वर)

# फोटो दाखवा, बक्षीस मिळवा' आंदोलनाचा दणका

## संतप्त शेतकरी अन् काँग्रेस कार्यकर्त्यांनी घातला घेराव

**तिवसा/प्रतिनिधीः-** दीड महिन्यापासून पावसाने मारलेली दडी, डोळ्यांदेखत करपून खाक होणारे सोयाबीन आणि सरकारच्या ढिम्म कारभाराविरोधात तिवसा तालुक्यात शेतकऱ्यांचा उद्रेक झाला आहे. पालकमंत्री आणि आमदारांचा शेताच्या बांधावरील फोटो दाखवा अन् रोख बक्षीस मिळवा या सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्या उपरोधिक आव्हानानंतर खडबडून जाग आलेल्या प्रशासनाला घेऊन पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे



यांनी तिवस्यात धावता दौरा केला. मात्र, महामार्गालगतच्या शेतात पोहोचताच संतप्त शेतकरी आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनी पालकमंत्र्यांना चोहोबाजूंनी घेरले.

सोयाबीनच्या नगदी पिकावर शेतकऱ्यांची दसरा-दिवाळी अवलंबून असते. मात्र, करपलेल्या पिकांकडे लक्ष द्यायला लोकप्रतिनिधींना वेळ नसल्याने प्रशांत कांबळे यांनी सोशल मीडियावर पालकमंत्री व आमदारांचे बांधावरचे फोटो दाखवणाऱ्यास ☞(पान २ वर)

# अमरावती रेल्वे स्थानकाच्या सुरक्षेत मोठी त्रुटी

**-थेट फलाटावर घुसली खाजगी स्कॉर्पिओ -आरपीएफकडून गुन्हा दाखल**

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती रेल्वे स्थानकावर सुरक्षा व्यवस्थेचा मोठा बोजवारा उडाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शनिवारी सायंकाळी सुमारे ७ वाजता प्रवाशांना सोडण्यासाठी आलेली एक खाजगी स्कॉर्पिओ कार थेट मुख्य प्रवेशद्वार ओलांडून रेल्वे फलाटावर पोहोचली. त्यावेळी फलाटावर अमरावती-मुंबई अंबा एक्स्प्रेस ☞(पान २ वर)



# दर्यापूरात जयंती २ चित्रपटाचे बॅनर अज्ञातांनी केले गायब

**-नागरिकांत तीव्र संताप**

**खल्लार/प्रतिनिधीः-** संपूर्ण महाराष्ट्रासह विदेशातही प्रेक्षकांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळत असलेल्या जयंती २ या चित्रपटाचे बॅनर दर्यापूर येथे बस स्थानक आगारासमोर लावण्यात आले होते. सदर बॅनर काल (दि.१८) रात्री अज्ञातांनी गायब केल्याचा प्रकार आज (दि.१९) समोर आला आहे. याबाबत नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त केल्या जात आहे.



शिक्षणाचे महत्व, सामाजिक जाणीव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य, समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी परंपरा असा हा पुरोगामी विचारांचा हा चित्रपट ☞(पान २ वर)

# जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत जाहीर करा

## युवक काँग्रेसचे गणपती बाप्पाकडे साकडे

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात पावसाअभावी अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. पिकांचे नुकसान, उत्पादनातील घट आणि वाढता शेतीचा खर्च यामुळे शेतकऱ्यांसमोर गंभीर संकट उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने गणपती बाप्पाला ☞(पान २ वर)



# चांदुर रेल्वे शहरातील मुख्य रस्त्याचा प्रश्न प्रलंबित

**लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षावर नागरिकांचा संताप -विसर्जनही खड्ड्यातच होणार का?**

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** गणरायाच्या आगमनाचा उत्साह शहरभर पाहायला मिळत असताना चांदुर रेल्वे शहरातील मुख्य रस्त्याची दुरवस्था मात्र नागरिकांच्या उत्साहावर विरजण घालत आहे. मोठमोठे खड्डे, उखडलेला रस्ता आणि वाहतुकीची बिकट परिस्थिती यामुळे 'बाप्पाचे आगमन खड्डयात झाले, आता विसर्जनही याच खड्डयांतून करायचे का?' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

चांदुर रेल्वे शहरातील मुख्य



रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी गेल्या दोन ते तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. वारंवार मागणी, निवेदने आणि प्रशासनाचे लक्ष वेधूनही रस्त्याच्या प्रश्नावर ठोस तोडगा निघत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील रस्त्यांवर नागरिकांची आणि वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यातच मुख्य रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेले मोठमोठे खड्डे अपघाताला निमंत्रण देत आहेत. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीतही याच रस्त्यांचा वापर होणार असल्याने विसर्जन मिरवणूक सुरक्षितपणे पार पडणार तरी कशी? असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत. चांदुर रेल्वे शहरातील नागरिकांनी लोकप्रतिनिधींना मतदान करून त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला. मग त्याच जनतेच्या मूलभूत रस्त्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष का? 'चांदुर रेल्वे शहरातील जनतेने मतदान केले नाही का?' असा थेट सवाल नागरिकांमधून उपस्थित होत ☞(पान २ वर)

# आयआयटी बॉम्बेतील साहिल वाकोडे मृत्यूची सीआयडी चौकशी करा!

**-जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** आयआयटी बॉम्बे, पवई येथे अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या यवतमाळ येथील विद्यार्थी साहिल रविंद्र वाकोडे यांच्या १८ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या दुर्दैवी मृत्यूची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी साहिलच्या कुटुंबीयांसह विविध सामाजिक संघटनांनी केली आहे. यासंदर्भात



जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

साहिलच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर आयआयटी बॉम्बे प्रशासनाची अधिकृत भूमिका आणि कुटुंबीयाकडून करण्यात येणारे आरोप यामध्ये फरक असल्याचे माध्यमांमधून समोर आले आहे. त्यामुळे घटनेमागील संपूर्ण सत्य निष्पक्ष तपासातून उघड होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. साहिल वर परीक्षेपूर्वी, परीक्षेदरम्यान किंवा त्यानंतर मानसिक, ☞(पान २ वर)

# सराईत गुन्हेगार बंटी पवार दोन वर्षांसाठी हद्दपार, गंभीर गुन्ह्यांची नोंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील सराईत व वारंवार गुन्हे करणारा उमेश ऊर्फ बंटी अशोक पवार (वय ३०, रा. लोहार लाईन, विलासनगर, अमरावती) याच्यावर पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. गंभीर स्वरूपाच्या विविध गुन्ह्यांची नोंद असलेल्या बंटी पवारला दोन वर्षांसाठी अमरावती शहर व जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे. १८ सप्टेंबर रोजी आदेशाची अंमलबजावणी करून त्याला




अमरावती जिल्ह्याबाहेर अकोट, जिल्हा अकोला येथे हद्दपार करण्यात आले.

पोलिसांच्या माहितीनुसार, बंटी पवार हा गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याच्याविरुद्ध विनयभंग, घातक शस्त्र बाळगणे, जबरी चोरी, गैरकायद्याची मंडळी जमविणे, दरोडा, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी, दुखापत, गंभीर दुखापत तसेच जीवे ठार मारण्याचा प्रयत्न अशा विविध स्वरूपाच्या गुन्ह्यांची नोंद आहे. बंटी पवार याच्यावर यापूर्वी पोलिसांकडून वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्याच्या वर्तनात अपेक्षित सुधारणा झाली नसल्याचे पोलिसांच्या अभिलेखावरून ☞(पान २ वर)

# अपहरणाच्या आरोपातून कैलास कुशवाह निर्दोष मुक्त

## ॲड.जिया खान यांचा यशस्वी युक्तिवाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक जिल्हा व सत्र न्यायालयाने आपला निर्णय देताना पोस्को आणि अपहरणाच्या गुन्ह्यातून आरोपी कैलास दादुल्ला कुशवाह याला दोषमुक्त केले आहे. एड.जिया खान यांनी यशस्वी युक्तिवाद केला. दोषारोप पत्रानुसार आरोपी विरुद्ध कलम ३६३ आणि



३७६(२)(ह) तसेच पोस्को कायदा २०१२ च्या कलम ४ व ६ अंतर्गत गंभीर आरोप लावण्यात आले होते.या प्रकरणात अभियोजन पक्षाकडून एकूण १० साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली होती. तसेच वैद्यकीय आणि फॉरेन्सिक पुराव्यांसोबतच इलेक्ट्रॉनिक ☞(पान २ वर)

# पैशाच्या वादात तरुणावर हल्ला करणारे ८ पाकिटमार गजाआड

**-काँग्रेस भवनसमोरील घटना -फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई**


**अमरावती/प्रतिनिधीः-** मालटेकडी येथील काँग्रेस भवनासमोर अकोला जिल्ह्यातील अकोट निवासी शेख सोहेल शेख सलीम (वय ३६) याच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. शेख सोहेल याची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्याला उपचारासाठी नागपूर येथे रेफर करण्यात आले आहे. जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहे, तर दुसरीकडे फ्रेजरपुरा पोलिसांनी



सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे ८ आरोपींना अटक केले आहे.

सर्व आरोपी पाकिटमार निघाले आहेत. मुख्य सूत्रधार बादल बागवाले (महाजनपुरा), हरिष विनोद बोबडे (श्याम नगर), कुणाल मनोज डंडुले (वय २८, श्याम नगर),यश सुरेंद्र कलसकर (वय २०, लायब्ररी चौक),निरंजन उर्फ निर्या संजय रोडगे (वय १९, फ्रेजरपुरा),सक्षम विजय लोंढे (वय १९, वैंक्यापुरा),
☞(पान २ वर)

सारांश
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
❒ रविवार, २० सप्टेंबर २०२६ ❒ E-paper - www.janmadhyam.com



# राखी सावंतविरोधात थेट एनआयएकडे तक्रार

बॉलिवूडची 'ड्रामा क्वीन' म्हणून ओळखली जाणारी राखी सावंत तिच्या अतरंगी वक्तव्यांमुळे, सोशल मीडियावरील चर्चांमुळे आणि पॅप्ससमोरच्या विविध करामतींमुळे नेहमीच चर्चेत असते. मात्र, आता तिचं नाव एका वेगळ्याच वादात अडकले आहे. यावेळी हे प्रकरण थेट देशाच्या सुरक्षेशी संबंधित असल्याचा दावा करण्यात आला आहे. राखी सावंतविरोधात राष्ट्रीय तपास संस्था अर्थाते अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

**तक्रार नेमकी कशाबाबत?**

तक्रारदाराने राखीच्या अलीकडच्या काही वक्तव्यांपासून ते तिच्या परदेशातील दौऱ्यांपर्यंतच्या विविध बाबींवर प्रश्न उपस्थित केले आहेत. सोशल मीडियावरील तिची वक्तव्ये, माध्यमांसमोर केलेली विधाने, परदेशातील काही हालचाली तसेच सीमेपलीकडील काही व्यक्ती आणि संस्थांशी असलेले कथित संपर्क संशयास्पद असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

राखीच्या काही वक्तव्यांमध्ये आणि हालचालींमध्ये राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने तपासाची गरज असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. त्यामुळे या सर्व बाबींची सखोल चौकशी करून त्यामागील नेमके तथ्य समोर आणावे, अशी मागणी तक्रारीत करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

**राखीच्या कोणत्या गोष्टींवर प्रश्नचिन्ह?**

राखीने सोशल मीडियावर केलेली काही वक्तव्ये, परदेशातील तिचे दौरे, माध्यमांशी संवाद साधताना केलेली विधाने आणि सीमेपलीकडील व्यक्ती किंवा संस्थांशी असलेले कथित संपर्क या सर्व बाबी तक्रारदाराने तपासाच्या कक्षेत आणल्या आहेत.दरम्यान, तक्रार दाखल होणे म्हणजे राखी सावंतवरील आरोप सिद्ध झाले आहेत, असे नाही.

या प्रकरणातील सत्यता आणि तक्रारीतील दाव्यांमध्ये तथ्य आहे की नाही, हे संबंधित यंत्रणेच्या तपासानंतरच स्पष्ट होईल.

# 'हैवान' मध्ये अक्षय- सैफ आमनेसामने

**हिंदी चित्रपटसृष्टीतील थ्रिलर चित्रपट अनेकदा त्यांच्या अनपेक्षित वळणांसाठी आणि गूढतेसाठी ओळखले जातात; परंतु 'हैवान'चे वैशिष्ट्य म्हणजे यातली उत्कंठा केवळ 'गुन्हेगार कोण आहे' या प्रश्नापुरती मर्यादित नाही, तर एक दृष्टीहीन व्यक्ती एका धोकादायक आणि हिंसक शत्रूचा सामना कसा करते, यावर ती अवलंबून आहे. दिग्दर्शक प्रियदर्शन यांनी या चित्रपटाची कथा याच असमान लढतीभोवती गुंफली आहे. एका बाजूला परशुराम आहे, ज्याच्याकडे प्रचंड ताकद, आत्मविश्वास आणि हिंसक स्वभाव आहे;**





हिंदी चित्रपट सृष्टीतील थ्रिलर चित्रपट अनेकदा त्यांच्या अनपेक्षित वळणांसाठी आणि गूढतेसाठी ओळखले जातात; परंतु 'हैवान'चे वैशिष्ट्य म्हणजे यातली उत्कंठा केवळ 'गुन्हेगार कोण आहे' या प्रश्नापुरती मर्यादित नाही, तर एक दृष्टीहीन व्यक्ती एका धोकादायक आणि हिंसक शत्रूचा सामना कसा करते, यावर ती अवलंबून आहे. दिग्दर्शक प्रियदर्शन यांनी या चित्रपटाची कथा याच असमान लढतीभोवती गुंफली आहे. एका बाजूला परशुराम आहे, ज्याच्याकडे प्रचंड ताकद, आत्मविश्वास आणि हिंसक स्वभाव आहे; तर दुसऱ्या बाजूला श्याम आहे, जो आपली बुद्धिमत्ता, ऐकण्याची क्षमता आणि संयम यांच्या जोरावर या धोकादायक परिस्थितीचा सामना करतो. हाच संघर्ष प्रेक्षकांना सुरुवातीपासून शेवटपर्यंत खिळवून ठेवतो.

कथानक: चित्रपटाची कथा परशुराम आणि श्याम यांच्याभोवती फिरते. परशुराम हे एक अत्यंत धोकादायक आणि गूढ व्यक्तिमत्त्व आहे, जो आपल्या वाटेत येणाऱ्या कोणालाही सहजपणे नमवतो. याउलट, श्याम अशा परिस्थितीत अडकतो जिथे त्याचे प्रत्येक पाऊल एक आव्हान बनते. दृष्टीहीन असल्यामुळे, त्याला आपल्या आसपासच्या हालचालींचा अर्थ लावण्यासाठी इतर ज्ञानेंद्रिये आणि बुद्धीवर अवलंबून राहावे लागते. जसजशी कथा पुढे सरकते, तसतसा या दोघांमधील तणाव वाढत जातो. परशुराम आपल्या अफाट ताकदीचा आणि दहशतीचा वापर करून श्यामला तोडण्याचा प्रयत्न करतो, तर श्याम संयम आणि चातुर्याने प्रतिस्पर्ध्याची पुढची चाल ओळखण्याचा प्रयत्न करतो. या दोघांपैकी कोण शेवटी एक पाऊल पुढे राहील, याबद्दलची उत्सुकता टिकवून ठेवून चित्रपट प्रेक्षकांची आवड कायम राखतो. ही कथा केवळ गुन्हेगारी आणि पाठलागापुरती मर्यादित नाही; यात नातेसंबंध आणि भावनांचे पैलूही गुंफलेले आहेत. नंदिनीच्या भूमिकेतील पहल चौधरी कथेला भावनिक खोली देते आणि श्यामच्या संघर्षाशी एक वैयक्तिक नाते निर्माण करते.

अभिनय: 'हैवान'ची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे अक्षय कुमार आणि सैफ अली खान यांचा अभिनय. परशुरामच्या भूमिकेत अक्षय कुमार त्याच्या नेहमीच्या नायक (पेदग्म्) प्रतिमेपेक्षा पूर्णपणे वेगळा दिसतो. यावेळी प्रेक्षकांना खूश करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, भीती आणि अस्वस्थता निर्माण करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे आणि यात तो बऱ्याच अंशी यशस्वी ठरतो. परशुरामचे पात्र खऱ्या अर्थाने भीतीदायक वाटते ते त्याच्या हिंसकतेमुळे नाही, तर त्याच्या शांत स्वभावामुळे. आवाज न चढवता किंवा अतिरंजित हावभाव न करता अक्षय या पात्रात एक प्रकारची थरारक भीती निर्माण करतो. अनेक दृश्यांमध्ये, त्याची ही संयमी वृत्तीच त्याच्या अभिनयाची मुख्य ताकद ठरते.

सैफ अली खानने 'श्याम'ची भूमिका अत्यंत सहजतेने साकारली आहे. श्यामच्या अंधत्वाचा वापर तो केवळ सहानुभूती मिळवण्यासाठी करत नाही; त्याऐवजी, तो या पात्राची मानसिक कणखरता अधोरेखित करतो. श्यामला नक्कीच भीती वाटते, पण तो त्या भीतीला स्वतःवर वरचढ होऊ देत नाही. सैफच्या अभिनयातील हा समतोल त्याच्या भूमिकेला प्रभावी बनवतो. अक्षय आणि सैफ यांच्यातील आमनेसामनेचा संघर्ष हे या चित्रपटाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे; एकाकडे प्रचंड ताकद आणि आक्रमकता आहे, तर दुसरा बुद्धिमत्ता आणि संयमाचा आधार घेतो. या दोन अभिनेत्यांमधील केमिस्ट्री आणि संघर्ष खऱ्या अर्थाने थरार निर्माण करतात.

नंदिनीच्या भूमिकेत पहल चौधरी एक सुखद धक्का देते; तिचा अभिनय नैसर्गिक आणि वास्तववादी वाटतो. बोमन इराणी, सैयामी खेर आणि श्रिया पिळगावकर यांनीही आपापल्या भूमिकांतून प्रभाव पाडला आहे. पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारणारा शारिब हाश्मी कथानक पुढे नेण्यास मदत करतो, तर असरानींची उपस्थिती चित्रपटाला भावनिक स्पर्श देते.

दिग्दर्शन आणि तांत्रिक बाबी: प्रियदर्शन हे एक अनुभवी दिग्दर्शक आहेत, ज्यांना हे पक्के ठाऊक आहे की थ्रिलर चित्रपटातील प्रत्येक दृश्यात मोठा 'प्लॉट ट्विस्ट' असण्याची गरज नसते. 'हैवान'मध्ये, एखादे पात्र काहीतरी लपवत आहे याची जाणीव किंवा पुढील कृतीची उत्सुकता यांतूनच अनेकदा तणाव निर्माण होतो. दिग्दर्शकाने या अनिश्चिततेचा प्रभावीपणे वापर केला आहे.

चित्रपटात सुरुवातीपासून शेवटपर्यंत गंभीर आणि तणावपूर्ण वातावरण टिकवून ठेवले आहे. कथेला अनावश्यक भपकेबाज बनवण्याऐवजी, पात्रांच्या संघर्षावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे.


चित्रपटाचा वेग काही ठिकाणी थोडा मंद वाटतो ज्यावरून असे वाटते की अधिक काटेकोर संपादन शक्य होते तरीही मूळ कथानक प्रेक्षकांना खिळवून ठेवते. पार्श्वसंगीत चित्रपटातील तणावपूर्ण वातावरण अधिक गडद करते, तर प्रीतमचे संगीत भावनिक प्रसंगांना पूरक ठरते आणि एकूणच सिनेमॅटिक अनुभव समृद्ध करते.

अंतिम निष्कर्ष : 'हैवान'ची खरी ताकद त्याच्या कथानकातील वळणांमध्ये नसून, त्यातील पात्रे आणि त्यांच्यातील संघर्षात आहे. परशुरामच्या भूमिकेत अक्षय कुमार आपल्या अभिनयकौशल्याचे एक वेगळेच पैलू सादर करतो, तर दुसरीकडे सैफ अली खान 'श्याम' या पात्राच्या वरकरणी दिसणाऱ्या कमकुवतपणामागे दडलेली मानसिक कणखरता प्रभावीपणे साकारतो.

चित्रपटाचा कालावधी काही ठिकाणी जरा जास्त वाटत असला, तरी अक्षय आणि सैफ यांच्यातील संघर्ष प्रेक्षकांना सतत खिळवून ठेवतो.

शारीरिक बळ विरुद्ध बुद्धीचा वापर आणि हिंसा विरुद्ध संयम यांच्यातील हा सामना हेच या चित्रपटाचे सर्वात मोठे आकर्षण आहे. जर तुम्हाला गंभीर, तणावपूर्ण आणि पात्रांवर आधारित थरारक चित्रपट (थ्रिलर्स) आवडत असतील, तर 'हैवान' हा चित्रपट मोठ्या पडद्यावर पाहण्यासारखा आहे.

# प्राजक्ता माळीने विकला मुंबईतील फ्लॅट



महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम अन् लोकप्रिय मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी पुन्हा एकदा तिच्या रिअल इस्टेट गुंतवणुकीमुळे चर्चेत आली आहे. प्राजक्ताने मुंबईतील गोरेगाव ईस्ट येथील फ्लॅट १.१२ कोटी रुपयांना विकल्याचे वृत्त समोर आले आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच तिने याच परिसरात ६.४२ कोटी रुपयांचे अत्यंत आलिशान नवीन घर खरेदी केले होते. अभिनेत्रीच्या या नव्या प्रॉपर्टी डीलबद्दल सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली आहे.

'सीआरई मॅट्रिक्स' या रिअल इस्टेट ॲनालिटिक्स फर्मवरील दस्तऐवजांनुसार, प्राजक्ता माळी हिने गोरेगाव ईस्ट येथील ४७३ स्क्वेअर फूट क्षेत्रफळ असलेला फ्लॅट १.१२ कोटी रुपयांना विकला आहे. या व्यवहाराची नोंदणी १० सप्टेंबर २०२६ रोजी झाली झाली. यासाठी ६.७३ लाख रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरण्यात आली आहे. प्राजक्ताने हा फ्लॅट का विकला, याबद्दल कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. इकोनॉमिक टाइम्सने हे वृत्त दिलंय.जुना फ्लॅट विकण्याच्या एक महिन्यापूर्वीच म्हणजेच १२ ऑगस्ट २०२६ रोजी प्राजक्ताने गोरेगाव येथील 'ओबेरॉय

# बिग बी बच्चन यांची अजूनही 'ती' एक इच्छा अपूर्णच

'कौन बनेगा करोडपती'च्या १८ व्या सीझनला प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या शोच्या होस्टिंगची जबाबदारी बिग बी अमिताभ बच्चन यांच्या खांद्यावर आहे. शोमध्ये स्पर्धकांसोबत दिलखुलास गप्पा मारताना बिग बी बऱ्याचदा अनेक गोष्टींचा ते खुलासा करत असतात. अलीकडेच अमिताभ यांनी त्यांची एक इच्छा सांगितली आहे. त्या अपूर्ण इच्छेचा त्यांना आजही पश्चाताप होतो. ८४ वर्षीय अमिताभ बच्चन यांनी खुलासा केला की, त्यांना नेहमीच गाणं शिकण्याची इच्छा होती, पण त्यांना ते कधी जमले नाही. त्यांची ही इच्छा ऐकून फॅन्सला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक वेगळा आणि वैयक्तिक पैलू पाहायला मिळाला.



अमिताभ बच्चन यांनी शो दरम्यान, स्पर्धकासोबत बोलताना त्यांनी त्यांच्या अपूर्ण इच्छेबद्दल सांगितले, ते म्हणाले की, 'माझी इच्छा असतानाही मी कधीच गाणं शिकलो नाही. लोक खूप चांगलं गातात किंवा सतारसारखी वाद्ये वाजवतात, तेव्हा मला थोडं वाईट वाटतं. ते इतक्या चांगल्या प्रकारे कसे काय गाऊ शकतात? याविषयी मला कायमच आश्चर्य वाटते. मी कधीच हे शिकलो नाही. मी पुन्हा केव्हातरी ते वाद्य शिकेल या आशेने माझ्या घरी सगळी वाद्ये आणून ठेवली आहेत. आता मी ८४ वर्षांचा आहे आणि वाद्य वाजवण्यास मी अजूनही शिकलो नाही. त्यामुळे याच गोष्टीचं मला वाईट वाटतं.' बिग बींच्या ह्या अपूर्ण इच्छेची सोशल मीडियावर जोरदार चर्चा होत आहे.

हॉटसीटवर खेळताना स्पर्धकाने बिग बींना असेही विचारले की, 'तुम्हाला तुमच्या आयुष्यातील असा कोणता दिवस आहे, जो पुन्हा जगायला आवडेल?' या प्रश्नावर अमिताभ बच्चन म्हणाले की, प्रामाणिकपणे सांगायचे तर माझ्या आयुष्यात इतक्या घटना आणि प्रसंग घडले आहेत की, त्यामुळे कोणता ठराविक एक दिवस निवडावा, हे ठरवणं माझ्यासाठी कठीण आहे. 'कौन बनेगा करोडपती'चा १८ वा सीझन सोनी टीव्हीवर प्रदर्शित होतोय. दर सोमवार ते शुक्रवार दरम्यान रात्री ९ वाजता हा शो टेलिकास्ट होतो.

# अमीषा पटेलला लाखोंचा....फटका



'गदर' फेम अभिनेत्री अमीषा पटेल पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. आपल्या दमदार अभिनयामुळे आणि सुपरहिट चित्रपटांमुळे अमीषाने सिनेसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. तिच्या अभिनयाचे देशभरात असंख्य चाहते आहेत. चित्रपटांव्यतिरिक्त अमीषा अनेकदा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असते.

दरम्यान, अमीषाच्या कुटुंबाशी संबंधित एक धक्कादायक घटना समोर आली आहे. अमीषाच्या आईच्या घरातून हिऱ्यांचे दागिने चोरीला गेल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, चोरीच्या या प्रकरणाची सध्या चर्चा सुरू आहे.

माहितीनुसार, अमीषाची आई आशा पटेल यांच्या घरातून लाखो रुपयांचं हिऱ्याचं कंगन चोरीला गेलंय. तसंच पोलिसांनी घरातील एक हाऊस हेल्परला अटक केलीय. ती आरोपी महिला विरार इथली रहिवाशी असून तिचं नाव सीमा विनोद घाटे असं आहे. गेल्या दीड वर्षांपासून ती आशा पटेल यांच्या घरी काम करते.

आशा पटेल यांच्या घरातून जानेवारीमध्ये ५ लाख रुपयांचं डायमंड जडित कंगन चोरीला गेलं होतं. त्यानंतर चोरीमध्ये मात्र सीमा हिचा असल्याचा आशा पटेल यांचा संशय होता. त्यांनी तिची चौकशी केली, परंतु तिने चोरी केली नसल्याचं सांगितलं. यानंतर आशा पटेल यांनी मरीन ड्राइव्ह पोलिसांशी संपर्क साधत तक्रार दाखल केली. भारतीय न्याय संहिता मधील कलम ३०६ अंतर्गत या प्रकरणी ईंई दाखल करण्यात आली.


पोलिसांच्या तपासादरम्यान सीमा घाटे हिचा शोध घेत तिला विरारमधून ताब्यात घेतलं. त्यानंतर तिला न्यायालयात हजर करत १५ सप्टेंबरपर्यंतची कोठडी सुनावली आहे. परंतु चोरीला गेलेले दागिने अद्याप पोलिसांना परत मिळाले नसून तपास सुरु आहे.

# दिवाळीत 'राम' भिडणार गॉडझिलाशी....!

बहुचर्चित रामायण हा चित्रपट येत्या दिवाळीत येत असल्याने या चित्रपटाविषयी उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. दिवाळी म्हटल्यावर फटाके, फराळ आणि सुट्टी असे समीकरण असताना , सिनेरसिकांसाठी सुद्धा मनोरंजनाची पर्वणी असणार आहे. बॉलिवूडमध्ये 'रामायण' आणि जपानचा लोकप्रिय मॉन्स्टर चित्रपट 'गॉडझिला मायनस झीरो' हे चित्रपट ऐन दिवाळीच्या मुहूर्तावर प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहेत. त्यामुळे बॉक्स ऑफिसवर होणारी ही टक्कर सर्वांसाठीच चर्चेचा विषय ठरलेली आहे.

रामायण आणि गॉडझिला एकाच वेळी प्रदर्शित होत असल्याने आता सोशल मीडियावर चर्चेला आणि मीम्सना उधाण आले आहे. विशेष म्हणजे सोशल मीडियावर या लढतीला हिंदुस्थानी चाहत्यांनी आपल्या स्टाईलमध्ये नावही देऊन टाकलं आहे. सोशल मीडियावर 'गॉड व्हर्सेस गॉडझिला'या नावाने चर्चा रंगली आहे. एकीकडे रणबीर कपूरचा प्रभू श्रीराम, तर दुसरीकडे थेट गॉडझिला! त्यामुळे पडद्यावर नेमकी कोणाची दहशत जास्त दसणार, याची उत्सुकता सिनेरसिकांमध्ये आहे.

'रामायण'च्या प्रदर्शनाची चर्चा आधीपासूनच जोरात सुरू आहे. त्यातच चित्रपटातील 'जय जय राम'हे पहिले गाणे रिलीज झाल्यानंतर चाहत्यांचा उत्साह आणखी वाढला. गाण्याच्या व्हिडीओमध्ये रणबीर कपूर आणि साई पल्लवी यांची यापूर्वी न पाहिलेली दृश्ये पाहायला मिळाली. त्यासोबतच चित्रपटातील व्हीएफएक्स आणि कलर ग्रेडिंगमध्येही सुधारणा करण्यात आल्याचे दिसून आले.




'गॉडझिला मायनस झिरो' हा चित्रपट ६ नोव्हेंबरला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित होणार आहे. तर 'रामायण' ८ नोव्हेंबरला म्हणजेच दिवाळीच्या काळात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे परदेशातील बाजारपेठांमध्ये दोन्ही चित्रपटांमध्ये थेट स्पर्धा पाहायला मिळू शकते.

हे दोन चित्रपट एकत्र रिलीज होणार असल्याने, चाहत्यांनीही आपली कल्पनाशक्ती पणाला लावली आहे. सोशल मीडियावर काही चाहत्यांनी रणबीर कपूरच्या प्रभू श्रीरामच्या रूपाला गॉडझिलासोबत जोडणारे पोस्टर्स तयार केले आहेत. तर काहींनी यशच्या रावणाच्या रूपाला गॉडझिलासमोर उभे केले आहे. एकीकडे प्रभू श्रीरामांचा भव्य अवतार आणि दुसरीकडे गॉडझिलाचा राक्षसी अवतार आता मीम्सच्या माध्यमातून दिसून येत आहे. त्यामुळे रामायण विरुद्ध गॉडझिला ही बॉक्स ऑफिसची लढत सध्या चाहत्यांसाठीच चर्चेचा विषय ठरली आहे. आता दिवाळीत प्रेक्षक कोणत्या चित्रपटाला अधिक पसंती देतात, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# टायटनवरील नद्यांचे गूढ....



शनीचा उपग्रह टायटनच्या ध्रुवीय प्रदेशांमध्ये अशा द्रव साठ्यांचे मोठे प्रमाण आढळते. टायटनवरील या नद्या संशोधकांसाठी कायम आव्हान ठरल्या आहेत.नदी म्हटले की डोळ्यांसमोर वाहते पाणी, हिरवीगार काठची झाडे आणि समुद्राकडे जाणारा प्रवाह उभा राहतो. पण आपल्या सौरमालेत एक असे जग आहे, जिथे नद्या आहेत, तलाव आहेत, समुद्र आहेत आणि पाऊसही पडतो, मात्र या सगळ्यांत पाणी मुख्य घटक नाही. शनीचा सर्वात मोठा उपग्रह टायटन हा पृथ्वीनंतर आपल्या सौरमालेतील असा एकमेव ज्ञात जग आहे, जिथे द्रव पदार्थाचे वातावरणातून पृष्ठभागावर आणि पुन्हा वातावरणात जाणारे चक्र स्पष्टपणे दिसते. या चक्रात पाण्याऐवजी मिथेन आणि इथेन महत्त्वाची भूमिका बजावतात.

टायटनचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे दाट वातावरण. त्याच्या वातावरणात मुख्यत नायट्रोजन असून मिथेनचे प्रमाणही महत्त्वाचे आहे. सूर्यप्रकाशामुळे आणि वातावरणातील प्रक्रियांमुळे पृष्ठभागावरील द्रव मिथेन बाष्पीभवन होते, त्यातून ढग तयार होतात आणि योग्य परिस्थितीत मिथेनचा पाऊस पृष्ठभागावर पडतो. हा पाऊस वाहत जाऊन द?या, प्रवाह आणि नदीसदृश मार्ग तयार करतो. एक महत्त्वाचा फरक आहे. टायटनच्या पृष्ठभागाचे तापमान सुमारे उणे १७९ अंश सेल्सिअस असल्याने तेथील पाणी गोठून अत्यंत कठीण बर्फासारखे असते. परंतु मिथेन आणि इथेनसारखे हायड्रोकार्बन त्या अत्यंत थंड वातावरणात द्रवरूपात राहू शकतात. त्यामुळे पृथ्वीवर पाणी जे काम करते, त्यासारखे भौगोलिक कार्य टायटनवर द्रव मिथेन-इथेन करू शकतात. ते पृष्ठभागावरील पदार्थ झिजवतात, वाहून नेतात आणि वेगवेगळ्या ठिकाणी साचवतात.

शनीभोवती फिरणाऱ्या कॅसिनी या अवकाशयानाच्या निरीक्षणांमधून टायटनवर असंख्य नदीसदृश वाहिन्या, खोल दऱ्या आणि द्रवाने भरलेले तलाव व समुद्र असल्याचे स्पष्ट झाले. विशेषत टायटनच्या ध्रुवीय प्रदेशांमध्ये अशा द्रव साठ्यांचे मोठे प्रमाण आढळते. 'क्रॅकेन मेअर', 'लिजिया मेअर' आणि 'पुंगा मेअर' ही याची प्रमुख उदाहरणे आहेत. काही नदीपात्रे या समुद्रांपर्यंत पोहोचताना दिसतात; यावरून टायटनवरील द्रव मिथेन आणि इथेनच्या स्थानिक व प्रादेशिक चक्राच्या परिणामकारकतेची कल्पना येते. टायटनवरील नदीकाठ मात्र पृथ्वीवरील नदीकाठासारखे हिरवेगार नाहीत. तेथे द्रवाच्या प्रवाहामुळे बर्फाळ पृष्ठभागाची झीज होते. टायटनवरील पाण्याचा बर्फ हा इतक्या कमी तापमानात कठीण खडकासारखा वागू शकतो. त्यावर खाली येणारे सेंद्रिय कण साचतात आणि कालांतराने वेगवेगळ्या प्रकारचे भूआकार तयार होतात. त्यामुळे टायटनचा भूभाग पाहताना तो काही प्रमाणात पृथ्वीसारखा वाटतो, परंतु त्याची रासायनिक आणि भौतिक यंत्रणा वेगळी आहे.

टायटनचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याचे वातावरण आणि पृष्ठभाग यांच्यातील गुंतागुंतीचे रसायनशास्त्र. सूर्यप्रकाश आणि शनीच्या चुंबकीय वातावरणातून येणाऱ्या ऊर्जेमुळे मिथेनचे रेणू तुटतात आणि त्यातून विविध सेंद्रिय संयुगे तयार होतात. यातील काही पदार्थ वातावरणातून खाली येऊन पृष्ठभागावर साचतात. त्यामुळे टायटन हा केवळ विचित्र नद्यांचा उपग्रह नाही, तर सेंद्रिय रसायनांनी समृद्ध असलेली नैसर्गिक प्रयोगशाळाच आहे.

टायटनवर द्रवरूप मिथेनचे चक्र असल्यामुळे तेथे ऋतूंनुसार बदलही होतात. शनीला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यासाठी सुमारे २९.५ पृथ्वीवर्षे लागतात. त्यामुळे टायटनवर ऋतू पृथ्वीपेक्षा खूप हळूहळू बदलतात. दीर्घ काळात ढगांचे स्वरूप, पावसाचे प्रमाण आणि द्रव साठ्यांचे वितरण बदलू शकते. काही भागांत पावसामुळे तयार झालेल्या वाहिन्या दिसतात, तर काही भाग कोरडे आणि विस्तीर्ण आहेत.

टायटनवर आजपर्यंत जीवन आढळल्याचा कोणताही पुरावा नाही. तरीही तेथे मुबलक सेंद्रिय संयुगे, द्रवांचे सक्रिय चक्र आणि पृष्ठभागाखाली द्रवरूप पाण्याचा महासागर असण्याची शक्यता असल्यामुळे हा उपग्रह वैज्ञानिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. भविष्यातील ड्रगनफ्लाय मोहीम टायटनच्या पृष्ठभागावर विविध ठिकाणी जाऊन तेथील रसायनशास्त्र आणि संभाव्य जीवनपूर्व प्रक्रियांचा अधिक सखोल अभ्यास करण्याची अपेक्षा आहे. पृथ्वीवरील नदी आपल्याला पाण्याच्या सामर्थ्याची जाणीव करून देते; टायटनवरील नदी मात्र निसर्गाचे नियम वेगळ्या परिस्थितीत किती विलक्षण रूप धारण करू शकतात हे दाखवते. तिथे पाणी खडकासारखे कठीण आहे, मिथेन पावसाचे रूप घेते आणि त्याच मिथेनच्या प्रवाहांनी दऱ्या व नदीवाहिन्या तयार होतात. पृथ्वीपासून तब्बल कोटयवधी किलोमीटर दूर असलेला टायटन त्यामुळे केवळ शनीचा उपग्रह राहत नाही; तो पृथ्वीच्या परिचित जलचक्राची एका वेगळ्या रसायनशास्त्रात घडलेली अद्भुत, परग्रहावरील आवृत्ती बनतो.

# ऐंशीच्या दशकातील प्रतिमा उत्कट!

इल फोन, इंटरनेट तर दूरच; साधे फोनही दुर्मीळ असलेल्या आणि चाळ-वाडा संस्कृती हेच सर्वसामान्यांचे व्यवच्छेदक लक्षण असलेल्या ऐंशीच्या दशकात आपण कसे दिसत असू, याच्या शोधात सध्या बहुतेक जण गर्क आहेत! कृत्रिम बुद्धिमत्ता — 'एआय' तंत्रज्ञानाच्या मदतीने ऐंशीच्या दशकातील आपली छबी तयार करून घेण्याची आणि ती समाज माध्यमांत शेअर करण्याची अघोषित स्पर्धाच जणू लागली आहे. 'प्रत्यक्षाहून ऐंशीच्या दशकातील प्रतिमा उत्कट', म्हणत विशीतील तरुणांपासून सत्तरीतील ज्येष्ठांपर्यंत अनेक जण त्यात सहभागी होत आहेत. केवळ भारतातच नव्हे, तर जगभर. ऐंशीच्या दशकानंतर जन्माला आलेले 'जेन झी' आणि 'जेन अल्फा' पिढीतील तरुण स्वत:ला त्या दशकातील फॅशनमध्ये पाहत आहेत, तर त्याच्या आधी जन्माला आलेले त्या काळाच्या स्मरणरंजनात रमत आहेत.

तर हा आहे 'रेट्रो इयरबुक ट्रेंड'चा महिमा. 'एआय'द्वारे छायाचित्रे तयार करून ती समाज माध्यमांवर टाकून मिरवण्याची ही नवी लाट आहे. अशा लाटा नव्या नाहीत. दोन वर्षांपूर्वी नव्वदच्या दशकातील छायाचित्रांची आणि गेल्या वर्षी जपानी अ?निमेशन व चित्रशैलीतील छायाचित्रांची लाट होती. या लाटा निर्माण करणे ही 'एआय' कंपन्यांची आणि समाज माध्यमांची गरज असते; कारण त्याद्वारे नवतंत्रज्ञानाचा वापर वाढतो, त्यांना हव्या त्या प्रमाणात माहिती आणि डेटा मिळतो. समाज माध्यमांवरील विविध आशयाचे प्रेक्षक, श्रोते आणि वाचक असणाऱ्या वापरकर्त्यांना गुंतवून ठेवण्यात

बा

यशही मिळते. त्याचबरोबर, छायाचित्र शेअर करण्यास सांगून वापरकर्त्यांनाच आशयनिर्मातेही बनवता येते. शिवाय, 'एआय' कंपन्यांना छायाचित्रांचे कोट्यवधी नमुने मिळतात. चेहरे ओळखण्याच्या तंत्रज्ञानाला अचूक करण्यापासून व व्यक्तींची नेमकी छायाचित्रे तयार करण्यासाठी याचा उपयोग होतो.

थोडक्यात, हा 'डेटा संकलन' आणि 'एआय प्रशिक्षण' यांचा प्रकार आहे. त्यामध्ये स्वाभाविकच 'एआय' प्लॅटफॉर्म आणि समाज माध्यम कंपन्या यांचे अर्थकारण आहे. अशा लाटांत आपण तयार करीत असलेली छायाचित्रे या कंपन्यांसाठी 'कंटेंट' ठरतात. आपल्या 'सेल्फी' त्यांच्यासाठी 'व्हिज्युअल डेटा' असतात; तर 'एआय'ला आपण देत असलेल्या सूचना — 'प्रॉम्प्ट' — त्यांच्यासाठी प्राधान्यक्रम देणारी माहिती असते आणि या





साऱ्यासाठीचा आपला वेळ ही त्यांच्याकरिता 'एंगेजमेंट' ठरते. ऐंशीच्या दशकाच्या 'रेट्रो ट्रेंड'मध्ये आतापर्यंत सुमारे दहा कोटी लोक सहभागी झाल्याचे आणि पन्नास कोटींहून अधिक छायाचित्रे तयार झाली असल्याचा अंदाज अशा 'ट्रेंड्स'चे विश्लेषण करणाऱ्या अभ्यासकांनी वर्तविला आहे.

मात्र, अशा लाटांकडे केवळ व्यावसायिक दृष्टिकोनातून किंवा तंत्रज्ञानाचा आविष्कार म्हणून पाहून चालत नाही. सर्वसामान्यांना गुंतवून ठेवण्याची, त्यांच्यातील उत्सुकता ताणण्याची, त्यांच्या भावनांना साद घालण्याची, स्वत:ला वेगळ्या छबींत वा भूमिकांत पाहण्याच्या त्यांच्या आकांक्षेला फुलवण्याची क्षमता त्यांमध्ये असते. या लाटांमुळे सर्वसामान्यांना गतकाळात डोकावण्याची संधी मिळते; 'गेले ते दिवस,' असे म्हणत स्मरणरंजनाला चालना देता येते. तो काळ न अनुभवलेले आपली कल्पनाशक्ती ताणत स्वत:ला त्या काळात नेतात. तत्कालीन फॅशनमध्ये, कलाकारांच्या, खेळाडूंच्या वा विविध पेशांतील व्यक्तींच्या पेहरावात आपण कसे दिसलो असतो, हे पाहतात. आपले दिसणे, राहणे, पोशाख यांबाबत प्रत्येकाची एक धारणा असते आणि स्वप्नही असते. स्वत:ला उंची कपड्यांत किंवा विशिष्ट पोशाखांत पाहायचे असेल, तर पूर्वी असे कपडे परिधान करावे लागत. आज पोशाख न करताही तशा कपड्यांत स्वत:ला पाहण्याची सोय आहे. वेगवेगळ्या दशकांतील पोशाख किंवा विशिष्ट चित्रशैलीतील प्रतिमा आदींसारख्या लाटांमुळे स्वत:ला वेगवेगळ्या रूपांत पाहता येते. यातून एक आगळा आनंदही अनेकांना मिळतो.

या लाटांत सहभागी होण्याची सक्ती कोणावर नसते; परंतु तंत्रज्ञान सहजपणे उपलब्ध असल्याने आणि लाखो लोक त्याचा वापर करून आपली छबी समाज माध्यमांवरून जगाला दाखवत असल्याने आपणही तसे करावे, अशी भावना बहुतेकांत निर्माण होते. इतके लोक आपली छायाचित्रे तयार करून घेत असतील, तर आपण मागे का राहावे, अशी भूमिकाही यामागे असते. यालाच इंग्रजीमध्ये 'फिअर ऑफ मिसिंग आउट' — 'फोमो' — असे म्हणतात. नवतंत्रज्ञान आणि बड्या कंपन्या अशा प्रकारची मानसिकता घडवतही असतात. अशा लाटांत सहभागी होऊन स्वत:ची छायाचित्रे आणि अन्य माहिती देऊ नका, असे इशारे जाणकार देत असले, तरी लोक त्याकडे दुर्लक्ष करतात, ते या कारणांमुळेच. अशा लाटेत प्रवाहपतितासारखे सहभागी व्हायचे की नाही, हे ज्याचे त्याने ठरवावे, हेच खरे.

# शतायुषी कासव!

कासवाची चालण्याची गती खूपच मंद असते. म्हणून चेंगटपणाने काम करणाऱ्याला 'कूर्मगती' म्हणतात. ही गती इतर प्राण्यांच्या किंवा सशाच्या तुलनेत कमी वाटली तरी कासवाची चिकाटी अफाट असते. ते 'स्लो आण्ड स्टेडी' (मंद पण सतत) चालतच राहते आणि सुस्तावलेल्या सशाबरोबरची शर्यतही जिंकते अशी बोधकथा.

या कासवांचेही दोन प्रकार आहेत. जल-कासव आणि भू-कासव. त्यापैकी जल-कासव म्हणजे टर्टल आणि भूद्कासव म्हणजे टारटाइज. आता ज्ञान-विज्ञान प्रसारामुळे आपल्याला दोन्ही प्रकारचे कासव ठाउढक असतात. आपल्या महाराष्ट्रातील रत्नागिरीमधल्या वेळास गावात दरवर्षी हजारो टर्टल प्रजोत्पादनासाठी डेरा टाकतात. माणसांनी ते पाहण्याचाही महोत्सव केलाय. साधारण एप्रिलमध्ये तो असतो. त्यावेळी तिथल्या कासवांवर सविस्तर लिहिता येईल.




कासवाच्या सर्वच प्रजातींना अमेरिकेत टर्टल अशीच संज्ञा आहे. आपणही केवळ 'कासव' म्हणूनच सर्वांना ओळखतो. परंतु जैविक भेद लक्षात घ्यातला तर टर्टल पाण्यात म्हणजे मुख्यतः समुद्रात आणि सरोवरात राहतात. ते किना?यावर येतात फक्त अंडी घालण्यापुरते. वेळासला तेच घडते. सागरी कासवांचे जथेच तिथे ठराविक काळात अवतरतात.

टारटाइज मात्र वजनदार आणि बहिर्गोल आकाराच्या कठीण कवचाची असतात. आपले पाय आणि डोकं कवचाखाली झाकून ते स्वसंरक्षण करतात. त्यांच्या पायात आपलं बिळ तयार करण्याइतकी शक्ती असते. भू-कासव गवत, नाजूक वेली (विडस) फुले वगैरे आहारावर उपजीविका करतात तर जलकासव छोटे मासे, समुद्री कीटक आणि वनस्पतींवर जगते. भू-कासव बराच काळ जगतात. कमीत कमी ५० आणि जास्तीत जास्त शे-दोनशे वर्षांचे आयुष्य त्यांना लाभते. जल-कासवाला मात्र कमीत कमी वीस ते ऐंशी वर्षांचे आयुर्मान मिळते. जोनाथन हे लॉंगेस्ट लिव्हिंग (दीर्घायुषी) कासव माणसाला माहीत आहे. त्याला या वर्षी १९४ वर्षे पूर्ण झाली आहेत. १८३२ मध्ये त्याचा जन्म झाला. ते नेपोलियनला ठेवलेल्या सेन्ट हेलेना बेटावर राहते. तिथल्या गव्हर्नरच्या घरचा तो शतायुषी सदस्य आहे. वयपरत्वे त्याची दृष्टी मंदावली असून वास घेण्याची क्षमताही कमी झालेली आढळते. जोनाथन २५० किलो वजनाचे असून आकाराने तीन फूट ८ इंच आहे.

# मनोकायिक विकार

टोकाचा आदश 'वाद' अपेक्षांचं ओझं घेऊन येतो आणि हा ताण मनोकायिक विकारांमध्ये दिसू लागतो. मन आणि शरीराने खचत जात मानसिक ताण, नैराश्य, चिंता यांनी व्यक्ती ग्रासून जाते. अर्चना (नाव बदलले आहे) ही अत्यंत संवेदनशील आणि होतकरू अशी लोकप्रिय शिक्षिका होती. एका प्रतिष्ठित अशा शाळेत ती दहाएक वर्षे अध्यापनाच काम करत होती. तिचा प्रत्येक दिवस हा वेगळा आणि चैतन्यमय असायचा. 'अर्चना ही फक्त आदर्श शिक्षिकाच होण्यासाठी जन्माला आली आहे'' असं कौतुकाने तिचे आई-वडील तिच्याबद्दल म्हणत असत. अशा या अर्चनाला काही महिन्यांपासून तीव्र अंगदुखीने आणि अचानक होणाऱ्या सर्दीतापाने ग्रासलं होतं.



शाळेतून आल्यावर किंवा शाळेत जाताना तिला ही तीव्रतेने जाणवे आणि ती मग त्या दिवशी रजा घेई. त्यामुळे तिच्या कामाच्या दांडय़ा भरपूर व्हायला लागल्या होत्या. त्यामुळे तिच्यावर कामाचा ताणही वाढला. हल्ली तिच्या अंगदुखीमध्ये प्रचंड वाढ झाली होतीच त्याचबरोबर हाताचे आणि पायाचे स्नायू दुखणं, नंतर येणारा ताप, रात्रीची झोप कमी आणि वाईट स्वप्ने येणे या लक्षणांमुळे तिच्या डॉक्टरांनी समुपदेशनाचा सल्ला दिला.

'फक्त तुला शारीरिकच तक्रारी आहेत का?'' असं तिला विचारल्यानंतर ती पटकन 'नाही'' असं म्हणाली. 'मला समुपदेशनासाठी यायचंच होतं. मला गेलं वर्ष शाळेकडून भरपूर ताण आहे. मॅनेजमेंट बदलल्यामुळे गोष्टी कठीण झाल्यात. मला अजूनही पे रोलवर घेतलं नाहीये. कामाचा त्रास, त्यात शाळेत होणारं राजकारण आणि सगळ्यांचं बदललेलं वागणं यामुळे मला शाळेत जावंसं वाटत नाही. या गोष्टी घरी सांगितल्या तर बाबांनी खिल्ली उडवली आणि मला म्हणाले फक्त या कारणासाठी समुपदेशन घ्यायची गरज नाही. प्रत्येकाला नोकरीत तडजोडी कराव्या लागतात.'' क्षीण हसत अर्चना म्हणाली. तीच्या या हसण्यात अर्चनाची झालेली मानसिक घालमेल आणि दबलेल्या भावनांमुळे झालेला शारीरिक त्रास जाणवला.

# बहुपत्नीत्वाचे वास्तव

भारतीय मुस्लिम महिला आंदोलन' या संघटनेने केलेल्या 'Brer&king the Silence - Lived Rer&lityed of 2500 Iåian Muslimed Women in Polygamous Marriages' या अभ्यासातून भारतीय मुस्लिम समाजातील बहुपत्नीत्वाच्या वास्तवाकडे गंभीरपणे लक्ष वेधले आहे. एकूण २,५०८ भारतीय मुस्लिम महिलांच्या अनुभवांवर आधारित या सर्वेक्षणात १,४१९ पहिल्या पत्नी आणि १,०८९ दुसऱ्या पत्नींचा समावेश होता. या महिलांच्या अनुभवांतून आर्थिक अवलंबित्व, शिक्षणाचा अभाव, वैवाहिक नात्यातील गुप्तता, महत्त्वाच्या दस्तऐवजांवरील नियंत्रणाचा अभाव आणि मुलांच्या संगोपनाची जबाबदारी यांचे गुंतागुंतीचे चित्र समोर येते.

या सर्वेक्षणातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे महिलांना स्वतःच्या वैवाहिक अधिकारांविषयी असलेली मर्यादित माहिती. तब्बल २,०७९ महिलांनी, म्हणजे सुमारे ८३ टक्के महिलांनी, आपला निकाहनामा कधीच वाचला नव्हता. त्यात १,१८६ पहिल्या पत्नी आणि ८९३ दुसऱ्या पत्नींचा समावेश होता. निकाहनाम्यासारख्या महत्त्वाच्या दस्तऐवजाचे नियंत्रणही अनेक महिलांच्या हातात नव्हते. ३८ टक्के महिलांना त्यांचा निकाहनामा कुठे आहे, हेही माहिती नव्हते, तर केवळ २७ टक्के महिलांकडे हा दस्तऐवज त्यांच्या स्वतःच्या ताब्यात होता.

दुसऱ्या विवाहाच्या प्रक्रियेतही गुप्तता आणि दिशाभूल झाल्याचे सर्वेक्षणातून दिसते. जवळपास ३२ टक्के दुसऱ्या पत्नींना पतीच्या आधीच्या विवाहाबाबत माहिती नव्हती किंवा त्यांची दिशाभूल करण्यात आली होती. पहिल्या पत्नींपैकी तब्बल ८५ टक्के महिलांना पतीच्या दुसऱ्या विवाहाची माहिती थेट पतीकडून मिळाली नव्हती. दुसऱ्या पत्नींपैकी ३९.६ टक्के महिलांनी प्रेमसंबंधामुळे विवाह स्वीकारल्याचे सांगितले, तर ३९.४ टक्के महिलांनी कौटुंबिक दबावामुळे विवाह केला. ११.४ टक्के महिलांनी पुरुषाने विवाहासाठी जबरदस्ती केल्याचे सांगितले.

पुरुषांनी दुसऱ्या विवाहासाठी दिलेली कारणेही विचार करण्यासारखी आहेत. ४३ टक्के महिलांना पतीने त्यांच्यावर प्रेम नसल्याचे कारण सांगितले, तर ३९.७ टक्के महिलांना धर्मात चार पत्नी ठेवण्याचा अधिकार असल्याचे सांगण्यात आले. काही प्रकरणांत पहिल्या पत्नीवर प्रेम नसणे, ती अपत्यप्राप्तीस असमर्थ असणे, तिचा स्वभाव, आजारपण किंवा मुलगा नसणे अशी कारणे देण्यात आली. १२.८ टक्के महिलांना तर पुरुषाने स्वतःचा घटस्फोट झाला असल्याचे खोटे सांगितले होते.

दुसऱ्या विवाहाचा परिणाम पहिल्या पत्नीच्या संपूर्ण आयुष्यावर होतो. १,४१९ पहिल्या पत्नींपैकी ६६७ महिला, म्हणजे ४७ टक्के महिला, माहेरी राहायला गेल्या. ३१.४ टक्के महिला त्याच घरात राहिल्या. सर्वेक्षणानुसार ५४ टक्के महिलांनी पती आता त्यांच्यासोबत राहत नसल्याचे सांगितले. दुसरा विवाह हा केवळ पतीचा आणखी एक वैवाहिक निर्णय राहत नाही. त्यासोबत पहिल्या पत्नीच्या घरातील स्थान, आर्थिक सुरक्षितता आणि भविष्याबाबतची निश्चितता यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. याचा परिणाम मानसिक आणि शारीरिक आरोग्यावरही झाल्याचे आकडेवारी दर्शवते. ४५.३ टक्के पहिल्या पत्नींनी झोप न लागणे किंवा झोपेच्या समस्या असल्याचे सांगितले. मानसिक आरोग्याशी संबंधित प्रश्नांमध्ये ५८.३ टक्के पहिल्या पत्नींनी निद्रानाशाचा अनुभव नोंदवला. ३६.२ टक्के महिलांनी नैराश्याची समस्या असल्याचे सांगितले, तर २९ टक्के महिलांना असहाय्य वाटत असल्याची नोंद झाली. सर्वांत गंभीर बाब म्हणजे ८.४ टक्के पहिल्या पत्नींनी आत्महत्येचे विचार अनुभवल्याचे सांगितले.





मुकुल रणभोर

या संघर्षाची किंमत पुढील पिढीलाही मोजावी लागते. पहिल्या पत्नीच्या मुलांमध्ये दुःख ही सर्वांत सामान्य प्रतिक्रिया होती. १,४१९ महिलांपैकी ७२५ महिलांनी, म्हणजे ५१.१ टक्के महिलांनी, आपल्या मुलांना दुःख झाल्याचे सांगितले. काही मुलांमध्ये राग आणि भीतीची भावना दिसून आली, तर काहींच्या शालेय उपस्थितीवर आणि शिक्षणावरही परिणाम झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. म्हणजे बहुपत्नीत्वाचा प्रश्न केवळ दोन पत्नी आणि एका पतीच्या नात्यापुरता मर्यादित राहत नाही. घरातील विश्वास तुटला, सुरक्षिततेची भावना कमी झाली आणि आर्थिक व भावनिक आधार डळमळीत झाला, की त्याचे परिणाम स्त्रीच्या मनावर, शरीरावर आणि मुलांच्या भावविश्वावर उमटतात.

या पार्श्वभूमीवर मोठा प्रश्न उपस्थित होतो - भारतीय मुस्लिम समाजातील प्रबोधनाचा मुद्दा आपल्या राजकीय आणि सामाजिक अजेंड्यावर केव्हा येणार? हिंदू समाजातील स्त्रियांची परिस्थिती आज पूर्णतः आदर्श आहे, असा दावा करता येणार नाही. स्त्रियांवरील अन्याय आजही आहे. पण गेल्या दोन शतकांतील सामाजिक सुधारणा चळवळींनी स्त्रीच्या अधिकारांविषयी वैचारिक वातावरण निर्माण केले. त्या प्रबोधनामुळे आज अनेक स्त्रियांमध्ये अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची आणि गरज पडल्यास न्यायालयाची पायरी चढण्याची हिंमत निर्माण झाली आहे.

मुस्लिम समाजातही सुधारक विचारवंत झाले. हमीद दलवाई यांचे नाव या संदर्भात विशेष महत्त्वाचे आहे. पण मुस्लिम समाजातील प्रबोधनाला व्यापक सामाजिक चळवळीचे स्वरूप देण्यासाठी पुरेसे प्रयत्न झाले का? इतर समाजातील सुधारकांना राष्ट्रीय स्तरावर सामाजिक परिवर्तनाचे प्रतीक म्हणून स्वीकारण्यात आले; त्याच पद्धतीने मुस्लिम समाजातील सुधारक विचारवंतांना मुख्य प्रवाहात स्थान मिळाले का?

राजकीय पक्षांची भूमिकाही येथे तपासावी लागेल. काँग्रेसने स्वातंत्र्यानंतर दीर्घकाळ अल्पसंख्याकांच्या हिताच्या रक्षणाचे राजकारण केले. पण अल्पसंख्याक समाजाला आधुनिक, प्रगतिशील आणि सामाजिक सुधारणांच्या प्रवाहात आणण्याची जबाबदारी कोणाची होती? अल्पसंख्याकांच्या हिताचे संरक्षण म्हणजे केवळ धार्मिक नेतृत्वाच्या राजकीय अपेक्षा पूर्ण करणे नव्हे. त्या समाजातील महिलांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि समान अधिकार मिळावेत, यासाठी राजकीय व सामाजिक नेतृत्वानेही प्रयत्न करणे अपेक्षित होते.शाह बानो प्रकरणात इतिहासाने काँग्रेसला महिलांच्या अधिकारांच्या बाजूने ठाम उभे राहण्याची संधी दिली होती. पण राजीव गांधी सरकारने लोकसभेतील बहुमताचा वापर करून कायद्यात बदल केला आणि मुस्लिम मूलतत्त्ववाद्यांची बाजू घेतल्याची टीका आजही होते. आज राहुल गांधी पितृसत्ताक विचारसरणी मोडून काढण्याची भाषा करतात. मग प्रश्न विचारला पाहिजे - 'एर्सेप् ूप ईैंग्म्प्ब'मध्ये या मुस्लिम महिलांचा समावेश आहे का? केंद्र सरकारने तिहेरी तलाकविरोधी कायदा केला तेव्हा काँग्रेसने त्या कायद्याला विरोध का केला, असा प्रश्न मुस्लिम महिलांनीही उपस्थित केला आहे.

# ब्रोकोली वजन करते कमी



वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी आहारात पौष्टिक आणि कमी कॅलरी असलेल्या पदार्थांचा समावेश करणे महत्त्वाचे असते. अशा पदार्थांमध्ये ब्रोकोलीचा समावेश केला जातो. ब्रोकोलीमध्ये फायबर आणि प्रथिने असण्यासोबतच विविध जीवनसत्त्वे आणि खनिजे आढळतात. फायबरमुळे पोट जास्त वेळ भरल्यासारखे वाटण्यास मदत होऊ शकते.

अमेरिकेच्या कृषी विभागाच्या माहितीनुसार, १०० ग्रॅम कच्च्या ब्रोकोलीमध्ये सुमारे ३४ किलोकॅलरी ऊर्जा, २.८२ ग्रॅम प्रथिने आणि २.६ ग्रॅम फायबर असते. त्यामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम, व्हिटॅमिन सी, फोलेट आणि व्हिटॅमिन के यांसारखी पोषकद्रव्येही असतात.

ब्रोकोली खाण्याचा एक सोपा मार्ग म्हणजे ती काही मिनिटे वाफवून घेणे. त्यावर लिंबाचा रस, थोडे मीठ आणि काळी मिरी घालून खाता येते. तेलाचे प्रमाण मर्यादित ठेवणे फायदेशीर ठरू शकते.

रात्रीचे जेवण हलके ठेवायचे असल्यास ब्रोकोलीचे सूपही करता येते. यासाठी कांदा, लसूण आणि ब्रोकोली हलकी परतून त्यात पाणी किंवा व्हेजिटेबल स्टॉक घालून शिजवावे. त्याची प्युरी करून त्यात आवश्यकतेनुसार मसाले घालता येतात.


ब्रोकोलीचे सॅलड हादेखील एक चांगला पर्याय आहे. वाफवलेली ब्रोकोली, काकडी, गाजर, कांदा यामध्ये लिंबाचा रस, दही, काळी मिरी आणि थोडे भाजलेले बदाम-अक्रोड घालता येतात.

याशिवाय लसूण, आले आणि थोड्या तेलात ब्रोकोली स्टिर-फ्राय करूनही खाता येते. मात्र वजन कमी करण्यासाठी केवळ ब्रोकोलीवर अवलंबून राहण्याऐवजी संतुलित आहार, योग्य प्रमाणात कॅलरी आणि नियमित शारीरिक हालचाल यांचा समावेश करणे महत्त्वाचे आहे.

# जेवल्यानंतर लगेच शौचास होते?

अनेकदा जेवण पूर्ण झाल्यानंतर लगेचच शौचास किंवा टॉयलेटला जाण्याची तीव्र भावना होणे, ही एक अशी समस्या आहे ज्याचा अनुभव बऱ्याच व्यक्तींना दैनंदिन जीवनात येतो. काही लोकांच्या बाबतीत ही गोष्ट कधीतरीच घडते विशेषतः जेव्हा त्यांनी खूप जास्त प्रमाणात अन्न खाल्ले असेल किंवा खूप मसालेदार आणि तिखट अन्नाचे सेवन केले असेल. ही भावना जर तुमच्या बाबतीत अधूनमधून होण्याऐवजी अत्यंत वारंवार होऊ लागली असेल, तर ही एक चिंताजनक बाब ठरू शकते. जेव्हा जेवल्याबरोबर लगेचच टॉयलेटला पळण्याची ही तीव्र इच्छा नियमित स्वरूपात होऊ लागते आणि त्यासोबतच पोटात सातत्याने वेदना होणे, पोट फुगल्यासारखे वाटणे, जुलाब होणे, बद्धकोष्ठतेचा त्रास होणे किंवा शौचाच्या सवयींमध्ये अचानक आणि मोठे बदल घडून येणे अशी विविध लक्षणे दिसू लागतात, तेव्हा हे केवळ साधे पचन बिघडणे नसून पचनसंस्थेशी संबंधित एका गंभीर समस्येचे संकेत असू शकतात.

वैद्यकीय भाषेत या स्थितीला 'इरिटेबल बाऊल सिंड्रोम' म्हणजेच घ्एं असे म्हटले जाते. पचनसंस्थेच्या इतर अनेक आजारांमध्ये आतड्यांना प्रत्यक्ष सूज येणे, जखमा होणे किंवा आतड्यांची रचना खराब होणे असे बदल दिसून येतात. परंतु, आयबीएसच्या बाबतीत अशी कोणतीही दृश्यमान सूज किंवा शारीरिक नुकसान आतड्यांमध्ये दिसत नाही. म्हणूनच वैद्यकीय शास्त्रात आयबीएसचे वर्गीकरण 'गट-ब्रेन इंटरॲक्शन' मधील बिघाड किंवा विकार म्हणून केले जाते. याचा सरळ अर्थ असा होतो की, आपला मेंदू आणि आपले आतडे यांच्यातील आपसातील संवाद आणि संदेशवहनाची प्रक्रिया जेव्हा विस्कळीत होते, तेव्हा आतड्यांची हालचाल आणि त्यांची संवेदनशीलता प्रभावित होते. परिणामी, रुग्णाला अत्यंत अस्वस्थ करणाऱ्या पचनाच्या समस्यांना तोंड द्यावे लागते.




जेवणानंतर लगेच शौचास जाण्याची इच्छा का होते?

गॅस्ट्रोकोलिक रिफ्लिक्सची प्रक्रिया : जेव्हा आपण अन्न खातो, तेव्हा ते अन्न पोटात जाते आणि पोटाचे स्नायू ताणले जातात. या ताणामुळे शरीरात एक नैसर्गिक मज्जासंस्थेची प्रक्रिया सुरू होते, ज्याला वैद्यकीय भाषेत 'गॅस्ट्रोकोलिक रिफ्लिक्स' म्हटले जाते.

जेव्हा पोट ताणले जाते, तेव्हा मेंदूकडून मोठ्या आतड्याला असा संदेश पाठवला जातो की वरून नवीन अन्न येत आहे, त्यामुळे आतड्याने आपली हालचाल वाढवून आधीच्या अन्नासाठी जागा तयार करावी.

सर्वसामान्य व्यक्तींमध्ये ही प्रक्रिया शांतपणे घडते, पण ज्या व्यक्तींना आयबीएस चा त्रास असतो, त्यांच्यामध्ये हा 'गॅस्ट्रोकोलिक रिफ्लिक्स' अतिशय तीव्र आणि अत्यंत संवेदनक्षम बनतो. त्यांच्या आतड्यांचे स्नायू ताणले जाण्याविषयी अतिसंवेदनशील असतात, ज्यामुळे अन्न खाल्ल्याबरोबर मोठ्या आतड्यात तीव्र आकुंचन पावण्याची क्रिया घडून येते आणि रुग्णाला लगेचच टॉयलेटला जाण्याची अत्यंत घाई आणि तीव्र गरज भासू लागते.?

### आधीचे अन्न पुढे ढकलणे

म्हणूनच, जे अन्न तुम्ही आत्ताच खाल्ले आहे ते लगेच बाहेर पडत नाही, तर या रिफ्लिक्स ामुळे मोठ्या आतड्यात आधीपासून साचलेले शौच किंवा अन्न पुढे ढकलले जाते.

केवळ जेवणानंतर शौचास जाण्याची इच्छा होणे म्हणजे एखाद्या व्यक्तीला आयबीएस आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. आयबीएसचे निदान होण्यासाठी इतरही अनेक लक्षणांची उपस्थिती आणि ठराविक स्वरूप असणे आवश्यक असते.

# स्वयंपाकघराले १ पान झुरळांना



घरात फरशीवर इकडे - तिकडे सतत फिरणारी झुरळं दिसू लागली की आपल्याला अगदी किळसवाणे वाटते. घरातील झुरळांचा वावर पाहून नकोसे होते,कधी ही सगळी झुरळं घराच्या कानाकोपऱ्यातून घराबाहेर कायमची जातील असं आपल्याला वाटत... घर कितीही स्वच्छ ठेवलं तरी अचानक घरात झुरळं दिसून लागली की सगळ्यांचीच धावपळ उडते... रात्रीच्या वेळी त्यांचा वावर अधिक जाणवतो आणि एकदा त्यांनी घरात जागा केली की त्यांना पूर्णपणे दूर करणंही सहजासहजी शक्य होत नाही. आपल्या घरात सतत दिसणाऱ्या या झुरळांना घराबाहेर काढण्यासाठी आपण काही ना काही एकचठोस उपाय शोधत असता घरातील झुरळांना घराबाहेर काढण्यासाठी आपण महागडी केमिकल्युक्त औषधे आणि स्प्रे ची फवारणी करतो, परंतु कित्येकदा असे उपाय केल्यानंतरही ते तात्पुरते परिणाम दाखवतात आणि पुन्हा थोड्या दिवसांनी तीच परिस्थिती असते. अशावेळी घरातील झुरळांना घराबाहेर घालवण्यासाठी एकच कायमचा ठोस उपाय असावा असं आपल्याला वाटत... झुरळांच्या या त्रासापासून सुटका मिळवण्यासाठी आपल्याला कसलेही विषारी केमिकल वापरण्याची गरज नाही, तर स्वयंपाकघरातील फक्त 'एक पान' पुरेसे आहे! हे एक साधे पान वापरूनही आपण घरातील लपलेली सर्व झुरळं चटकन पळवून लावू शकता.

पण यासाठी नेमकं काय वापरायचं? घरात सहज उपलब्ध असलेल्या )एका पानाचा वापर करून झुरळं लपलेल्या जागांपासून कशी दूर ठेवता येतील आणि ही ट्रिक नेमकी कशी करायची? ते पाहूयात...

जर तुम्हाला झुरळांना घरापासून दूर ठेवायचं असेल, तर सुकलेल्या तमालपत्राचा वापर करता येतो. सुकलेल्या तमालपत्राचा तीव्र सुगंध झुरळांना अजिबात आवडत नाही त्यामुळे त्यांचा वावर असलेल्या ठिकाणी तमालपत्र ठेवल्यास त्यांना त्या जागेपासून दूर ठेवण्यास मदत होऊ शकते. तमालपत्र कुटल्यावर त्यातील सुगंधी तेल बाहेर येत असल्याने तमालपत्राचा उग्र वास अधिक जाणवतो. हा उग्र वास झुरळांना अजिबात आवडत नाही त्यामुळे ते त्या भागापासून दूर पळतात.

घरातील झुरळांना पळवून लावण्यासाठी तमालपत्राचा वापर कसा करावा ?

## दालचिनीचे पाणी

वाढते वजन आणि बदललेली जीवनशैली यामुळे अनेकजण नैसर्गिक उपायांकडे वळतात. त्यामध्ये दालचिनीच्या पाण्याचाही समावेश आहे. दालचिनीमध्ये सिनामल्डिहाइड आणि पॉलीफेनॉलसारखी संयुगे आढळतात. त्यामुळे दालचिनीचा आहारातील मर्यादित वापर आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.वजन कमी करण्यासाठी दालचिनी ही फारच महत्त्वाची मानली जाते. रक्तातील साखर आणि वजन कमी करण्यासाठी दालचिनीच्या पाण्याचा वापर केला जातो. मात्र, दालचिनीचे पाणी प्यायल्याने थेट वजन कमी होते किंवा मधुमेह नियंत्रणात येतो, असे ठामपणे म्हणता येत नाही. वजन नियंत्रणासाठी आहार, व्यायाम आणि जीवनशैलीतील बदल अधिक महत्त्वाचे आहेत.दालचिनीचे पाणी तयार करण्यासाठी एका दालचिनीच्या काडीसोबत १/४ चमचा मेथीचे दाणे आणि ३ ते ४ तुळशीची पाने दीड कप पाण्यात १० ते १२ मिनिटे उकळू शकता. त्यानंतर हे पाणी गाळून कोमट किंवा थंड करून घेता येते.वजन व्यवस्थापनासाठी दालचिनी, सुंठ आणि काळी मिरी यांचा वापर करण्याचेही काही घरगुती उपाय सांगितले जातात. मात्र, दालचिनीचे अतिसेवन टाळणे महत्त्वाचे आहे. विशेषतः मधुमेहाची औषधे घेणाऱ्या व्यक्तींनी अशा उपायांचा नियमित वापर करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.



# फोडणीतला कडीपत्ता फक्त पदार्थ नाही केसही करतो सुंदर!

'केस' म्हटलं की केसांशी संबंधित अनेक समस्या ओघाने आल्याचं... आपल्यापैकी अनेकींना केसांच्या एक नाही तर अनेक समस्या सतावतात. केसगळती, केसांत कोंडा होणे, केस दुभंगणे, केसांची वाढ खुंटणे अशा बऱ्याच समस्या असतात. केसांशी संबंधित या समस्या कमी करून केस मजबूत, लांबसडक आणि घनदाट व्हावेतअशी अनेकींची इच्छा असते. केसांच्या समस्या कमी करण्यासाठी आपण अनेक उपाय करतो यातही घरगुती उपायांमध्ये कडीपत्ता म्हणजे केसांसाठी वरदानच..फोडणीचा स्वाद वाढवणारा कडीपत्ता फक्त जेवणाची चवच वाढवत नाही, तर केसांसाठी फारच गुणकारी मानला जातो. कडीपत्त्याच्या पानांचा योग्य पद्धतीने केसांच्या केअर रुटीनमध्ये समावेश केल्यास केसांचे आरोग्य व सौंदर्य टिकवण्यासाठी त्याची मदत होते. रोजच्या स्वयंपाकात फोडणीची चव आणि सुगंध वाढवणारा हा साधासुधा कडीपत्ता केसांच्या सौंदर्यासाठीही उपयोगी ठरू शकतो. केसांसाठी कडीपत्त्याच्या पानांचा वापर नेमका कसा करायचा ते पाहूयात... आजच्या या धावपळीच्या लाईफस्टाइलमध्ये तासंतास डोक्याला तेल लावणे किंवा किचकट हेअर मास्क लावण्याइतका वेळ कोणाकडेच नसतो. म्हणूनच, केसांचे आरोग्य आणि सौंदर्य सुधारण्याचा एक अगदी सोपा आणि नवीन ट्रेंड सध्या तुफान लोकप्रिय होत आहे.



# टोमॅटोच्या बिया खाल्ल्याने मुतखडा होतो?

आहार आणि आरोग्याबाबत अनेकदा वेगवेगळ्या घटकांबद्दल समाजात अनेक गैरसमज पसरलेले असतात. असाच एक मोठा गैरसमज म्हणजे टोमॅटो खाल्ल्याने मुतखडा किंवा किडनी स्टोन होतो. ज्या लोकांना मुतखड्याचा त्रास आहे किंवा जे लोक या समस्येपासून बचाव करू इच्छितात, ते बऱ्याचदा आपल्या आहारातून टोमॅटो पूर्णपणे वगळतात. टोमॅटोमधील 'ऑक्झलेट' या घटकामुळे आणि मुख्यत्वे टोमॅटोच्या बियांमुळे मुतखड्याची निर्मिती होते, असा एक दृढ समज लोकांमध्ये पाहायला मिळतो. सामान्यतः, केवळ टोमॅटोमध्ये ऑक्झलेट असते म्हणून बहुतांश लोकांनी आहारातून टोमॅटो पूर्णपणे बंद करण्याची अजिबात गरज नसते. किडनी स्टोन होण्याच्या प्रक्रियेवर




केवळ एखादा घटक परिणाम करत नाही, तर त्यामागे अनेक वेगवेगळे शारीरिक आणि आहाराशी संबंधित घटक कारणीभूत असतात. यामध्ये व्यक्तीच्या शरीरातील द्रवपदार्थांचे प्रमाण , लघवीतील कॅल्शियम आणि ऑक्झलेटची पातळी, आहारातील मिठाचे प्रमाण, मुतखड्याचा विशिष्ट प्रकार, अनुवांशिकता आणि आरोग्याशी संबंधित इतर वैद्यकीय परिस्थिती यांचा समावेश होतो. त्यामुळे इतर सर्व घटकांकडे दुर्लक्ष करून केवळ एकाच अन्नपदार्थाला (उदा. टोमॅटो) दोष देणे हे मुतखडा होण्याच्या मूळ कारणांचे चुकीचे आणि दिशाभूल करणारे चित्र उभे करते.

टोमॅटोमध्ये 'ऑक्झलेट' नावाचे नैसर्गिक घटक असतात, जे वनस्पतींपासून मिळणाऱ्या अनेक खाद्यपदार्थांमध्ये आढळतात. ज्या व्यक्तींना 'कॅल्शियम ऑक्झलेट' प्रकारचे मुतखडे होण्याची प्रवृत्ती असते, त्यांच्या आहारातील अतिरिक्त ऑक्झलेट लघवीतील ऑक्झलेटचे प्रमाण वाढवण्यास कारणीभूत ठरू शकते. परंतु, याचा अर्थ असा अजिबात नाही की ऑक्झलेट असलेला प्रत्येक पदार्थ आहारातून काढून टाकला पाहिजे. इतर अनेक नियमित खाल्ल्या जाणाऱ्या पदार्थांच्या तुलनेत टोमॅटोमध्ये ऑक्झलेटचे प्रमाण अत्यंत मध्यम किंवा कमी असते. बहुतांश लोकांसाठी, संतुलित आहाराचा एक भाग म्हणून ताज्या टोमॅटोचे सामान्य प्रमाणात सेवन करणे हा मुतखडा होण्यामागील निर्णायक किंवा मुख्य कारण ठरू शकत नाही. टोमॅटो खाण्यापेक्षा व्यक्तीचा एकूण आहार कसा आहे हे जास्त महत्त्वाचे असते. उदाहरणार्थ, जो माणूस अतिशय कमी पाणी पितो, जास्त मीठ असलेला आहार घेतो आणि सातत्याने प्रक्रिया केलेले पदार्थ खातो, त्याला नेहमी टोमॅटो खाणाऱ्या सामान्य व्यक्तीपेक्षा मुतखडा होण्याचा धोका कितीतरी पटीने जास्त असतो.

# तारणहार चॅट जीटीपी

गणेशोत्सवात घरोघरी लाडक्या बाप्पाचे आगमन होते. मुंबई आणि आसपासच्या उपनगर आणि परिसरात बाप्पाच्या पूजेसाठी भटजी मिळणे कठीण होऊन बसते. या समस्येवर एका भाविकाने नामी शक्कल लढवली आहे. या पठ्ठ्याने गणपतीच्या पूजेसाठी चक्क चॅट जीटीपीचा आधार घेतला आहे. हा तरुण आपला मोबाईल सुरु करून चॅट जीपीटीला गणेश पूजा कशी करायची याची विनंती करतो.




चॅट जीपीटी त्या तरुणाला मराठी भाषेमध्ये आचमन करायला लावतो. चॅट जीटीपी ज्या प्रकारे मार्गदर्शन करतो त्याप्रमाणे हा तरुण तसे करतोय. या व्हिडिओवर एकाने कमेंट केलीय कि, 'पूजा पूर्ण करण्यासाठी पटकन रिचार्ज करा अशा भन्नाट कमेंट्स केल्या आहेत.

# सकाळी उठताच हृदयाची धडधड जास्त होते?

सकाळी झोपेतून जागं होताच काही वेळासाठी हृदयाची धडधड अचानक वाढल्याचा अनुभव अनेकांना येतो. अशावेळी 'काही गंभीर तर नाही ना?' अशी चिंता वाटणं साहजिक आहे. मात्र, प्रत्येक वेळी हृदयाची धडधड वाढणं म्हणजे हृदयाशी संबंधित आजार असेलच असं नाही. शरीरात सकाळच्या वेळी होणारे काही नैसर्गिक बदल, पाण्याची कमतरता, ताण-तणाव किंवा कॅफिनचं सेवन यामुळेदेखील असं होऊ शकतं. तज्ज्ञांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. त्यांच्या मते, सकाळी उठल्यानंतर धडधड काही वेळाने आपोआप सामान्य होत असेल तर अनेकदा घाबरण्याचं कारण नसतं. मात्र, ही समस्या वारंवार होत असेल, बराच वेळ टिकत असेल किंवा इतर लक्षणांसोबत जाणवत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये.


**सकाळी उठताना हृदयाची धडधड का वाढू शकते?**

**१. झोपेतून जागं होताना शरीरात होतात बदल**

झोपेत असताना शरीर विश्रांतीच्या अवस्थेत असतं. जागं झाल्यानंतर शरीर हळूहळू सक्रिय अवस्थेत येतं. या काळात हार्मोन्स आणि मज्जासंस्थेच्या कार्यात बदल होतात. सकाळच्या वेळी कॉर्टिसोलसारख्या हार्मोन्सची पातळी वाढते. बिछान्यावरून उठताना रक्तदाब आणि रक्ताभिसरण सुरळीत ठेवण्यासाठी काही काळ हृदयाची गती वाढू शकते. त्यामुळे काही वेळ धडधड जाणवणं सामान्य असू शकतं.

**२. शरीरात पाण्याची कमतरता**

रात्रभर आपण पाणी पीत नाही. त्यातच श्वासोच्छवास आणि घामामुळे शरीरातील द्रवपदार्थ कमी होऊ शकतात. यामुळे शरीरातील रक्ताचं प्रमाण काही प्रमाणात कमी होऊ शकतं. रक्ताभिसरण व्यवस्थित ठेवण्यासाठी हृदयाला थोडं वेगाने काम करावं लागू शकतं आणि त्यामुळे सकाळी धडधड जाणवू शकते.



**३. ताण, चिंता आणि अपुरी झोप**

झोप पूर्ण झाली नसेल किंवा मनावर ताण असेल, तर सकाळी उठल्यावर हृदयाची धडधड वाढल्यासारखी वाटू शकते. तणावाच्या वेळी शरीरातील 'सिम्पेथेटिक नर्व्हस सिस्टिम' सक्रिय होते. त्यामुळे हृदयाची गती वाढू शकते.

**४. चहा-कॉफी किंवा कॅफिनचं जास्त सेवन**

चहा, कॉफी, एनर्जी ड्रिंक्स यांसारख्या पदार्थांमध्ये कॅफिन असतं. काही व्यक्तींमध्ये कॅफिनमुळे हृदयाची धडधड वाढू शकते. रात्री उशिरापर्यंत कॅफिनचं सेवन केल्यास झोपेवर परिणाम होऊन दुसऱ्या दिवशीही धडधड जाणवू शकते.

**५. थायरॉईड किंवा हृदयाच्या ठोक्यांमधील अनियमितता**

काही वेळा सकाळी वारंवार होणारी धडधड एखाद्या वैद्यकीय समस्येचं लक्षणही असू शकते.

थायरॉईड हार्मोन्सची पातळी जास्त असल्यास शरीरातील अनेक प्रक्रिया वेगाने होतात आणि हृदयाचे ठोके वाढू शकतात. यासोबत वजन कमी होणं, जास्त घाम येणं, हात थरथरणं, अस्वस्थता किंवा नेहमीपेक्षा जास्त गरम वाटणं अशी लक्षणं दिसू शकतात. याशिवाय काही व्यक्तींमध्ये हृदयाची लय अनियमित होऊ शकते. याला ॲरिदमिया म्हणतात. अशावेळी हृदय खूप वेगाने किंवा अनियमित ठोके देऊ शकतं.

त्यामुळे वारंवार होणाऱ्या धडधडीचं कारण स्वतःहून फक्त ताण किंवा कमजोरी आहे, असं मानणं योग्य नाही.

**'ही' लक्षणं दिसली तर धडधडीकडे दुर्लक्ष करू नका**

प्रत्येक वेळी हृदयाची धडधड वाढणं गंभीर असेलच असं नाही. मात्र, त्यासोबत खालीलपैकी लक्षणं जाणवत असतील तर तातडीने वैद्यकीय मदत घेणं महत्त्वाचं आहे—

छातीत दुखणं किंवा दडपण जाणवणं, श्वास घेण्यास त्रास होण, चक्कर येणं किंवा बेशुद्ध पडणं, हृदयाची धडधड खूप वेगाने किंवा अनियमित होणं, सकाळी वारंवार अशीच धडधड होणं, धडधड बराच वेळ कमी न होणं.

**सकाळी धडधड जाणवली तर काय कराल?**

अचानक धडधड जाणवली तर लगेच घाबरू नका. काही मिनिटं शांतपणे बसा आणि हळूहळू दीर्घ श्वास घ्या. धडधड नियमित आहे की अनियमित, याकडे लक्ष द्या. बिछान्यावरून अचानक उठण्याऐवजी हळूहळू उठणं चांगलं. दिवसभर पुरेसं पाणी प्या आणि नियमित झोप घेण्याचा प्रयत्न करा. चहा, कॉफी किंवा एनर्जी ड्रिंक्सचं सेवन जास्त असल्यास ते कमी करण्याकडे लक्ष द्या. मात्र, धडधड वारंवार होत असेल तर केवळ घरगुती उपायांवर अवलंबून न राहता डॉक्टरांचा सल्ला घेऊन आवश्यक तपासणी करून घेणं महत्त्वाचं आहे.

सकाळी उठताच काही काळ हृदयाची धडधड वाढणं नेहमीच हृदयविकाराचं लक्षण नसतं. झोपेतून जागं होताना शरीरातील नैसर्गिक बदल, पाण्याची कमतरता, ताण-तणाव, अपुरी झोप किंवा कॅफिन यामुळेही असं होऊ शकतं. मात्र, धडधड वारंवार होत असेल, बराच वेळ टिकत असेल किंवा त्यासोबत छातीत दुखणं, श्वास घेण्यास त्रास, चक्कर किंवा बेशुद्धी यांसारखी लक्षणं दिसत असतील, तर वैद्यकीय तपासणी करून घेणं आवश्यक आहे.

# डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व

**अलीकडेच भारताने डिजिटल क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये एक एतिहासिक पाऊल टाकले. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.**

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एके काळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने जगाला यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचे एक अद्वितीय मॉडेल दिले. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.

या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ?प्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता रहात नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अनेकदा आपण एटीएम कार्ड घरी विसरतो किंवा ते पाकिटासह हरवते. अशा वेळी अचानक पैशांची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. कार्डलेस एटीएममुळे ही समस्या पूर्णपणे दूर होते.



आज बहुतांश लोकांकडे स्मार्टफोन असतो आणि त्यावर यूपीआय ॲप्स सक्रिय असतो. त्यामुळे केवळ मोबाईलच्या सहाय्याने पैसे काढणे शक्य होते. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये एटीएम स्किमिंग, कार्ड क्लोनिंग आणि डेटा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. काही गुन्हेगार एटीएममध्ये गुप्त उपकरणे बसवून कार्डची माहिती चोरत आणि त्याद्वारे बनावट कार्ड तयार करत. परिणामी ग्राहकांच्या खात्यातील पैसे लुटले जात. कार्डलेस व्यवहारांमध्ये कार्डच वापरले जात नसल्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात आळा बसतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित बनतात.

आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. अनेकदा वयोमानानुसार एटीएम कार्ड हाताळणे, कार्डचा पासवर्ड लक्षात ठेवणे किंवा मशीनमध्ये कार्ड योग्य प्रकारे वापरणे कठीण जाते. मोबाईलवरील परिचित यूपीआय ॲप्स वापरून व्यवहार करणे तुलनेने सोपे वाटू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे.

पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्ड सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात.

विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय ॲप्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते.

डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना अधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा वापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील.

# एआय आखणार भौतिकशास्त्रातील प्रयोग

**भौतिकशास्त्रात एखादा प्रयोग उभा करणे म्हणजे केवळ उपकरणे एकत्र जोडणे नव्हे. कोणते घटक वापरायचे, त्यांची मांडणी कशी असावी, कोणते मोजमाप घ्यायचे आणि त्यातून नेमकी कोणती माहिती मिळवायची, याचा विचार करावा लागतो. आतापर्यंत ही प्रक्रिया प्रामुख्याने वैज्ञानिकांच्या अनुभव, गणिती ज्ञान आणि कल्पकतेवर अवलंबून होती. मात्र आता कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय या प्रक्रियेत नवी भूमिका बजावत आहे. 'नेचर'मध्ये २ सप्टेंबरला प्रकाशित झालेल्या लेखात एआयच्या मदतीने भौतिकशास्त्रीय प्रयोगांची रचना करण्याच्या या नव्या दिशेचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे.**

**प्रसाद ताम्हणकर**

भौतिकशास्त्रात एखादा प्रयोग उभा करणे म्हणजे केवळ उपकरणे एकत्र जोडणे नव्हे. कोणते घटक वापरायचे, त्यांची मांडणी कशी असावी, कोणते मोजमाप घ्यायचे आणि त्यातून नेमकी कोणती माहिती मिळवायची, याचा विचार करावा लागतो. आतापर्यंत ही प्रक्रिया प्रामुख्याने वैज्ञानिकांच्या अनुभव, गणिती ज्ञान आणि कल्पकतेवर अवलंबून होती. मात्र आता कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय या प्रक्रियेत नवी भूमिका बजावत आहे. 'नेचर'मध्ये २ सप्टेंबरला प्रकाशित झालेल्या लेखात एआयच्या मदतीने भौतिकशास्त्रीय प्रयोगांची रचना करण्याच्या या नव्या दिशेचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे.

एआयचा वापर प्रयोगातील एखादा एक-दोन घटक अधिक चांगले करण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. संगणकीय पद्धतींच्या मदतीने प्रयोगाची संपूर्ण मांडणीच नव्याने शोधण्याचा प्रयत्न आता करता येतो. एखाद्या वैज्ञानिक प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आवश्यक असलेल्या उपकरणांची रचना, त्यांची परस्पर मांडणी आणि उपलब्ध साधनांच्या मर्यादा लक्षात घेऊन एआय असंख्य शक्यता तपासू शकते. माणसाला सहज सुचणार नाही अशी रचना त्यातून समोर येऊ शकते. विशेष म्हणजे काही एआय-निर्मित रचनांची कामगिरी मानवी तज्ञांनी तयार केलेल्या रचनांइतकी किंवा त्याहून चांगली ठरू शकते.

या प्रक्रियेत एआयला आधी प्रयोगासाठी उपलब्ध असलेल्या शक्यतांची मोठी यादी तयार करून द्यावी लागते. त्यानंतर प्रयोगाचे संगणकीय अनुकरण करणारी वेगवान आणि विश्वासार्ह प्रणाली आवश्यक असते. वैज्ञानिकांना नेमका कोणता परिणाम हवा आहे, हे संगणकाला मोजता येईल अशा उद्दिष्टात रूपांतरित करावे लागते. त्यानंतर एआय विविध रचनांचा शोध घेते आणि कोणती रचना दिलेल्या उद्दिष्टासाठी अधिक परिणामकारक आहे, हे तपासते. या प्रक्रियेत प्रयोगाची प्रत्यक्ष अंमलबजावणी शक्य आहे का, याचाही विचार करावा लागतो.

क्वांटम भौतिकशास्त्रासह अनेक क्षेत्रांमध्ये अशा स्वयंचलित शोधपद्धतींचे प्रयोग आधीपासून सुरू आहेत. प्रकाशकणांशी संबंधित प्रयोगांची रचना शोधण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या संगणकीय पद्धतींनी यापूर्वी माणसांना वेगळ्या पद्धतीने विचार करायला भाग पाडणा-या प्रयोगरचना सुचवल्या आहेत. 'मेल्विन' आणि 'पायथियस'सारख्या प्रणालींनी क्वांटम प्रयोगांच्या विविध शक्यता शोधण्याचा मार्ग दाखवला आहे. आता हीच कल्पना अधिक व्यापक करून विविध प्रकारच्या भौतिकशास्त्रीय प्रयोगांमध्ये वापरण्याची दिशा पुढे येत आहे.

यामागची खरी ताकद म्हणजे एआय एकाच वेळी प्रचंड मोठ्या संख्येने शक्यता तपासू शकते. वैज्ञानिक एखाद्या प्रयोगासाठी काही मोजक्या पर्यायांचा विचार करतात; मात्र संगणकाला शोध घेण्याचे हजारो संभाव्य पर्याय किंवा त्याहून अधिक रचना तपासणे शक्य असते. एखाद्या रचनेत वापरलेले घटक वेगळ्या क्रमाने मांडल्यास काय होईल, एखादे उपकरण काढून टाकल्यास परिणाम कसा बदलेल किंवा अनेक घटक एकत्र वापरल्यास नवा फायदा मिळेल का, यासारख्या शक्यता एआय तपासू शकते.

त्यामुळे वैज्ञानिकांच्या हातात केवळ गणना करणारे साधन नव्हे, तर नव्या प्रयोगांच्या शक्यता शोधणारे सहकारी साधन येऊ शकते.

मात्र एआयने सुचवलेली प्रत्येक रचना प्रत्यक्ष प्रयोगशाळेत वापरता येईलच असे नाही. संगणकाला चांगली वाटणारी रचना प्रत्यक्ष उपकरणे, खर्च, वेळ, उपलब्ध तंत्रज्ञान आणि प्रयोगातील सुरक्षितता यांसारख्या मर्यादांमुळे अव्यवहार्य ठरू शकते. त्याचबरोबर एआयने एखादी रचना का निवडली, हे समजणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे संगणकीय वेग आणि मानवी वैज्ञानिक कौशल्य यांचा समन्वय आवश्यक राहणार आहे.

भविष्यात अधिक शक्तिशाली संगणकीय अनुकरणे आणि विविध वैज्ञानिक उद्दिष्टे एकत्र आल्यास एआयला माणसाच्या पारंपरिक कल्पनाशक्तीच्या पलीकडील प्रयोगरचना शोधता येऊ शकतात. विश्वातील अत्यंत सूक्ष्म कणांपासून ते गुरुत्वाकर्षण, क्वांटम जग आणि अंतराळातील गूढ घटनांपर्यंत अनेक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी याचा उपयोग होऊ शकतो. प्रयोगाची कल्पना माणूस करेल आणि एआय ती तपासेल, या पारंपरिक पद्धतीपासून पुढे जाऊन एआयच माणसाला नवा प्रयोग सुचवेल, अशी वैज्ञानिक संशोधनाची नवी दिशा तयार होत आहे. यामुळे भविष्यात प्रयोगशाळेतील संशोधनाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. वैज्ञानिक एआयच्या सूचनांची पडताळणी करून त्यातील उपयुक्त कल्पना प्रत्यक्ष प्रयोगांत तपासतील आणि नव्या शोधांचा मार्ग अधिक वेगाने खुला होईल.

# 'त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यम्'





**पं. गौरव रवींद्र देशपांडे**

गणेशोत्सवातील विघ्न निवारणाचा अर्थ बाहेरून येणारी विघ्ने दूर होण्यापुरता नाही. काम, क्रोध, लोभ, मत्सर, अहंकार, निर्णय दौर्बल्य आणि अस्थिरता ही खरी 'विघ्ने' आहेत. म्हणून अथर्वशीर्ष 'सर्वत्राधीयानो पविघ्नो भवति' असे सांगते. गणेशाला प्रसन्न करणे म्हणजे बाह्य जग आपल्या इच्छेप्रमाणे घडावे अशी अपेक्षा नसून प्रसंग कोणताही असो, त्यात योग्य निर्णय घेणारी बुद्धी जागृत व्हावी, अशी ती प्रार्थना आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी गणेश बुद्धीचा, गृहस्थांसाठी विवेकाचा, उद्योजकांसाठी योग्य आरंभाचा आणि साधकांसाठी अंतर्मुखतेचा अधिपती ठरतो.

भारतीय धर्मपरंपरेत श्रीगणेश हे मंगल कार्याच्या आरंभी स्मरण केले जाणारे आराध्य दैवत. बुद्धी, विवेक, प्रज्ञा, आरंभशक्ती आणि विघ्नांचे रूपांतर साधनेत करण्याच्या आध्यात्मिक सामर्थ्याचा तो अधिष्ठाता आहे. गणपती अथर्वशीर्षातील 'त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि। त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोसि।।' हे वचन गणेशोपासनेचे तत्त्वज्ञान एका वाक्यात उलगडते. बाह्य मूर्तीच्या पलीकडे जाऊन त्या रूपामध्ये व्यापलेले चैतन्य, ज्ञान आणि विश्वात्मकता अनुभवणे ही या उपासनेची दिशा. पुढे 'त्वं गुणत्रयातीत त्वं मूलाधारस्थितोसि नित्यम्' असे म्हणत गणेशाला योगमार्गातील मूलाधाराधिष्ठित शक्तीशी जोडले आहे. म्हणून गणेशोत्सव हा केवळ सामाजिक उत्सव राहत नाही; अंतकरणातील अव्यवस्था शमवून विवेकाची प्रतिष्ठापना करणारा तो संस्कार ठरतो.

गणेशाचे रूपही तितकेच अर्थगर्भ आहे. अथर्वशीर्षात 'एकदन्तं चतुर्हस्तं पाशमम्कुशधारिणम्। रत्तं लम्बोदरं शूर्पकर्णकं मूषकध्वजम्' असे ध्यान दिले आहे. 'शूर्पकर्ण' म्हणजे सुपासारखे विशाल कान. सार आणि असार यांची निवड करणा?या विवेकाचे प्रतीक. 'लम्बोदर' हे विश्वाला सामावून घेणा-या व्यापकतेचे द्योतक, तर मूषक हा चंचल आणि सूक्ष्म मार्गांनी धावणा?या मनोवृत्तीचा संकेत मानला जातो. पाश आसक्तीवर संयम शिकवतो, अंकुश अनियंत्रित प्रवृत्तींवर नियंत्रण दर्शवतो आणि वरदमुद्रा धर्मयुक्त इच्छांच्या पूर्तीची आशा जागवते. गणेशमूर्तीसमोर बसणे म्हणजे अशा अर्थाने स्वतच्या मन, बुद्धी आणि वृत्तींच्या शोधनाचा संकल्प करणे होय.

भारतीय उपासना पद्धतीत पंचायतनाच्या संकल्पनेलाही महत्त्व आहे. शंकराचार्यप्रणीत स्मार्त परंपरेत गणेश, विष्णू, शिव, सूर्य आणि देवी या पाच देवतांच्या माध्यमातून विश्वातील मूलभूत शक्तींची एकात्मता अनुभवली जाते. अथर्वशीर्षातील 'त्वं भूमिरापोनलोनिलोनभ' हे वचन तर गणेशाला पंचमहाभूतस्वरूप मानते. म्हणूनच गणेशोपासनेचा आशय एका देवतेपुरता मर्यादित राहत नाही. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या संपूर्ण विश्व व्यवस्थेला अधिष्ठान देणा-या तत्त्वाचे पूजन म्हणून त्याचा विस्तार होतो. यादृष्टीने पार्थिव मूर्तीला विशेष अर्थ प्राप्त होतो. मातीला आकार द्यायचा, त्यात देवभाव प्रतिष्ठित करायचा आणि अखेरीस पुन्हा तिचे तत्त्वात विलयन करायचे. सृष्टी, स्थिती आणि लय यांचा हा प्रत्यक्ष अनुभव.

प्राणप्रतिष्ठेच्या वेळी मूर्ती 'देव' बनते, असे सरधोपटपणे म्हणण्यापेक्षा मंत्र, न्यास, आवाहन आणि संकल्प यांच्या सहाय्याने उपासक त्या मूर्तीत आपल्या आराध्य देवतेची सन्निधी स्वीकारतो, असे म्हणणे अधिक अचूक ठरेल. 'त्वमेव केवलं कर्तासि। त्वमेव केवलं धर्तासि । त्वमेव केवलं हर्तासि' या अथर्वशीर्ष वचनातून सृष्टीची उत्पत्ती, धारण आणि लय या तिन्ही शक्ती गणेशतत्त्वात एकवटलेल्या आहेत, असा भाव व्यक्त होतो. प्रतिष्ठापनेच्या क्षणी म्हणूनच बाह्य विधीइतकीच अंतकरणातील श्रद्धा, शूचिता आणि एकाग्रता आवश्यक ठरते.

भाद्रपद शुक्ल चतुर्थीचे सिद्धिविनायक व्रत हे या उपासनेचे प्रधान पव. 'तिथी निर्णयात गणेशव्रतासाठी मध्यान्हव्यापिनी चतुर्थीला विशेष महत्त्व आहे. बृहस्पती वचन उद्धृत करताना निबंध ग्रंथ म्हणतात,

***'चतुर्थी गणनाथस्य***
***मातृविद्धा प्रशस्यते ।***
***मध्यान्हव्यापिनी चेत्स्यात्***
***परतश्चेत् परेहनि।।'***

तसेच गणपती कल्पातील 'प्रात शुलतिलैः स्नात्वा मध्यान्हे पूजयेद् नृप!' हे वचन पूजेचा कर्मकाल स्पष्ट करते.

प्राणप्रतिष्ठेचा उपलब्ध काल आणि मुख्य चतुर्थीपूजेचा कर्मकाल हे दोन स्वतंत्र विषय आहेत. यंदा हरतालिका व्रत आणि गणेश चतुर्थी एकाच दिवशी येत असल्याने 'आधी कोणते पूजन?' असा प्रश्न अनेकांना पडतो. प्रत्यक्षात या दोन्ही स्वतंत्र व्रतकर्मांचा अनिवार्य पूर्वापरक्रम शास्त्राने सांगितलेला नाही. हरतालिका विधीत 'तत्र प्रात उमामहेश्वरमूर्तिं पीठे संस्थाप्य पूजयेत' असे स्पष्टपणे 'प्रात' पूजन सांगितले आहे; तर गणेश व्रताचा मुख्य कर्मकाल मध्यान्ह आहे. म्हणून व्यवहारत सूर्योदयानंतर प्रातकाळातील साधारण दोन तासांत हरतालिका पूजन करावे आणि त्यानंतर गणेशाची प्राणप्रतिष्ठा करावी, ही सुबोध व्यवस्था आहे. परिस्थितीनुसार गणेश प्रतिष्ठा आधी झाली तरी हरतालिका व्रताचा भंग होत नाही. महत्त्वाचे एवढेच की, हरतालिका प्रातकालात आणि विशेष गणेश पूजन मध्यान्ह काली व्हावे.

पूजेत आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, तांबूल, नमस्कार इत्यादी उपचारांनी देवतेचे सन्मानपूर्वक पूजन केले जाते. गणेशासाठी लाल पुष्प, विशेषत जास्वंद तसेच दूर्वांना विशेष स्थान आहे. तुळस गणेशपूजेत सामान्यत वर्ज्य मानली जाते. अथर्वशीर्षातील 'यो दूर्वांकुरैर्यजति स वैश्रवणोपमो भवति' हे वचन दूर्वार्पणाचे महत्त्व अधोरेखित करते. परंपरेने २१ दूर्वांकुर अर्पण केले जातात. २१ ही संख्या गणेशोपासनेतील पूर्णत्वाची संख्या मानली जाते. दूर्वांची हिरवी, शीतल आणि पुनरुत्पादक वृत्ती साधकाला सहनशीलता, सातत्य आणि जीवनशक्तीचा संदेश देते.

गणेशपूजेत उपचारांची संख्या हे भक्तीचे मोजमाप नसले तरी विधीची रचना अत्यंत विचारपूर्वक झालेली आहे. आवाहन म्हणजे मनाला देवाभिमुख करणे; आसन म्हणजे चित्ताला स्थैर्य देणे; स्नान आणि वस्त्र शूचितेचे, गंधपुष्प सौंदर्य व सद्गुणांचे, दीप ज्ञानाचे आणि नैवेद्य कृतज्ञतेचे प्रतीक आहेत. षोडशोपचारे पूजा म्हणूनच यांत्रिक न होता अर्थबोधपूर्वक झाली पाहिजे. पूजेच्या शेवटी प्रदक्षिणा, नमस्कार, आरती आणि मंत्रपुष्पांजली करताना 'मी'पणाचा आग्रह कमी करून सर्व कर्म ईश्वरार्पण करण्याची वृत्ती जागवणे हेच तिचे अंतरंग. गणेशोत्सवाच्या दिवशी शक्य असल्यास गणपत्यथर्वशीर्ष, गणेश स्तोत्रे अथवा नामावलीचे पठण करणे ही या उपासनेची सहज आणि शास्त्रानुकूल वृद्धी ठरते.

नैवेद्य म्हणजे केवळ भोजनाचे देवापुढे ठेवलेले ताट नव्हे. त्यामागे 'निवेदन' या भावनेचा संस्कार आहे. कालिकापुराणात

***निवेदनीयं यद् द्रव्यं प्रशस्तं***
***प्रयतं तथा।***
***तद्भक्ष्याद्यं पञ्चविधं***
***नैवेद्यमिति गद्यते ।***
***भक्ष्यं भोज्यं च लेह्यं च***
***पेयं चोष्यं च पञ्चमम् ।।***

असे पंचविध नैवेद्य सांगितले आहेत. गणेशाला मोदक प्रिय मानण्यामागेही प्राचीन आधार आहे. 'यो मोदकसहस्रेण यजति स वाञ्छितफलमवाप्नोति' असे अथर्वशीर्ष सांगते. त्यामुळे मोदक, लाडू, गूळ-खोबरे, खीर, फळे इत्यादी शुद्ध, सात्त्विक आणि आपल्या सामर्थ्यानुसार तयार केलेले पदार्थ भावपूर्वक अर्पण करावेत. नैवेद्याचा केंद्रबिंदू पदार्थांची संख्या नसून 'प्रथम तुझे, नंतर माझे' ही प्रसादबुद्धी आहे.

गणेशोत्सवातील विघ्न निवारणाचा अर्थ बाहेरून येणारी विघ्ने दूर होण्यापुरता नाही. काम, क्रोध, लोभ, मत्सर, अहंकार, निर्णय दौर्बल्य आणि अस्थिरता ही खरी 'विघ्ने' आहेत. म्हणून अथर्वशीर्ष 'सर्वत्राधीयानोपविघ्नो भवति' असे सांगते. गणेशाला प्रसन्न करणे म्हणजे बाह्य जग आपल्या इच्छेप्रमाणे घडावे अशी अपेक्षा नसून प्रसंग कोणताही असो, त्यात योग्य निर्णय घेणारी बुद्धी जागृत व्हावी, अशी ती प्रार्थना आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी गणेश बुद्धीचा, गृहस्थांसाठी विवेकाचा, उद्योजकांसाठी योग्य आरंभाचा आणि साधकांसाठी अंतर्मुखतेचा अधिपती ठरतो.

पार्थिव गणेशमूर्तीचे विसर्जन हे त्यामागील तत्त्वज्ञानाची परिपूर्णता आहे. मातीपासून आलेले रूप काही दिवस भक्तिभावाने पुजले जाते आणि पुन्हा जलतत्त्वात विलीन होते. सामान्य देवविसर्जनमंत्रातष्ठ

***यान्तु देवगणाः सर्वे***
***प्रूजामादाय मामकीम् ।***
***इष्टकामसमृद्ध्यर्थं***
***पुनरागमनाय च ।।***

अशी प्रार्थना आहे. देवत्व नष्ट होत नाही; उपासनेचे साकार रूप निरोप घेते आणि त्यामागील तत्त्व अंतकरणात राहते. विसर्जन म्हणूनच श्रद्धेने, पर्यावरणपूरक रीतीने आणि शक्यतो शुद्ध जलात करावे. गणेशोत्सवाचा अंतिम संदेश याहून वेगळा नाही. गणपतीला घरात प्रतिष्ठापित करण्यापेक्षा गणेशतत्त्वाला बुद्धीत प्रतिष्ठापित करणे श्रेष्ठ. विशाल कानांनी सद्विचार ऐकणे, शूर्पकर्णासारख्या विवेकाने सार-असार वेगळे करणे, पाशाने आसक्ती आवरणे, अंकुशाने प्रवृत्ती नियंत्रित करणे, दूर्वांसारखे पुन्हा उभे राहणे, नैवेद्याने कृतज्ञता शिकणे आणि विसर्जनातून अनित्यता स्वीकारणे हीच श्रीगणेशोपासनेची खरी फलश्रुती. अशी उपासना झाली तर गणेशोत्सव हा संपूर्ण जीवनाला दिशा देणारा आध्यात्मिक संस्कार ठरतो.